म. ग्रं. सं. ठाणें

लेखक

सन

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

इतिहास

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

(ठाणे जिल्हा वाचनालय) वाचनालय / संदर्भ / नौपाडा

सन १८७९

# भाऊसाहेबांची बखर

लेखक - काशीनाथ नारायण साने.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

जुनी मासिके (संदर्भ)

[ काव्येतिहास-संग्रह. ]

२

# भाऊ साहेबांची बखर.

ही अनेक प्रतींवरून शुद्ध करून अर्थनिर्णायक व अवांतर
माहितीच्या विपुल टीपांसह

काशिनाथ नारायण साने, बी. ए.

यांणीं

प्रकाशित केली.

" हतोवा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् "

भगवद्गीता.

पुणें येथें

'श्री शिवाजी' छापखान्यांत छापिली.

डिसेंबर १८७९.

श्री

महाराष्ट्राच्या इतिहासाच्या व भाषेचा आस्था-
पूर्वक अभ्यास करूं पाहणाऱ्या स-
ज्जनांस हा ग्रंथ परम
प्रीतीनें अर्पण
करितों.

ग्रंथ-प्रकाशक.

# भाऊसाहेबांची बखर.

## उपोद्घात.

१. पाणिपत येथें स० इ० १७६१ सालीं जें मराठ्यांचें आफगान लोकांशीं युद्ध झालें त्याच्या हकीगतीच्या ५।६ बखरी आह्मांजवळ आहेत ह्मणून पूर्वींच आह्मीं कळविलें आहे. यां पैकीं दोन बखरी ताडून पहातां त्या एकाच ग्रंथाच्या निरनिराळ्या प्रती आहेत असें कळून आलें. ह्या ग्रंथ प्रसिद्ध करण्याचा आह्मीं विचार केला आहे. ह्या लढाईच्या हकीकतीचे ५।६ ग्रंथ उपलब्ध असतां हाच प्रथमतः छापण्याचीं कारणें अशीं. एक तर खुद या घोर युद्धाची जशी तपशीलवार हकीगत इतर बखरींत दिली आहे, तशी—कदाचित् जास्तही—ह्या बखरींत असून, ह्या लढाईचा प्रसंग कसा आला, तिचीं उत्पादकें काय काय झालीं, इत्यादि पूर्व स्थितीचें निरूपण ही हींत केलें आहे. येणें करून खुद्द युद्धप्रसंगाचें वर्णन अधिक विशद झालें आहे. दुसरें, ह्या बखरींतील हकीगत केवळ हिशेबी तऱ्हेनें न लिहितां दिलेला वृत्तांत फार मनोवेधक रीतीनें लिहिला आहे. तेव्हां भाषेच्या संबंधानें पहातांही हिलाच पहिला मान योग्य आहे. तिसरें, आह्मांस या ग्रंथाच्या २ प्रती मिळाल्यामुळें त्रुटित पत्रें व दुर्बोध अक्षरें इत्यादि अर्थनिर्णयाला येणाऱ्या अडचणी ह्या बखरीच्या संबंधानें पुष्कळ अंशीं जशा दूर झाल्या आहत, तशा दुसऱ्या बखरींच्या संबंधें अद्याप झाल्या नाहींत.

२. ह्या ग्रंथाची एक प्रत रत्नागिरि येथें एका जुनाट व टाकाऊ दफ्तरांत आह्मांस मिळाली. ही लिहिणाराचें अक्षर आधीं नीट नाहीं. खेरीज ज्या मूळ प्रतीवरून त्याणें ती उतरली, ती मूळप्रत त्यास नीट लागली असें ही वाटत नाहीं. तेव्हां अर्थात् पुष्कळ ठिकाणीं ही प्रत आह्मांस दुर्बोध झाली. तिच्या मूळ प्रतीचा शोध करितां ती राजापुराजवळ धोपेश्वरीं रा० रा० कृष्णाजीपंत निफाडकर यांजपाशीं आहे, असें त्यांच्याकडूनच आह्मांस कळलें. पुढें आह्मीं मागितल्यावरून त्यांणीं ती आह्मांस देण्याचें कबूलही केलें होतें; पण त्यांजकडून ती प्रत न आल्यामुळें मिळालेली प्रत तेव्हां एकीकडे ठेऊन दिली.*

* ही मूळप्रत कोणीं राजापुरकर मित्रांनीं | मिळवून देण्याचें श्रय घेतल्यास फार बरें होईल.

मिळालेली प्रत अव्वल पासून अखेर पर्यंत सबंध आहे. ती उभ्या फ्रेंच बंदांवर एका बाजूनें लिहीत लिहीत १०९ बंद पर्यंत नेली आहे व नंतर कल्याण येथील पेशव्यांचे बखरीच्या प्रतीप्रमाणें १०९ व्या बंदापासून पाठीवर लिहीत लिहीत २९ व्या बंदाच्या पाठीवर संपविली आहे. विष्णु बापूजी निफाडकर धोपेश्वरकर ( रा. रा. कृष्णाजीपंत यांचे बंधु ) यांणीं शके १७८१, सिद्धार्थीनाम संवत्सरीं, ही प्रत केली. हिची मुळ, प्रत धोपेश्वरीं आहे ह्मणून हीस 'धोपेश्वरची' असेंच आह्मी ह्मणूं.

पुढें कांहीं महिन्यांनीं आमच्या एका पुणेंकर मित्रानें एका वाण्याच्या दुकानांतून पाणिपतची बखर मिळवून दिली. ती वाचून पाहतां धोपेश्वरच्या प्रतीशीं मिळूं लागली. ही 'पुण्याची' प्रत सुवाच्य अक्षरांनीं जुनरी कागदांवर एका बाजूनें २०९ बंदावर लिहिली आहे. पैकीं पहिले २ व शेवटील १ असे ३ बंद गहाळ झाले आहेत. त्यामुळें ही बखर कोठें, कोणीं व केव्हां लिहिली वगैरे मागमूस लावावयाचा तो लावितां येत नाहीं. तरी ही प्रत बरीच जुनी असावी असें तिच्या अक्षरावरून व कागदावरून दिसतें. असो, ही प्रत मिळाल्यामुळें धोपेश्वरची प्रत तिच्या दुर्बोधत्वांस्तव अगदीं बांधून ठेवावी लागली होती ती हिच्या साहाय्यानें पुष्कळ सुबोध झाली हा मोठा लाभ झाला.

ह्या बखरीच्या आणखीही प्रती कोठें मिळाल्यास आह्मांस पाहिजेच आहेत. एका प्रतीच्या शोधांत आह्मी होतों. ती प्रत वैजनाथ येथें कै० विष्णुपंत केतकर यांजपाशीं होती असें स्मरतें. पण तिचा छडा अद्याप लागला नाहीं. त्यांच्या चिरंजिवांनीं ह्या प्रतीचा शोध लाविल्यास मोठा उपयोग होईल. धोपेश्वरच्या प्रती विषयीं वर आह्मीं सूचविलें आहेच.

३. 'पेशव्यांची बखर' छापण्याचे पुर्वीं आह्मीं मूळग्रंथांत वाक्यरचनेच्या संबंधें व्याकरणरीत्या कांहीं फेरफार करूं ह्मणून लिहिलें होतें व त्या प्रमाणें ते अंशतः चालूही आहेत; पण तसें करणें सर्वथैव इष्ट नाहीं अशी कित्येक मित्रांची सूचना झाल्यावरून व ह्या ग्रंथीं तसें करण्याची फारशी अवश्यकता ही दिसत नसल्यावरून तो क्रम आह्मी सोडून देणार आहों.

४. आतां ह्या बखरींत वृत्तांत कोठपासून कोठपर्यंत आहे तें थोडक्यांत येथें सांगतों. श्री० रघुनाथराव दादासाहेब यांणीं इ० स० १७५४।५५ सालीं हिंदुस्थानांत स्वारी केली तींत सुरजमल्ल जाट यास कुंभेरीचे किल्ल्यांत कोंडिलें, हा ह्या ग्रंथाचा आरंभ असून, जयापा शिंदे यांनी

वाडांतील स्वारी, दिल्लीचे पादशहानें व त्याच्या जनानखान्यांतील स्त्रियांनीं नजीब उद्दवला याचे मार्फत अबदालींशीं मदतीचें संधान लाविलें तो प्रकार, अबदालीची स्वारी, शिंदे व होळकर यांचा मोड, श्री० भाऊसाहेब यांची अबदालीवर स्वारी व शेवटील युद्ध, अशीं प्रकरणें अनुक्रमानें वर्णन करून, श्री० नानासाहेब यांच्या मृत्युपर्यंत आणून ही बखर संपविली आहे.

याजवरून इ० स० १७५४ पासून १७६१ पर्यंत ६।७ वर्षांत–ह्मणजे ज्या काळीं हिंदुस्थानांत मराठे लोकांचा जिकडे तिकडे दरारा बसून, त्यांचे उत्कर्षाची पराकाष्ठा होऊन शेवटीं अपकर्ष झाला, त्या काळीं–ह्या मराठे लोकांनीं त्या देशीं राज्यप्रकरणीं ज्या ज्या मोठमोठ्या उलाढाली केल्या त्यांची हकीगत हींत दिली आहे, असें सहज ध्यानांत येईल.

५. वरील कलमावरून ह्या ग्रंथास "शालिवान शके १६७६।७७ पासून शके १६८३ पर्यंत हिंदुस्थानांत मराठ्यांनीं ज्या स्वाऱ्या केल्या त्या स्वाऱ्यांची बखर," असें कांहीं तरी नांव देणें योग्य दिसतें. आम्ही तर "पाणिपतची बखर," असेंच नांव देणार होतों. पण पुणें येथील प्रतींच्या कांहीं बंदांचे डोकीवर "भाऊसाहेबांची बखर" असें लिहिलेलें आहे. शिवाय शेवटील प्रसंगाचा अति निकट संबंध श्री० सदाशिवराव भाऊ यांचे शीच आहे. अशा करितां 'भाऊसाहेबाची बखर,' हेंच या ग्रंथाचें नांव कायम करून आम्ही तो प्रसिद्ध करितों.

# भाऊसाहेबांची बखर.

## श्रीगजानन.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री व्यंकापा* नाईक
दिलनूरकर कसबा बालापूर स्वामींचे सेवेशीं:—

पोष्य कृष्णाजी शामराव मुक्काम दम [?] दिल्ली इंद्रप्रस्थ. कृतानेक साष्टांगनमस्कार. विज्ञापना ऐसीजे. स्वामींनीं कृपा करून पत्र पाठविलें तेथ आज्ञा केलीकीं हिंदुस्थानांतील आद्यंत वर्तमान, प्याद्याचा फर्जी नजीबखान रोहिला होऊन दक्षिण देशीं हिंदुपद श्री राजा शाहू छत्रपति यांचा मुख्य प्रधान आदि करून सवालक्ष फौजेनिशीं भाऊगर्दी[†] होऊन प्यादेमात कशी झाली, हें सविस्तर ल्याहावें ह्मणोन आज्ञा. ऐशियास, महाराज [ यांणीं ] राजश्री बाळाजी पंडित प्रधान यांचे मस्तकीं हात ठेविला कीं, "तुह्मीं माझे पश्चात् स्वधर्मन्यायें समुद्र वलयांकित पृथ्वीचें आक्रमून प्रतापें राज्य चालवावें." ह्मणोन शिक्केकटार दिली.

नंतर आशीर्वादें करून दिवसें दिवस विजेच्या चंद्रमाप्रमाणें चढते कळें राज्य करीत असतां, पुढें विनाशकाळें येणार भविष्य आलें. तेव्हां कलह लागण्यास कारण झालेंकीं, राजश्री रघुनाथराव दादासाहेब, प्रथम स्वारी, हिंदुस्थानाचे मोहिमेस पाठविले. त्यां समागमें राजश्री मल्हारराव होळकर व जयाजी शिंदे व विठ्ठल शिवदेव व अंताजी माणकेश्वर व गोविंदपंत बुंदेले व यशवंतराव पवार वगैरे मोठमोठे उमराव, लहान थोर सरदार, पाऊ-

* हे सोरापुरचे जहागीरदार असावे.

१. प्यादा, फर्जी ( वजीर ), प्यादेमात ह्या शद्बांनीं साधलेला अलंकार बुद्धिबळें खेळणारांस सहज समजेल.

२. नजीब उद्दवला हा एक रोहिला सरदार होता तो 'प्याद्याचा फर्जी' कसा झाला हें पुढें स्पष्ट होईलच. हा इ० स० १७७० चे सुमारास मृत्यु पावला. १७५४, ५५ पासून तों १७७० पर्यंत तो दिल्लीच्या दरबारीं प्रमुख उमरावांत मोडत असे.

रोहिले लोकांची उत्पति अशी. एका आफगानानें एका अहीर जातीच्या मुलास दत्तक घेऊन त्याचें नांव अली महमदखान रोहिला असें ठेविलें. हा अली महंमदखान रोहिला पुढें मुरादाबाद येथील अधिकाऱ्याचे नोकरीस आफगान स्वारांचें पथक घेऊन राहिला. नंतर त्याणें जास्ती सरकार दस्त देण्याचा बहाणा करून बराच मुलुख आपणाकडे घेतला. पुढें महंमदशाहाच्या कारकीर्दींत त्याणें बंड करून पातशाही फौजेस दाद न देतां तो मुलुख बळकाविला व त्या मुलुखाच्या जहागिरीच्या सनदा पातशहापासून मिळविल्या (१७७१) ह्या अली महंमद रोहिल्यावरून त्याच्या हाताखालच्या आफगान लोकांस 'रोहिले' हें नांव पडलें. ह्यांचा मुलुख, रोहिलखंड, भागीरथी व रामगंगा ह्यांमधील प्रदेशांत मोडतो.

† 'भाऊंशीं गर्दी' किंवा 'भाऊंशी गर्द' असें बखरींत आहे.

३ इ० स० १७५४।५५ साली.

ण लक्ष फौजेनिशीं हिंदुस्थानांत रवाना केले. ते मजल दर मजल निघोन नर्मदा पार झाले. आणखी का ले चा द वा डा रा [ ? ] खेचीवाडा बुंदी, कोट व राजगड व पाटण व उदेपूर व जनगड व नरवार व ग्वालेरी व झांशी व कालपी अशा खंडण्या घेत ढोलपुरचे माथां पार झाले. तों पुढें सुरजमल्ल⁴ जाटाचा मुलुख लागला. ते समयीं सुरजमल्ल जाट याजकडील वकील रूपराम चौधारी येऊन राजश्री रघुनाथराव दादासाहेब यांशीं भेटले आणि खंडणीचा मजकूर बोलूं लागले. तों दादासाहेब यांची दृष्टि थोर झाली. जिवान माफ [ ! ] खंडणी घेईनात. क्रोड रुपये एक खंडणी मागों लागले. वकील याचें बोलणें मिदान चाळीस लक्ष रुपये पर्यंत जाहालें. तें दादासाहेब यांणीं न ऐकतां कूच करून कुंभेरीचे रोखें चालिले.

मग रूपराम चौधारी याणें सुरजमल्ल जाट यास वर्तमान येऊन सांगितलें कीं, " पेशवे ऐकत नाहींत ; एक क्रोड रुपये खंडणी मागतात. " तेव्हां सुरजमल्ल जाट तो ही द्रव्यबळें, फौजबळें चांगला सामर्थ्यवान् होता. वरकड किल्ले भरतपूर, डीग व रामगड व कळवणदुर्ग हे असाध्य यांचा बंदोबस्त करून आपण खासा *कुंभेरींत बळ बांधोन् राहिला. आणि

---

४. जाटलोक मुलतान प्रांताहून दिल्लीकडील मुलुखांत आले व तेथें वसाहात करून राहिले. त्याचा धंदा शेतकीचा होता. पुढें औरंगजेब पातशहा मृत्यु पावल्या नंतर त्याच्या मुलांमध्यें आपआपसांत लढाई सुरू झाली, त्या संधींत जाटलोकांनीं आपला मुख्य जो चूडामणि त्याच्या सल्यानें आपले गांवास किल्ले बांधिले व लुटालूट करून आपल्यास 'कजाग' असें नांव पाडून घेतलें. पुढें दिल्लीचे कारभारी सय्यद यांच्या आज्ञेवरून जयपूरचा सवाई जयसिंग याणें त्यांजवर हल्ला केला. परंतु जाटांनीं मोठा नेट धरून आपल्या किल्यांत आपला मोठ्या कुशळतेनें बचाव केला व जयसिंगाचें कांहीं चालूं दिलें नाहीं. पुढें चूडामणीचा भाऊ बदनसिंग हा (आपणांस चूडामणीनें कैदेंत ठेविलें होतें या द्वेषानें ) जयसिंगास सामील झाला आणि पुन्हा लढाई जाटांशीं करावी म्हणून जयसिंगाचें मन त्याणें वळविलें. या वेळीं चूडामणि व त्याचा मुलगा यांस पळून आपला बचाव करावा लागला. पुढें जयसिंगानें डीग मुक्कामीं बदनसिंगास राज्याभिषेक केला. बदनसिंगास मुलें पुष्कळ होतीं पैकीं वडील सुरजमल्ल यास त्याणें आपलें राज्य दिलें. पुढें १७६४ मध्यें सुरजमल्लानें दिल्लीपर्यंत स्वारी केली. तेव्हा एके दिवशीं शिकारीस गेला असतां तो बलूची घोडेस्वाराच्या टोळीच्या दृष्टीस पडला. त्या स्वारांनीं त्यास तेथें मारिलें. (कर्नल टॉड्, राजस्थान.)

* कुंभेरी भरतपुराच्या वायव्येस आहे. ह्या कुंभेरीचे वेढ्याबद्दल इंग्रजी ग्रंथांत कोठें कांहीं लिहिलेलें आढळत नाहीं. जाटांच्या प्रसिद्ध किल्यांचीं नांवें दिलीं आहेत त्यांत कुंभेरीचें नांव ही कोठें आढळत नाहीं. भरतपुरास मराठे व ग्याजुउद्दीन यांनीं १७५४ सालीं वेढा घातला. पण सुराजमल्ल याणें या किल्याचा बंदोबस्त मोठ्या चतुराईनें ठेवून त्यांस दाद दिली नाहीं. शेवटीं फार जेरीस आल्यावर त्याणें ७ लक्ष रुपये देऊं करून मराठ्यांशीं सल्ला केला. असें ग्रांट्डफ् म्हणतात. या वेळीं मराठेसरदार शिंदे व होळकर हेच फक्त होते असें त्याचें म्हणणें आहे.

राजश्री दादासाहेब यांस उत्तर सांगोन पाठविलें कीं, "चाळीस लक्ष रुपये देतों ते घेण्यांत यावे. नाहीं तरि युद्धास उभे रहावें." ह्मणोन पांच गोळ्या व दारू पाठविली.

त्या समयीं राजश्री रघुनाथदादा यांस विषाद येऊन कुंभेरीस मोर्चे लाविले. तमाम जिकडील तिकडे मोर्चेबंदी वांटून दिली. मोर्चे काईम झाले. परस्परें तोफा वहस्तनाला व सुतरनाला व जेजाला [यांचे व] बंदुकीचे व बाणांचे मार होऊं लागले. असें करितां आठपंधरा दिवस झाले. दादासाहेब आपले भरावर गेले. तो दुर्ग असाध्य, *सलावत. मोर्चे चालवून सुरुंग लावावे तरि रान रेतीचें. सुरुंगास यत्न नाहीं. तोफ नीच धरली तर गोळा रेतींत जातो. वर धरली तरि गोळा कुंभेरीचे पार होऊन यांज कडीलच दुसरे मोर्च्यांतील मनुष्यें जायां होतात. असें संकट प्राप्त झालें. मोहोरा इरेस[५] पडला. आंतून कोणी सल्यास येईनात. असा समग्र दीड महिना झाला.

तों एके दिवशीं राजश्री मल्हारराव होळकर यांचा पुत्र, खंडेराव होळकर, केवळ बेहुष होता; त्याची आयुष्य-मर्यादा सरली ह्मणोन त्यांस मुंगीस पक्ष फुटतात तसा प्रकार झाला. भोजन करून मोर्चियांत निशाणापाशीं आला तों एकाएकींच प्रळय-वीज पडते तसें होऊन, जेजालेची गोळी अकस्मात् लागून मोर्च्यांत ठार झाला. शुभ्रवर्ण चक्षु होऊन प्राणत्याग झाला. हें वर्तमान मल्हारराव यास कळतांच घावरा झाला. त्यास पुत्र तेवढाच. पुत्र पडतांच, त्याची गती अशी झाली हें जाणोन, मल्हारराव यास असें झालें कीं, पर्वत मस्तकीं कोसळतो किंवा अंगावर विद्युल्लता पडते. तसें होऊन देहभान विसरला. तेव्हां राजश्री रघुनाथराव व आणखी लहान थोर सरदार येऊन, ब्रह्मज्ञान व कांहीं हिमतीच्या गोष्टी सांगोन, क्षणभर शांत करून, मोर्च्यांतून शव आणून त्यास यथाविधी दहन सार्थक केलें. तेरा दिवस उत्तर कार्य होऊन दानधर्म ही चांगलाच झाला. पुत्र-शोकाचा विषाद मल्हारराव यास येऊन प्रतिज्ञा करित झाला कीं, "सुरजमल्ल याचा शिरच्छेद करीन व कुंभेरीची माती यमुनेंत टाकीन, तरीच जन्मास आल्याचें सार्थक. नाहीं तर प्राणत्याग करीन." ह्मणोन दातानें ओंठ चावून दुराग्रहास प्रवर्तला.

हें वर्तमान वकील याणें सुरजमल्ल जाट यास श्रुत केलें कीं, "मल्हार-

---

* सलावत=सलामत=सुरक्षीत.

५. इरेसपडणें=अभिमानीं गुंतणें. अव-रुस्यातर कोणतें एक कृत्य नेटानें करणें. (मागें टीप १ पहा.)

राव याचा एकुलता एक पुत्र होता तो निधान पावला. त्या विषादें करून शपतपूर्वक प्रतिज्ञा केली कीं, ‘ जाटाचा वंश निर्मूळ करीन, कुंभेरी खाणून यमुनेंत टाकीन. तरीच बापाचे पोटीं जन्म घेतला. ’ ” असें वकिलाचे मुखें वर्तमान ऐकतांच त्यासही मल्हारराव याची मर्जी ठावकीच होती कीं, “ मल्हारराव जें बोलेल तें करील. यांत संदेह नाहीं. ” [ जाटानें विचार केला,] “तीन महिने झाले. लढाई होतच आहे. आतां आह्मांस हिंदुस्थानांत आश्रय कोणाचा नाहीं. आम्हीं कोणाचे बळावर हिंमत बांधावी ? आता गनीम मागतील ते रुपये द्यावे किंवा बायका मुलें यांचा त्याग करून चालून घेऊन मरावें. याचा *मजकूर काय करावा ? गावांतील सरंजाम दाणा, तूप व मीठ व तंबाकु व दारू गोळी सरलीं यास यत्न काय करावा ? ” ह्मणोन लहान थोर सरदार व रूपराम कटारी बाहेरील [ बलाविले ] व राणिवसांतील हंणसया ह्मणोन त्याची ज्येष्ठ स्त्री परम चतुर व सुशील होती. रूपराम व ती स्त्री एकत्र होऊन मनसुभा केला कीं, “ गोष्ट तो साधेना, मसलत सुचेना, प्राणाचा समय गुदरला. ” असें ह्मणतांच हणसया हिणें जाबसाल केला कीं, “यास यत्न एक आहे. दुसरी यत्नास दृष्ट पोंचत नाहीं. राजश्री जयाजी शिंदे यांचा आणि तुमचा स्नेह आहे. तेही सत्क्रियावान् एक वचनी आहेत. त्यांस ‡साह्य केलियास तुमचा तरणोपाय आहे. नाहीं तरि दुसरा विचार मनसबियांत येत नाहीं. ”

हें ऐकून मसलत सर्वांचे ध्यानांत आली. ह्याच निश्चय करून रूपराम कटारी याचा पुत्र तेजराम याजसमागमें पत्र व सुरजमल्ल याचे शीरची पगडी असे रात्रौ [ पाठविला तो ] राजश्री जयाजी शिंदे यांचे डेरियास

---

६. मर्जी=स्वभाव.

७. गनीम=राजाचा शत्रु. सर्व लोकांचा शत्रु. मराठे लोकास हिंदुस्थानीं सर्व प्रांतींचे लोक गनीम म्हणूं लागले होते यावरून तेथें त्यांचा दरारा किती बसला होता हें ध्यानांत येईल. दुसरे देशाचे लोक त्यांस गनीम म्हणोत पण स्वतः मराठे लोकही आपणास ‘ गनीम ’ हें नांव घेण्यांत प्रतिष्ठा मानीत असें पुढें कळून येईल.

८. ‘ पुण्याचे ’ प्रतीचापाठ ‘ यांची शंका करून ’ असा आहे. ‘ शंका ’ याबद्दल ‘सीमा’ (=प्राणांत) असें असावेंसें वाटतें.

* मजकूर=तजवीज, वेत.

९. हणसया=अनसूया. मारवाडी व जाट लोकांत ‘ अ ’ वगैरे स्वरांचा उच्चार नीट करतां येत नाहीं. ‘ अ ’ च्या ठिकाणीं ‘ ह ’ व ‘ आ ’ च्या ठिकाणीं ‘ हा ’ इ० असे उच्चार करतात. हाप्पा=आप्पा.

‡ साह्य.

† पसंत पडली.

येऊन, केवळ आजीनें[10] होऊन बोलला कीं, " आजचे समयीं तुम्ही वडील बंधु आणि मी धाकटा बंधु आहें. कळेल त्या रीतीनें बचाव करावा." ह्मणोन वकिलानें समागमें जाटाचे शीरची पगडी आणिली होती ती शिंदे यांचे डोकीस घातली आणि त्यांची पगडी आपणापाशीं घेतली. उत्तर केलें कीं, " बहादर की शरम पार पाडिवे.[11]" असें ऐकून जयाजी शिंदे यांणीं निर्वाण समय पाहिला आणि चित्तांत विचार केला कीं, " याचा पक्ष धरावा तरि स्वामिद्रोह पदरीं पडतो आणि मित्रद्रोह [ ही ] पडतो. एकीकडून आड व एकीकडून विहिर; दुतर्फा मरण सारखें. हिंदुस्थान तील स्वधर्म कीं, पगडीभाई झाल्यावर पोटचें द्यावें पण पाठीचें देऊं नये; त्यास रक्षावें. इकडून असा प्रकार. आणि हाच पक्ष धरावा तरि सेवाचार [ बुडतो. ] दोनीही संकटें." यांतून सबळ निर्बळ पक्ष कोणता ह्मणोन चौघे मातबर जिवाळियाचे मुत्सद्दी होते त्यांस विचारणा केली. चौघांनीं सबळ निर्बळ पक्ष जाणोन, "शरण आलियाचा अंगीकार करावा, शरण येईल त्यास मरण चिंतूं नये, असें धर्मशास्त्रीं वाक्य प्रमाण सबळपक्षीं होणेंच आहे," असें सांगितलें. हें ऐकून पुढील होणार भवितव्य ग्रहकलह-मधाचें बोट लागावयास कारण हेंच जाहालें—जयाजी शिंदे केवळ साभिमानी ह्मच अंगीकार करून आपली पगडी व बेलभंडार व अभयपत्र[12] आंत पाठविलें. सुरजमल्ल जाट यास याप्रमाणें वर्तमान कळतांच पुनर्जन्म [ झाला ] असें भासलें. दुप्पट हिंमत चढली.

हें वर्तमान कानोपकानीं मल्हारराव यांणीं ऐकून, परम विषाद येऊन रघुनाथराव दादा यांस एकांतीं सुचविलें कीं, " आमचे अस्तनींतच अग्न आणि जाट हस्तगत कसा होतो? जाट व शिंदे पगडीभाई जाहाले आतां जाट साध्य कसा होतो?" ह्मणोन चढावून[13] आपले डेरियास गेले. रघुनाथराव आणि सखारामबापू यांणीं मसलत केली कीं. "शिंदे केवळ एकनिष्ठ भीम, अर्जुन ध्यानांत आणिले, असें असतां त्यांजकडून हा प्रसंग घडला. यास उपाय काय करावा? यास मसलत कोणती ?" सखारामबापू केवळ निधडे[14] मनसुबेवान यांणीं उत्तर केलें, "शिंदे यांजकडून अशी गोष्ट घडावयाची नाहीं.

---

१०. आजीन=आजीस=गरीब, लाचार

११. शूराची अबरू राखावी.

१२. झा०किल्यांत.

१३. चढावून=रागानें, गुरकींत,

१४. निधडे=समर्थ, खात्रीचे.

सं. इ. १०८



घडली असलियास साहेबाचें अनहित करणार नाहींत. ही खातरजमा असों द्यावी. मल्हारराव यांणीं पुत्राच्या कटाक्षें हे अदावत घातली आहे. परंतु शरीराचे दोनी हात आहेत, यांतील कोणता तोडावा? आतां उभयतांचें एकीकडे ठेवून शिंदे यांचे हातून कळेल तसा सल्ला करून घ्यावा. याशिवाय दुसरा अर्थ नाहीं." म्हणोन तोच मनसबा निश्चयांत आणिला.

तों सुरजमल्ल जाट यांस दम पुरेनासा झाला. जयाजी शिंदे यांसि सांगोन पाठविलें कीं, "अजुनी निर्वाण कोठवर पहाल? सल्ला करणें, अथवा मारून टाकणें." असें उत्तर येतांच जयाजी शिंदे यांणीं आपले कारभारी बलावून मनसबा केला कीं, "जाट तो जेरीस आला. आतां या निमित्तें खावंदाची बेमर्जी झाली तरी पुरवली; परंतु जाबसाल[15] करितां उत्तम आहे." म्हणोन सिद्ध होऊन कचेरीस गेले. राजश्री दादासाहेब यांसि जाबसाल केला कीं, "आम्हीं धणियाचे बारगीर[16]; निमकहराम नहों. असें असतां आम्ही जो जाबसाल सांगतों तो खावंदांचे मर्जीस येत नाहीं. आजिचे समयीं जाटापाशीं खंडणी घेऊन पुढें मसलत फत्ते करावी[17]. एक जागां राहिलियास पदरीं फौज भारी, निभावणी होणें कठीण." असें बोलल्यावरि राजश्री दादासाहेब यांसि परम संकट प्राप्त झालें. सल्ला करावा तरि मसलतीस धक्का बसतो. यास यत्न काय करावा? जयाजी शिंदे यांस उत्तर केलें कीं, "प्रस्तुत तुम्हीं डेरियास जावें. याचा निश्चय करून तुह्मांस काय तो मनसबा सांगोन पाठवितों." ह्मणोन डेरियास लावून दिले. मोठे संकटीं पडले. मोर्चियाकडील दाणा, दारू, गोळी आंत प्रविष्ट होऊं लागली.

असे थोडे दिवस गुदरले. तों मारवाड प्रांतीं [18]अबेसिंग व ढोंकळसिंग

---

१५. जाबसाल=१ बोलणें २ उत्तर.

१६. बारगीर=यजमानानें दिलेल्या घोड्यावर बसणारा घोडेस्वार (शिलेदार याच्या उलट).

१७. पुढें मसलत इ०=दुसऱ्या मुलखांतील खंडण्या घेणें त्या घ्याव्या.

१८. मारवाडचा राजा अजितसिंग यास अभयसिंग व बख्तसिंग असे दोन पुत्र. पैकीं अभयसिंग हा जोधपूरच्या गादीवर १७२५ सालीं बसला व त्याणें १७५० पर्यंत राज्य केलें. त्याणें पिलाजी गायकवाड यास मारेकरी घालून १७३२ मध्यें मारिलें तो हाच. याच्या मरणानंतर त्याचा मुलगा रामसिंग हा गादीवर बसावयाचा. पण त्याच्या दुर्वर्तनामुळें त्याचा चुलता जो बख्तसिंग यास गादी मिळाली. व रामसिंगास आपले दिवस जयपूर येथें काढावे लागले. पुढें बख्तसिंग यास अजमिरा जवळ विषप्रयोग होऊन तो १७५२ सालीं मरण पावला. तेव्हां ती संधी चांगली आहे असें पाहून, आपल्या चुलत्याचा मुलगा जो बिजेसिंग त्याजपासून राज्य आपण परत हिसकावून घ्यावें असा बेत रामसिंग याणें केला.

कर्नल टॉड् ह्मणतात ढोंकळ (=नाशकर्ता, संहार कर्ता.) हें नांव अभय सिंगास मोंगलांनीं त्याच्या विलक्षण पराक्रमावरून व हिंमतीवरून दिलें होतें.

होडे दोघे भाऊ होते. वडील भाऊ अबेसिंग याचा पुत्र रामसिंग, व ढाकळसिंग याचा पुत्र बिजेसिंग, असे दोघे. त्यांत वडील रामसिंग केवळ अमली, बेहोष असें जाणोन बिजेसिंग यानें राज्यलोभें त्यास धुडावून अगदीं संस्थानें नागूर व भिकानेर व मेडते व झालूर अशीं भारी संस्थानें हस्तगत केलीं. त्यास एक अजमेर मात्र राहावयास स्थल होतें. त्यासही [ कोणत्या तरी ] निमित्तें उपद्रव नित्य, असें जाणोन त्याजकडील चेतराम वकील होता त्यास बोलावून विचार केला कीं, " आतां वैरियानें अगदीं राज्यमदें लोभास गुंतोन आह्मांस निर्माल्यवत् ठेविलें. असें जगावें याहून प्राणत्याग अथवा देशत्याग करावा, हें उत्तम. दोहींतून एक अर्थ करावा." तेव्हां चेतराम यानें उत्तर केलें कीं, " महाराजांची हांडी उतरावी, आणि आपली हांडी चढवावी.[१९] प्राणत्याग स्त्री जातीनें करावा आणि देशत्याग ब्राम्हण, संन्यासी यांणीं करावा. तुम्ही संस्थानी, राजपुत्र, त्यांत हडोंचे[२०] रजपूत. 'हिंमत मर्दा मदत खुदा ;' मारतां मारतां मरावें, परंतु केवळ अजीन होऊं नये. तुह्मास मसलत करणें तरि मसलत एक मात्र आहे. दक्षण देशांतील गनिमाची प्रबलता झाली आहे. त्यास निमें राज्य द्यावें आणि आपलें [ कार्य ] साध्य करून घ्यावें. त्यास प्रस्तुत गनिमाची फौज कुंभेरीस लागली आहे. होळकरांचे हातून कार्य करून घ्यावें तरि ते बिजेसिंगाचे स्नेही होत. आतां नेकजात[२१] एक जयाजी शिंदे मात्र आहेत त्यांस पगडीभाई करून त्यांचे हातोन कार्य करोन घ्यावें." म्हणोन मनसबा खचीत करून, इमान प्रमाण, बेलभंडार, व शिरींची पगडी चेतराम याजसमागमें जयाजी शिंदे यांजकडे पाठविली.[२२] तो कुंभेरीस येऊन, शिंदे यांस भेटून, येथील कच्चा पक्का वृत्तांत सर्व निवेदन केला आणि राजियाचे डोईची पगडी जयाजी

---

१९. हंडी उतरावी इ०=त्याचें एकीकडे ठेवून आपलें कार्य साधून घ्यावें.

२०. 'हटेले होडे रजपूत' असा सातारा व पुणें प्रतींचा पाठ आहे.

साताऱ्याहून आणखी एक या बखरीची प्रत कृष्णाजीपंत काळगांवकर यांजकडून मिळाली. ही प्रथम पासून शेवट पर्यंत शाबूद आहे. हिचा उपयोग पुष्कळ होईल.

२१ नेकजात=प्रतिज्ञा पाळणारा, सत्यसंध.

२२. ज्या वेळीं रामसिंग जयपुरास पळून गेला (१७५०) त्यावेळीं त्याचा उपाध्या जगू हा बख्तसिंगाच्या आदर सत्कारास न जुमानतां आपला धनी जो रामसिंग याच बरोबर गेला. पुढें यासच उज्जनी येथें मराठ्यांशीं सल्ला करण्यास पाठविलें. त्याणें जाऊन महादजी पाटील यांस आणिलें. पण बख्तसिंगाचा जोर पाहून महादजी त्या वेळीं परत गेले. क० टॉड.

तेव्हांपासून १७५३ पर्यंत रामसिंगाचें शिंद्याकडे सूत होतेंच असें दिसतें. या वर्षी आपला चुलता मेला असें पाहून रामसिंगानें मराठ्यांस कोट्याहून आणिलें व जयपूरकर माधवसिंग याच्याशीं ही तह केला.

शिंदे यांचें डोईस घातली आणि त्यांची पगडी आपणापाशीं घेतली. खुरनीस करून जाबसाल केला कीं, " आम्ही रोडे[23], दुर्बळ ह्मणोन तुह्मांस शरण आलों. आतां मान अभिमानाचे धणी तुह्मी आहां. " म्हणोन उत्तर केलें.

तों जयाजी शिंदे यांणीं आधींच असाध्य अंगीकार केला [होता] त्यांत हें बोलणें दुसरें आलें. फार उत्तम आहे म्हणोन तेच समयीं राजश्री रघुनाथराव दादा यांचे कचेरीस जाऊन उत्तर केलें कीं, " तुह्मी थोर खावंद आहां. आपण या स्थळीं राहून जाटाचें पारिपत्य करावें. आह्मांस आज्ञा द्यावी, आम्ही मारवाड प्रांतीं जाऊन मसलत फत्ते करतों. सर्वांनीं एक जागां राहून मसलत बुडवावी हें ठीक नाहीं. पदरीं फौज भारी यांस काय द्यावें ? धणी यांनीं खुषी रजावतीनें[24] निरोप दिला तर उत्तम आहे ; नाहीं तर आपणास साफ राहतां पुरवत नाहीं." ह्मणोन डेरियास येऊन फत्ते नगारजीस आज्ञा केली कीं, " कुचाची नौबत सुरू करणें. " ह्मणतांच नगारजीनें नगारा केला. तमाम मोर्चे उठवून गोटांत आणिले. हें वर्तमान ऐकून राजश्री रघुनाथराव दादा यांणीं राजश्री मल्हारराव यांस बोलावून सांगितलें कीं, " शिंदे तो कूच करून चालिले. तुम्ही वडील आहां. आह्मास मनसबा कोणता देतां ? " हें ऐकतांच मल्हारराव याचे तळव्याची आग मस्तकास जाऊन क्षणभर दंग झाला. चित्तांत पुरता विचार केला कीं केवळ आपणच दुराग्रह करावा, तरि अवघी नामोहरमी[25] आपणाकडे येईल. तत्रापि न ऐकावें तरि 'इदंच नास्ति परंच नलभ्यते,' दोहींसही नाडावें यांत रीत राहत नाहीं. अस्तु, जाट कोठें जात नाहीं. आजिचे समयीं कालहरण[26] करितां उत्तम आहे. " ह्मणोन मनसबा योजून दादासाहेब यांस उत्तर केलें कीं, " तुम्ही खावंद आहां. ज्यांत धन्याची मर्जी राजी त्यास आम्ही राजी. " असें म्हणतांच पडल्या फळाची आज्ञा होऊन[27] जयाजी शिंदे यांचे डेरियास आले. त्यांचें समाधान करून, त्यांस राहून घेऊन त्यांचे हातोन जाटाचा सल्ला करून, साठ लक्ष रुपये खंडणी घेऊन, राजश्री रघुनाथराव देशास आले. मल्हारराव माळवे प्रांतीं इंदुरास येऊन छावणीस राहिले[28].

---

२३. 'राजे' सा० प्र०

२४. रजावतीनें=मर्जीनें

२५. नामोहरमी=पराभव, अपेश.

२६. कालहरण=वेळ काढणें.

२७. 'घेऊन' धो० प्र०

२८. असा कुंभेरीचे वेढ्याचा इतिहास असतां मां० ब० यांचें ह्मणणें पुष्कळ निराळें पडतें (पृष्ठ ५ टीप * पहा) कुंभेरीच्या वेढ्याचें साल १७५४।५५ असें दिलें आहे तेंही बरोबर नाहीं. असें टॉड् यांचा ग्रंथ, ही बखर, व मेजर वाट्सन् यांणीं लिहिलेला गुजराथेचा इतिहास हीं ताडून पाहिलीं असतां समजेल. या वेढ्याचें वर्ष १७५३ हें होय.

शिंदे यांणीं कूच करून दर कूच मारवाड प्रांतावर चौल केली.

हें वर्तमान बिजेसिंग यानें ऐकून, आपली फौज जमा करून नागूर सोडून चार कोस राहिला. समागमें पंधरा हजार फौज व दहा हजार पायदळ व पन्नास तोफा व पंचवीस गांजिफियाच्या * गाड्या व शंभर उंट, बाणांच्या कैंच्या पाच सातशें, उंटावर सुतार नाले, व जेलाला व बरकंदाज, युद्धास सिद्ध झाले. ते राठोड रजपूत होडे परम हटेले, त्यांचे ध्यानांत गनिमाची फौज नाहीं. हें वर्तमान जयाजी शिंदे यांणीं ऐकून तमाम उमराव यांस बोलावून विचार केला कीं, "मारवाडी हटेले रजपूत महापराक्रमी, शिरच्छेद झाला तरि कबंध-नाचतें. त्यांचे मर्दुमकीची शर्थ तो या प्रकारची. त्यांणीं आपले हिंमतीनें कंदाहराचा पातशहा दुराणी गिलच्या याची पगडी व दुमची[30] सोडविली. ते मर्यादा अजुनी चालते. गिलच्यास पगडी नाहीं आणि घोड्यास दुमची नाहीं. आणि यांजपाशीं आगही भारी. आह्मांकडील अर्धीच गनीम यांचे दील त्या गोडेहत्यारी निढवले[31] तरि, झाडास बांधले तरी झाड घेऊन जातील. आणि आह्मी तो प्रतिज्ञापूर्वक राजश्री रघुनाथराव दादा यांजपासोन निघालों. आणि जन्मादारभ्य मल्हारराव याचे जुगांतून निघालों[32]. एक जागां होतो तेव्हां यश-अपेश आलें तरी त्याचा खेद नव्हता. आतां अपेश आलें तरि पुनः त्यास तोंड तरी कसें दाखवावें ? प्राणत्याग किंवा देशत्याग करावा. दोहीं अर्थांतून एकाचा अंगीकार करावा." हें ऐकून दत्ताजी शिंदे भीम-बहादर व आणखी ल्हान थोर सरदार यांणीं हिंमत दिली कीं, "पुण्यप्रताप श्रीमंत नानासाहेब यांचे पदरीं आहों. आणि तुह्मी एकनिष्ठ सेवा करीत आहां.

---

२९. शिंदे कोट्याहून जयपुरास गेले. तेथें रामसिंग होता. रामसिंग व शिंदे यांजमध्यें झालेल्या तहपत्रास 'हळदी' किंवा 'बलपत्र' असें ह्मणतात. ह्या बलपत्रावर ज्या मराठ्या सरदारांनीं सह्या केल्या त्यांचीं नांवें:—जनकोजी शिंदे, संताजी बोले, दत्तो पाटील, राणूबोरटे, अंतो जशवंतराव, कान्होजी जाधव, जिवाजी जाधव, जिवाजी पवार, पिलाजी, सटवाजी, माळोजी शिंदे, तात्या चिंतो, राघोजी पाग्या, धांसाळ्या जाधव, मुखायार अली, फिरोज खान. क० टॉड्.

* गांजिफियाच्या(?)

३०. दुमची=खोगीर पडूं नये ह्मणून घोड्याच्या शेपटा खालून बंद घतात तो.

हें लिहिणें मारवाडचा राजा एकदां औरंगजेबानें आफगानिस्थानांत पाठविला होता त्याच्या पराक्रमांस उद्देशून असावें.

३१. हे शब्द दुर्बोध आहेत.

सा० प्र० "आह्मांकडील गनीम यांचे आर्धी कच्चे दील. त्यांत गाडबक्तरी निटावले तरि".

३२. "जन्मांतर ज्या...जुरतीनें" धो० प्र० "जन्मांतर ज्या...जुगतीनें" पु० प्र० वरील सा० प्र० पाठ बरा आहे. 'मल्हारारावाची व आमची आजपर्यंत जूट होती—आम्हि स्वारी करण्यास एकत्र जात होतों, पण आजच एकटे निराळे इकडे ह्या मोहिमेवर आलों,' असा भाव.

ईश्वर यश देईल. आम्ही तेथून रामसिंग याचा अंगीकार करून आलों आणि बिजेसिंग युद्धास आला म्हणोन नामोहरम व्हावें तरि झाले-पणाचें सार्थक काय? नामर्दुमीची जघन्यता होईल. युद्ध करावें. यांत यश अपेश शूराचा वांटा. याची क्षिती काय? युद्ध करावें."

असा निश्चय ठरला. त्यांस व यांस दहा कोशाची तफावत होती. यांणीं स्नानें करून, तमाम एकामेकास निरवानिरव करून, तमाम अंगांत चिलखतें घालून व बक्तरें घालून जीर टोप पेट्या[३३] बांधून, दारू गोळी लोकांस वाटून, तंगवार[३४] करून, मुहूर्त-सिद्ध होऊन चालिले. मार्गीं शकूनही चांगले झाले. तीस हजार फौज होती. त्याची निवड करून दोन भाग केले. एकी-कडे दत्ताजी शिंदे झाले. आणि एकीकडे जयाजी शिंदे झाले. दोन्ही सैन्याच्या गांठी पडिल्या. बिजेसिंग याणें तमाम आपले फौजेंत ताकीद करून, फौज सामान सुद्धां सिद्ध झाले. भोंवता रिसाला तोफा वगैरे तयार झाले. जोंपर्यंत अंगाशीं अंग लागलें नव्हतें तों तोफांचे मार व हस्तनाले व सुतार-नाले व जेलाला व रेंकले व गंजिफियाच्या गाड्या व बरखंदाज अशी एक-दांच सरबत्ती झाली. बाणांचा वर्षाव मेघांप्रमाणें[३५] झाला. मोठा कडाखा झाला. धुराची व धुळीची धुंदी झाली कोणाचें तोंड कोणाचे दृष्टीस पडे-नासें झालें. धडाकियाखालीं घोडे मनुष्यें बाहेर गेलीं. क्षणभर अशी गर्दी होऊन दोहींकडून हर! हर! म्हणोन घोडे घातले. दोहींकडून घोडि-यांचीं तोंडें आंत शिरलीं. ते समयींचा कर्डाखा[३६] तेथील अनुभविक असतील त्यांस ठाऊक असेल. ऐशी आग झाली. नंतर आगीचा मार राहून तरवारीची खणाखणी झाली. त्यांत ते आधींच रजपूत, त्यांत मारवाडी होडे; त्यांचे मर्दुमीचें नवल नाहीं. परंतु मराठियांनीं फार शर्थ केली. ऐसें युद्ध गनिमांत कोणीं केलें नाहीं. मल्हारराव याचे इरेनें मोठमोठे खेतांत[३७] येऊन जीवा अधिक केली. मोठा प्रळय झाला. न भूतो न भविष्यति. पांच सातशें भले, चांगले लोक गनिमाकडील ठार झाले. जखमी घायाळ दोन अडीच हजार मनुष्यें झालीं. पांच सातशें घोडींही पडलीं. मारवाडियाकडील दोन अडीच हजार मनुष्यें ठार झालीं. तोफा व रिसाला कांहीं पाडाव केला.

---

३३. बखतर=लहान लोखंडी कड्यांचें चिलखत.

जीर=(जंजीर)=शिरस्त्राण पडूं नये म्हणून हनुवटी खालून जो अधारभूत लहान लहान कड्यांचा बंद घेतात तो.

टोप=शिरस्त्राण.

पेटी=शिरस्त्राणापासून तों नाकापर्यंत शरीरभागाच्या संरक्षणार्थ लोहादिकाची पट्टी बांधितात ती.

३४. तंगवार=आंवळून तय्यार.

३५. 'मेघकाळा प्रमाणें' पु० प्र०

३६. 'तेसमयींचें लाघव' धो० प्र०

३७. खेतांत येणें=रणांत पडणें. 'इरेनें दातनिसकीस येऊन' पु० प्र०

ऐसा प्रळय झाला. परंतु धन्य ! रजपुताची माय रजपुतासच व्याली. असें गानिमास होतें तरि धुरोळा दृष्टीस पडूं न देते. त्यांत गनीम यांचा उत्कर्ष, चढती सद्दी. नाहीं तरि मारवाडियांस तंत्री पोहोंचवावी असें नव्हतें. त्यांत ही हटेले रजपूत, जैसा मोटेचा बैल सरतो तैसे मार खातच खेती सोडून, आपले मुर्दे संभाळोन, दोन कोस माघारे निघाले. यांणीं ती जागा फत्ते करून सहांजनें[38] वाजवीत खेतीवर उभे राहिले. आणि आपले मुर्दे जमा करून [त्यांस] अन्न-प्रसाद दिला. घायाळांच्या जखमा बांधोन परम खुशाली केली. तो आनंद पत्रीं लिहून कळवावा तो काय ? तेथें असतील ते अनुभविक जाणतील. शिंदे यांस असें झालें कीं, मल्हारराव याजपासून निघोलियास[39] ईश्वरें अबरू राखिली. जन्माचें सार्थक झालें. म्हणोन रात्रौ तेथें मुक्काम केला. रात्रौ भोंवताले छविन्र्यांस[40] राऊत उभे केले. मारवाडी यांस वेढावयास अवसान राहिलें नाहीं. फौज शिकस्त झाली. हिंदुस्थानांतील स्वधर्म कीं फौज मोडली तरि दोन चार गांवें पळावें लागत नाहीं. खेती म्हणजे रण सोडून गोळीची खास्त निघाले तरि नामोहरम झाले. [?] मारवाडी यांनीं अपजय जाणून रात्रौ नागुरांत पोंचले. [ज्या] मारवाडियांस समोरच जखमा होत्या त्यांच्या स्त्रियांनीं काया कुरवंडी करून जयजयकार केला. ज्यांस पाठीवर जखमा होत्या त्यांच्या स्त्रियांनीं पतींचे त्याग केले. मारवाड प्रांतीं दस्तुर हाच कीं समूर घाव घेतला तरि उत्तम, नाहीं तरि पुरुषांचें स्त्रियांनीं मुखावलोकन करूं नये. रजपूत स्त्रियांची हिम्मत या रीतीची, तेथें पुरुषांची शिफारस कोठवर लिहावी ?[41][42]

---

३८. साहाजनें=शहादानें=सैदोन, माठ नगारे.

३९ निघालियास=निघालों त्या सारखी.

४०. छबीना=पहारा.

४१. रजपूत लोकांस स्पार्टन लोकांची उपमा देतात ती किती योग्य आहे हें या त्यांच्या एका 'गनिमाच्या' लिहिण्यावरून स्पष्ट होतें.

४२ रजपुतांचे कैवारी जे कर्नल टॉड् त्यांचा लेख वरील वर्णनाशीं ताडून पहावा.

(अ) पुष्कर सरोवरावर रामसिंग व मराठे यांच्या फौजा उतरल्यानंतर, मरु देशाची गादी खालीं करून देण्याविषयीं बिजेसिंगास त्यांणीं पत्र लिहिलें. तें अर्थात् मान्य न होऊन त्याणें युद्धाची सिद्धता केली. पत्र वाचून दाखवितांच सर्व राठोर सरदार रागानें ओरडले "कोण हा 'हाप्पा' (=आपा शिंदे.) आम्ही त्यास भीत नाहीं आकाश कोसळून पडूं लागल्यासही आपलीं मस्तकें तें धारण करण्यास पुढें करून आम्ही आपल्या राजास बचावूं !"

(आ) लढाई मोठी हात घाईची झाली. बिजेसिंगास जयसिद्धी होण्याचा काल येऊन ठेपला व आपाचें धैर्य गळून तो माघाराही परतणार होता इतक्यांत दोन गोष्टी अकस्मात् घडून आल्या. त्यामुळें बिजे सिंगाचे हातीं आलेला जय त्यास मिळाला नाहीं. त्या गोष्टी या:—राठोर लोकांची शिलेपोस केलेली पांच हजारांची तुकडी जय संपादून

(पुढें चालू).

अस्तु. राजा शाहूच्या पुण्यप्रतापाचा फलादेश. एक दोन रोज दम खाऊन नागुरा भंवताले उतरले. शहर थोर, तीस हजार गनीम आणखी त्या प्रांतांतील रामसिंग वगैरे राजे रजवाडे दहा हजार होते. परंतु लष्कर एक बाजूस राहिलें. तमाम मोर्चे कायम झाले. परंतु राज्य केवळ रेतीचें. सुरंगाचा तो यत्न नाहीं. असे पाहून युक्तीनें मोर्चे बंदी [४३] केली. परस्परें तो फांचा वगैरे रसालियाचा भाडेमार होऊं लागला. असे सात आठ महिने जहाले यावर जयाजी शिंदे यांणीं मनसबा केला कीं, "दुर्ग तो असाध्य आणि

( मागील पृष्ठावरून पुढें चालू ).

परत येत असतां ती शत्रूकडील आहे असें समजून त्यांवर बिजेसिंगाच्या लोकांनींच गोळ्यांचा वर्षाव केला. तेणेंकरून ती टोळीच्या टोळी बहुतेक खलास झाली. हा मोठा अपशकून समजून रजपूत पुनः पुढें पाय टाकीनात. दुसरी गोष्ट अशी. रूपनगरचा संस्थानी सरदारसिंग हा पदच्युत झाला होता म्हणून रामसिंगाप्रमाणें तो आपा शिंद्याकडे आला. ह्या लढाईत आपानें त्यास सांगितलें "रामसिंगा प्रमाणें तुझी ही ग्रहदशा प्रतिकूल म्हणून जय येत नाहीं. तर आतां काय करावें ?" तेव्हां सरदार सिंगानें हळूच आपला एक माणूस पाठलाग करीत आलेल्या बिजेसिंगाच्या टोळींत पाठविला. तो त्या टोळींत शिरून, आपण त्यांपैकींच एक आहों असें दाखवून, टोळीच्या सरदारास म्हणाला "आतां आपण काय म्हणून भांडावें ? तिकडे बिजेसिंग तर गोळी लागून ठार झाला." ही बातमी सर्व लोकांत पसरून तिचे खरेपणाविषयीं शोध न करितां रजपूत पळूं लागले व बिजेसिंगास सुद्धां मागें जावें लागलें.

(इ) बिजेसिंगाकडे दोन लाख लोकांचें प्रभुत्व असतां त्यास एका जाट शेतकऱ्याच्या खटाऱ्यांत बसून पळावें लागलें.

(ई) लालसिंग व रायसिंग हे त्याच्या पडलेल्या सरदारांतील मुख्य होत.

(उ) ह्या युद्धांत रजपुतांनीं जसा पराक्रम केला त्या प्रमाणें दक्षणी लोकांनींही आपली तरवार गाजविली असें भाट लोक वर्णन करितात. त्याचें एक पद्य असें आहे:—

"याद् घणा दीन् आवोशी, हाप्पा वाला हेल् । भागा तीनो भूपति, माल् खजाना मेल्॥"

"आपाच्या वेळेची लोकांस पुष्कळ दिवस आठवण राहील. त्यावेळीं तीन भूपति आपलें सामान सुमान व जड जवाहीर टाकून पळून गेले." हे तीन भूपति मारवाड, बिकानेर व किशनगड येथील राजे होत. हे सर्व ह्या लढाईत होतेच.

(ऊ) लढाई दोन दिवस झाली. पहिले दिवशीं तोफांनीं लढले. दुसरा दिवस ही असाच लढण्यांत गेला. त्या दिवशीं पांच हजारांची टोळी नाहींशी झाल्यावर पुढें काय करावें म्हणून सर्व सरदारांची मसलत बिजेसिंगानें विचारिली. त्यांत बिकानेरच्या राजानें मागें फिरण्याची सल्ला दिली. दुसरे सरदारही गुळमुळीतच होते तो गुळमुळीतपणा फौजेंत पसरला व बिकानेरचा राजा प्रथम निघून गेला. इतक्यांत मराठे व रामसिंग हे मारवाड्यांवर तुटून पडले. मग काय विचारावें ? जो उठला तो पळूं लागला. सर्व तोफा मराठ्यांचे हातीं लागल्या.

४३. 'असो कळाशी करून' सा॰ म॰ 'ऐसा ललुबुडी [?] करून' पु॰ म॰

एक जागां अवघी फौज राहिलिया पृथ्वी-दिग्विजय होणार नाहीं." ह्मणून रामसिंग व आपला पुत्र जनकोजी शिंदे यांजसमागमें दहा हजार फौज देऊन मेडतियासि रवाना केले. मेडतियासि मोर्चे लावून राहिले. असे बारा महिने पूर्ण झाले. मारवाडी दमास येईनात. त्यांसि तो मोहरा इरेस पडला तैसें जाहलें.

नागुरांत बिजेसिंग यानें विचार केला कीं, "मल्हारराव यांचे इभ्रतीवर आम्हीं हा अंगीकार केला. परंतु कागदीं पत्रीं मात्र समाधान करितात. आह्मीं दम कोठवर धरावा? एक वर्ष जाहलें. पांच मनुष्यांची कुमक नाहीं. तेव्हां आपले वकीलां समागमें पत्र मल्हारराव यांस देऊन पाठविलें कीं, "पादशाही उमराव अथवा[45] भुमे राजवडे याचे भरंशावर आह्मीं हिंमत केली नाहीं तुह्मीं भरंवसा दिला म्हणोन आह्मीं या गोष्टीचा अंगीकार केला. आतां आमची गत काय?" म्हणोन मल्हारराव यांस वर्तमान सांगतांच मल्हारराव यांणीं उत्तर केलें कीं, "ते[46] व आह्मी एका खावंदाचे चाकर. तेव्हां उघड तुमची कुमक आम्हांस करितां येत नाहीं. परस्परें या राज्यांतील उमराव व राजवडे यांस पत्रें देऊन तुमची कुमक करितों." म्हणोन तमाम पत्रें माधवसिंग जयनगरकर व शिवसिंग राणे शिसोदे उदेपूरकर व मदनसिंग बुंदीकर, उदेसिंग व मारवाडी भीमसिंग आणखी वहुत छोटे मोठे सरदार यांस साहित्य-पत्रें[47] दिलीं. आणि वकिलास हिम्मत देऊन सांगितलें कीं, "तुह्मीं टांसून रहावें ह्मणजे त्यांच्यानें रोमहर्षण होत नाहीं. असें करितां तुम्हांस कोणी मदत न करी तरि कांहीं मोंगलाई मसलत करून तुम्हीं यश संपादावें." असें सांगोन वकील बिजेसिंग याजकडे रवाना केलें[48]. भुमे राजवडे यांस पत्रें प्रविष्ट केलीं. तों मारवाडी याचें पारिपत्य जहालें येणें करून सर्वत्रांची छाती फाटोन गेली. कोणी कुमक करीनात.

असे चवदा महिने जाहले. लष्करांत धारण इस्तकबील पासून सात

---

४४. या काळीं मराठे सरदारांत भरतखंडाचें सार्वभौमत्व संपादण्याची जी मोठी आकांक्षा उत्पन्न झाली होती ह्मणून ह्मणतात तिचें व्यंजक हें वाक्य होय.

४५ भुमे=त्या देशीं पुष्कळ वर्षें वसाति करीत आलेले.

४६. 'शिंदे' सा० प्र०.

४७. साहित्यपत्रें=मदत करण्याविषयीं पत्र.

४८. मल्हाररावाकडे मदत मागण्याकरितां बिजेसिंगानें वकील पाठविले असें टॉड् यांचे ग्रंथांत कोठें आढळांत नाहीं. फक्त जयपुरचा माधवसिंग याजकडे खुद्द बिजेसिंग घेरा देणारांची नदर चुकावून गेला होता व तेथें त्याच्या एका ठाकुराच्या स्वामिभक्तीच्या व धैर्याच्या योगानें त्याचा प्राण वाचला, असें ते ह्मणतात. असो, शिंद्यांचें व होळकरांचें घांकडें येण्यास हें दुसरें कारण झालें. 'मोंगलाई मसलत' कोणती ती पुढें येईलच.

शेर आठ शेर व वैरण चोवीस पंचवीस [49]पुंले, अशी महागाई. परंतु सरदार केवळ कुबेर. रोजमुरा व आजन्नाव पाहून खर्चीं पावती केली. लोक आराम राखिले. धारण [ महाग ] आहे असें कोणास सुचों दिलें नाहीं. फौजेंत एक मनुष्य बेदील नाहीं. असे तमाम लोक एकदील, अवघियांची [50]वोढ कीं बिजे-सिंग याचें पारिपत्य करावें. या प्रकारचें गनिमाचे मानस [ होते. ]

तिकडे नागुरांत बिजेसिंग याणें आपले उमराव बोलावून मसलत केली कीं, " आतां आमची कोणी कुमक करीत नाहींत. मल्हारराव यांणीं इरेस घातलें परंतु त्याच्यानें उघड साहित्य होत नाहीं. समग्र सवा वर्ष जाहलें. आम्हीं आतां कोंडून कोठवर रहावें ? महागाई बहुत आणि गनीमही सोडून जात नाहीं हा पूर्ण भरवसा कळोन आला. आतां मोंगलाई मसलतीनें हो-ईल तें करावें. " म्हणोन तिघे मारेकरी सिद्ध केले. धन्य ते रजपूत ! सतीचें वाण घ्यावें तसे तयार जाहले. त्यांणीं आपला जीव मुठींत धरिला. मग त्याणें त्यांस काय देऊं केलें तें [51]नकळे. अस्तु, मारेकरी चार घटका रात्रीस बाहेर लावून दिले. आणि आपले फौजेंत ताकीद करून सिद्ध होऊन उभे राहिले.

नंतर मारेकरी लष्करांत येऊन पोंहचले. तों चार घटका दिवस आला. देवाचे डेऱ्यापुढें स्नानास जयाजी शिंदे गेले. तों नजीक घोड्यांची पागा होती. मारेकरी केवळ कंगाल भिकारि यांचा वेष घेऊन, आंगावर जीर्ण वस्त्र व गुप्त सुऱ्या असे घोड्यांपुढें दाणे वेंचित होते. तों जयाजी शिंदे यांणीं स्नान करून चौरंगावर उभे राहिले. खिसमतगार घोडा संभाळावयास गुंतले. अबदागिऱ्या मात्र डोईवर छत्र धरून उभा होता. जयाजी शिंदे यांस आदत अशी होती कीं, स्नानानंतर मुखावर धोतर घेऊन क्षणभर डोळे चोळीत रहावें. तों जसा राजा नळाचे द्वारीं कली वृषभाचें रूप धरून तिष्ठत होता तैसेच मारेकरी जपून होते. इतक्यांत संधी सांपडतांच मारेकरी यांणीं उठोन एकाएकीच दोहींकडून कुशीस सुऱ्यांचा मार केला. काम [52]कारागीर होतांच जयाजी शिंदे चौरंगावरून जमीनीवर आले. तेव्हां नजीक अबदा-गिऱ्या शरीरानें धष्टपुष्ट होता, त्याणें कव घालून एक धरिला. तों डेरियापुढें व पागेंत गडबड जहाली. जिकडे तिकडे मारा ! मारा ! असें होऊन ससे-होलपट होऊन एक ठार जहाला. एक अशा अरिष्टांतून प्राण घेऊन

---

४९. 'पेंढ्या' सा० प्र०
५०. इच्छा, उत्कंठा.
५१. त्यांस बिजेसिंगानें वंशपरंपरें गांव इनाम देऊं केले. क० टॉड.
५२. कारागीर = लागू.

नागुरांत पोहोंचेला. मागें दत्ताजी शिंदे यांणीं वर्तमान ऐकून धांवत बंधू-जवळ आले. त्याची अवस्था पाहून त्यांणीं केवळ धाय मोकलिली. घायाळ उचलोन डेर्‍यापुढें आणिला तों तिकडे मारेकरी गावांत पोंहचतांच बिजेसिंग सिद्धच होता. तमाम सरदार यांस बोलावून सांगितलें कीं "यार हो! आतां गनीम आहेत ते काय? 'मुरगी मरी बच्चे दाणादाण' तैसी गत होईल." ह्मणून बहुत संतोष मानून फौजेनिशीं युद्धास निघाला. तों आधींच हे गडबडोन तमाम मोर्चे उठवून [त्यांणीं] गावांत आणिलेच होते. फौज बाहेर आलियावर लष्करांत ऐशी गडबड जहाली कीं पृथ्वी प्रलय होतो तैसा विचार जहाला. तों जयाजी शिंदे मोठे हिंमतीचे सरदार, डोळे उघडोन पाहिलें तों जवळ बंधु दत्ताजी शिंदे केवळ धाय मोकलून शोक करितां देखिला. गडबड देखून हस्तसंकेतें भावास हिंमत देऊन बोलता जाहला कीं, "वैरी युद्धास आला आणि तूं रांडे सारिखा रडतोस! हें क्षत्र धर्मास उचित नाहीं. आतां मजला कांहीं होत नाहीं. तुम्हीं शत्रुपराभव करावा."

असें ऐकतांच दत्ताजी शिंदे यांणीं नगारा करून, फौज घेऊन, युद्धास गेले. दोहीं सैन्याच्या गांठी पडल्या. मोठें तुंबळ युद्ध पूर्ववत् प्रमाणें जहालें. मागती दत्ताजी शिंदे यांणीं शिलेजोरानिशीं मारवाडी मागें सारोन गावांत घातले. दोन तीनशें मनुष्यें ठार जहालीं. तैशींच घोडींही पडलीं. घोडे, मनुष्यें बहुतकरून घायाळ जहालीं. मोर्च्यापाशीं येऊन मागे ती जेथील तेथें मोर्चे कायम करून, शहाजणे वाजवीत ढाल पाशीं आले. तों मागें जयाजी शिंदे यांचा प्राण निघोन गेला. दत्ताजी शिंदे यांणीं वर्तमान ऐकून घोडियावरून खालीं घालून घेतलें. अतिशय शोक करिता जहाला. "आपा साहेब! आह्मांस कोणाचे हातीं निरवून गेलां? आतां आपा साहेबासारिखा भाऊ कोठें दृष्टीस पडेल? 'सभाग्य साधून जाय निधी आणि अभाग्य मागें मृत्तिका शोधी' तैसी आमची गत जाहली. आमचें छत्र केवळ मायबाप गेलें." तो शोक पत्रीं कोठवर लिहून कळवावा? त्याचें आतडें त्यास साक्ष देतें. तेव्हां राजश्री रामाजीपंत भाऊ दिवाण व आणखी लहान थोर सरदार मिळोन बहुत प्रकारें शांतवन केलें कीं, "हा मृत्यु लोक आहे. आला प्राणी रहात नाहीं. परंतु इहलोकीं कीर्ति करून परलोक-साधन करावयाचें हेंच दुर्लभ. अस्तु, जयाजी बावा काय घेऊन गेले? दुनिया, दौलत

५३ नागुरांत गेल्यावर त्याचें मुखावलोकन बिजेसिंग करीना असें ह्मणतात. नागुरच्या वेढ्यांत जयापा एकदां आजारी असतां त्याजकडे बिजेसिंगानें खुद आपला वैद्य पाठविला व त्याच्या उपचारानें आपास गुण आला!

५४. ढाल = निशाण.

खजीना, मुलूख, हत्ती, घोडे, पाहिजे तितकी संपदा, ठेवून गेले. आतां त्यांचे पुत्र जनकोजी बाबा आहेत. त्यांस वडीलपणें महत्व देऊन आपण हें राज्य चालवावें. पहिले पेक्षां अधिकोतर करून दाखवावें. आतां शोक करणें उचित नाहीं. शत्रू जवळ. हिंमत सोडिली ह्मणतील." ऐसें शांतवन करून जयाजी शिंदे यांस चंदन-काष्टें व वेलकाष्टें व तुळसी-काष्टें [करून] देह-सौर्थक केलें. ते वेळेस जनकोजी शिंदे जवळ नव्हते. त्यांणीं ही तेच दिवशीं मेडतें[५७] सर केलें होतें. त्यास वर्तमान कळतांच तोही त्वरेनें येऊन पोहोचला. उभयतां चुलते पुतणे एकत्र झाल्यावर तो शोक 'न भूतो न भविष्यति' या प्रकारें झाला. असो गत गोष्टीस यत्न नाहीं. असा सारासार विचार करून विवेक केला. यथाविधी तेरा दिवस उत्तर क्रिया पूर्ण झाली. आधींच शिंदे केवळ रणशूर, दानशूर; दान-धर्म बहूत प्रकारें केला.

हें वर्तमान तमाम भुमे व राजवडे यांस कळलें. इंदुरास मल्हारराव यांणीं ऐकोन बाह्यार्थ श्रमी जहाले कीं, "आमचें जूग विस्कळीत झालें." हें वर्तमान पुण्यास नानासाहेब व भाऊसाहेब यांस कळतांच बहुत श्रमी जहाले; "आमचा अर्जुन गेला, एक बाजू खचली" म्हणोन बहूत कष्टी जहाले. "असो जनकोजी शिंदे त्यांचे पुत्र आहेत, त्यांस सवाई जयाजी करून दाखवूं, चिंता नाहीं," ह्मणोन समाधानाचीं पत्रें दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे यांस पाठविलीं. मल्हारराव आपल्या वाफगांवास निघोन गेले.

इकडे नागुरावर पूर्ववत् प्रमाणें गोळागोळी होतच होती. असे पूर्ण अठरा महिने जाहले. एक जागां मेख गाडली होती. बिजेसिंग यास पुर्ते समजलें कीं, जयाजी शिंदे गेले तरी उणें पडलें नाहीं. आणि आमची कुमक कोणी कांहीं करीत नाहीं. शिंदे पुर्ते इरेस पडले. पारपत्य आमचें करतील." अशी खातरजमा राखून वकील सल्यास पाठविला. त्यांसही असें जहालें कीं कोणते रीतीनें तरी यश संपादावें आणि निघोन जावें. बाह्यार्थ मैत्र बोलत होते. मग उभयपक्षीं सल्ला केला. एक कोटी रुपये खंडणी

५५. "त्यास वडीलपणाचें महत्व देऊन आपण युवराज्य चालवावें." सा० प्र०"

५६. आपा व संताजी (हा त्याचा भाऊ नागूरच्या वेढ्यांत पडला) यांच्या छत्र्या मोठ्या सुरेख रीतीनें पुष्कर सरोवराचे तीरीं बांधिल्या आहेत.

५७. मागें. पृ० १६ पाहा.

५८. आमचे जूग विसकटतांच नरंदवार मेली [?] बाहेर-ळापिका या प्रकारें बोलून श्रमी जाहाले. अंतर ळापिका ज्याची ते जाणतील" असा पु० प्रतीचा पाठ आहे. "आमचें जूग विसकटतांच जरप [?] ठार केली. बाहेर लौकिकीं या प्रकारें बोलून श्रमी जहाले अंतर्यामीं ज्याचे ते जाणत" धो० प्र०

५९. इंदराहून. वाफगांव जुन्नराजवळ आहे.

६०. "बाह्यार्थ मात्र युद्धाची उमेद ठेविली होती." सा० प्र०

घेऊन नागुरापासून आलीकडे मुलूख अजामिर, मेडतें, व बिकानीर ऐशीं ठाणीं रामशिंग यास दिलीं. याप्रमाणें खंडणी व मुलुख घेतला. त्यांत अर्धा मुलुख रामसिंग यास दिला; अर्धा मुलुख आपणाकडे करून, ठाण्यांचा बंदोबस्त करून, तेथून कूच करून, मजल दरमजल उज्जनीस आले.

उज्जनीस आलियावरि तमाम शिबंदीचा हिशेब केला. तीन कोटी रुपयांचा मोहिमेचा जमाखर्च जहाला. झाडून ऐवज माळवे वगैरे प्रांतांतील नेऊन दहा पांच लाख रुपये कर्जवाम जहाले. खजिन्यांत पैसा राहिला नाहीं. जामदार-खाना कुल् खालीं जहाला; आणि शिलेदार लोकांचा हिशेब केला तो तीन सालें हिशेब लोकांस महागाईमुळें झाडून पावला. शेवट कोणाकडे फाजील निघाला. असें जहाल्यावर शिंदे केवळ सालस त्यांणीं चित्तांत विचार केला कीं, "महागाईमुळें लोकांनीं झाडून रुपये खादले. आह्मां-करितां लोक खराब जहाले. तीन वर्षें राहून रिक्तहस्तें लोक घरास गेलिया त्यांचीं मुलें बाळें बेदुवा देतील. त्यांचे तळतळाट घेऊं नये. आतां सरासरी लोकांस झाडून एकसालां रुपये द्यावे." असें निश्चयांत आणिलें तों पदरीं पैसा राहिला नाहीं. मोठे संकटीं पडले. दिवसा अन्न गोड लागेना व रात्रौ झोप येईना. केवळ ईश्वरावर तवक्कलें करून होते. तों त्यांची क्रियें शाबूद. 'अजगरका दाता राम.' भाग्य अभाग्य काळपरत्वें जातें, परंतु निश्चयांत मात्र अंतर करूं नये. त्यांत ईश्वर साध्य होतो. जैसी क्रिया धरावी तैसें फळ पावावें. प्रत्यक्षास प्रमाण पहावें नलगे. शिंदे यांणीं शुद्ध वासना धरिली. यास्तव ईश्वरें तेथें एकाएकीं असें कौतुक केलें कीं, बुंदीचा राजा होता तो मृत्यु पावला. तेव्हां त्याचा दायाद पितृव्य-पुत्र होता तो राज्याभिलाष करायाचे विचारांत आला. त्यांचें मूल नेणतें होतें. तेव्हां राजस्त्रीनें तावडतोब वकील उज्जनीस शिंदे यांजकडे पाठविला कीं, "तुम्हीं येथवर येऊन मुलास तक्तीं बसवून टिळा लावावा. तुह्मांस पाउण कोटी रुपये देतों." असें ऐकतांच, हे आधींच आतूर होते, त्यांस असें जहालें कीं, दुकाळियास मि-

६१. जयापास मारल्यावर त्याचा सूड चांगला घ्यावा असें मराठ्यांच्या मनांत होतें त्याजबद्दल अजमीर द्यावें व तीन वर्षांनीं खंडणी व लागतील तेव्हां अमुक लोक कुमकेस द्यावे असा तह बिजेसिंगाकडून त्यांणीं करून घेतला. राजस्थानचे मध्यभागीं अजमीर असल्यामुळें तें शहर त्या सर्व मुलुखांची किल्ली असें समजलें पाहिजे. तीही किल्ली मराठ्यांच्या हातीं सांपडल्या पासून त्यांचा अंमल तेथें पूर्ण बसला. असा तह झाल्यावर "तुझ्या नशीबीं काय असेल तें तूं प्राप्त करून घे!" असें रामसिंगास सांगून मराठे निघून गेले असें क॰ टॉड् ह्मणतात.

६२. तवक्कल = ईश्वरावर भरंवसा.

६३. क्रिया = भाव, श्रद्धा.

६४. 'राजांचें सा॰ प्र॰

ष्टान्न मिळतें तसें जहालें, आणि ऐकतां क्षणीं नगारा करून कूच केलें. तेथें जाऊन, जबरदस्तीनें त्याचा दायाद होता त्यास कैद करून मुलास तक्तीं बसविलें.[६५] राजाचे स्त्रीनें बोलल्या बरहुकूम पाउण कोटी रुपये खंडणी व बहुमान्य हत्ती, घोडे, अमोल्य वस्त्रें, शिरपेंच, मोत्यांचे तुरे, पदकें आणि मुक्ताफळांच्या माळा येणेंप्रमाणें दिलें तें घेऊन उज्जनीस येऊन पोंचले. तमाम लोकांस हिशेब न करितां एकसालां ऐवज पदरीं घालून निरोप दिला. लोकही खुशाल होऊन आशिर्वाद देते झाले.

याप्रमाणें वर्तणूक करून दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे चांभारगोंदियास आले. मुलें माणसें यांस भेटते समयीं पुनः नवें दुःख जहालें. असो, सर्वत्रांनीं विवेक करून, जनकोजी शिंदे यांजवर नजर देऊन राहिले. हें वर्तमान नानासाहेब व भाऊसाहेब यांस पुणियास कळतांच शिंदे यांचे समाधानास चांभारगोंदियास आले. भेटून बहुता प्रकारें पोटाशीं धरून सर्वत्र लहान थोरांचें समाधान केलें. सुभ्याचे शिक्के जनकोजी शिंदे यांचे नांवें करून दिले. समजाविशीस अर्धे मारवाड काबीज केलें होतें तें दरोबस्त त्यांजकडे दिलें. त्यांत कोणाची वांटणी कपर्दिक नाहीं.

येणेंप्रमाणें समजाविशी करून श्रीमंत सावनूरचे मोहिमेस[६६] गेले. मुरारराव घोरपडे व मुसाफरजंघ मिळून सावनूरचा पठाण यास तंबी पोंचवून, त्याजपासून खंडणी घेऊन, बंकापुरचा किल्ला आपणाकडे करून देशास आले. शिंदे घरींच होते. मल्हारराव यांणीं घरास येऊन समाधान करावें अशा रदबदल्या घातल्या. परंतु शिंदे यांणीं मोजिलें नाहीं. "आतां त्यांची भेट स्वर्गीं" ह्मणोन निष्ठुर जाबसाल सांगितला. त्यावरून मल्हारराव आपले जागीं फिके होऊन राहिले.[६७] त्याजवर नानासाहेब यांणीं रघुनाथराव दादा व मल्हारराव होळकर यांस साठ हजार फौजेनिशीं हिंदुस्थानचे मोहिमेस रवाना[६८] केलें.

हिंदुस्थानांत असें वर्तमान झालें कीं अलमशाहा बादशाही करीत असतां

---

६५. क० टॉड् यांच्या ग्रंथांत ह्यास कोठें आधार नाहीं.

६६. ही मोहीम १७५६ सालची असावी.

६७. शिंदे व होळकर यांचे मध्यें चुरस कुंभेरीच्या वेळ्यांत प्रथम उत्पन्न झाली. ती दिवसेंदिवस वाढतच चाळली असें मागील, ह्या, व पुढें येणाऱ्या मजकुरावरून स्पष्ट होतें. बखर रचणाराचा झोंक एकंदरींत मल्हारराव यास दोष देण्याचा दिसतो.

६८. ही दादांची बडी स्वारी, जींत त्यांणीं लाहोर काबीज करून कृष्णातीरच्या घोड्यास सिंधुनदाचें पाणी पाजिलें.

वजिरी धाकटा गाजुदीखान[६९] करीत होता. त्याजपाशीं नजीबखान रोहिला प्यादेपणाची जमादारी करीत होता तो दिवसेंदिवस भर घेऊन, घोडे घेऊन, शिलेदारी करूं लागला. शिलेदारी करितां दैवयोगें करून हजार पाचशें लोक बाळगून गाजुदीखान याची कुलअख्त्यारी करूं लागला[७०]. सावकारांत ही पत भारी जाहाली. त्या योगें कुरुक्षेत्रापासून परगणा अंतर्वेद प्रांत अगदीं ईजारें[७१] करून चार हजार फौज बाळगून जमात बरी चांगलीच करून होता. तों पुढें होणार भवितव्य [तें झालें.] अलमशाहा[७२] याची स्त्री ‡ मलका जमानी व तिची कन्या चंदा जमानी अशीं लालगडी नजीक लगत यमुनेचे बेटावर शिलिमगड ह्मणोन थोर किल्ला आहे—तेथें पाण्यास पूल बांधिला आहे; त्याजवरून दोन्ही किल्ल्यांत जाणे येणेस वाट आहे;—त्या किल्ल्यांत बादशाहजादा व त्याच्या स्त्रिया जितक्या तितक्यांनीं तेथें रहावें, अन्नाच्छादन देतील तितकें घेऊन बंदिवानाप्रमाणें असावें. त्यांत मलका जमानीन होती; तिचे पोटापाण्याची बहुत *तसदी होती. तिनें आपले जागीं विचार केला कीं "मी † अहमदशाह याची ‡ बादषाहजादी, अटके अलीकडील मुलुख देखील दक्षिणदेश समुद्रवलयांकित पृथ्वीचें स्वामित्व केलें. असें असतां मी अन्नाच्छादनास यजित[७३]! हें दुःख कोणापाशीं सांगावें? अलमशाहा बादषाही करितो त्यास सांगावें तरि तो आह्मांहून बंदिवान. गाजुदीखान वजीर यास सांगावें तरि [तो] गनिमाचा पुत्र[७४]. वरकड अष्टाधिकारी केवळ निर्माल्यवत्. आतां एक मात्र विचार आहे. एक काबिल[७५] मनुष्य नजीबखान रोहिला आहे. तोही गाजुदीखान याचा वाढविलेला. परंतु त्यास तरी सांगून पहावें. म्हणोन विचार करून आधीं खोजा गाजुदीखान याजकडे पाठविला. त्याणें संपूर्ण तापत्रय

६९. गाझिउद्दीन (चवथा) याचें नाव मीर शहाबुद्दीन असें होतें. हा असफजहा निजामउल्मुल्क याचा नातु. निजामाच्या पाठीमागें दिल्लीच्या दरबारचें त्याचें काम त्याचा वडीलपुत्र गाझिउद्दीन (तिसरा) हा पहात होता. तोही १७५२ त दक्षिणेंत विषप्रयोग होऊन मृत झाल्यावर त्याचा भाचा मीर शहाबुद्दीन यास त्याचा दिल्लीकडलि सर्व अधिकार प्राप्त झाला.

७०. मागें पृ० ४ टी० २ पहा.

७१. इजारा=मक्ता.

७२. अलमशहा=अलमगीर (दुसरा.) हा दिल्लीचा १४ वा मोंगल तख्ताधिपति याणें १७५४-५९ पर्यंत दिल्लीचें तख्त भोगिलें. हा शेवटीं गाजी उद्दीन याचे मसलतीनें मारला गेला.

* 'तंगचाई' धो० प्र०

† अहमदशहा (१७४८-५४) हा महंमदशहाचा पुत्र ज्याणें अबदाली गिलज्याचा सरहिंदच्या लढाईत पराभव केला तो।

‡ पुढें पृ० २४ टी० ८५ पहा.

७३. यजित=(अजित) शरण, महाग.

७४. पुत्र=आज्ञाधारक, त्याच्या ओंजळीनें पाणी पिणारा.

७५. काबील = हुशार, कर्ता.

विदित केलें. त्याणें उत्तर केलें कीं, "मजकडे कांहीं गुत्ता नाहीं, गिर्दनबी[७६] जी गनिमा कडील अंताजी माणकेश्वर आहे त्यास पुसावें" ह्मणोन जाब दिला. तेथून खोजे अंताजी माणकेश्वर यांजकडे गेले. त्यांसही तसेंच निवेदन केलें. त्याणें उत्तर केलें कीं, "गाजुदीखान यांजकडे जाऊन सांगावें." तेव्हां खोजे माघारे येऊन [त्यांणीं सर्व वृत्त] मलकाजमानीस निवेदन केलें. तिणें नेत्रांस पाणी आणून परम खेद करिती जाहाली. तदोत्तर खोजे गुप्तरूपें नजीबखान रोहिल्याकडे पाठवून त्यास आपणाकडे बोलावून नेलें. तो गाजुदीखान याच्या जिव्हाळियाचा[७७] होता. त्यास किल्यांत जाण्या येण्यास कांहीं अटक नव्हती. तो मलकाजमानीकडे जाऊन खुरनिसात्[७८] करून अदबशीर उभा राहिला. आणि अधोमुख करून उत्तर केलें कीं, "मा साहेब! मे तेरा खानाजाद गुलाम. क्या तक्षीर? क्या हुकूम?" म्हणोन बोलतांच मलकाजमानीस दुःखाचा उमाळा[७९] येऊन अति आक्रोशें हंबरडा फोडून रुदन करूं लागली. आणि नजीबखान यास सांगितलें कीं कुलं[८०] पातशाही बुडाली त्यामुळें बादषाही उमराव, जिकडील तिकडे आपलाले जागां गनिमास मिळोन आपली अबरू रक्षून आहेत. आतां तूं रोहिल्याचे कुळांतला[८१] असलास तर फिरोन बादषाहीस अवसान घालशील. केवळ मुसलमानीस तांब्रा[८२] आला. बामणी बादषाही जहाली. आतां तूं एक अबरू राखशील ही खातरजमा राखोन तुला मात्र दुःख सांगितलें. हे बादषाही दुसऱ्यास आपले हातून द्यावी, परंतु असें निर्माल्यवत् रहाणें उचित नव्हे." असें नजीबखान याणें वर्तमान ऐकून मागुती खुर्निसात् करून अर्ज केलाकीं, "तक्षीर माफ. मैं एक अर्ज करितां हूं." तमाम बादषाही उमराव व राजवाडे अगदीं गनिमाचे आश्रित. बळ कोणाचे भिस्तीवर बांधावें? आह्मी ज्याचे पदरीं तो केवळ गनिमाचा ठेवणाईत, बादषाह [तर] बंदिवाना प्रमाणें आहे. आतां तुह्मीं मला आज्ञा केली तरि मजला साहेबीं सांजक[८३] रोटी. द्यावी कीं, मी जें* करीन त्याप्रमाणें वर्तावें.

---

७६. गिर्दनबाजी=गस्तकरी, शहरचा किल्लेकरी [?]

७७. जिव्हाळ्याचा=मर्जींतला, वर्गांतला.

७८. खुरनिसात्=कोर्निषात=भुईस हात लावून नम्रतेनें सलाम करतात तो. बखरींत कोठें 'खुरनीस' कोठें 'कुर्णुसात्' असें ही लिहिलें आहे.

७९. उमाळा = उभडा, अनावर गहिंवर.

८०. कुल्=सर्व.

८१. 'जुलमाचा' पु० प्र० 'वीर्याचा' धो० प्र०

८२. तांब्रा=तांब, गंज.

८३. साजक रोटी= आणभाक, बेलभंडार ह्या अर्थी.

* 'मीं जो अर्ज करीन त्या प्र०' सा० प्र०

तेव्हां तिणें तत्समयीं साजक रोटी दिली, आणि विचारती झाली कीं, "कामाची सुरत* मजला सांगावी."

असें ह्मणतांच नजीबखान रोहिला बोलता झाला कीं, "पूर्वी महंमदशाह बादषाहाचे समयीं उमराव वजीरी सुजाउद्दवला याचा बाप मनसूर अल्ली याजकडे [८४]होती. तो महमदशाहा [ मयत ] झाल्यावर तुमचे भतार अहंमर्दशाह यांस बादषाही झाली. [८६]तो केवळ नाकाबीज. त्याणें दक्षिणचा सुभा ढुंडा संजतशहा [ ? ] साडेसहा सुभे दक्षिण खाऊन होता. तो साठ हजार फौजेनिशीं दिल्लीस चाकरीस आला होता. तसेच आणखी दहा पांच उमराव दोन लक्ष घोड्यानिशीं दिल्लींत होते. तों पूर्वापार परंपरागत तमाम उमराव यांणीं जसे खिजमतगार अदबशीर रहातात, तसें त्यांणीं उभें रहावें. त्यांत किलिजखान नबाब निजामुल्मुलुख होता. तो बादषाहा तक्तीं बसोन फळ फळावळ हर जिन्नस पुढें असल्यास तिकडे पाहावें त्याजपुढें असेल त्याणें कुर्नुसात करीत पुढें येऊन हात पसरावे. त्याणें काय जिन्नस असेल तो कृपा करून द्यावा. अशी चाल होती. तसेंच किलिजखान याचे तोंडाकडे पाहिलें. तो कुर्नुसात करीत पुढें आला, तों पातशहांनीं हात आंखडून विनोद केला कीं, "यार हो! दखनी बांदर नाचता क्या देखो!!" असें पांच सात वेळां केलें. तेव्हां किलिजखान यास विषाद आला. तळव्याची आग मस्तकास जाऊन बोलला कीं, "निशा अकताला हुकमत परवार दिगॅर. आज पासून सहा महिन्यांत पातशाही आदिकरून कुल दिल्लीस बांदरका विकार दिखलाऊं तरच मिशा बाळगूं" म्हणोन प्रतिज्ञा केली. पादशाह बेहोष त्याणें सारासार विचार ध्यानांत राखावा तें न करितां बेफाम राहिला. किलिजखान याणें रूमचा पातशाह नादरशहा याजकडे सूत्र लावून त्याची चढाई दिल्लीवर करविली. रूमचे पातशाई खालीं दिल्लीची पानशाई; तीन लक्ष फौज दिल्लिपत पातशाहा व पांच लक्ष फौज रूमचा पातशहा. याहून [तो] जबरदस्त पातशहा त्याणें दोन लक्ष फौजेनिशीं मजल दर

* सुरत = तऱ्हा, प्रकार.

८४. या वाक्याचा संबंध पुढील गोष्टींशीं कांहीं दिसत नाहीं. मनसूरअल्ली = सफदरजंग. हा अयोध्येचा नबाब.

८५. मागें पृ० २२ टी० ‡ पहा अलमगीर हा अहंमदाचा चुलता. तेव्हां अलमगिराची मुलगी ती अहमदशहाची स्त्री, असें जास्त संभवतें. मागें 'अलमशहाची स्त्री मलका जमानी' असें झटलें आहे तें, बरोबर नाहींसें वाटतें.

८६. तो = महंमदशहा (१७२०-४८)

८७. 'मुढ पातशहा' सा० प्र० 'मुर्दी पातशहा' धा० प्र०

८८. इनडशा हाखनाला, हुकमत परवर दिगार-की हैं = ईश्वराची इच्छा असल्यास त्याचीच अज्ञा प्रमाण.

मजल अटक उतरून, लाहूरच्या सुभ्यास तंब्री पोंचवून, शतद्रू[८९] नदी उतरून आलीकडे आला. हें वर्तमान अहंमदशहास कळतांच त्यांणीं तमाम उमराव, वजीर यांस ताकीद करून फौज सिद्ध करून पुढें रवाना केले. दक्षिणची फौज भारी ह्मणोन किलीजखान यास मात्र जवळ ठेवून घेतलें. पुढें मनसूर[९०] अल्ली व जयसिंग राजाचा पुत्र व मारवाडी राठोड व छत्रसाल जाट व सुरजमल्ल जाट याचा बाप, अकबरखान बाळोचे [?] व सादलखान व बादलखान असे सरदार बहुत दीड लक्ष फौजेनिशीं पुढें सडे रवाना केले. झाडून पातशाई रिसाला चारशें तोफा व दोनशें गंजिफियाच्या गाड्या व हस्तनाले व सुतारनाले व जेजाला व रेकले व बंदुका व बाणांच्या कैच्या, असा कुल् दारूखाना किलीजखान याजसमागमें देऊन पानपत कर्णोल पावेतों पुढें रवाना केले; तों पुढील फौजेची गांठ पडली. तों नादिरशहाची फौज बेमुबलग व जुरत[९१] ही भारि त्यां पुढें यांस टिकाव होईना. यांणीं मोंगलाई मसलत करून पाठीवर फौज घेऊन दिल्लीकडे येते झाले. पुढें किलीजखान यास इशारत केली कीं, "आह्मीं नादिरशहास घोळवीत घोळवीत तुह्मांवर घेऊन येतों, तुह्मीं रिसाल्यांत दारूगोळा घालून सिद्ध असावें; तुह्मांवर येतांच तुम्हीं एकदांच सरबत्ती देऊन मागून हौद्यावर चालून घ्यावें; आह्मी इकडून हौदे चालवितों." असा मनसबा करून नादिरशहास वेढून आणिलें, तों किलीजखानाचें व नादिरशहा यांचें सूत्र एकच होतें. नादिरशहा वेलाशक फौजेचे पाठीवर आला. किलीजखान आधींच जाणून सिद्धच होता. मनसूर अल्ली याजपाशीं आग भारी ह्मणोन भडभुंजे अभिधान होतें. तेही आग किलीजखान याजपाशीं राहिली होती. [तिची] त्याणें दिल्लीपत पातशहाची फौज तोंडापुढें येतांच एकदांच सरबत्ती केली. जसे भडभुंजे लाह्या भाजतात तशी गत केली. तोफा व हस्तनाले व जेजाला व रेकले व गंजिफियांच्या गाड्या व बाणांचा भडिमार एकदांच झाला. फौज भाजून काढली. केवळ धुंदी जहाली. आपला रिसाला ह्मणोन फौज बेफाम राहिली होती. तों गृह-कलह होऊन 'विनाश काळीं विपरीत बुद्धी' जहाली. गृहकलह लागला ह्मणजे विनाश काळ जाणावा. तशी गती होतांच फौज भाजून काढली. तों नादिरशहाची फौज येऊन पोंचली. आधींच फौज केवळ

---

८९. शतद्रू=सतलज.

९०. मनसूरअल्ली.–ह्यावेळेस सादतखान जिवंत होता. त्यासच चुकून मनसूरअल्ली असें म्हटलें आहे. सादतखानाचा पुतण्या सफदरजंग यास मनसूरअल्ली ह्मणत असें दिसतें.

९१. जुरत=आवेश, मर्दुमकी.

आजून काढलेली, त्याजवर नादिरशहाकडील उमराव, इराणी, तुराणी, तांम्रमुखे[९२] व धकि आदि करून यांनीं हौदे चालविले. दिल्लीपत पातशहाची फौज मारून कुल धुमाधार केली. कांहीं रणांत मेली. कांहीं राहिली ती रानोरान देशत्याग झाली, तिणें फिरोन दिल्ली पाहिली नाहीं. नादिरशहा याची फौज चढत्या घोड्यांनिशीं[९३] दिल्लीस पोहोंचली. तों पुढें फौज गेली म्हणोन शहरची बंदोबस्ती न करितां शहरपन्हा[९४] खालींच होता. चढत्या घोड्यानिशीं शहर घेतलें. तों शहरास कधीं उपद्रव ऐसा ठाऊक नव्हता. केवळ द्वारकेप्रमाणें दिल्ली नांदत होती. ऐसा शहरचा चिंधीचोळी[९५] केला. इराणी, तुराणी अर्बुज जात, याणीं कित्येक करून [?] स्त्रियांच्या अब्रु घेतल्या ; शहरची गती या रीतीची केली. फौज लालगडी किल्ल्यास लागली. दिल्लीचा किल्ला अपेशी दों चौ रोजांत हस्तगत झाला ; महंमदशहा[९६] पातशहास धरून कैद केलें ; पातशाहीजादीची देखील अब्रु राहिली नाहीं ; किल्यांतून वस्त्रहरण करून पातशाही तक्त[९७] देखील काढिलें. परंतु तक्तावरील कचेरीस रुप्याचें छत होतें, तेवढें मात्र ठेवून मर्यादा राखिली. अवघे शहराचा विनाश करून पातशहा कैद करून नादिरशहा याणें मजमूचे टिळियावर[९८] मुक्काम करून राहिला. किलीजखान रसाला व तोफा फौज घेऊन मागून आला. बाह्यार्थ कृत्रिम शिष्टाई करून नादिरशहास भेटून पातशहास सोडविलें. नादिरशाई झाल्यावर तो आपले रुमाकडे गेला. तों पातशाही उमराव जिकडील तिकडे आपापले ठिकाणीं [जे] गेले ते फिरोन आज दिवसपर्यंत कोणी आले नाहींत. मनसुरअली गंगापार गेला. तो अयोध्येचा सुभा संभाळून तिकडेच राहिला. पुन्हा भागिरथी उतरून आलीकडे आला नाहीं. तेव्हां महंमदशहा सहजच निर्माल्यवत [झाला]. एक किलीजखान मात्र जवळ भारी. तेवेळेस किलीजखान याणें पातशहास प्रत्युत्तर केलें कीं, “दखनी बांदर किस तऱ्हेसे नाचता है ? साहेबांचे खातरेस आलें कीं नाहीं ?” ह्मणोन बोलतांच पातशहास परम विषाद आला. तों ‘जोर थोडा आणि घुस्सा बडा’ काय करतील ? किलीज-

९२. ताम्रमुखे हे कोण ? ‘ताम्र’ ही सज्ञा युरोपियन लोकांस दिलेली दुसऱ्या बखरींत कोठें कोठें आढळते.

९३. चढते घोड्यानिशीं = एकदांही घोड्यावरून न उतरतां ; एका धांवेसरसे; थांबल्याशिवाय किंवा दम घेतल्याशिवाय.

९४. शहर पन्हा=शहरची तटबंदी.

९५. चिंधीचोळा=विध्वंस, नासाडी.

९६. बखरींत पुष्कळ ठिकाणीं ‘अहंमदशहास’ असें आहे. पण तो हस्तदोष किंवा बखर रचणाराच्या गैर माहितीचें फल होय.

९७. मयुरावरील तक्त शहाजहान याणें साडेसहा कोटी रुपये लावून तयार केलें होतें ! !

९८. मजमूचे टिळियावर=मुजुमीचा टिळा [ ठिकाण ? ]हें दिल्लीचा एक भाग असावा.

खान याणें वजीरी आपला पुत्र गाजुदीखान होता या गाजुदीखानास देऊन बंदोबस्त करून दक्षिणेस आला. याप्रमाणें वर्तणूक झाली. हें तुह्मांसही वर्तमान सर्व माहितच आहे."

[ असें ] ह्मणोन नजीबखान रोहिला सविस्तर बोलता झाला, " आतां त्या तागाईत पातशाही उमराव गनिमास मिळोन आपली अब्रु रक्षून आहेत. त्यांत मनसुरअल्लीचा पुत्र सुजा उद्दवला यास मात्र वजिरीचें मुख [?] आहे. त्याजपाशीं पन्नास साठ हजार फौज व तीनशें तोफा आहेत. तो मात्र लगामीं लागल्यावर मारवाड प्रांतांतील बिजेसिंग राठोड तो गनिमाशीं मिळता दिसत नाहीं; तोहि प्रयत्न केल्या हस्तगत होईल. व माधवसिंग जयनगरकर याचा दोंही डगरीवर हात आहे व सुरजमल्लजाट तो आपला नव्हे. तसेच बुंदेले व आणखी उमराव आपले नव्हेत. परंतु यास आधीं एक निमित्य घ्यावें लैंगतें; जर त्यां घेतलें तर मजला आश्रय पाहिजे. आतां उपाय एक आहे कीं, खंदाहारचा पातशाहा अबदुल अल्ली तुराणी एक मातबर आहे. त्याचा पुत्र तैमूरशहा यास तुमची कंन्या चंदाजमानी द्यावी. दिल्लीचा पातशहा अलमशहास मारून [ पातशाही ] तैमूरशाहांस, द्यावी व वजिरी सुजाउद्दवला यास द्यावी, आणि बक्षीगिरी[1] मजला द्यावी. असा करार होत असल्यास हुकूम जह्याल्यास प्रयत्न करीन." ह्मणोन बोलून खुर्नीस केली. हें मलकाजमानीनें ऐकून मान्य करिती झाली. 'स्त्री बुद्धिः प्रलयंगता' तिचें यांत काय जातें?

याप्रमाणें तिचा व त्याचा दारमदार होऊन नजीबखान ठिकाणास येऊन वकील व पत्रें सुजाउद्दवल्याकडे पाठविलीं. त्याणें पत्रें पाहून, परम खुशाली मानून, वकिलापाशीं साजकरोटी दिली कीं, " मी सर्वस्वीं तुमचा आहें. हिंमत धराल तर फौज व लागेल तितका पैसा पुरवीन. परंतु वजारत एक वेळ करीन." ह्मणोन पुर्ता बंदोबस्त करून वकील आला. तसेंच जयनगरकर व हामदखान लंगडा व बिजेसिंग यांजकडील सूत्रें ठीक करून याणें आपला भाऊ सुलतानखान रोहिला यास अबदालीकडे खंदारास पाठविला कीं, " दिल्लीची पातशाहि तुह्मा पुत्र तैमूरशहा यास देऊन मलकाजमानीची कंन्या चंदाजमानी तैमूरशहास देईन. दिल्लीचा भेद झाडून मजपाशीं आहे. चढत्या घोड्यानिशीं दिल्लीचा किल्ला हस्तगत करून देईन." म्हणोन भावास

९९. " परंतु यास ( त्यास ?) आधीं निर्मोळ त्यास धनी पाहिजे." सा० प्र०

१००. " तंबूरशहा" असा पु० प्रतीचा पाठ सर्वत्र आहे.

१. बक्षगिरी=सेनाधिपत्य.

खंदारास पाठविलें. हें वर्तमान गाजुदीखान यास रतीमात्र ठाऊक नाहीं. इकडे तो नजीबखान रोहिला केवळ हितशत्रूप्रमाणें जावसाल करून, इकडे केवळ त्याचे उपक्रमांत राहून, तमाम गारोडी रान भारतो तसा प्रकार [त्यानें] केला. सुलतानखान खंदारास जाऊन पोहोंचला. अबदालीस भेटून येथील वृत्तांत निवेदन केला. तोही आधींच इकडे यावयास आतूर होता. "वजारत सुजाउद्दवला यास द्यावी, मलकाजमानीची कन्या चंदाजमानी तैमूरशहास देऊन दिल्लीची पातशाही तैमूरशहास द्यावी आणि बक्षीगिरी नजीबखान यास द्यावी," येणें प्रमाणें करार करून ऐशीं हजार फौजेनिशीं दिल्लीवर चाल केली. लाहूर, मुलतान, पंजाब कुल मुलुख काबीज करून २ब्यासगंगा व चिनाब व शतद्रुनदी उतरून सरदेस३ येऊन मुक्काम केला.

ही बातमी दिल्लीस गाजुदीखान वजीर यास कळली कीं, "तुराणीची दौड निश्चयें दिल्लीवर आली." तेव्हां नजीबखान रोहिला मात्र चार हजार फौजेनिशीं मातबर माणूस वजिराजवळ होता. तसाच गनिमांपैकीं अंताजी माणकेश्वर शहरचे गिर्दनवाजीस पांच हजार फौजेनिशीं होते. ते समयीं गाजुदीखान याचे पातशाही कारभारी नागरमल्ल व बाहादूरखान बाळोचे होते [ते] व अंताजी माणकेश्वर व नजीबखान रोहिला असे मिळवून परम अजीज होऊन मनसुबा पुसता झाला कीं, "तुराणीची दौड भारी; दक्षिणच्या फौजा गनीम कुल झाडून दक्षिणेस गेल्या. एक नजीबखान रोहिला व अंताजी पंत दोघे मात्र मातबर आहेत. तेही झाडून दहा हजार. यास उपाय काय करावा?" हें वर्तमान ऐकून अवघे दंग झाले. एकमेकांस राजे कोणी कोणास बोलेनात. असे मुहूर्त मात्र बसले तों नजीबखान रोहिला केवळ मात्रागमनी, याणें उठोन खुर्नीस करून अर्ज केला कीं, "मी साहेबांचे पदरीं आहे तों वजिरांनीं कांहीं फिकीर करावी असा अर्थ नाहीं. आतां त्याशीं युद्ध करावयास सामर्थ्य नाहीं, [तर] मजला हुकूम करावा, आडवा जाऊन त्यास भेटून केवळ ते साम-दाम-दंड-बुद्धि-भेद करून त्यास दिल्लीस न येतां तेथूनच माघारां फिरोन लावीन." ह्मणोन हितशत्रुपणें बोलतांच गाजुदीखान यास वाटलें कीं, "नजीबखान केवळ प्राणाचाही प्राण, प्राणाहून परता, याजवर काया कुरवंडी करावी." म्हणोन त्याचें बहुता प्रकारें समाधान करोन, त्यास हत्ती व घोडा व शिरपेंच व मोतियांचा तुरा देऊन त्याची रवानगी केली.

तों अबदुल अली तेथून कुरुक्षेत्रावर आला. तेथील तीर्थविध्वंस करून,

---

२. ब्यासगंगा=बियास नदी. | ३. सरद=सरहिंद.

ब्राह्मणांचीं घरें पाडून आठ मुक्काम तेथें केले; त्या मुक्कामीं नजीबखान रोहिला जाऊन पोंचला. ते समयीं अबदुल अल्लीकडील वजीर व सैमदखानें कतलबाज आडवे येऊन बहुत सन्मानें घेऊन गेले. पातशाहाची भेट जाहाली. येथें सुकाणूं [?] सुलतान होता. भेट होतांच दारमदार करून पूर्ववत् प्रमाणें त्याची साजक रोटी यांस आली, याणें आपली साजक रोटी त्यास दिली. तेसमयींच तेथून कूच करून पाणिपत कर्णाल येथें आले; तेसमयीं बाहादरखान बाळोचे याचा पुत्र बाहादर गडी होता तो रातोरात दिल्लीस येऊन पोंचला. इकडून नजीबखान सांडणी स्वारां समागमें वरचेवर पत्र पाठवी कीं, "वजिरांनीं कांहीं फिकीर न करावीं." त्याजवरून हे आपले जागां स्वस्थ होते. बाहादरखान याचा पुत्र येऊन, वजिरास भेटून, तेथील सविस्तर सांगितलें कीं, "नजीबखान त्यांजकडे मिळाला. एक दोहीं दिवशीं येऊन पोहोंचतो. तुह्मी त्या मात्रागमनीवर स्वस्थ कसे राहिलां?"

हें वर्तमान वजिरानें ऐकून बहुत घाबरा जहाला. "मात्रागमनीनें निमकहरामी केली. यास यत्न काय करावा?" ह्मणोन अंताजी माणकेश्वर यांस बोलावून सांगितलें कीं, "तुह्मी शहरची गीर्दनबाजी करावी मी किल्ला संभाळतों." हें अंताजी पंतांनीं ऐकून साफ उत्तर केलें कीं, "शहर-पन्हा थोर, फौज थोडी. आह्मांस हे हिंमत होत नाहीं." ह्मणोन कूच करून बालमगडाबरि मुक्काम केला. तों दुराणी ही दुसरे दिवशीं येऊन पोंचले. आधींच शहर खालीं. आणि नजीबखान तो केवळ भेद्यां चढते घोडियानिशीं शहर घेतलें. तों गिलच्यांची ताकीर्द भारी. शहरांत दहा हजार गिलच्यानीं मारले. केवळ धुंदी जहाली. शहरचा नाश केला. पूर्वीं नादिरशाही जाहाली त्याहून भारि प्रलय जहाला. तों अबदुल अल्ली दुराणी जिमा माशिदीस येऊन आपल स्वधर्म उजू तवाजू करीत होता. तों अर्जबेगांनीं अर्ज केला कीं, "शहरांत गर्दी होऊन दुराणीची बहुत कत्तल झाली. तों नजीबखान रोहिला व

४. 'समपखान कत्तलबान' असें तुंगार येथील प्रतींत आहे. तुंगार ता० वसई येथील कुळकर्णी राघो मल्हार याची ही खबर पुण्यास शके १७१२ सालीं लिहिलेली वि० ज्ञा० वि० कर्ते यांजकडून आह्मांस मिळाली. हिचा अर्थनिर्णय करण्यांत बराच उपयोग होईल.

५. 'सुका सुलतान' तुंगार प्रत.

६. 'बलक' किं० 'बाडक' असे तुं० प्रतींत दिसतें.

७. "नजीबखान तो हकहारामी बहुत आहे. तेव्हां जें करणें तें सांभाळन करावें नाहीं तर त्याजला धरून आणावें अशी ताकीद बादशहानें केली." सा० व तुंगार प्रत.

८. ताकीद=सक्ती, जरब.

९. "तों शहरांत दहा पांच हजार गिलचे मारले गेले केवळ धुंदी झाली." असा एके प्रतीचा पाठ आहे.

सैमदखान कत्तलबाज जवळ होता ; अबदुल अलीनें त्याचे तोंडाकडे पाहून जवळ निमचा होता तो अर्धा ओढून जवळ ठेवितांच ' कत्तल ' ह्मणोन पुकार जाहली. ते समयीं त्याची कत्तल काय ? पुरुषच मारावा असा अर्थ नाहीं. पुरुष व स्त्री, मुलेंबाळें व गाढव कुत्रें व गुरूं हाताखालीं सांपडेल त्याची कत्तल करावी. अशी साडेतीन घटकापर्यंत कत्तल झाली. तों अबदुल अलीनें * निमाज करून करांचली [ ? ] ओढून ठेविली होती तीस मेण करून ठेविलें. मेण करितांच 'द्वाही' ह्मणोन पुकार झाली. तों गिल-च्यांची कैद भारी. ताकीद ह्मणतांच मानेवर सुरी ठेविली असली तरी सोडावें. साडेतीन घटकांत अठरा हजार मनुष्यांची कत्तल जाहाली. तो प्रळय काय लिहून कळवावा ? याप्रमाणें शहरचा चिंधीचोळा करोन, किल्यास येऊन लागले. दोंचौं दिवसांत किल्लाही घेतला. पातशहा अलमशहा होता तो कैद केला. गाजुदीखान यास धरून कैद केला. त्याची मावळण व वहीण व त्याच्या कळावंतिणी वगैरे नजिबखान याणें आपले घरांत घातल्या. नजीबखान मात्रागमनी तो या प्रकारचा. मलकाजमानी इची कन्या चंदा जमानी होती, ती तैमूरशहास दिली. चार रोज तेथें राहून आगरियाचे रोखें चाल केली. समागमें कैदेंत गाजुदीखान यासही घेतलें. आणि अलमशहास किल्यांतच कैद करून ठेविलें.

तों अंताजीपंत येऊन पलवलावरि [?] राहिले. नजीबखान याणें गाजुदीखान याचा शिरच्छेद करावा ह्मणोन बहुत आग्रह केला. परंतु ते समयीं अबदुल अलीनें राखिलें. अंताजीपंत याची बातमी पळाल्याची कळतांच सैदमखान कतलबाज पंधरा हजार फौजेनिशीं त्याजवर गेला. अंताजी माणकेश्वर यांणीं हिंमत धरून फौजेचा मोकाबला घेतला. तों यांची जड काया. धाकटे घोडियावर थोर घोडा टाकावा तो धाकटा दबून राहतो, तैसा प्रकार झाला. दोन घटिका मारा[११]मारी झाली. तों अंताजी पंत रेवाडीचे मुक्कामी निघोन गेले. पांच हजार फौज होती त्यांतून अडीच हजार फौजेची कत्तल झाली. जितके निवडक माणूस तितके ठार झाले. तो खासा अबदुल अलीचा मुक्काम पलवलावर जाहला. पुढील आघाडीची फौज पडेलवाला कडून[१२] छाचे सरा-

---

* "निमाजामा करुन" पु० प्र०

१०. इ० गिलच्यांची.

११. "मारामारी हणाहणी सणासणी झाली तों अंताजीपंतांस साहेनासें जालें मग अंताजीपंत रेवाडियाचे रोखें' तुं० व सा० प्रती

१२. 'पडलेकडोन छऱ्याचे राईस जाऊन राहिली' सा० प्र०

'होडळेकडून छायार्त राईस' तुं० प्र०

'पुढील आघाडीची फौज हाडवालरून छारेस राईवर जाऊन पोंचली' धो० प्र०

ईवर जाऊन पोंचले. तेथून मथुरा वृंदावन कच्चे सोळा कोस राहिले. मथूरेंतील ब्राह्मण व वैरागी यांस गनिमाचे फौजेचा इतबार म्हणून बेसावध होते. तों एका एकीं झाडून दौड येऊन पोंचली. वृंदावनांत आठ हजार वैरागी होते ते हत्यारें धरून मेले. गिलच्यानीं गोखडींत[13] दहा पांच वैरागी सत्पुरुष होते तेही बसले ठिकाणीं लेवें[14] केले. दुराणी केवळ निर्दय, त्यांस मनुष्याची परवा नाहीं. तसेच मथूरेंत हजार दीड हजार ब्राह्मण मारिले. तरुण ब्राह्मणी व अन्यत्र जातीच्या स्त्रीया होत्या त्यीं[15] धरून ठेविल्या. त्यांत कित्येक पतिव्रता स्त्रिया होत्या त्यांणीं जिवावर उदार होऊन यमुनेंत जीव द्यावा ह्मणोन डोहांत चालिल्या. तों 'संकटीं ईश्वर साहाय्य,' तसें ज़ाहलें. प्रत्यक्षास प्रमाण डोहांत पाणी बायकांस मांडीभर लागोन नदीपार झाल्या. त्यांचे मागें गिलच्ये घोडे घालावयास गेले ते बुडों लागले. ईश्वरानें कौतुक केलें. ही गोष्ट कोणी मिथ्या मानावी असें नाहीं. बहुत साक्ष आहेत.

या प्रकारें क्षेत्राचा चिंधीचोळा करून गोकुळा पलीकडे गोघाट ह्मणून [ आहे. ] पूर्वीं देव गाई चारून त्या घाटावर पाणी पाजावयास आणीत होते ह्मणोन 'गोघाट' नांव पडलें. तेथून कच्चे सात कोस आगरियाचा किल्ला होता. येथें यमुनेच्या तीरानें मुक्काम दुराणीचा झाला होता. गाजुदीखान कैदेंत होता त्याची राउटी नदीचे कडेस होती. भोंवताले रखवालीचे रोहिले सावधच होते. पाणियाचे रोखें पाणी भारी ह्मणोन गैरसावध होते. तेसमयीं गाजुदीखान यास पाणियांत पोहावयाचा सराव चांगला बहुतच होता. त्यानें राखणदारांची नजर चुकावून डोहांत गेला. पोंहत नदीचे तीर सोडून मध्यभागीं कांहीं पोंहत कांहीं ठाव घेत असा आगरियास जाऊन पोहोंचला. कडेस निघोन, रात्र चार घटका पहांटेची राहिली होती तेसमयीं निघोन उघडा बोडका किल्ल्याचे दरवाजियास जाऊन पोंचला. तों शह लष्करचा भारी ह्मणोन किल्लाही सावधच होता. तेव्हां दरवाजियाचे लोकांस हांक मारून सांगितलें कीं, "मी गाजुदीखान ऐशा अरिष्टांतून पार पडून तुमचे पाठीशीं निघावयास आलों आहें. आजिचे समयीं मजला किल्ल्यांत घेऊन जिवदान द्यावें, असें किल्लेदारांस सांगावें." हें वर्तमान किल्लेदारास दरवाजेकरी यांणीं सांगतांच किल्लेदारानें मशाला लावून दरवाजियाच्या खिडक्या उघडून बाहेर आला.

---

१३. 'गोपडी' तुं० प्रत. गोखडी=गाई उभ्या राहण्याची जागा,. गोठण.

१४. नर्व=ठार. 'नर्व' पु० प्र०

१५. 'त्याबांद (?) धरून' तुं० प्र०

आगरियाचा किल्ला यमुनेच्या तीरीं आहे. एकेकडून यमुनेचा खंदक व एकेकडून खणून खंदक. दोन्ही तोंडें यमुनेस मिळवून खंदकांत पाणी बेमुबलग. दरवाजियापुढें खंदकावरून फळ्यावरून जावें यावें. फळ्या[१६] काढल्यावर यत्न नाहीं. तो किल्ला केवळ असाध्य. एकांत एक पांच परीघ किल्ल्यास. दर परिघास दोनशें तोफा व शिवाय धाकटीं यंत्रें, अशीं किल्ल्यावर बाराशें तोफ वगैरे. तो दुर्ग केवळ अवघड. आगरियाप्रमाणें भुईकोट किल्ला कोठें उपमेस नाहीं. ज्यावेळेस अकबरशहा पातशाहा यांणीं किल्ला बांधला त्या वेळेस किल्लेदार आंतील सामान यंत्रधारी व गोलंदाज ठेविले ते वंश परंपरा किल्ल्यांत राहत आले. आलीकडे औरंगजेब महाबळी आदि करून पातशाहा जाले आणि गनिमाचीही प्रबळता जाहली. पलीकडे अटकेपर्यंत मुलुख काबिज केला. परंतु किल्ला कोणास आला नाहीं. सुरजमल्ल जाट यास शहरची गिर्दनवाजी दिली होती. परंतु त्यास किल्ला असाध्य. त्याचें वेतन ज्यांनीं आगरियाचें स्वामित्व करावें त्यांणीं किल्ल्यांतील पोटापाणियाची बंदोबस्ती करावी. तो किल्ला अकबरशाहा पातशाहा यांणीं कांहीं पृथ्वी दिग्विजय करून, रुपये मिळवून बांधिला, असें नाहीं. त्यास किमया अवलिया फकिरापासून प्राप्ति होती. त्या किमियाचे द्रव्यें करून एवढें असाध्य दुर्ग निर्माण केलें होतें. दारूगोळा यंत्राचें साहित्य याजप्रमाणें कोणत्याही किल्ल्यावर नाहीं.

[ असो ] तेथें गाजुदीखान पोहोंचतांच तो किल्लेदार बाहेर आला. आणि ओळख घेतली. तो गाजुदीखान प्रमाण. जीवदान मागतांच किल्लेदार बोलता झाला कीं, "ज्यापासून आह्मांस किल्ल्याची किल्लेदारी त्यापासून कधीं पारखी[१७] मनुष्य येऊं दिलें नाहीं." असें ह्मणतांच गाजुदीखान याणें उत्तर केलें कीं, "तुमचा आश्रय धरून एथवर आलों. आतां आपले हातून मारून टाकणें किंवा किल्ल्यांत नेणें." असें ऐकून किल्लेदार याणें चित्तांत योजना केली कीं, "एक पुरुष किल्ल्यांत आलिया काय होणें? या समर्थास रक्षावें हें उचित." म्हणोन किल्ल्यांत नेला. वस्त्रें देऊन समाधान केलें.

तो मागें गाजुदीखान गेला म्हणोन हांक जाली. नजीबखान रोहिला याणें चौकीदारांचा शिरच्छेद केला. गाजुदीखान याचा तपास केला. तो अखेर आगरियाचे किल्लां दाखल झाला हें ऐकून, कूच करून, अबदुल अल्ली यमुनापार जाला. आगरियाचे किल्यानजीक मुक्काम करून राहिला. पांच मजलचे व पत्रें किल्लेदारांस लिहिलीं कीं, "गाजुदीखान यास आमचे हातीं

१६. 'पाट्या' तुं० प्र० | १७. पारखी=परकी.

देणें आणि किल्ला खालीं करून द्यावा. नाहीं तर मी खंदारचा पातशाहा अबदुल अल्ली आहे. किल्ला खाणून यमुनेंत टाकीन. आणि तुझा शिरच्छेद करून तुझीं रांडापोरें ढाणकांत देईन." ह्मणोन रवाना केले. ते किल्ल्यास पोहोंचले. किल्लेदार याणें पत्रें वाचून पाहिलीं. चित्तांत विचार केला कीं, "अबदुल अल्ली पातशाहा शहाणा म्हणोन ऐकतों. असे असतां असा प्रकार लिहिला: त्यास याचा खावंद नादिरशाहा आला होता त्याणें काय केलें? तो याच्या हातें काय होणें?–तथापि हुशारी केली पाहिजे." किल्लेदारें याणें शहरांतील शोध केला कीं शहर निखालस उजाड जालें कीं वस्ती आहे. तो भारंधेडी झाडून गेली. परंतु वस्तीस मनुष्यें होतीं. किल्लेदार यानें शहाणपण केलें कीं, "गिलच्यांस धुडावूं तरि जीगत दिल्लीची व मथूरेची तीच गत आगरियाची होईल." असें जाणोन दोघे गिलचे दरवाजियांत ठेविले. तिघे माघारे पाठविले कीं, "पातशहांनीं चार दिवस कृपा करावी. चौं दिवशीं किल्ला खालीं करून देतों. आणि गाजुदीखान वजीर यास हजर करितों." ह्मणोन लिहून पाठविलें.

इकडे तमाम शहरांत ताकीद करून शहर चौं रोजांत बेचिराख केलें. आगरियांत कुत्रें राहिलें नाहीं, तेथें मनुष्य कैसें असेल? यावरि किल्लेदार यांणीं ज्या रोखें गिलच्या मुक्कामास होता ते बाजूस चारशें तोफा दारूगोळा भरून, सिद्ध करून [ ठेविल्या ] आणि अबदुल अल्लीस एक चिठी लिहिली कीं, "आज आमचा खुशालीचा दिवस आहे. जलदीनें कूच करणें नाहीं तर तोफांस सिलिक होईल." ह्मणोन चिठी लिहिली. एके गिलच्यास तोफेच्या तोंडीं देऊन उडविला. एक चिठी देऊन पाठविला. हें वर्तमान अबदुल अल्लीनें व नजबिखान यानें ऐकून, मणगटें चावून किल्यावर हल्ला करावा ह्मणोन फौज सिद्ध केली. तों किल्लेदार यानें चारशें तोफांची एकदाच सरबत्ती दिली. फौजेंत एकदाच चारशें गोळा येऊन पडतांच मोठा प्रलय झाला. जलदीनें लष्कर तयार होऊन पळों लागलें. दोन तीन कोस जाऊन दम खादला. तेथेंही पल्याच्या गोळ्यापुढें टिकाव होईनासा जाहाला. पांच कोसावर मुक्काम केला. नजीबखान रोहिला यांस अबदुल अल्ली [ यानें ] मसलत विचारिला. तेव्हां नजीबखान याणें उत्तर केलें कीं, "आगरियाचा किल्ला भारी. तेथें कोणाचाही यत्न नाहीं. येथें आम्हांस गुंतणें भलें नव्हे. देशींहून गनिमाची

---

१८. "ढाणकास वाढीन" सा० प्र० ढाणक=मांग, महार वगैरे.

१९. भारधडी=जड वस्तु, भारी सामान (?)

२०. 'सिलक'=बत्ती देणें.

फौज रघुनाथराव व मल्हारराव होळकर[२१] नर्मदा अलीकडे आले आहेत. अशी बातमी तह किल्लां आली आहे. शहास गुंतणें उत्तम नाहीं."

ह्मणोन कूच करून कुंभेरीचे रोखें चाल केली. सुरजमल्ल जाट यास चिठी लिहिली कीं, "क्रोड रुपये खंडणी घेऊन हुजूर भेटीस येणें." ह्मणून चिठी आली. सुरजमल्ल जाट याणें रूपराम कटारी यास बोलावून सल्ला विचारिला कीं, "अबदुल अली खंदारचा पातशाहा चालून आला सामान्य नव्हे. यास जाबसाल काय करावा?" रूपराम कटारी मोठा मनसुबेबाज. यानें उत्तर केलें कीं, "देशींहून गनिमांच्या फौजा नर्मदा उतरून आल्या. यास शहास पडावयास दम निघत नाहीं. मेजवानी म्हणोन दहा लक्ष रुपये घेत असल्यास उत्तम, नाहीं तर झुंजास उभें राहवें. तों पावेतों गनिम यांच्या फौजा येऊन पोहोंचतील." हा मनसुबा सुरजमल्ल जाट याचे ध्यानास आला. अबदुल अलीस चिठी लिहिली कीं, "दाहा लक्ष रुपये मेजवानी देतों. हे घेऊन स्नेह राखून जावें. नाहीं तर युद्धास सिद्ध आहों." म्हणोन चिठी येतांच यांणीं गनिम यांचे धास्तीवर मान्य केलें. दहा लक्ष रुपये घेऊन परस्परें कागदीं पत्रीं स्नेह संपादून दिल्लीस पोंचले.

[पुढें] सुजाउदवला यास आणून वजारत द्यावी, तैमूरशहास तख्तीं बसवावें, हा मजकूर होता तो राहिला. अदुल अलीनें चित्तांत विचार केला कीं, "हा नजीबखान मात्रागमनी. ज्याचे येथें वाढला त्याची गत या प्रकारची केली. याचे भरंवाशियावर पुत्रास येथें ठेवणें उचित नाहीं." ह्मणून अंतरीं मजकूर करून नजीबखान यास समजाविलें कीं, "प्रस्तुत आह्मी खंदारास जातों. पेस्तर सालीं येऊन अवघा बंदोबस्त करितों. तों पावेतों तुम्हीं दिल्लीचा किल्ला राखावा." ह्मणोन नजीबखान यास पांच हजार फौजेनिशीं दिल्लींत ठेविला. पातशाहा अलमशाहा यास जिवें मारावें तें न करून, जीवदान देऊन, तसेंच रक्षोन कूच करून कुरुक्षेत्राकडून सरदेंत सैमदखान कतलबाज दहा हजार फौजेनिशीं ठेविला. समागमें मलकाजमानी व तिची कन्या चंदाजमानी तैमूरशहास वीस हजार फौजेनिशीं ठेवून अबदुल अली खंदारास गेले.

हें वर्तमान राजश्री रघुनाथराव दादा व मल्हारजी होळकर यांणीं ऐकून दबत दबत चालिले होते ते मजल दर मजल[२१] चालले. चमेली उतरून आगरियानजीक आले. इकडे अंताजी माणकेश्वर यानीं दत्ताजी शिंदे यांस

२१. 'रघुनाथ इ०' मागें पृ० २१ टी० ६८ पहा.

पत्रांवरे[२२] पत्रे पाठविलीं कीं, "हिंदुस्थान हातचें गेलें. जलदीनें फौजबंदी करून येऊन पोहोंचावें." त्यावरून शिंदेयांनीं नालबंदीचे दिवस नसतां वैशाखमासीं चाळीस हजार फौजेस नालबंदी[२३] दिली. तयार होऊन जावें तों दिल्लीच्या वकिलांचीं पत्रें आलीं कीं, "दुराणी आपले फौजेसुद्धां निघोन प्रांतांत गेला. राजश्री दादा साहेब यांची फौज चमेली पार जाहली. तुह्मीं तूर्त यावयाचें न करावें." ह्मणोन पत्र येतांच यांणीं चतुर्मास पर्जन्यकाळ दम खाऊन राहिले. इकडे राजश्री दादासाहेब यांणीं आगरियां नजीक येऊन, सुरजमल्ल जाट याजपाशीं खंडणी घेऊन, आगरियांत गाजुदीखान होता त्यास काढून आपणापाशीं आणिलें. तेथून मजल दरमजल कूच करून गाजुदीखान यास घेऊन दिल्लीस पोंचले. शहरचा विनाशकाल. ज्यांनीं आधीं यावें त्यानें वस्त्राहरण करून मग काय तें कर्तृत्व करावें. असा शहरचा सत्यनाश करून किल्ल्यास मोर्चे लाविले. पंधरा दिवस नजीबखान किल्ल्यांतून झुंजला. त्यास पुरतेपणीं उमजलें कीं, "आतां गनीम कांहीं मजला सोडीत नाहींत. आणि अबदुल अल्लीचीही कुमक होत नाहीं. आतां आपला बचाव करावा." ह्मणोन अंतस्थ वकील मल्हारराव यांजकडे पाठविला. आणि जाबसाल केला कीं, "मी तुझा धर्मपुत्र आहें. माझा बचाव करावा. शरण आलिया मरण चिंतूं नये. [हें] समर्थास उचित होय." असें ह्मणतांच मल्हारराव केवळ साभिमानी होता. त्यास ईर पडली कीं, "नजीबखान यानें धर्मपुत्र ह्मणविलें तेव्हां याचा बचाव करावा." ह्मणोन मल्हारराव राजश्री दादासाहेब यांजकडे जाऊन, बहुत प्रकारें भीड खर्चून, पदर पसरोन, मागितलें. दादासाहेब यांचे चित्तांत नजीबखान हा केवळ मात्रागमनी, यास जिवें सोडावें असें नव्हतें. परंतु मल्हारराव यांची भीड भारी, उलगडेनाशी झाली. तेव्हां मान्य करणें प्राप्त झालें. मल्हारराव यांनीं नजीबखान यास किल्यापासून काढून आपणापाशीं ठेविला. मागुती अलमशहास तक्तीं बैसवून, वजीरी गाजुदीखान यास देऊन, शहरची गीर्दनबाजी अंताजी माणकेश्वर यांस सांगोन, पूर्ववत् प्रमाणें बंदोबस्त करून, कुरूक्षेत्रास येऊन पोंचले.

तेथें तीर्थविधी यथा पद्धतीनें करून, कांहीं तुळादानें करून, सरदेस जाऊन पोंचले. श्रीमंतांचा काळ उत्कर्ष. सैमदखान कतलबाज याणें तोंड न दाखवितां पळून लाहुराकडे जात होता. तो पेंढारी याणींच लुटून टाकिला. फौज

---

२२. 'पत्रांवर पत्रांचा सूर चेतविला' तु० प्र०

२३. नालबंदी = घोडेस्वारांस चाकरी ठेवण्याच्या पूर्वीं अगर पाठवणीच्या वेळीं कांहीं आगाऊ पैका देतात तो.

मजल दर मंजल शतद्रु व व्यासगंगा व चिनाव उतरून लाहुरास पोहोंचले. तेथील सुभा संदीपबेग होता. तो दुराणींनें मारून त्याची स्त्री, मुलें कैदेंत ठेविलीं होतीं. तैमूरशहानें लाहूर सोडून [तो] खंदारास गेला त्याचीही फौज थोडी बहुत लुटली. लाहुरचा सुभा संदीपबेग याचा पुत्र कैदेंत होता त्यास पांच हजार फौजेनिशीं चाकरीस ठेवून त्याचा दिवाण लक्ष्मी नारायण ह्मणोन जातीचा कायस्त होता—बरा कर्ता मनुष्य होता—त्याचे स्वाधीन लाहूर पंजाब व मुलतान अटकेपर्यंत मुलुख काबीज करून ठाणीं माघाऱ्या दिल्या. लुटीनें पेंढारी व लष्कर कुबेर जाहले रघुनाथराव व मल्हारराव यांनीं मोठें यश संपादिलें. ते सालीं छावणीस राहिले.

तों देशीं राजश्री नानासाहेब यांचा व बंदेगानअली निजामउल्मुलुख याचा कांहीं बिघाड जाहला. ते समयीं रा० नानासाहेब यांनीं रा० जनकोजी शिंदे यांस नेऊन त्यांस सांगितलें कीं, " हिंदुस्थानांत तुह्मीं पराक्रम बहुत केले. मारवाडिया सारखे राठोड यांजपासून राज्य सोडविलें. तें आम्ही कानीं मात्र ऐकून तृप्त जाहलों. परंतु आपले दृष्टीनें पाहिलें नाहीं. प्रस्तुत मोंगलांचा व आमचा बिघाड जाहला आहे. आमची फौज बहुत करून दादासाहेब यांज समागमें गेली. तुम्हीं फौज अबदुल अलीचे आवईवर ठेविली आहे. प्रस्तुत आम्ही तुमचे जीवावरि बिनघोर आहों. आंबदांची मसलत तुम्हांवर आहे." असें म्हणतांच शिंदे मर्द आणि काबीज मनुष्य यांनीं मान्य करून फौजेसुद्धां दुसरियाकारितां नबाब औरंगाबादेसच गाठिला. नबाबाजवळ फौज अगदीं मराठे व्यंकटराव निंबाळकर व जानबा निंबाळकर व गोपाळसिंग राजा खंदारकर व इब्रामखान गारदी. एक जाधवराव निराळा करून तीस हजार फौज होती. तिजवर भोंवताले गनीम उभे राहात. परंतु मोंगल बाहेर येईना. त्यास मराठियांच्या फितुराचा संशय जाहला होता. तों मराठियांस ईर ही पडली कीं, " आमचा अभावें[२४] नबाबास जाहला आहे. हें उत्तम नव्हे. युद्ध करावें." म्हणोन तमाम मराठे सिद्ध होऊन शहरा नजीक बाहेर उभे राहिले. तों दत्तोजी शिंदे व जनकोजी शिंदे व नानासाहेब यांचा पुत्र विश्वासराव यांनीं फौज सिद्ध करून चालून गेले. नबाब निजाम अली तयार होऊन यांत न मिळतां दुरून तमाशा पाहात उभा राहिला. यांनीं तीन फौजा करून तिन्हीकडून तिघे उठले. जानबा निंबाळकर यांजवर दत्ताजी शिंदे, व व्यंकटराव निंबाळकर यांजवर जनकोजी शिंदे, व वरकड उमराव यांजवर विश्वासराव यांची फौज, असे उठले. व्यंकटराव यांची

२४. अभाव = संशय. हें निजामाकडील मराठे सरदारांचें ह्मणणें.

बहीण जनकोजी शिंदे यांस दिली होती. सोइरे जाहले तरी एकमेकांचे येथें जेवण्यास जावें. परंतु क्षत्रधर्मांत अंतर करितां येत नाहीं. ह्मणोन मराठी यांचे गाडहत्यारांची[२५] मोठी मारामार जाहली. तों व्यंकटराव यांचे मेहुणे आणि इकडे जनकोजी शिंदे यांचे साडू रा० नागोजी माने ह्मसवडकर यांनीं अवघे फौजेंतोन उठोन जनकोजी शिंदे यांची गांठ घातली. परंतु शिंदे यांजपाशीं करोलांचे[२६] सामान भारी. करोलाकडून मार देवविला. त्यांत नागोजी माने यांस गोळी लागोन ठार पडले. तो गैबीचा[२७] मारा जाहला. ईश्वरें चित्तांतील हिंमत पुरूं दिली नाहीं. अस्तु. इहलोकीं कीर्ति करून परलोकसाधन केलें. नागोजी माने यांचा मुडदा काढून नेला. त्याजवर सायंकाळही जाहला. व्यंकटराव यास मेहुणे यांचें परम दुःख झालें. मुलें माणसेंही समागमें होतीं. मायाजाळें सर्वत्रांस परम दुःख झालें. त्यांचें देहसार्थक केलें. नबाब बंदेगान अली डेरियास येऊन त्याचे मूल दत्ताजी माने यांचें समाधान केलें. ते वेळीं नबाब यांचे चित्तांतील विकल्प निघाला.

तों राजश्री रामचंद्र जाधवराव पांच हजार फौजेनिशीं नबाबास मिळावयास तावडतोब येत असतां ते वर्तमान दत्ताजी शिंदे यांस कळतांच त्यांनीं त्याजवर दहा हजार फौज रवाना केली. फौजेची गांठ पडावी तों रामचंद्र जाधवराव हे शिंदखेडचा आश्रय करून शिंदखेडांत राहिले. फौजेचें व त्यांचें युद्धप्रसंग नित्य होतच होते. दिवसें दिवस जाधवराव पेंण्याचे तसदीनें जेरीस आला. हें वर्तमान निजाम उल्मुलुख यांनीं ऐकून भोंवताला तोफांचा अराबा देऊन, गोल बांधून बाहेर निघाले. बहुत मोंगल होऊन गेले परंतु यांजसारिखा कौबीज[२९] कोणीच जाहला नाहीं. तों राजश्री नानासाहेब यांजकडून गोपाळराव रास्ते व पंवार व आणखी फौज येऊन शिंदे यांशीं सामील झाले. मध्यें मोंगल व भोंवताले गनीम वेष्टून हांहूं करीत दोन कोस झुंजत भांडत मजली करून शिंदखेडास दाखल झाले. तों खासे नाना व भाऊही येऊन पोंचले. ते दिवशीं दत्ताजी शिंदे इरेस पडून आपण उठून करोळ व तोफा व जेजाला व सुतारनाला व हस्तनाला असें ढांसणें[३०] धरून मार दिला. तों मोंगलाचे फौजेचा गोल याजमुळें थोडीं मनुष्यें पळूं लागलीं. तेसमयीं नबाब बंदेगान अली यांस विषाद येऊन ढासणावर नीट हौदे चालविले.

---

२५. गाडहत्यारी. (?)

२६. करोलाचे, करोल = घोड्यावरील बंदूकवाला शिपायी.

२७. गैबीचा मार = आडून दिलेला मार, भिंती पाठीमागून केलेला मारा.

२८. 'पोटाचे' तुं० प्र०

२९. 'काबिसदार' (काबेदार?) तुं० प्र०

३०. ढांसण = हातघाईची वेळ किंवा जागा. 'ढासळ' तुं० प्र०

तेसमयीं दुतर्फी यंत्रांचा कडाखा ऐसा जाहला कीं, न भूतो न भविष्यति. भडभुंजे लाह्या भाजतात तैशी गत जाहली. धुराचे गर्दींत कोणी कोणास दिसेनासें झालें. दत्ताजी शिंदे जसा डुकर खळीस येतो तैसे इरेस पडून मारामार केली. तों नबाब केवळ हातघाईस आला. भाऊसाहेब यांचे नेत्र संतोष जाहले. तारिफ केली कीं, " दत्ताजी शिंदे यांचे मर्दुमकीची शर्थ आहे ! जसें ऐकण्यांत आलें तसें कर्तव्य करून दाखविलें. " असें बोलून मोठें संकटें दत्ताजी शिंदे यांस उखळोन काढिलें. शेदोनशें खासे ठार पडले. नबाबासही असें झालें कीं, गनीमाशीं झुंजे बहुत केलीं परंतु याप्रमाणें निधडा सरदार मराठियांत नाहीं. " म्हणोन त्यानेंही स्तुति करून आपले जागां मुक्काम करून राहिले. मानकरी लोकांचे समाधान करून नांवाजिलें. पुढें सल्लयाचें सूत्र आरंभिलें. तेव्हां आठ दिवसांत मोंगलाचा व गनिमाचा सल्ला साखरखेडलीचे[३१] मुक्कामीं झाला.

नंतर रा० जनकोजी शिंदे यांस हिंदुस्थानचे मोहिमेस आज्ञा दिली. दत्ताजी शिंदे खासा चांभारगोंदियास लग्नाकरितां गेले. जनकोजी शिंदे चाळीस हजार फौजेनिशीं मजल दर मजल हिंदुस्थानांत चालिले. जनकोजी शिंदे यांची उमर तो लहान, परंतु पराक्रमास वृद्धाप्रमाणें. स्वधर्मशील, भक्ति परायण नर्मदापार होऊन उज्जनीस दाखल झाले. तेथून पुढें बुंदीवाड्यांत गेले. तों त्या राज्यांत तेथें हरगड म्हणोन होता. तेथें गुमानसिंग म्हणोन गिराषा[३२] होता त्यानें संपूर्ण माळवियांत दहशद लावून गुप्तरूपें खंडण्या घेत होता. त्या गडास एकाएकींच जाऊन पोंचले. तो गड उगाच माळा सारिखा होता. परंतु भोंवतालीं झाडीची डांग[३३] भारि होती. तो कांहीं गांवांत सांपडला नाहीं. परंतु दोन अडीचशें सामान व बायका होत्या तेव्हां जातीचे गिराष त्यानें रात्रीं मध्यें बायका व भोंवताले गिराषे घालून जरीपटक्याचे निशाणावर चालोन घेतलें. मारामार करीतच मोर्चियांतून पार पडून गेला. तेथें बाळाजी शिंदा म्हणून पाळला होता. नामी सरदार झाला होता. त्यास गोळी लागोन ठार झाला. त्याज समागमें त्याची स्त्री सहगमन गेली.

तेथून पुढें खेचीवाडा व राजगड व पाटण व बुंदी, कोट यांच्या खंडण्या घेऊन जयनगराचे प्रांतांत गेले. तेथील माधवसिंग राजा यानें चार दिवस हिंमत धरून होता. परंतु त्यास झुंजावयास पुरवेना. असें जाणून, वीस लक्ष रुपये खंडणी देऊन लाविलें. तेथून पुढें मारवाड प्रातीं जावें तों उदे-

---

३१. 'साखर खंडाळियाचे' सा० प्र० 'साकर खंडलियाचें' तुं० प्र०

३२. गिराशा=डोंगरी लुटारू ( गुजराथेंतील. )

३३. डांग=रानटी, डोंगराळ चढाव.

पूरकर राज्याकडील शिवसिंग सिसवदे येऊन जाबसाल केला कीं, "शिवपुरियाचा राजा आमचा चाकर असतां त्यानें घोटाळा केला. किल्ले व गढिया बळकावून आम्हांशीं बेदिलै[३४] होऊन आपले प्रांतांत धामधूम करितो. याकरितां चातुर्मास बरसातकाळ आहे, शिवपुरेचे[३५] नजीक छावणी करावी. वीस लक्ष रुपये तुह्मांस देतों. शिवपूर व गढी हस्तगत करून द्यावी." तेव्हां जनकोजी शिंदे यांनीं मनसबा केला कीं, "दत्ताजी शिंदे गांवास देशीं गेले आहेत ते येत तोंपर्यंत चातुर्मास उगेच एखादे ठिकाणीं रहावें हें उत्तम आहे. 'एक पंथ दोकाजें[३६]'" असें ध्यानांत आणून मान्य केलें. खासा आपण शिवपुरास मोर्चे लावून राहिले. राणोजी भोइटे बरे, कर्ते मनुष्य होते. त्याणीं फौजेनिशीं टेकाळ याचे गढीस मोर्चे लाविले होते. तों एकाएकीं मोर्च्यांत राणोजी भोइटे यांस गोळी लागून ठार झाले. हें वर्तमान जनकोजी शिंदे यांनीं ऐकून बहुत कष्टी झाले. तों त्या स्थळीं दिपवाळी ही झाली. शिवपुरचे राजास हस्तगत करून उदेपूरकर राणोजीचें व त्याचें ऐक्य करून दिलें. राणोजीचे आज्ञेत सेवावृत्तीनें रहावें, या प्रमाणें करून आपला कराराप्रमाणें ऐवज घेतला.

तों लाहुराकडून रघुनाथराव दादा मसलत फत्ते करून देशास जात असतां मार्गीं जनकोजी शिंदे यांस भेटावयास आले. तों जनकोजी शिंदे यांस वर्तमान कळतांच फौजेसुद्धां भेटावयास गेले. दादासाहेबही मुक्कामापासून दोन कोस आडवे आले. उभयतांच्या भेटी झाल्या. जनकोजी शिंदे यांचे डेरियास येऊन एकांतीं जनकोजी शिंदे यांस मनसबा दिला कीं, "तुह्मी आंबदांची मसलत बुडविली तरी पुरवेल. क्रोड रुपये शिबंदी वाढली तरी देऊं. परंतु नजीबखान रोहिला याचें पारिपत्य करून त्यास जिवें न सोडावें. एवढी जोड आह्मांस द्यावी. आह्मीच पारिपत्य केलें असतें, परंतु मल्हारराव यांस त्याचें आगत्य पडलें. त्याचा धर्मपुत्र म्हणोन त्यांनीं आगत्य धरून आपले तर्फेनें अंतर्वेद प्रांत व कुरुक्षेत्रापासून कुंजपुरा देखील चाळीस लक्षाची मामलत त्याचे स्वाधीन केली. त्यास मल्हारराव यांस पुत्र बहुत. माधवसिंग जयनगरकर व बिजेसिंग मारवाडी व आणखी बहुत आहेत.. त्यांत हा नजीबखान रोहिला ही पुत्र जाला आहे. जितके यांनीं पुत्र म्हणविले त्यांचा फळादेश ही भोगीतच आले. परंतु त्यांचा अभिमान जाईना. त्यांचे जितके धर्मपुत्र तितके मातागमनी आहेत. आम्ही त्यास पिसाळलिया कुतरियाची गत केली असती. परंतु 'तुपाचे घागरीवर उंदिराचें पिटकुलें[३७] बसतें'

---

३४. 'बेबदल' तुं० प्र०
३५. 'शीपूर' तुं० प्र०
३६. 'एकपथें दोनकाजें' तुं० प्र०
३७. पिटकुलें=लहान पिलूं. (उंदराचें.)

तैसा प्रकार जाला. आतां तुम्हांस पदर पसरून जोड एवढीच मागतों." असें म्हणतांच जनकोजी शिंदे यानीं तैसलीम करून अर्ज केला कीं, "दादा साहेब, आह्मी आपले बारगीर, आज्ञा कराल त्याप्रमाणें वर्तणुक होईल. नजीबखान ह्मणजे कोण जिन्नस ? याचें पारिपत्य आम्हांकडे लागलें. पण आपण लाहूर, मुलतान, पंजाब, अटके पावेतों मुलुक काबीज केला. आतां आम्हांस मोहिमेस राज्य कोणतें ?" असें म्हणतांच दादासाहेब यांनीं उत्तर केलें की, "तुम्हीं नजीबखान याचा शिरच्छेद केलिया, आम्हांस तुमची सर्व जोड पावली." याप्रकारें तीन वेळ झालें. मग परस्परें बहुमान हत्ती घोडे जवाहीर देऊन रा० रघुनाथराव देशास आले.

आठांपंधरां दिवसां मागाहून मल्हारराव आले. त्यांस यांस बारा कोसांचें अंतर होतें. तेव्हां मल्हारराव यांनीं गंगाधर तात्यांस बोलावून आणून विचार केला कीं "शिंदे यांची जन्माची सांगड होती. तो पावेतों ब्राम्हणांसही आमचा वचक होता. व कितेक कामकाजें केवळ असाध्य तीं साध्य होतीं. आतां आमचें एक मूल, तेंही पिशाच्यवत् आणि आमचें वार्धक्य. हर यत्न करून जनकोजी शिंदे यांस भेटून त्यांचे चित्तांतील मळ काढून त्याचे हातीं मूल द्यावें." असें बोलोन गंगोबा तात्यास जनकोजी शिंदे यांजकडे पाठविलें. गंगोबा तात्या भेटून सविस्तर वर्तमान ममता पुरस्कर केवळ अजीन होऊन जाबसाल केला कीं, सुभेदार यांचें वृद्धापपण आणि तुम्ही सुज्ञ मनुष्य आहां. सुभेदार भेटावयास येतात. तुम्ही अव्हेर न करावा." म्हणोन बोलतांच जनकोजी शिंदे यांस तिरस्कार आला आणि उत्तर केलें कीं, "त्यांची आमची भेट आतां स्वर्गीं. आतां तुम्हांस जितकें उचित दिसेल तें करावें." तेव्हां गंगोबा तात्या केवळ चांगला गळां पडला. तेव्हां जनकोजी शिंदे यांणीं जाबसालाची तोंड केली कीं, "वडील दत्ताजी शिंदे प्रसंगीं नाहींत. त्यांचे पश्चात् आपणास भेटावयास पुरवत नाहीं." असें बोलून गंगाधरपंत यांस वाटेस लाविलें.

मल्हारराव यांनीं वर्तमान ऐकून अधिक उणें जाबसाल ध्यानांत आणून विचार केला कीं, 'मूल आहे.' ह्मणून कूच करून लष्करानजीक दोन कोसांवर मुक्काम केला. मान, महत्व ध्यानांत न आणितां मल्हारराव तयार होऊन जनकोजी शिंदे यांचे डेरियास चालले. हें वर्तमान जनकोजी शिंदे यांनीं

३८. तसलीम=तसली मात, सलाम, वंदन, मानमरातब.
३९. 'बाजर' तुं० प्र०
४०. एक मूल=नातु-कुंभेरीचे वेढ्यात पडलेल्या खंडेरावाचा मुलगा मालेराव.
४१. 'किलाफ' तुं० प्र०
४२. अजीन = नम्र.
४३ 'अझूनही' तुं० व पु० प्रती.

ऐकून निश्चय केला कीं, " आतां आडवें जावें हें उचित. नाहीं तर अ-श्लाघ्यता येईल. " ह्मणोन जनकोजी शिंदे तयार होऊन आडवे जाऊन भेटले. आठ पंधरा दिवस मल्हारराव याचे येथें रात्र दिवस राहून चित्तांतील किलाफ काढून तोडिला. [होळकरांनीं] मुलास हातीं देऊन देशास जावयास निरोप मागितला. तेसमयीं जनकोजी शिंदे यांनीं अर्ज केला कीं, ,, सुभेदार तुम्ही आह्मांस वडील आहां, तुह्मीं अटकेपावेतों मुलुख काबिज केला. आतां आम्हांस मोहिमेस राज्य अँसुदें कोणतें ?" तेव्हां मल्हारराव यांनीं उत्तर केलें कीं, " तुह्मांस राज्य एक आहे. भागीरथीस पूल बांधोन अयोध्येवर जावें. सुजाउद्दौला यास तंबी पोंचवून पाहिजे ते रुपये मिळतील. राज्य असुदें आहे. " जनकोजी शिंदे यांनीं निरोत्तर उत्तर केलें कीं, " भागीरथीस पूल बांधणें कसें घडेल ? तेव्हां मल्हारराव यांनीं सांगितलें कीं, " नजीबखान रोहिला यास हातीं धरून त्याचे हातून हें काम करून घ्यावें. " हे वचन ऐकतांच जनकोजी शिंदे यांनीं जाबसाल केला कीं, " नजीबखान रोहिला मात्रागमनी जन्मस्थानीं लैंधुशंका करणार. गाजुदीखान याचे येथें वाढला. त्याचें सार्थक केलें. हें तुह्मीं जाणतच आहां. त्यांत कामातुर होऊन काळावर नजर द्यावी तरी खावंदांचा द्रोही. त्यांनीं आह्मांस मोहिम नजीबखान याजवरीलच नेमून दिली आहे. असें असतां हें कर्म केलियास श्रेष्टें स्वामिद्रोही व्हावें. त्यांत आह्मांकडे केवळ शिलेदारी कर्म नाहीं. पागेचे बारगीर असें आहे. आम्हांकडून हा विचार घडूं नये. " असें ह्मणतांच मल्हारराव यांनीं उत्तर केलें कीं, " बाबा, तुमचा मूल-स्वभाव. अटकेपासून रामेश्वरपर्यंत एकछत्री राज्य जाहलें. हिंदुस्थानांत एक नजीबखान मात्र खैंळी राहिला आहे. त्याचें पारपत्य केलिया पेशवे अटकेपासून जासुदां हातून पैसा आणवतील. मग तुम्ही आह्मी सहजच निर्माल्यवत् जाहलों. मग कोणी पुसणार नाहीं. यास्तव एवढा खैंळी रक्षून जें जें करणें तें करावें. "याजप्रमाणें सांगोन मल्हारराव होळकर यांनीं आपला पाळक पुत्र तुको जी होळकर दोन हजार फौजेनिशीं टाकून, निरोप घेऊन देशास चालिले.

तों [इकडे] दत्ताजी शिंदे गांवीं होते. त्यांनीं लग्न करून समागमें नारो शंकर चार हजार फौजेनिशीं घेऊन जनकोजी शिंदे यांजकडे चालिले. तों वाटेस रा० दादासाहेब यांची भेट जाहली. बहुत प्रकारें गौरव करून जनकोजी

---

४४. असुदें=मोकळें किं० भरभराटीचें.
४५. 'मैथुन करणार' पु० प्र०
४६. 'भ्रष्ट' असा एका प्रतीचा पाठ आहे. 'स्पष्ट' असें असावें.
४७. 'खळ' तुं० प्र०
४८. 'ळीळा' तुं० प्र०

शिंदे यांस नजीबखान याजविशीं सांगितलें होतें तसेंच पदर पसरून यांसही सांगितलें. दत्ताजी शिंदे यांनीं मान्य करून दादासाहेब पुण्यास पोंचले. दत्ताजी शिंदे उज्जनीस आले. तों मल्हाररावही उज्जनीस गेले. जनकोजी शिंदे यांचें व मल्हारराव यांचें ऐक्य जाहलें, हें दत्ताजी शिंदे यांस पूर्वी सूचना होतीच. मग दत्ताजी शिंदे आडवे जाऊन बहुत सन्मान करून उज्जनीस घेऊन गेले. दोन चार रोज राहून उपचार मेजवान्या जाहल्या. उपरांतिक दत्ताजी शिंदे यांनीं मल्हारराव यांस प्रश्न केला कीं, "सुभेदार, तुह्मी अटके पावेतों मुलुख कात्रीज केला. आतां आह्मांस मोहिमेस असुदें राज्य कोणतें आहे?" तेव्हां मल्हारराव यांनीं सांगितलें कीं, "याविशीं सूचना जनकोजी शिंदे यांस सांगतलें आहे आणि तुह्मांस हा सांगतो कीं, नजिबखान रोहिला यास हातीं धरून, भागारथिसि पूल बांधोन पुलापलीकडे अयोध्या व ढाका व बंगाला व कोंऊर देश पावेतों मोहिम करावी. राज्यही असुदें आहे. पैसा पाहिजे तितका मिळेल. आणि सुजाउदौला यास तंत्री पोंचवून भागीरथी पलीकडील अर्धा मुलुख ध्यावा. त्यांत दहा पांच किल्ले भारी असतील त्यांत ठाणीं घालावीं. ह्मणजे चित्तास येईल तेव्हां श्वेतबंधासारिखें जावयास यावयास येईल. हें न करितां तुह्मी नजीबखान याचें पारिपत्य कराल तर तुह्मांस पेशवे धोत्रें वडवायास लावतील," असें स्पष्ट सांगितलें. तेव्हां दत्ताजी शिंदे यांचे ध्यानांत गोष्ट ठसली. खावंदांनीं सांगितलें तें मिथ्या भास जाहला. मल्हारराव यांणीं सांगितलें हेंच पुर्तेपणें प्रत्ययास आलें. जैसें लोभियाचे ध्यानांत धन बसतें तैसें जाहलें. मल्हारराव यांनीं मंत्र सांगोन [ते] देशास गेले. तसेच मागून रा० विठ्ठलराव शिवदेव देशास जात होते. त्यांनीं हीच गोष्ट सांगितली. अग्नीवरि आज्य टाकावें तसें पुरतेपणें ठसलें. जनकोजी शिंदे यांचे चित्तांत मल्हारराव याचा मनसबा ठसला नाहीं. सुभेदार याचें ऐकावें तरि निमकहरामी पदरास येते. आणि धनी याची इतराजी होईल. खावंदाची आज्ञा ज्या प्रमाणें त्या प्रमाणें जनकोजी शिंदे यांची वृत्ती जाहली होती. इकडे दत्ताजी शिंदे यांनीं हा मजकूर प्राधान्य केला.

असो जनकोजी शिंदे यानीं मारवाड प्रांतीचा बंदोबस्त करून दिल्लीकडे चालिले. खेडीवर जाऊन पोंचले तों दत्ताजी शिंदेही जाऊन मिळाले. चुलत्या पुतण्यांच्या भेटी झाल्या. त्यांस त्या राज्यांत कोणाचें भय नव्हतें.

४९ काऊर किंवा काहूर? कोठें?

५०. 'हा' ह्मणजे मल्हाररावानें सांगितलेला.

यास्तव दत्ताजी शिंदे यांनीं आपली स्त्री भागीरथी बाई व जनकोजी शिंदे यांची स्त्री काशीबाई यांस बरोबर घेऊन आले. तेथून कूच करून दिल्लीस पोहोंचले. दिल्लीपार लाहूर दरवाज्याकडे मजमूच्या[५१] टिळियावर यमुना तीरीं मुक्काम करून राहिले. गाजुदीखान वजीर याची भेट जाहली. जनकोजी शिंदे यांचा मानस कीं, "वजिरास समागमें देऊन नजीबखान याचें पारिपत्य करावें." गाजुदीखान याचे चित्तांतील भावार्थ हाच होता. बाह्यार्थ दत्ताजी शिंदे वजीर यांसि नजीबखान याचे पारिपत्याचें बोलत. परंतु चित्तांत तो अर्थ नाहीं. निदान गाजुदीखान यांनीं पंधरा लक्ष रुपये कबूल केले. आपणही समागमें यावें असा निश्चय झाला. तो दत्ताजी शिंदे यांनीं विचार केलाकीं, "हरएकविशीं वजिराशीं कवाईत[५२] करून हा मजकूर राहता करावा." ह्मणोन वजिराकडील वकील यांस आज्ञा केली कीं "पातशाई रसालियांतील दोन तोफा पूर्वी अकबरशाहा पातशाहाचे जिलबीस चालत होत्या त्या अटक व एक फत्तेलष्कर व आणखी एक किल्लेकुशाद ऐशा तीन तोफा देणें." तो वरकड तोफा जिकडील तिकडे गेल्या होत्या. परंतु भारी ह्मणावयास तीन मात्र राहिल्या. पंचरसी, सुवर्णासारिख्या तेजस्वी चौदा हात लांबी व पेटीस[५३] रुंद सात हात दोरी लागत होती. व तोंडास चार हात [ लागत होती] या प्रमाणें मातबर आणि एकेक तोफ नवलक्षाची होती. अशा तोफा मागतांच गाजुदीखान वजीर यास परम विषाद आला. "प्राण गेला तरी पुरवेल. परंतु तोफा द्यावयास अनकूल पडत नाहीं," ह्मणोन उत्तर होतांच दत्ताजी शिंदे यांनीं फौज सिद्ध करून पातशाही रसालिया कडे चालोन गेले. तों गाजुदीखान याजकडील सामान चालोन आलें. तेव्हां थोडी बहुत गोळागोळी जाली तों वजीराचें सामान थोडकें. त्यास यांची उपट सोसेनाशी जाली. मग सामान सरून ठिकाणास गेले. ते गर्दींत दिल्लीचा पुरा जयसिंगपूर ह्मणोन होता त्याचा सत्यनास जाहला. एवंच शहरचा विनाशकाल !

असो, शिंदे यांनीं दोन तोफा अटक व किल्लेकुशाद अशा दोन तोफा काढल्या. अटकेची जोडकरीण तोफ फत्तेलष्कर होती तेवढी मात्र शिलीमगडचे किल्यांत राहिली. अटक तोफेस साडेतिनशें बैलांच्या तीन माळा वोढावयास लावल्या. दोन हत्ती लाविले. परंतु तोफ जागेवरून हलेना. मग मनुष्य एक शहरांतून धरून आणून तोफेवर जेबें[५४] केलें. बकरीं, कोंबडीं, नारळ, लिंबें यांस गणती नाहीं. मोठे संकटें तोफ लष्करांत आणिली. उज्जनीस

५१. मजमूचा टिळा मा० पृ० टी०पहा.
५२. कवाईत=युक्ति, बहाणा.
५३. 'पेधीस' तुं० प्र०
५४. जेब किं० नर्व=ठार.

तोफ लावून द्यावयाची विवंचना केली. तों निभावणीचें संकट. शिंदे यांचा मानस होता कीं, "एकवेळ आणखी विजेसिंग याजवर नागुरास जावें आणि तोफ लावावी." अशी उमेदें[55] बहुत करून होते. तोफ निभावणीस बुद्धी कुंठित जाहली. तेव्हां जाटाकडील रूपराम कटारी समागमें होता. त्यानें आपले खंडणी पैकीं दोन लक्ष रुपये सूट मागून तोफ उज्जनीस पोंचती करावी, असा करार करून, दारमदार करून तोफ त्याचे जिम्मेस केली. त्यानें इसारा करून तोफ वाटेस लाविली. तों शेवटीं तोफ उज्जनीस पोंचली नाहीं. यांचा पुढें विनाशकाल जाहला तेव्हां तोफ चमेलीच्या खळियांत येऊन ऑंचरीचे[56] घाटास राहिली. किल्ले-कुशादतोफ समागमें घेतली. गाजु-दीखान वजीर याचे चित्तांत खिलाफ आलियावरि वजीर दिल्लींतच राहिला. दत्ताजी शिंदे यांणीं कूच केले ते मजल दरमजल पाणिपतावरून कुरु-क्षेत्रांत गेले. आठ मुक्काम करून, चार तुळादानें करून, पुढें मजल दरमजल शतद्रुपावेतों गेले. तों लाहुरांतील सुभा संदीपवेग याचा पुत्र व लक्ष्मीनारायण असे येऊन भेटले. त्यांचे यांचे विचारें रा० साबाजी शिंदे व त्र्यंबक बापूजी असे पंधरा हजार फौजेनिशीं पुढील लाहूर मुलतान व पंजाब व काश्मीर अटकेपर्यंत मुलुख जप्तीस पाठविले. आपण खासा तेथून कूच करून कुंजपुरानजीक मुक्काम केला. चित्तांत योजना केली. "नजीबखान यास हस्तगतकरून त्याचे हातीन भागिरथीस पूल बांधून महत्कार्य करावें." जनकोजी शिंदे व नारो शंकर व अंताजी माणकेश्वर यांचे चित्तांत कीं "श्रीमंतांनीं आज्ञा केली तेणेंप्रमाणें वर्तावें. नजीबखान याचें पारपत्य करावें." हे सर्वत्रांचे अनुमतें होतें.

इकडे गोविंदपंतें[57] बुंदेले यांचा व नजीबखान याचा स्नेह होता. त्यानें गोविंदपंत यांजकडे सूत्र लाविलें कीं, "गोविंदपंत दाजी, तुमचे हातीं आह्मांस सुभेदार मल्हारराव देऊन गेले. प्रस्तुत रा० दत्ताजी शिंदे यांचा शह भारी आला आहे. निभावणी होणें कठीण आहे." हें गोविंदपंत यांनीं ऐकून त्यास अभय दिलें कीं, "तुह्मीं आपले जागां स्वस्थ रहावें. उभयपक्षीं रदबदली आह्मांकडे लागली." असें बोलून रा० गोविंदपंत बुंदेले येऊन दत्ताजी शिंदे यांस भेटले. शिंदे यांनीं गोविंदपंत यांस मनसबा भागीरथीस पूल बांधावयाचा विचारिला. गोविंदपंत यांनीं जाबसाल केला कीं, "पाटीलबावा, विना नजिबखान यास हातीं घेतल्या शिवाय हें कार्य होत नाहीं." तों

५५. 'हुटहुटी' तुं० प्र०
५६. 'अटेरीचे' तुं० प्र०
५७. गो० बुं० 'पेशव्यांची बखर' पृ० ३६ व टी० ४० पहा.

यांचेंहि चित्तांत हाच भावार्थ होता. त्यांनींहि हाच संदर्भ लाविला. ती गोष्ट यांच्या चित्तांत ठसली. गोविंदपंत बुंदेले यांस वचन दिलें कीं, "नजीबखान यास वेलाशक घेऊन यावें. तुमचें आमचे अनुमतें जें कर्तव्य तें करूं," ह्मणोन सांगितलें. मग गोविंदपंत यांनीं वकील नजीबखान याजकडे पाठविले. तों तो अगोदरच आतुर होता. चार हजार फौजेनिशीं नजीबखान रोहिला भेटावयास आला. दोन कोसांवर येऊन मुक्काम केला. हें वर्तमान दत्ताजी शिंदे यांस बुंदेले यांनीं श्रवण करितांच त्यास आडवे जावयास सिद्ध जाहले. तेव्हां जनकोजी शिंदे व नारो शंकर व अंताजी माणकेश्वर व जानराव वांवळे [वगैरे] छोटे मोठे सरदार एकत्र मिळून इत्यर्थ केला कीं, "नजीबखान रोहिला ससे भाणवसियास सांपडतें तैसा आला आहे. आजिचे समयीं सोडूं नये." ह्मणोन बोलून दत्ताजी शिंदे याजकडे आले. त्यास हें वर्तमान बोलतांच दत्ताजी शिंदे यांनीं अव्हेर केला. उत्तर केलें कीं, "आपले कार्याकरितां वैरी मित्र करणें प्राप्त आहे. यांत आह्मी खावंदाचें वाईट काय करितों?" म्हणोन धिःकारलें. जनकोजी शिंदे आपले जागां परम श्रमी जाले कीं, "नकटें असावें परंतु धाकटें असों नये." यत्न कोणाचा चालेना. बायका मुलें बाळें देखील कोणाचे चित्तीं नजीबखान यास सोडावें असें नाहीं. परंतु कोणाचें न ऐकतां दत्ताजी शिंदे आडवे जाऊन भेटून घेऊन आले. तेसमयींची ममता आणि जिव्हाळे सांगावें असा अर्थ नाहीं. त्यांनीं नजीबखान यास जाबसाल केला कीं, "आम्हांस भागीरथीस पूल बांधून द्यावा. अघाडी तुम्हास देतों. पलीकडील रुपया मिळेल त्यांत दहावी तक्षिम देतों. तैसाच मुलुक हस्तगत होईल त्यांत दहावी तक्षिम देऊं. तुम्हीं आम्ही एका खावंदाचे चाकर एकनिष्ठ होऊन सेवा करावी." म्हणोन बोलिले. नजीबखान यानें मान्य केलें. यांणीं आपला बेलभंडार इमान त्यासि दिलें. त्यानें आपली साजकरोटी यांस दिली. केवळ एकदील जाहले. आठ पंधरा दिवस एक जागां राहिले.

तिकडे भागीरथी पार सुजाउद्दवला अयोध्येंत होता. त्याजकडे गुप्तरूपें चेतराम वकील यास पाठविलें. आणि सांगितलें कीं, "दत्ताजी शिंदे यांचा निश्चय. मोहीम तुह्मांवर आहे. आम्हीं एक वेळ मनसबा केला आणि अबदुल अलीस घेऊन आलों. तुम्हीं चहूंकडून उपराळा केला नाहीं. तो

५८. भाणवसा = चुली पाठीमागील ओटा.

५९. "आपले कार्याकरितां वैरी बोलिजे याचें कपण (?)" तुं० प्र०

६०. तक्षीम=हिस्सा, वांटा.

६१. उपराळा=साहाय्य, मदत.

मनसबा या रीतीचा जाहला. आह्मीच सर्वत्रांचे द्वेषी जाहलों. आतां एक वेळ तुम्हांस पुसावें याकरितां मात्र सांगून पाठविलें आहे. याचें उत्तर काय तें द्यावें." [ असें ] ह्मणोन वकिलानें जाबसाल केला कीं, "अनुपशहरकर अहमदखान लंगडा पठाण हा मात्र आपले ममतेंत आहे. तुमचा निश्चय काय तो सांगावा." असें ऐकून सुजाउद्दवला यानें उत्तर केलें कीं, "आपला बाप मनसूर अली याची वजारत जाऊन इकडे कालक्षेप करून आहों येथेंही सुखरूप राहूं देईनात. मरणाहून अपेश वोखटें. आतां आपला कांहीं दुसरा अर्थ नाहीं. नजीबखान यास सांगावें कीं, "मी सर्वस्वें तुजला साध्य आहें. पन्नास हजार फौज व तीनशें तोफा तुझे जिमेस करितों, व पांच कोट रुपये खर्च लागला तरी इतका खर्च पुरवितों. परंतु गनीमास नदीपार होऊं देऊं नये." याप्रमाणें साजक रोटी इमान प्रमाण घेऊन वकील आला.

इकडे अबदुल अलीचें सूत्र वरचेवर ठीकच होतें. इतका सुजाउद्दवला याजकडून आश्रय खातरजमेचा होतांच नजीबखान रोहिला दत्ताजी शिंदे यांचे डेरियास येऊन जाबसाल केला कीं, "साहेब, तुह्मी गडमुक्तेश्वरीं जाऊन तीर्थविधी करावा. मजला आज्ञा द्यावी. मिरापुरानजीक शुक्रताल[६२] आहे. तेथें जाऊन भागीरथीस पूल बांधून ठीक करितों. तों पावेतों एक महिन्यानें मागाहून आपणही यावें." नजीबखान यानें अगोदर माहिना पंधरा दिवस केवळ आर्जव करून अकत्रिम भाव दाखविला होता. याजकरितां शिंदे यांस खरें भासलें. हत्ती, घोडा, जवाहीर, वस्त्रें, बहुमान देऊन गाजदीपुऱ्याचे मुक्कामाहून रवानगी केली. तेसमयीं जनकोजी शिंदे [यांनीं] व सर्वत्रांनीं सांगितलें कीं, "याचें पारिपत्य करावें तें न केलें. अस्तु. आतां यास जवळ ठेवूनच कार्य करून घ्यावें. यास निरोप देऊं नये." ह्मणतांच दत्ताजी शिंदे यांनीं जाबसाल केला कीं, "तुह्मी अवघे कर्तव्याचे मनुष्य आणि आह्मीच एक नाकाबीज. तस्मात् आह्मांस कांहींएक सुचत नाहीं, नजीबखान याचें अंतर शुद्ध आह्मांस पुरतेपणीं प्रत्ययास आलें. तेव्हां आह्मीं त्यास निरोप दिला" याप्रकारें उत्तर होतांच दुसरें कोण बोलतो ? सर्वत्रांनीं कल्पना केली कीं, "मुंगीस पक्ष फुटतात तैशी गत जाहली." उपाय नाहीं म्हणोन आपले जागां स्तब्ध राहिले.

नजीबखान यानें कूच करून तो शुक्रतालास गेला. शुक्रताल म्हणावयास कारणकीं शुकाचार्य यांनीं परिक्षिती राजास भागवत श्रवण ते स्थळीं केलें होतें व ते स्थळीं परिक्षिती राजा शापानळें तक्षकदंशें भस्म

६२. शुकताल ?

झाला. तें स्थळ परम गूढ, भागीरथी उत्तरवाहिनी येऊन, पालखीचे दांडीसारखें नदीचें वळण होऊन दक्षिणवाहिनी गेली. तेथें लष्कराचा मुक्काम केला होता. आलीकडील तोंडीं खळ्या भारी दोन दोन डोंबरगणें[६३] सारख्या भारी. जावयास सुदामत वाट नाहीं. कोठें कोठें सुगम मार्ग होते. तेथें खंदक खणून त्यांवरि तोफा व वरकड रिसाला ठेवून बंदोबस्त करून केवळ दुर्ग असाध्य केले. तों इकडे दत्ताजी शिंदे श्रीभागीरथीस गडमुक्तेश्वरीं येऊन तीर्थविधी केला. आधींच शिंदे रणशूर व दानशूर होते. त्यांत अलभ्यलाभ श्रीभागीरथी प्राप्त झाली.' मग ज्यास जसें ईश्वरें अनुकुल दिलें तसे दानधर्म केले. ये अर्थीं दोहरा आहे. ॥ "जलकी शोभा कमल है, दलकी शोभा पील। धनकी शोभा धरम है, कुलकी शोभा शील" ॥ तों नजीबखान याजकडील पत्राची मार्गप्रतीक्षा करीत होते. तों अकस्मात् पत्र नजीबखान याचें आलें. हालकारे यांनीं पत्रें दिलीं. खुशाली मानून एकांतीं जाऊन पारशीं पत्रें मुनसी कडून वाचून पाहिलीं. त्यांतील अन्वय ध्यानांत आणिला. तों नजीबखान यांणें पत्रीं लिहिलें कीं, "तूर्त वरसात काल, नदीला पाणी भारी, पूल सिद्ध होत नाहीं. तुम्ही या समयीं कोणी कडे तरी मोहिमेस जावें. वाजत बरसांतें[६४] देखलेऊं" याप्रमाणें उत्तर आलें. तरी यांस कत्रिमभाव उमजला नाहीं. जावसाल दिलाकीं, "तूर्त राहिलें तरि राहूं द्यावें. तुम्ही फौजेसुद्धां यावें, म्हणोन नजीबखान यास पत्रें लिहिलीं. रोहिलियानें उत्तर केलेंकीं, " आपणास अनकूल यावयास पडत नाहीं तुम्ही देखली युद्ध करावी."

असें साफ उत्तर येतांच दत्ताजी शिंदे यांची मर्जी केवळ दिक्क[६५] जाली. लहान थोर यांनीं व खावंदांनीं सांगितलें तें न ऐकून मल्हारराव यांचे मनसबियावरून सर्वत्रांचा अव्हेर केला. याचा फळादेश या प्रकारचा जाहला. नजीबखान यानें मात्रागमन केलें. ह्मणून केवळ दंग होऊन एक दोन दिवस अन्नपाणी देखील वर्ज केलें. मग जनकोजी शिंदे यांनीं हिमतीची मसलत दिली कीं, "अधींच लहान थोर यांचें ऐकिलें नाहीं. आतां 'हिंमत मर्दा मदत खुदा' मारतां मारतां मरावें. नजीबखान ह्मणजे कोण जिन्नस ? चढते घोडियानिशीं उडवून टाकूं." ह्मणतांच दत्ताजी शिंदे यांसही आवेश आला. तेच क्षणीं नगारा करोन कूच केलें. ते मजल दरमजल भागीरथी तीरीं हस्तनापुरावर

६३. डोंभारगणें अगर डोंबरगणें. डोंभरा=खड्डा.

६४ 'वाजत बरसात' = पर्जन्यकाळानंतर.

६५ दिक्क (मर्जी) त्रासलेली, शिसारी आली.

मुक्काम केला. तेथून दिल्ली इंद्रप्रस्थ कच्चे चाळीस कोस. हस्तनापुरीं कांहीं वस्ती नाहीं. साक्षा मात्र जुनी पांढर आहे. तेथें तीर्थाचा कूप व वटवृक्ष मात्र आहेत. साक्षा मात्र सांगतात कीं, "यास्थळीं हस्तनापूर होतें." तेथें मागती रोहिलीयाकडील वकील चेतराम येऊन भेटला. वटवृक्षा खालीं सावलीस बसले. आणि त्यानें जाबसाल केला कीं, "प्रस्तुत तुम्हीं आलियानें काम कारागीर होत नाहीं; माघारे जावें." ह्मणतांच दत्ताजी शिंदे यांनीं उत्तर केलें कीं, "सुजाउद्दौला व तुह्मीं मिळोन कोट रुपये खंडणी देणें, माघारे जातों." म्हणतांच वकील यांनीं उत्तर केलें कीं, कौरव पांडव यांचा गृहकलह लागला ते समयीं श्रीकृष्ण परमात्मा यानें आपले आंगें याच वटवृक्षाखालीं शिष्टाई केली तेसमयीं दुर्योधन यानें उत्तर केलें कीं, 'सुयीचे अग्रांची मृत्तिका प्राप्त होणार नाहीं.' तेथें इंद्रप्रस्त कैंचें व वरूणावंत कैंचें?' साक्षात् भगवंत याची शिष्टाई या जागीं सिद्धीस गेली नाहीं. तेथें तुमचा मनसुबा काय सिद्धीस जाणार? पुरवेल तरी कूच करून जावें. नाहीं तर युद्धास आपण सिद्धच आहों." या प्रकारें त्याचें निष्ठुर उत्तर होतांच वकील यास वेडेवांकडे बोलून पिटून लाविलें. आपण कूच करून शके १६८१ वैशाख शुद्ध १० स शुक्रतालास जाऊन पोंचले. चढते घोडियानिशीं चालोन जावें अशी हिंमत धरून गेले. तों केवळ असाध्य. कोसपर्यंत उभे राहूं देईनात. खळ्यांचा आश्रय करून तोफांचा व बाणांचा मार देऊं लागले. चार घटिका उभे राहून, सायंकाळीं तेथून कोसभर मागें सरून मिरापुराकडे शुक्रतालापासून दोन कोस जेथें परिक्षिती राजास ऋषीचा शाप जाल्या ह्मणोन धन्वंतरी उठवावयास जात होता तो मार्गीं तक्षक नागराज यानें ब्राम्हणाचा वेश धरून, धन्वंतरी याचा पराक्रम पाहून, धन्वंतरी यास, अमुप द्रव्य देऊन माघारीं फिराविला. ते स्थळीं साक्षीस कूप आहे. तेथें शिंदे यांचे डेरे जाहले. तमाम अंतरवेद प्रांती रोहिलियाचीं ठाणीं होतीं तीं घेतलीं, मिरापुरचे सैय्यदही येऊन भेटले. पूर्वीं दक्षिणेंत सैय्यद३६ आला तो त्याच मिरापूरचा. तेथें राहून प्रातःकाळीं नगारा करून, फौज सिद्ध करून चालून जाऊन तोफा लावाव्या तों इकडील तोफा लावीत तो गोळा कारागर होईना. खालीं तोफ लागू केलीं तो खळ्यांत गोळा पडों लागला. वरतीं तोफ लावावी तरि शुक्रताला वरून पार भागीरथींत गोळा पडे. ऐशी गति जाहाली. त्यांजकडील तोफांच्या व बाणांच्या मारानें दहा पांच घोडे व मनुष्यें ठार पडलीं. असा प्रकार जाहला. या प्रकारें नित्य नित्य भाद्रपद-

३६ हुसन अली, १७१७-२०

मासपर्यंत गोळागोळी होतच गेली. नजीबखान यानें भागीरथीस पूल बांधोन कुतुबशाहा गुंडुं दाहा हजार फौज व बुणगे नदीपार राहिले होते. फौज व तोफा ते स्थळीं होत्या. नदीपलीकडून रसद पुलावरून रोहिलियास चालत होती. गहूं, तांदूळ कमोदी, तीस बत्तीस शेर पक्के याप्रमाणें संवगाई त्यांजकडे होती. यांचे गनिमाचे लष्करांत आठ शेर नऊ शेर धारण, वैरणचारा महाग याजकरितां घोडीं व उंटे [ उपाशीं ] मरून अस्थिचर्में जाहालीं. याप्रमाणें भाद्रपदपर्यंत जाहालें.

तों एके दिवशीं फौज सिद्ध करून फौजेंत जनकोजी शिंदे येऊन जानराव वांबळे व नारो शंकर व जिवाजी भोइटे व दिल्लीची कुमक नागरमल्ल, बाहादरखान बाळोचे ऐसे प्रत्येक दुसरेकडे ढाँसण धरून गोळागोळी करीत होते. त्या फौजेंत दत्ताजी शिंदे गले. तेव्हां त्या लोकांस अधिक हिंमत चढून पुढे खळ्यांकडे मार देत चालिले. तों नजीबखान रोहिला याजकडून फौज सिद्ध होऊन, खळ्या सोडून आलीकडे आली. त्याजवर दत्ताजी शिंदे यांचे झुंज लागलें. तों जनकोजी शिंदे यांचे बाजूस रोहिलियाचें सामान होतें तें ही बाहेर निघालें. तोफा वगैरे यंत्रांचा भडिमार दत्ताजी शिंदे यांजकडील फौजेवर होऊं लागला. परंतु धीर्व होईना. रोहिलियाची आग भारी. यांजकडे या रीतीचें वर्तमान होतांच सांडणीस्वार जनकोजी शिंदे यांजकडे आला. त्याणें सुचविलें कीं, " पाटील साहेब यांनीं घोडे घातले. मारामार जाहली. " हें वर्तमान जनकोजी शिंदे यांनीं ऐकून नगारा केला. उभयतां चुलते पुतणे यांची हिंमत सारखीच आणि एकामेकांची आंचही बाळगून होते. मग घोडियास तंगबार करून त्वांसा जनकोजी शिंदे हर ! हर ! शब्द करून उठले. तोफांच्या माऱ्यांत आले. तोही मार खाऊन बाणांचा व हस्तनाला व सुतारनाला व जेजालांचा मार खाऊन बेलाशक रोहिलियांत मिसळले. मोठा कडाखा जाला. क्षणभर तरवारीची टिपरघाई झाली. तों हें वर्तमान दत्ताजी शिंदे यांनीं ऐकून दांत-निसंकीस येऊन तिकडून घोडे घातले. त्यांनींही मिसळ होऊन घाव केला. दोहींकडून मार सोसून रोहिलियाचें सामान निघोन खंदकापार जाहालें. यांचे फौजेचें ढासण खंदकास लागलें. तों पुढें मार्ग नाहीं. आणि आगीनें केवळ भाजून काढिलें. दत्ताजी शिंदे यांजखालील घोडा खंदकाच्या तोंडावर ठार पडला. पाटील पायउतारां खंदकाचे तोंडीं उभे

६७. गुरु कोणाचा ?

६८. ढासण म्हणजे तोफा, जेजाला, यांत दारू ठांसण्याचा गज किंवा सोटा असाही अर्थ संभवतो. काहीं स्थळीं ' ठांसण' असा पाठ आहे. ( मागें पृ. ३७ टीप ३० पहा).

६९. घाव तरवारीचा.

७०. दांत निसकी-दांत खाणें, दातावर दांत संतापानें घांसणें.

राहिले. हातांत तरवार होती. मोठा हिमतीचा पुरुष त्याजवर घाव करावयास हात पोंचेना. मग हातांत तरवार होती ती झिडगारून मारिली. पलीकडे रोहिला ठार जाला. इकडे जनकोजी शिंदे यांनीं मार खाऊन खंदकाला येटून उभे राहिले. ते समयीं जनकोजी शिंदे यांची उमर वीस वर्षांची होती. परंतु हिंमत भारी. जनकोजी शिंदे यांजकडील खांसा याचे खालील घोडी ठार जाहली. खांसा जनकोजी शिंदे यासि हातावर मनगटाजवळ तरवारीची जखम लागली. व भाल्याची जखम कानपट्टीस लागली. परंतु [ती] हलकी होती. तसेंच दत्ताजी शिंदे यांस एक भाल्याची जखम व गोळी मानेस कातरती गेली. तेसमयीं लोकांनीं दोघे सरदारही खालीं उखळून बळें ओढून नेले. शिंदे यांजकडील साडे सातशें खांसे मनुष्य कामास आले. केवळ धारच खचली. बाराशें घोडे ठार पडले. दोन अडीच हजार घोडे मनुष्य जखमी घायाळ झाले. शिंदे यांजकडील सरदार जिवाजी शिंदे ह्मणून वग मनुष्य मातबर होता. तीन हजार पागा त्याचे जिमेस होती. तो ठार पडला. त्याचा पुत्र हणमंतराव शिंदे. ते ही कामास आले. दोन अडीचशें मुडदे खंदकापाशीं राहिले. काढावयास फावलें नाहीं. फौज माघारी सरून गोटांत आली. लष्करांत जिकडे तिकडे प्रळय. तेसमयीं कित्येक लोकांचे लौकिक जाहले. कित्येकांनीं स्थित होती ती अबरू गमाविली. आठ पंधरा दिवस जखमा बऱ्या व्हावयास लागले. परंतु नजीबखान यास कांहीं चैन पडूं दिलें नाहीं. नित्य गोळागोळी होतच होती. तों दसराही आला.

मग नजीबखान यानें आपला भाऊ खंदारास अगोदरच पाठवून अबदुल. अल्लीस सिद्ध केलेंच होतें. इकडे सुजाउद्दवला आधीं हस्तगत होताच. तैसाच अहमदखान लंगडा पठाणही त्याचे मेळणींत होताच. तैसाच माधवसिंग जयनगरकर व बिजेसिंग मारवाडी. अगदीं हिंदुस्थान भारून टाकिलें होतें. हें अगदींच दत्ताजी शिंदे यांस दृश्य नव्हतें. खंदाराचा पातशाहा अबदुल अल्ली चाळीस हजार फौजेनिशीं अटक उतरून लाहोर प्रांतीं आला. तों त्या प्रांतीं सांबाजी शिंदे होते. त्यांनीं एक मोठें अरिष्ट केलें. कमाऊचे पहाडानजिक ज्वालामुखी ह्मणून महा जागृत शक्तीचें पीठ होतें. तें महाक्षेत्र तेथील ब्राम्हण केवळ अवघे हिंदुस्थान प्रांतीं प्रतिसूर्य होते. त्या क्षेत्रास जाऊन सांबाजी शिंदे यांनीं [त्याचा] विध्वंस केला. तेव्हां तेथील ब्राह्मण यांनीं शक्तीपुढें सहस्र-चंडीचा होम [करून] प्रथम आहुती दत्ताजी शिंदे यांचे नांवें टाकिली. पूर्णाहुती नानासाहेब यांचे नांवें टाकिली. पुढील भवितव्य

तैसेंच होणार. असो, सांबाजी शिंदे यांनीं दुराणीस तोंड[71] न देतां निघोन पंजाब, मुलतान प्रांतीं त्र्यंबक बापुजीचें पथक होतें. दहा हजार फौजेनिशीं [होते.] ते केवळ कवेर जाहाले होते. पंजाब मुलुख केवळ गरीब, निःशस्त्री. त्या राज्यांत जे चाकर[72] मनुष्य त्यांनीं मात्र हत्यार बांधावें. वरकड कोणीं हत्यार न बांधावें. या प्रकारचा तालुका गरीब. पांच राउतांनीं गांवांत जाऊन चावडीस बसावें आणि गांवांतील मालियत[73] आणणें. तो ज्याचा त्याजकडून आणवावा. शेवट त्याचे डोईवर देऊन लष्करा पावेतों येऊन पोंचवावें. ऐशा सुखांत होते. केवळ गरीब खासदार[74] याजपाशीं हजार पांचशें रुपये यांची मालमत्ता बाळगून होते. ते तिकडेच गिलचे याचे कवेंत सांपडले. निघों पावले नाहींत. सांबाजी शिंदे मात्र निघाले होते.

इकडे दुसरा जालियावरि दत्ताजी शिंदे यांनीं लहान थोर सरदार मिळवून मनसबा केला कीं, "चार महिने या स्थळीं मेहनत केली; परंतु नजीबखान रोहिला जेरीस येईना. दिवसें दिवस शेणा मेणाचे [ते] लोखंडाचे होत चालिले. यास यत्न कोणता काय करावा? आतां एक तजवीज मात्र करावी. हर इलाज करून भागीरथीपार फौज चालवावी. ह्मणजे पलीकडे रोहिलियाचे बुणगे व खजिना आहे, तो लुटून टाकावा. आणि नदीस पूल बांधिला आहे तो तोडून टाकावा आणि फौज पलीकडे ठेवावी. ह्मणजे सहजच वैरी अप्रयासें जेरीस येईल." तेसमयीं कित्येक लोकांनीं दिक्कत[75] घेतली कीं, "पलीकडे सुजाउद्दौला पन्नास हजार फौजे [सुद्धां] असतां हें कसें घडतें?" दत्ताजी शिंदे बोलिले कीं, "सुजाउद्दौला याचा व आमचा स्नेह चांगला आहे. पूर्वीं मनसुर अली याचे कामास आमचे बाप राणोजी शिंदे बहुत प्रकारें आले होते. प्रस्तुत ही त्याजकडील वकील येथें आह्मांपाशीं आहेत. बोलणियांत स्नेहांत अंतर दिसत नाहीं." ह्मणून बोलिले. परंतु मोंगलाई मसलत यांस उमजली नाहीं. एक सुजाउद्दौलाच्या बळावर तर नजीबखान यानें हिंमत बांधिली. असें असतां यांस कालगतीमुळें झांपड पडली. 'जैशी दैवाची उजरी[76], तैशी बुद्धि उपजे शरीरीं.' असा प्रकार जाला.

असो, "नदी उतरावयास यत्न पहावा" ह्मणोन बोलिले. तों नजिक मिरापूर होतें तेथील सय्यद हे नजीबखान याचे द्रोही होते, त्यांस बोलावून नदीचा विचार पुसला. तेसमयीं सय्यद यांनीं सांगितलें कीं, "हरिद्वारा नजि-

---

७१. तोंड देणें=आडविणें, लढाईस उभें राहणें.

७२. चाकर मनुष्य = सरकारी नौकर, अमलदार.

७३. मालियत=मालमत्ता.

७४. खासदार=घोडेवाला.

७५. दिक्कत=आक्षेप, उलट कल्पना.

७६. उजरी=तेज, उत्कर्ष.

क जैता गुजर ह्मणोन गिराशी भारी आहे. त्यास मात्र चोरवाट विदित आहे. त्याजशिवाय दुसरियास ठाऊक नाहीं." ह्मणोन सांगितलें. मग हरइलाज करून जैता गुजर यास आणून, त्यास बहुमान करून, हत्ती, चौकडा व जडावाची कंठी दिली. त्यास पांच लक्षांचा मुलूख द्यावा असा करार केला. तेव्हां त्यानें "वाट दाखवितों" ह्मणोन मान्य केलें. मग यांनी फौजेंतील निवडक गोविंदपंत बुंदेले व अंताजी माणकेश्वर यांचा पुत्र नाना व शिवाजी भोइटे व नाइकजी भोइटे व तुकोजी होळकर, असे वीस हजार फौजेनिशीं नेमून जैता गुजर याजसमागमें दिली. कार्तिक शुद्ध प्रतिपदेस हरिद्वारास जाऊन पोंचले. तेथें खळाळ भागीरथीस होता. तेथें गेले तों खळाळांत नाभीपर्यंत पाणी होतें. परंतु खळाळ भारी. दहा हात निभावलें म्हणजे पार पडलें. नाहीं तर चार हात गेले तरी डोहांत पडलियावरि समुद्रांत गेल्याची गत. मग यत्नच नाहीं. असे संकटांतून फौज भागीरथीपार गेली. हें वर्तमान दत्ताजी शिंदे यांस समजलें. हें ऐकून परम खुशाली जाली. तोफाही जाल्या.

हें वर्तमान नजीबखान रोहिला यानें ऐकतांच तेच क्षणीं कुतुबशाहा पांच हजार फौजेनिशीं पुलावरून बुणगियांत लावून दिला. दुंदेखान रोहिला तो अगोदरच नदीपार होता. दुंदेखान व कुतुबशाहा एकत्र जाले. इकडे नजीबखान रोहिला यानें तावडतोब सांडणीस्वार सुजाउद्दौला याजकडे रवाना केले कीं, "तुमचे भरंवाशियावर आह्मीं हें कर्म पतकरिलें. आतां गनिमाची फौज नदीपार झाली. माझा जीव जगत नाहीं. अजूनही तुह्मी कुमक जलद करितां तर उत्तम आहे. नाहीं तरि आह्मी दत्ताजी शिंदे यांस भेटून पुलावरूनच पार होतों. तुम्हांसाठीं म्यां एवढें दुर्घट कर्म अवलंबिलें." म्हणोन सांडणीस्वार सुजाउद्दौला याजकडे पाठविला. गंगापार फौज गेली त्यांनीं नजीबखान यांचे बुणगे व मुलेंमाणसें व खजिना गांठिला. ते दिवशीं अगदींच हस्तगत व्हावा, परंतु गोविंदपंत यांचा व नजीबखान याचा चांगला स्नेह होता म्हणोन लांच पांच लक्ष रुपये घेऊन त्याची वाट मारून दिली. कमाऊंचे पहाडांत भारी किल्ला होता त्यांत जाऊन अगदीं भारधडी पोंचली. निमित्य टाळावें ह्मणून गोविंदपंत यांनीं पिछाडी गांठली. त्यांत दोन लक्ष रुपये, पांच हत्ती व दोनचारशें उंट व दोनचारशें घोडीं अशीं सांपडलीं.

---

७७. गिराशी=डोंगरी लुटारू.
७८ भारी=जबरदस्त.
७९ पु० प्र० 'कार्तिक वद्य १'
८०. भारधडी=जड सामान (मागें पृ० ३२ टी० १९ पहा.)

तें घेऊन पुलाकडे यावें तों सुजाउद्दौला पन्नास हजार फौजेनिशीं व तिनशें तोफां[निशीं] असा चाल करून आला. त्याचे कहीची[८१] व ह्यांची गांठ अकस्मात पडली. कांहीं कही लुटून गेली. हें वर्तमान गनिमांनीं ऐकतांच तेक्षणीं माघारे पलायमान जाले.[*] कोठें दम न खातां दोन रात्री व दोन वेळांत खळाळ उतरून आलीकडे पोंचले. झाडून नदी उतरून आलीकडे आले. त्या गडबडींत हजार बाराशें मनुष्य वाहून गेलें. दम खाऊन उतरते तर इतके मनुष्य वाहून जातेंना.

असो, दत्ताजी शिंदे यांनीं वर्तमान ऐकतांच यांची खुशाली होती ती मोडली. निर्वाण-समय भासला. सुजाउद्दौला याजकडील वकील प्रीतराज होता त्यास बोलावून आणिलें आणि पुसलें कीं, "तुम्ही आह्मांस मसलत काय करीत गेलां, आणि कर्तुत्व काय केलें ?" म्हणोन वकिलाची अप्रतिष्ठा करून दवडून दिला. फौज येऊन मिळाली. गोविंदपंत यांजवर बहुतच श्रमी[८२] जाले. "मसलतीस धक्का यांनीं बसविला ; असो, पुढें पाहून घेऊं," म्हणोन उगेच राहिले. सुजाउद्दौला याचा मुक्काम भागीरथीचे पलीकडे जाहला. यांजकडील कोणी तीर्थाचे स्नानास जाऊं पावेनातशीं जालीं. तोफांचे गोळे यानें मारूं लागले. अस्तु.

पुढें सुजाउद्दौला यानें नजीबखानाची भेट घेऊन एकांती मनसबा केला कीं, "तुह्मीं भेटीस [ शिंदे यांस ] आणावें, व दगा करून दत्ताजी शिंदे यांस मारावें, व जनकोजी शिंदे यांस मारावें." ह्मणोन मनसबा करून दत्ताजी शिंदे यांजकडे राजेंद्रगीर गोसावी याचा चेला उमरावगीर गोसावी सुजाउद्दौला याजकडे होता. त्याचे पदरीं पांच हजार फौज होती. उमर तों पंचवीस वर्षांचे खालें, परंतु कर्ता मनुष्य होता. त्यास सुजाउद्दौवला यानें कांहीं चित्तांतील कापट्य कळूं न देतां वर-करणीनें ममतापूर्वक बोलून दत्ताजी शिंदे यांजकडे पाठविलें. मनसबियांत दहा पांच येरझारा केल्या. निदान मनसबियांत ठरावेिलें कीं, "सुजाउद्दौला याजकडील कोट रुपये खंडणी घ्यावी. नजीबखान यानें व तुम्हीं पाहून घ्यावें. नजीबखान भेटीस येत जात पावेतों स्वस्थें[८३] रहावें. तुम्हीं हजार फौजेनिशीं नजीबखान याचे फौजेंतून उभयतां दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे व नारो शंकर व अंताजी माणकेश्वर यांचा पुत्र असे मिळोन भेटावयासि यावें." याप्रमाणें इमान प्रमाण

---

८१. कही=गवत, काटें इ० लुटून आणण्याकारितां जाणाऱ्या लष्करी लोकांची टोळी.

८२. श्रमी=नाखुष, इतराज.

८३. "व नजीबखान याणें भेटीस यावें जावें, हजार फौज घेऊन यावें." सा० प्र०

बोलून करारांत आणिलें. इकडे यांस बोलीचे भरास लावून अबदुल अली-कडे वरचेवर पत्रें पाठविलीं कीं, "सुजाउद्दौला येऊन पोचला. अहमदखान लंगडा पठाण तो दहा हजार फौजेनिशीं सिद्धच आहे. माधवसिंग जयनगरकर हा केवळ आम्हांस आताहून आप्त, त्यानें सवतीं एक बाजूच आटोपली. [आहे.] मल्हारराव होळकर देशींहून तीस हजार फौज घेऊन मजल दरमजल दत्ताजी शिंदे यांस मिळावयास येत होता, तो माधवसिंग यानें त्यास गुंतोन पाडिला महत् कार्य केलें. याप्रमाणें आज केवळ ससे भाणवासियास सांपडतें तैसी शिकार सापडली आहे. सत्वर येऊन पोचावें. म्हणजे दक्षिणेस एक मनुष्य जाऊं पावणार नाहीं." याप्रमाणें पत्रें पाठविलीं. आणि अबदुल अलीस आणविला. तैसें दिल्लींत अल्मशाहा पातशाही करीत होता. त्याचे भवितव्य होणार, त्यासही बुद्धि-विपर्यास निर्माण झाला. त्यानेंही फितुराचीं पत्रें सुजाउद्दौला याजकडे पाठविलीं कीं, "तुम्हीं सर्वत्र मिळोन दखनियांचें पारिपत्य करावें, गाजुदीखान याचा शिरच्छेद करावा; तुम्हांस वजिरी देईन आणि बक्षीगिरी नजीबखान रोहिला यास देईन." म्हणोन पत्र पाठविलें. इकडे अबदुल अली खंदाराचा पातशाहा यासही पत्रें पाठविलीं कीं, "नजीबखान व सुजाउद्दौला यांनीं गनिमाची फौज इरेस पाडिली आहे. तुम्ही थोर थोर मजली करून दिल्लीस येऊन पोचावें. दिल्ली हस्तगत करून, गाजुदीखान याचें कार्य उरकोन, मग चौंकडोन दत्ताजी शिंदे यास ससेहोलपटें करावी. खबर सांगावयास दक्षिणेस मनुष्य जाऊं देऊं नये." म्हणोन अबदुल अलीकडे पत्रें पाठविलीं.

तों इकडे दत्ताजी शिंदे कोडरूपयांचे आशेस लागून भेटीस पुलावर जावें, असा इत्यर्थ जाहला. मग जनकोजी शिंदे व नारो शंकर व भागीरथीबाई [८५]त्यांची स्त्री होती, त्यांनीं एकांतीं भीड सोडून जाबसाल केला कीं, "अबदुल अली दुराणी याची फौज चाळीस हजार अटक उतरून लाहूर प्रांतीं आली. आमची फौज होती ती कांहीं उधळली, कांहीं पंजाबांत होती तिची गत काय जाहाली तें नकळे. हें वर्तमान प्रसिद्ध ऐकतच आहों. दुसरें अहमदखान लंगडा पठाण दहा हजार फौजेनिशीं जमून राहिला. व ते एकमतें आहेत. सुजाउद्दौला [याची] ही पन्नास हजार फौज, कुळी ही दैत्याची, व तीनशें तोफा [असा तो] उरावर उतरलाच आहे. नजीबखान वीस हजार फौज व दहा हजार

८४. 'ससे होलपट', 'डुकर खळीस येतो' (मागें पृ० ३८ ओळ ४) 'ससें भाणवसियास सांपडतें' ( (पृ० ४५ ओ० १०) 'पोटांत हरणाची काळजी शिरून' (पुढें) 'लाडगेतोड' (पे० ब० पृ० १८७ ओ० २८) वगैरे पारधीच्या कामांत येणारे शब्द पूर्वी ब्राम्हण जातीच्या लेखकांच्या देखील तोंडीं होते.

८५. त्यांची=दत्ताजी शिंद्याची.

पायदळ, प्रत्यक्ष वैरी, युद्ध करीतच आहे. असें चहूंकडून जाळें पसरलें असतां तुह्मी आपले आयुष्यानें धुंद जालां. परंतु आह्मीं मुलें बायकांनीं उ रू म हो डी स ह डी स [?] पडावें इतकें मात्र मात्र उरलें. प्रत्यक्ष वैरी नजीबखान याचे फौजें-तून पूलावर जाऊन भेटावें, ही मसलत, हा मनसबा [ वाईट असें ] केवळ नेणतें मूल असेल त्याचे ध्यानांत येईल आणि तुह्मांस काळाच्या गतीमुळें झांपड कैसी पडली, हें नकळे." असें ऐकोन दत्ताजी शिंदे यांस परम विषाद आला. बोलता जाहला कीं, "जनकोजी शिंदे बावा, तुह्मांस जिवाची आस्था आहे. तुह्मीं फौजेंत रहावें. आह्मी भेटीस जातों. दैवीं असेल तें होईल." ह्म-णोन बोलतांच जनकोजी शिंदे बोलिले कीं, "तुह्मीं फौजेंत रहावें. आपण भेटीस जातों." ह्मणोन केवळ गळां पडले. नारो शंकर कौंबील[८६] मनुष्य बोलिला कीं, "तुम्हांस भ्रांती कां पडली, हें नकळे. आधीं नजीबखान याचे फौजेंत गेल्यावर तो कांहीं प्राणानिशीं माघारां येऊं देत नाहीं. कदाचित् त्याणें हें कर्म न केलें तरि पुलावर सुजाउद्दौला यास भेटावयास आलें[८७]. तेव्हां तो केवळ मनुष्य नव्हे. प्रत्यक्ष अंगींही दैत्य आणि कुळींही दैत्य, बळेंही भारी. हत्तीचे मागील पायावरि पाय देऊन शेंपूट बोढून धरिलें तरि हत्ती-जाऊं न पावे. तैसेंच भागीरथी सारखी नदी, माठें विस्तीर्ण पात्र, तें सुजा-उद्दौला यानें सहज आडसांगडीनें रिकामें यावें जावें. बुडी देऊन सुसर ओ-ढून काढावी. उमर तो पहिली पंचविशी, परंतु शक्ति येवढी." तेव्हां जवळ कोणी गृहस्थ होते त्यांनीं विचारिलें कीं, "मनुष्य-व्यक्तीमाजी एवढा पराक्रमी व्हावयास कारण काय?" नारो शंकर यांनीं उत्तर केलें कीं, "मनसूर अली यास पोटीं पुत्रसंतान नव्हतें. म्हणोन एवढें राज्य, केवळ दुसरी पात-शायत, असें सुख असतां मनसूर अली यानें पुत्राविना केवळ हळहळ मानून चित्तांत योजना केली कीं, "याहून फकीरी बरी, परंतु हे जिकीर कामाची नाहीं." म्हणोन उदास वृत्तीनें अतीत-अभ्यागत, फकीर-फकरा यांस द्रव्यदान, वस्त्रदान, व अन्नदान करीत आपण जार्त्या[८८] आपले स्वकर्मीं उजु तवाजु करून सावध [होता.] पुत्र-उद्देशें अयोध्येंत ब्राह्मण व वैरागी यांस अनुष्ठानास घात-लें. तेसमयीं त्याच्या दैवयोगें केल्या कर्माचें सार्थक, ईश्वरास भार जाहला. मग त्याचें कुलदैवत मक्केहून एक अवलिया फकीर आला. त्यानें स्वप्नीं फळ दिलें कीं, "तूं पुत्राचे उद्देशें श्रमी, तरि हें फळ आपले स्त्रीस भक्षायास द्यावें." म्ह-णोन फळ हातीं दिलें. असें स्वप्नीं पाहिलें. प्रत्यक्ष दिवस उगवलियावरि

---

८६. काबील=हुषार, वस्ताद.
८७. 'आले' पुणें प्रत.
८८. जात्या=जातीनें, स्वत.

फकीर आला. त्यानें फळ दिलें. दुवा देता जाला कीं, " फळ आपले स्त्रीस भक्षावयास देणें. " ह्मणोन सांगतांच त्यास रात्रीं आधींच स्वप्नीं साक्षात्कार जाहला होता. मग मनसूर अली यानें फळ नेऊन स्त्रीस भक्षावयास दिलें आणि बाहेर आला, तों फकीर गैब[९] झाला. मग मनसूर अली यानें चित्तांत विचार केला कीं, " अवलिया फकीर आला असतां मी मोहास गुंतोन सेवा-चोर जाहलों " ह्मणून बहुतच खेद करिता जाहला. याप्रमाणें ईश्वर-कृपेचें देणें." असें ह्मणतांच तेथें कोणी पाषांडी होते त्यांनीं उत्तर केलें कीं, "प्रारब्धीं पुत्र नसतां देवें कोठून दिला. ?" "यास प्रमाण भारतीं आहे कीं नाहीं ? भक्ताचे प्रारब्धीं पुत्रसंतान नसतां नवेंचि निर्मून देतो. असें सिद्ध आहे. शास्त्र साक्ष देत आहे." त्यांत कोणी एकानें कल्पना घेतली कीं, " यांजकडे भक्तपणाचें कर्म काय ? प्रत्यक्ष म्लेंच्छ-योनीस जन्म. अमंगळ तप, त्याचें कश्मलें[१०] फळ म्हणोन दिक्कत[११] घेतली. नारोपंतांनीं प्रत्युत्तर केलें कीं, "भक्तपणा कांहीं पंहोवयास[१२] लागत नाहीं. दैत्यकुळीं भक्त प्रल्हाद जाहला कीं नाहीं ! किंवा राक्षसकुळींत बिभीषण झाला कीं नाहीं ! तसें, अविंधाशीं मतलब[१३] नाहीं. तो केवळ नेकिजाद[१४] प्राप्त पुरुष होता. असें दुवाचें फळ. या योगें करून बळ उत्कर्ष प्राप्त जाहलें. असो, त्याचें बळ या प्रकारचें त्यानें दगा न करितां सहजीं दोघांस बगलेस धरून गंगेत उडी पुलावरून टाकिली, तरि त्याचें काय करावें ?" असे बहुतां प्रकारें बुद्धिवाद सांगून भेटीची मसलत राहविली. उमरावगीर बाहेर डेरियांत होता, त्यास साफ सांगितलें कीं, "आम्हांस पुलावरि भेटावयास अनुकुळ पडत नाहीं. तुह्मांस आगत्य असेल तरि तुम्हीं हजार फौजेनिशीं नजीबखान याचे आलीकडे यावें. आम्ही हिकडून येतों. परस्परें भेटी होतील. हें न घडे तर तुमची आमची कागदपत्रीं भेट. इमान प्रमाण करून आमची क्रोड रुपयांची हुंडी उतरून द्यावी. तुम्ही मित्रवादें अयोध्येस जाऊन स्वस्थ रहावें. नजीबखान याची कुमक करूं नये." याप्रमाणें बोलतांच उमरावगीर यास परम विषाद आला. "आह्मी हिंदु असतां दगादुगा होऊं देऊं असें नाहीं. हें चित्तांत काय आणिलें ?" म्हणोन क्षणभर रदबदली केली. परंतु खातरजमेशीं मसलत मोडिली. उमरावगीर गोसावी यानें सुजाउद्दौला यास वर्तमान सांगितलें. तेव्हां तो आपले जागां

---

[९] गैब=गुप्त

[१०] कश्मल=वाईट, पापरूप.

[११]. दिक्कत=आक्षेप.

[१२]. 'भक्तपणास कांहीं यातायात लागत नाहीं' तुं० प्र०.

[१३]. मतलब नाहीं=कर्तव्य नाहीं, अविंध असो कीं कोणी असो, तो भक्त असू शकेल.

[१४]. नेकजाद=सद्गुणी, साधु.

फिका होऊन राहिला. नजीबखान व नबाब सुजाउद्दौला मागती एकत्र होऊन मसलत केली कीं, "हा तो मनसबा राहिला. आतां एक करावें. क्रोड रुपयांचे लटके आशेस गोंवून-पाडावें. तों अबदुल अली दुराणी हो येऊन पोंचेल. दुराणी आलियावरि बसले जागियावरून मराठे यांस उठों न द्यावें." याप्रमाणें मसलत करून नित्यशः "आज देतों, उद्यां निशों करितों" ह्मणोन आशेस लाविले.

इकडे अबदुल अली लाहुरास पोंचला. तों साबाजी शिंदे व संदीबेग यांचा पुत्र यांनीं राज्य सोडून [ते] कुरुक्षेत्राचे राज्यांत आले. दत्ताजी शिंदे यांस पत्रें पाठविलीं कीं, "तुम्ही अजून तेथें कां राहिलां? दुराणी गिलच्यांची फौज भारी आली. तुम्ही निघतां तरि उत्तम, नाहीं तरि तुह्मांस कोणी यमुना उतरूं देणार नाहीं." म्हणोन पत्रें येतांच यांस निर्वाण-समय भासला. मग डोळियावरील पडळ निघतें तैशी गत जाहली. परंतु द्रव्याची आशा सुटेना. फौजेंत मोठी खळबळ जाहली. तमाम उंटें, घोडीं मेलीं होतीं, त्यांनीं उंटें घोडीं घेतलीं. मग दत्ताजी शिंदे यांनीं बुणगे काढून मिरापुरावरते कोशावर ठेविले. आपण सडे फौजेनिशीं तळावर राहिले.

तों इकडे फितुराचीं पत्रें दिल्लीहून अलमशाहा याचीं सुजाउद्दौला यास गेलीं होतीं, त्याचीं उत्तरें आलीं होतीं तीं अकस्मात् गाजुदीखान याचे चौकीस सांपडलीं. पत्रें वांचून पाहिलीं तों घात व्हावयाचा प्रसंग पाहिला. तेच समयीं गाजुदीखान किल्ल्यांत जाऊन, बेलाशक अलमशाहाचा शिरच्छेद करून, दिल्लींत मुरदा तैसाच टाकून, प्रहर रात्र उजेडावयाची तों अगोदरच गाजुदीखान व नागरमल्ल व बहादरखान बाळोचे चार हजार फौजेनिशीं निघोन कच्चे चाळीस कोस तिसरे प्रहरीं येऊन पोंचले. ते अंतरवेद-असें ह्मणावयास कारण कीं, यमुना व भागीरथी या दोहींच्या मध्यें भाग कच्चे चाळीस कोसांची मर्यादा, या नांव अंतरवेद-तेथें गाजुदीखान वजीर येऊन पोंचले. आडवे यावयाचाही मान पाहिला नाहीं. सुजाउद्दौला याजकडील हुसेनखान व गफूरखान व उमरावगीर असे येऊन मसलत करितांत[१६] तों, एकाएकींच पाईकें[१७] येऊन मुजरा केला आणि अर्ज केलाकीं, "साहेब वजीर तो आज पोंहोंचे" असें म्हणतांच पाटील जागियावरून बाडांच्या[१८] बाहेर येऊन पाहतात तों गाजुदीखान याच्या अंबाऱ्या देवडीस येऊन पोंहोंचल्या. दत्ताजी शिंदे यांनीं विस्मय केलाकीं, "यानीं मान महत्व न पाहतां एकाएकींच एवढे निकडीनें यावयास प्रयोजन

---

१५. निशा=खात्री (ऐवजाबद्दल).
१६ शिंदे यांजकडे.
१७. पाइक=चाकर, प्यादा.
१८. बाड = तंबूच्या कनाथी.

काय ? " असें ह्मणतात तों वजीर हत्ती वरून उतरून दत्ताजी शिंदे यांस हातीं धरून तेच क्षणीं एकांतीं जाऊन साफ सांगितलेंकीं, " अवघें ही हिंदुस्थान फिरलें. अबदुल अलीची दौड पानिपत, कर्णोलचे रोखें येऊन पोंचली. सुजाउद्दौला व नजीबखान व अहमदखान लंगडा हे पाऊण लक्ष, ऐशीं हजार येथें आहे. तुह्मी क्रोड रुपयांचे आशेस लागलां आहां; तुह्मांस क्रोड रुपये कोणी देत नाहीं. अवघा मनसबा एकीकडे ठेऊन यासमयीं कूच करून जावें. " असें ऐकतांच सर्वांचे तोंडाचें पाणी पळालें. पुढें होणार परंतु आजच जाहलें असें भासलें. कूच करावयाचा निश्चय जाला. सांडणीस्वार व पत्रें मल्हारराव यांजकडे पाठविलीं, कीं " तुह्मी जयनगरचा शह सोडून लवकर येतां तर उत्तम आहे. नाहीं तर पुन्हा तुमची आमची भेट होत नाहीं. " ह्मणोन निदानचीं पत्रें पाठविलीं.

तों लाहुराकडून सांबाजी शिंदे पळोन आले तेही येऊन पोंचले. ते समयीं उमरावगीर गोसावी यास सांगितलेंकीं, " अबदुल अलीची फौज नजीक आली. आतां नबाब सुजाउद्दौला यास सांगावें कीं, 'प्रस्तुत आम्ही त्याचे पारिपत्यास जातों. तुम्हांस इमान, आमचा स्नेह, राखणें असलियास आजिचे समयीं क्रोड रुपयांची हुडी उतरून द्यावी. व तुम्ही कूच करून अयोध्येस जावें.' " म्हणोन बोलोन त्याज समागमें हत्ती, घोडा व शीरपेच व मोतियांचा तुरा देऊन वस्त्रें ही दिलीं. याप्रमाणें सांगितलें तेसमयीं उमरावगीर गोसावी यास उमगलें कीं, " अविंधानीं मोंगलाई मसलत केली होती, परंतु दत्ताजी शिंदे भेटीस आले नाहींत म्हणोन उत्तम जालें. नाहीं तरि आह्मांस जन्माचें अपेश येतें. ईश्वरेंच अरिष्ट वारिलें. " ह्मणोन संतोष पावून उमरावगीर सुजाउद्दौला याजकडे आला. इकडील वृत्तांत सविस्तर सांगितला. तेसमयीं सुजाउद्दौला यानीं चित्तांत विस्मय केलाकीं " अशा अरिष्टांतून आजिचे समयीं दत्ताजी शिंदे निभावून चालिले ! आमची केली मसलत तैशीच राहिली ! "

दुसरे दिवशीं दत्ताजी शिंदे यांनीं कूच करून मजल दरमजल कुंजपुऱ्या नजिक येऊन यमुना उतरून आलीकडे आले. तों गिलच्या कुरुक्षेत्रावर आला. याची बातमी पोंचली. मग दत्ताजी शिंदे यांनीं बुणगे, मुलें माणसें व जनकोजी शिंदे व गाजुदीखान यांस दिल्लीकडे वाटेस लाविलें. आपण सडे होऊन [११]"हे कोणी एकमेकांस मिळाले नाहींत तो अबदुल अलीस गाठावें ह्मणोन पाणिपतावर गेले. तों तेथून गिलच्या सोळा कोसांवर [आहे] म्हणोन बातमी आली. दत्ताजी शिंदे यांनीं मसलतीस लहान थोर सरदार बोलावून

११ हे म्हणजे सुजाउद्दौला, नजीबखान, | अबदाली वगैरे.

सांगितलें कीं, " खंदारचा पातशाहा चालोन आला आहे. मी पेशव्यांचा चारगीर, माझी अब्रू कांहीं विशेष नाहीं. परंतु तुम्ही सर्वत्र राज्यांतील मराठे नामी सरदार. ' मरा ' ह्मणवत नाहीं. तरी लेजे दान की दीजे प्राण यदर्थ दोहोरा आहे. ॥ मारूं तो मरजाऊं, हटोंतो जनकी लाज । खुदा परवार दिगार, दोनो कठीण काज ॥ ऐसा विचार आहे. याचें उत्तर काय?" म्हणोन बोलतांच सर्व नामी सरदार बरेंच कुलीन होते. त्यांनीं निरोत्तर केलें कीं, " पाटील, तुम्ही फौजेचे पाठीवर उभे राहाल तर आम्ही इरेनें झुंज करूं. तुम्ही फौजेस टाकून पुढें जालेत, तर आम्हि गनीम जातीचे. पाठीवर काठी उडती तोंच जें होणें तें होईल. नाहीं तर झाडास बांधले तरी झाड घेऊन जातील. आमचा मराठियांचा स्वभाव, बोलावयाचा मात्र धर्म आहे कीं, जेथें साहेबांचा पायपोस पडेल तेथें आमचें डोकें पडेल. परंतु त्याचे वांटेकरी थोडे. नाहीं तरि जेथें साहेबाचें डोकें तेथें भल्याचा पायपोस ही पडणार नाहीं. ऐसा विचार आहे. यांत तुम्ही खावंद आहां." असें म्हणतांच दत्ताजी शिंदे बोलिले कीं, " तुम्ही ज्या रीतीनें सांगाल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. " म्हणोन बोलून रात्रीं मुक्काम करून राहिले. गिलचियाची बातमी आणविली तों तेथून कच्चे वीस कोसांवर अबदुल अली येऊन पोंचला. ही बातमी येतांच शिंदे यांनीं पुढें [100]हरोळीस फौज जिवाजी भोइटे व नाइकजी भोईटे व गोविंदपंत बुंदेले व अंताजी माणकेश्वर यांचा पुत्र, असे पंधरा हजार फौजेनिशीं पुढें रवाना केले. त्यांनीं जाऊन सोळा कोसांवर दुराणी गांठिला. परंतु ईश्वराचें कर्तव्य, गनिमाचा विनाशकाल. नाहीं तरि दुराणी मनुष्य कांहीं पक्के मर्द मनुष्य नव्हते. कूर्मवत् फौजेचें आकर्षण करून, गोल बांधून, कुंजपुरियाचा रस्ता सोडून, कमाऊचे पहाडाचे सुमारें यमुनातीरीं अडचण होती तिकडे तडक पळों लागले. तेव्हां पुढें होराळीस गेले होते त्यांनीं योजना केली कीं, " दुराणी केवळ पळोन आम्हांस भेऊन तडक पळतो. दत्ताजी शिंदे मागेंच आहेत तों आपण घोडे घालून एवढें यश घ्यावें." म्हणोन मोठी कडनिकड मांडिली. अबदुल अली नजीबखान यास मिळाला नाहीं तों पावेतों युद्ध करावें.

तों इकडे दत्ताजी शिंदे यांनीं तो प्रातःकाळीं उठोन, फौजेस ताकीद करून, शेला भाला आणि अजीनतंग सिद्ध करून, आंगांत बक्तरें व चिलखतें, टोप, पेन्धा, जिरे, दस्तानें, टोपास बिन्या वगैरे बावन्न बिरदें सिद्ध होऊन

१००. हारोळी ( हरोल = फौजेची पिछाडी ) टेहळणी.

१. मागें पृ० १३ टी० ३३ पहा.

दस्ताना = लोखंडी हातमोचा, हस्तत्राण.

बिनी = नासात्राण.

बिरिद = गुणोत्कर्ष-दर्शक भूषण, बाहुभूषण.

गोटा बाहेर निघाले. तों अकस्मात् पंजाब प्रांतीं त्रिंबक बापूचे पथक गेलें होतें तें दुराणीनें बुडवून तमाम मनुष्यांचा बंदे धरून भंवताले राखणदार [ ठेविले. ] सायंकाळीं अदशेर अन्न द्यावें, अंगावर वस्त्र नाहीं. परंतु तेसमयीं त्यांनीं जीवदान देऊन सोडिलें हेंच अधिकोत्तर. त्यांनीं पंजाबची संपदा मेळविली होती. ती जाऊन दैवहत जाले. दरिद्री स्वप्नीं राजा होतो आणि जागृति होतांच तृणकाष्ट आणावयाचें संकट पडतें, तैशी गत जाहली. असो त्यांनीं जिवें जगले हेंच मिळविलें. कुरु-क्षेत्राचे तळावरून त्यांज समागमें पांच गिलचे देऊन रवाना केले होते. ते दोन अडीच हजार मनुष्य नागवे उघडे, केवळ मोठ मोठे सरदार होते. ते ओळखूं येईनात अशा अवस्थेनें आले. तों यांणीं युद्धास जावें म्हणून पुढें तळ सोडून बाहेर निघाले. तों तीं पुढें नागवीं उघडीं वायाळें आलीं तेसमयीं सर्वत्रांच्या मुखावरील पाणी उतरलें. महा अपेश आलें ऐशी सर्वत्रांची कल्पना जाली. दत्ताजी शिंदे यांस वाईट भासलें परंतु मागती विवेक केला कीं "ज्या ज्या काळीं जें जें होणार तें होतच आहे." म्हणोन दोन घटका उतरून, सर्वत्रांस भेटून, त्यांचें समाधान करून, त्यांशास पोषाख व मनुष्यांस दोन दोन वस्त्रें व सकट पन्नास रुपये खर्चास देऊन आपण घोडियावर स्वार जाले. शिंदे केवळ खजानपूर सरदार द्रव्यदृष्टी होते. त्यांस कांहीं द्रव्याची परवा नव्हती.

असो. पुढें गेले तों गिलच्या जाऊन यमुनातीरीं अडचणींत एकेकडून पानें व शेरणीचीं बेटें व पाणियाची झील असे अडचणींत उतरले. गिलचे यानीं जातेक्षणीं हत्तीवर उंटावर झडत पडत बुणगे नदीपार केलें. आपण सर्व पंचवीस हजार फौज व पांच सातशें उंटांवर सुतारनाले व दोन चारशें उंटांवर बाणाच्या कैच्या व जिल्बींतील हलक्या तोफा पन्नास, अशा जमून उभा राहिला होता. तों दत्ताजी शिंदे यांचे फौजेचे धुराळे दृष्टीस पडों लागले. तेसमयीं नाइकजी भोईटे व जिवाजी भोईटे व गोविंदपंत बुंदेले यांणीं आपण यश घ्यावें म्हणोन त्या अडचणींत शिरोन घोडीं घातलीं. तेसमयीं अबदुल अली गडबडोन सुतारनाले व बाणाचे उंट बसवून तोफांचा व सुतारनाले यांचा व बाणांचा एकदांच मार केला. तों पुढें होणार भवितव्य. यांचे दृष्टीस काय पडलें, हें न कळे. एवढे पराक्रमी होते परंतु त्यांच्या पोटांत हरणाची काळजी शिरून, निशाणें माघारीं फिरवून तडक पळों लागले. त्यांच्या मागें

---

२ बंद धरून = आडवून, कैदकरून ?
३ खजानपूर = खजीना भरपूर आहे ज्यांचा असे.
४. द्रव्यदृष्टी ( द्रव्यादृष्ट ) = दैवाची धनसंपादनांत अनुकूलता आहे ज्यांस असे.
५, मागें पृ० ५४ टी० ८४ पहा.

फौजही भरधांव पळों लागली. बापास पुत्र व पुत्रास बाप उभे राहिनात. तेथें दुसरे कोण उभे राहतील? असा पळ सुटला. तेव्हां गिलचे यांनीं पाठलाग करून जैसा कुणबी विळयानें जोंधळ्याचीं कणसें कापितो तद्वत् शिरच्छेद करूं लागले. गिलचे केवळ बेहुष, एका शरीराच्या तीन अवस्था केल्या. एकानें पुढें डोचकें कापावें, एकानें मागें बृहती मारावी [ व ] डोकें कापून न्यावें तें सरकारांत रुजु करावें. त्यांनीं इनाम दर शिरास पांच रुपये देऊन नाक कापावें. अशा एका शरीराच्या तीन अवस्था करून क्षणांत अडीच हजार खांसे यांचीं शिरें कापलीं. दुराणी व हे सरमिसळ[6] पळत येतात तों दत्ताजी शिंदे फौज सुद्धां येऊन पोंचले. एवढे शिंदे अंगें मर्द व हमेषा लढती फौज, ज्या फौजेनें मारवाडी राठोड हटविले आणि एकदील ऐशी असतां पुढील सोहोळा[7] पाहून केवळ दिपतात तैसे दिपोन उभे राहिले. तोंडें काळीं खापरासारखीं दिसों लागलीं. लोकांची वीरश्री उतरली. अंगें दत्ताजी शिंदे उभे राहिले. परंतु त्यांची कमक करविली नाहीं. दत्ताजी शिंदे इकडे तोंड करीत तों इकडील फौजेचे सेले तोंडासन्मुख येत येत असी इकडे तोंड फिरविलें तरि इकडील फौजेकडे येत.[8] अशी आपले जागां गडबड झाली. परंतु त्यांची कुमक जाली नाहीं. त्यांनीं[9] आपले स्वइच्छेनें शिरें कापिलीं. आणि दुराणीकडे[10] गेले. त्यांनीं तमाम शिरांचीं नाकें कापून डेरिया पुढें कलवडा[11] प्रमाणें चौत्रा घातला. अडीच हजार डोकीं, कांहीं थोडीं नव्हेत!

असो दत्ताजी शिंदे तिसरे प्रहरपर्यंत तेथें उभे राहून, माघारे सरून पुलानजीक उतरले. अबदुल अली सडा होता तो अगदींच नदीपार गेला. दुसरे दिवशीं दुराणी तावडतोब नजीबखान यास भिरापूरचे तळावर मिळाला. तिकडून सुजाउद्दौलाही पन्नास हजार फौज व तीनशें तोफा भागीरथी उतरून आलीकडे आला.. अनुपशहराहून अहमदखान पठाण लगडा दहा हजार फौजेनिशीं मिळाला. अशी एक लक्ष चाळीस हजार फौज एक जागां मिळाली.

---

६. सरमिसळ = एकाजागां, एकमेकांत मिश्रित.

७. सोहळा = आपले लोकांची दुर्दशा.

८. " दत्ताजी शिंदे इकडे तोंड करितां ना इकडील फौजेचे तोंडा सन्मुख सेले फिरविले इकडील फौज इकडे येत. अशी " तुं० प्र० " दत्ताजी शिंदे इकडे तोंड करितात तों हिकडे फौजेचे शेले तोंडापुढे येईत आणि फिरोन दुसरेकडे तोंड करितात तों हिकडून ,सोग तोंडा पुढें येईत " धोंडेश्वर प्रत.

९. म्हणजे गिलचांनीं

१०. दुराणी = अबदाली.

११ कलवड =शेण, माती इ०कांच्या लेपानें आच्छादित जो गोंवऱ्यांचा ढीग तो.

इकडे दुसरे दिवशीं दत्ताजी शिंदे यांनीं कूच करून दुराणीचे तळावर आले. तों शिरांचा गंज[12] पाहिला. डोळ्यास पाणी आलें. एका क्षणांत पंधरा हजार फौजेतील निवडक निवडक मनुष्यें गेलीं. ओळखायास कोणी दृष्टीस पडेनासें झालें[13]. मोठा प्रळय. फौजेंत जिकडील तिकडे रुदंती झाली. क्षणभर तेथें उभे राहून सोमाजी बाबा भोसले फलटणांत रहात,—ते केवळ साधु मनुष्य होते—त्यांनीं ते दिवशीं क्षणभर क्षत्रिय धर्म केला. परंतु विनाशकाल; त्यांचेंही शीर छेदून नेलें होतें. मोठ्या प्रयासें त्यांचें धड मात्र हुडकून काढिलें. त्या धडास अग्नि-प्रसाद देऊन मोठीशी मजल करून बाहादरगडचे नजीक तुणगे व जनकोजी शिंदे यांसि गांठ घातली. तेथून मजल दर मजल तिसरे दिवशीं दिल्लीनजीक मजमूचे टिळिया नजीक मुक्काम केला. किल्ल्यांतून गाजुदीखान वजीर आला आणि "आह्मी कोठें रहावें?" ह्मणोन विचारिलें. दत्ताजी शिंदे यांनीं सांगितलें कीं, "तुह्मी स्वस्थ किल्ल्यांत रहावें. दुराणी नामर्द, त्याच्यानें काय होणें आहे? आह्मी गनिमी* काव्यानें राहतों. तों पावेतों मल्हारराव याचेंही पत्र आलें आहे या उद्देशें शह जयनगरचा सोडून येतात, तेही एक दोन दिवसांत येऊन पोंचतील." असें त्याचें समाधान करून त्यास किल्ल्यांत वाटेस लाविलें. आपण स्वस्थ राहिले.

तेसमयीं भागीरथीबाई यांनीं नारो शंकर यांस सांगून पाठविलें कीं, "आजपर्यंत आमचा होता† काळ होता; जें केवळ असाध्य तें तें साध्य होत होतें. आतां जी गोष्ट योजावी ती विपर्यास ‡ होते. प्रस्तुत सर्व हिंदुस्थानांत एक जाले. दीड लक्ष फौजेची गणती दुराणी व अवघे मिळून जाले आहेत. तुह्मांपाशीं पन्नास हजार फौजेची गणती नाहीं. पाटील तों दुराग्रहास प्रवर्तले. आपण मरावें आणि जग बुडवावें, असा विचार घडला आहे. तुह्मीं मरावें आणि आह्मी तु रु क ह (बु) डी स [?] पडावें असेंच आमचें प्रालब्धीं! असो. ईश्वरें निर्मिलें होतें ह्मणून ईश्वरें आह्मांस जन्मादारभ्य या रानांत आणिलें. तुह्मीं पाटील यांस विवेक करून सांगावें." ह्मणून सांगितलें. तेसमयीं नारो शंकर यांचीही मुलें माणसें समागमेंच होतीं. त्यांणीं चित्तांत योजना हीच केली होती. मग नारो शंकर, जानराव वांबळे[14] व गोविंदपंत बुंदेले व जनकोजी शिंदे [असे] एकत्र होऊन दत्ताजी शिंदे यांजकडे आले. आणि साफ

१२. 'शिरागण' पाठांतर.

१३. 'ओळख पडेनाशी झाली' तुं० प्र०

* गनीमी कावा=समोर लढाई न देता युक्तीनें शत्रूचा नाश करण्याची मराठी रीत.

† होता काळ=चालता काळ.

‡ विपर्यास = उलटी.

१४. वावळे किंवा वाबळे?

जाबसाल केला कीं, " तुम्ही मरावयास सिद्ध जालां, परंतु मुलें लेकरांनीं काय पाप केलें आहे ? याजकारितां आपण सडे या स्थळीं राहून बुणगे व कबिले* चमेलीपार लावून द्यावे. मग तुमचे दैवीं असेल तें घडेल. " म्हणोन ऐकतांच दत्ताजी शिंदे यांस विषाद येऊन बोलते जाले कीं, " नाना ! तुह्मी काय समजून हा अर्थ बोलिलां ? आह्मांसही पुरतेंपणीं समजलें कीं, आमचे आयुष्याचा अंत जाला. मग मुलें माणसें जगून काय करावीं ? कोणी आप तरावें आणि जग तारावें, कोणी आप बुडावें व जग बुडवावें. मुलें माणसांची सीमा[१५] करून, हत्तीस अंदू[१६] घालून मारतां मारतां मरावें. मरणाहून अपेश वोखटें[१७]. अपजय घेऊन नानासाहेबांस व भाऊसाहेबांस तोंड काय दाखवावें ? आतां मरावे हाच निश्चय. याविणें दुसरी कल्पना नाहीं. " असें ऐकून नारो शंकर यांनीं उत्तर केलें कीं, " पाटील, तुम्ही बोलिलां हें पुरवून घ्यालच, यांत संदेह नाहीं. तुम्ही बोलिलां तें कराल, परंतु मुलें माणसें मारवत नाहींत. हें कर्म, एक दोन वेळ शाका मंडळियाचे राजियानें केल्या. आणि हिंदुस्थानांत बुंदी व कोटियाचे राजे होडे रजपूत यांनींच हीं कर्मे करावींत. मराठियांस मायाजाळ सुटत नाहीं. या गोष्टी घडणार नाहींत. आह्मी आपलीं मुलें माणसें वाटेस लावितों[१८]. " ह्मणोन बोलून डेरियास आले. दत्ताजी शिंदे उठोन बाडांत† स्त्री भागीरथीबाई यांजकडे गेले. त्यांचे चित्तांतील काळजी ध्यानांत आणिली तों त्यांचे चित्तांतही निघतां उत्तम. त्यांत भागीरथीबाई गरोदर, नऊ महिने पूर्ण भरले होते. दत्ताजी शिंदे यांनीं चित्तांत योजना केली, " हिचे पोटीं पुत्र नाहीं. स्त्री गरोदर आहे. वाटेस लावितां उत्तम आहे. " ह्मणून बाहेर येऊन, जनकोजी शिंदे यांस बोलाऊन सांगितलें कीं, बुणगे व मुलें माणसें घेऊन तुम्ही चमेलीपार होणें. आह्मी येथें राहून होईल तसें पाहून घेऊं. " असें ऐकतांच जनकोजी शिंदे यांणीं उत्तर केलें कीं, " काकासाहेब, तुम्ही राहतां आणि म्यां जाऊन काय करावें.? मजकडून या गोष्टी घडावयाच्या नाहींत. तुम्हीं मुलें माणसें पाठविलीं तरि उत्तम आहे नाहीं तरि आम्ही आग्रह करीत नाहीं." असा दुराग्रह ऐकून दत्ताजी शिंदे डेरियांत येऊन मुलां माणसांस चार गोष्टी विवेकाच्या सांगितल्या. त्याजवरून त्यासमयीं बायकांचा शोक !

---

* कबिले=बायका.

१५. 'शाका' तुं० प्र०—नाश, तुकडे या अर्थी.

१६. अदू=हत्तीस ठाम करण्याकारितां ज्या सांखळदंडानें त्यास बांधितात तो.

१७ 'वोखटें' बद्दल 'वेळावें' तुं० प्र० वोखटें =वाईट, कळंक आणणारें.

१८. येथें "या गोष्टी घडणार. तुम्ही वाटेस लावाल तर उत्तम; नाहींतर" इ० तुं० गार प्रतीचा पाठ.

† बाड=तंबूचें आवरण.

*ज्याप्रमाणें मनुष्य मरतें तैशी गत जाहली!* भागीरथीबाई यांस असें जालें कीं, "पाटील आजच आपणास अंतरले. भगवंतें आजच आमची ताडातोड केली." ह्मणून बहुतां प्रकारें शोक करून अगदीं बुणगे व मुलें माणसें समागमें पांच हजार फौज व सुरजमल जाट याजकडील वकील रूपराम कटारी यास समागमें देऊन वाटेस लाविलीं. तेथून फरकाबादे नजीक बारा कोसावर जाऊन बुणगे पोंचले.

तेच दिवशीं अबदुल अली दुराणी व सुजाउद्दौला व नजीबखान रोहिला असे व अहमदखान लंगडा व कुतबशाहा व दुंदेखान रोहिला असे यमुना पलीकडे शाहाधडा म्हणोन मोठासा पुरा, अंतरवेदीची उतरती पेठ, व पटपंचगंगे असे तीन पुरे मारून त्यांचा सत्यनास केला. एक लक्ष चाळीस हजार फौज होती. पौष शुद्ध* ४ स संक्रांतीची भोगी त्या दिवशीं होती. ते दिवशीं यमुनातीरीं दुराणीचा मुक्काम जाला. *यमुनेचे आलीकडील तीरीं गर्नीम पाणी* पीत होते. व पलीकडील तीरीं दुराणी पाणी पीत होते. दोन्हीं सैन्यें एकमेकांनीं पुरतीं पाहिलीं. तों शिंदे यांजकडील फौज भारी सैन्य पाहून फारच संकटांत पडली. ते दिवशीं दत्ताजी शिंदे यांनीं दिल्लीसमीप राजघाट होता तेथें हत्ती घालून ठाव पाहिला. तों पाणियांत ठाव लागला नाहीं. तसेंच मजमूचे टिळियानजीक घाट होता. तेथेंही जाऊन ठाव पाहिला. तों तेथेंही ठाव नाहीं. तों सायंकाळही जाहला. रात्रचे राव अपलाले जागां राहिले. रात्र प्रहर उरली. मग दत्ताजी शिंदे यांनीं जानराव वाबाळे यांस नजीक घाट होता तेथें राखावयास जावें, ह्मणोन सांगून घाट राखावयास पाठविलें. व मालोजी शिंदे म्हणोन बरा उमराव होता. तो हजार फौजेनिशीं दिल्ली नजीक राजघाट होता तेथें घाटावर त्यास पाठविलें. दिवस उगवला. समागमें नामी पांच सात हत्ती व सडे बुणगे [व] तीन लक्ष रुपये समागमेंच होते. त्यांत हत्ती नामी जव्हेरगज, व पट्टागज, कृष्णगज, व रामबाण असे चार हत्ती अमोल्य. त्यांजवर महात हीं थोर अबरूचे. चौवांस खडी-ताजीम होत होती. त्यांस दत्ताजी शिंदे यांनीं ताकीद केली कीं, "यार हो! निदान समय येऊन पडलें आहे. आमचे मनांत आहे कीं, निदान समयीं हत्तीस अंदू घालून लढाई करावी." असें महातांनीं ऐकून उत्तर केलेंकीं, "रावसाहेब! आह्मीं बहुत दिवस तुमचे पदरचें अन्न खा-

१९. "यमुना दिल्लीला शाहाधडा ह्मणून मोठासा पुरा, अंतरवेदीची उतरती पेठ, तो व पटपटंग असी पुरें मिळून अर्धी दिल्ली होईल" असा तुं० प्र० पाठ.

* 'शुद्ध १४' धो० प्र०

२०. "वाल्होजी शिंदा" तुं० प्र० 'मल्हारजी' धो० प्र०

२१. 'बालखादम' 'बाजखादम' पु० तुं० प्र०

दलें आहे. एक वेळ आपण हें रण सोडून निघालां तर आमचा प्राणांत समय आला. आह्मी कांहीं वाचत नाहीं." असें ऐकून एकमेकांस निरवानिरव करिते झाले. समागमें हत्तीवर घटका ही वाजत होती. तीन घटका दिवस आला तों तमाम फौज जेऊन खाऊन, तिळगूळ वाटून, जीन सामान सिद्ध होऊन बसलेच होते. तों अबदुल अल्लीची फौज व तोफा सिद्ध होऊन कांहीं राजगडचे घाटें चालिले. व कांहीं मजमूचे टिळियाचे घाटें व कांहीं चमेलीचे[22] घाटें चालिले. इतक्यांत किल्यापासून गाजुदीखान वजीर आला. दत्ताजी शिंदे यांस येऊन बोलतां झाला कीं, "तुह्मी गनीम आहां. तुह्मीं घाट धरिले. [23]ते हे मोंगलाई लोक. तुह्मांस घाट बांधणें सोसणार नाहीं. तुह्मी घांट सोडून दुरोन गनिमी काव्यानें राहिलां तरि आह्मी किल्ला राखतों. नाहीं तरि तुमचे तुह्मांपाशीं राहतों." असें ह्मणतांच दत्ताजी शिंदे यांनीं सांगितलें कीं, "तुह्मी त्रिनघोरी किल्यांत जावें. आह्मी आज कांहीं घाट धरून युद्ध करीत नाहीं." असें बोलून वाटेस लाविले.

तों दुराणीची फौज व तोफा पलीकडील तीरीं येऊन दाखल झाले. गनिमाचा प्रतिकूळ काळ म्हणोन यमुनेनें वाट त्यांस दिली. पलीकडील तोफांचा मार झाला. जानराव वांवळे यांस घाटावर दम निघेनासा झाला. उंटावर सुतारनाला व हत्तीवर हस्तनाला पुढें घालून मागें फौज तडका उतरूं लागली. पांच घटका दिवस आला होता. इतकियांत जानराव वांवळे याजकडील स्वार धांवत आला कीं, "पाटील, तुम्ही काय म्हणोन स्वस्थ बसलां? दुराणीची फौज अर्धी यमुना उतरतांच आम्हांस घाटावर ठरूं देत नाहीं. तोफाच्या गोळ्यांनीं शें दीडशें मनुष्य ठार झाले." असें ऐकतांच दत्ताजी शिंदे यांजपाशीं सांबाजी शिंदे यांचा पुत्र बयाजी शिंदे, जवळ बसले होते. त्यांस आज्ञा केली कीं, "बयाजी बावा, तुह्मी जानराव वांवळे यांची कुमक करणें." याप्रमाणें हुकूम होतांच बयाजी शिंदे यांनीं उठोन तसलीम[24] केली. आणि जाबसाल केला कीं, "पाटील साहेब, आम्ही लाहुराकडून आलों [ते] गिलच्याशीं युद्ध प्रसंग न करितां चुकावून आलों [असा] आपले मनांत संशय आला असेल तरि चाळीस हजार फौज दुराणीची त्यास आम्हीं १० हजार फौजेनें त्याचें काय करावयाचें? अस्तु, आतांहि प्रसंग आहे. खावंद जवळ आहेत. बहुत दिवस साहेबांचें निमक भक्षिलें आहे. जी सेवा घडेल ती रुबेरूबे[25] दृष्टीनें

---

२२. "चमेलीचे घाटें" हें तुं० प्रतींत नाहीं. 'रेवडीचे घाटें' धों० प्र०

२३. ते=तर, अशास्त्र.

२४. तसलीम=रामराम.

२५. 'रुबरू' (ब) तुं० प्र० = समक्ष. 'उरुबरु' धों० प्र०

पहावी. असें म्हणतांच दत्ताजी शिंदे यांनीं प्रत्युत्तर केलें कीं, " बयाजी बावा तुह्मी हमेशा लढाया करितां, नव्यानें करीत नाहीं. केलियाचें नवल नाहीं. न केलियाचें मात्र नवल. आतां बोलावयास पुरवत नाहीं, त्वरा करावी," म्हणोन बोलिले. बयाजी शिंदे यांनीं आपली पांच सात हजार फौज घेऊन झीलें[२६] उतरून घाट स गेले. तों दुराणीची फौज अलीकडील तोंडीं आली. ते समयीं बयाजी शिंदे यांनीं चित्तांत योजना केली कीं, "दुराणीची फौज नदी उतरली आतां दत्ताजी शिंदे यांस तोंड काय दाखवावें ?" ह्मणोन पांच सात हजार फौजेतून पंधरा स्वारांनिशीं बयाजी शिंदे यांनीं घोडे घातले. त्यांनीं त्यांचेकडेस घाव घातला तों बयाजी शिंदे यास गोळी लागली आणि ठार पडला. अर्धा मुर्दा वाळूंत आणि अर्धा मुर्दा पाण्यांत पडला. त्याजसमागमें दहा मनुष्यें ठार पडलीं. गनिमाचे फौजेनें अगदींच घाट सोडिला. रोहिले व दुराणी यांनीं घाट घेऊन अलीकडील बाजूस उभे राहिले. तोंपर्यंत दुराणीस दत्ताजी शिंदे याची सलाबत[२७] होती.

इकडे दत्ताजी शिंदे यांस बयाजी शिंदे यांजकडील स्वार धांवत आला. आणि सांगितलें कीं, " पाटील, बयाजी शिंदे तो ठार पडले. मुर्दा त्यांनीं नेला. आणि घांट घेऊन फौज जमावून उभी आहे. " असें ऐकतांच नगारा केला. दत्ताजी शिंदे घोडियावरि स्वार झाले. तों फौज अगोदरच सिद्ध होती. जनकोजी शिंदे यांनीं अंगात बक्तर घातलें. दत्ताजी शिंदे यांनीं रागास येऊन अंगांतील सामान काढविलें. आणि बोलिले कीं, " आज कांहीं आम्ही युद्ध करीत नाहीं. मल्हारराव होळकर नजीक आले आहेत, एका दोंहों रोजांत येऊन पोंचणार, तों पावेतों काव्यानेंच दुरून राहावें." म्हणोन रागास येऊन अंगांतील सामान काढविलें. आपण घोडियावर स्वार जाले. घाटाचे सुमारें चालिले. तों फौज जमून मुजऱ्यास आली. मुजरा करितात तों त्यांस आज्ञा केली कीं, " निशाणा बराबर चालावें. " म्हणोन फौज निशाणा बराबर लाविली. तों यमुना तीरीं अडचण भारी, शेरण्यांचीं बेटें[२८] होतीं. दिसेनात असे अडचणींत शिरले. मराठियांस पाठीवर काठी उडत असली तरच हिंमत होते. त्यांत दैवयोगें करून पडण[२९] भारी, कोणाची शरम कोणास नाहीं. तों निशाण जाऊन युद्धास येठलें. तेसमयीं दोहीं तर्फेनें तोफांचा, हस्तनाले व सुतारनाले व जेजाला व गंजीफियांच्या गाड्या

२६ झील=ओघ, प्रवाह.

२७. सलाबत=भय, धाक.

२८ 'काऊस व शेरण्यांचीं बेटं ' नुं॰ प्र॰ शेरणी = नदींत उगवणारा वनस्पतिविशेष

२९ पडण = विश्रांतीची जागा. दडणें ?

वगैरे गैरभांडीं व बंदुकांचा मार ऐसा जाला कीं, जैसे भडबुंजे लाह्या भाजतात, कीं विद्युल्लता पात होतो. तैसा एकच धडका जाहला. मोठी गर्दी जाली. बाणांचा वर्षाव मेघमालांप्रमाणें होऊं लागला. घोडे मनुष्य धुंद जाले. धुराची गर्दी जाली. मोठे मोठे वीर, त्यांच्या वीरश्रिया उतरल्या. आलीकडे मराठियांनीं झुंज याप्रमाणें पाहिलें नाहीं. न भूतो न भविष्यति. तेसमयीं प्रसंगीं होते त्यांस मात्र अनुभव असेल. असे दोन घटिकांपर्यंत जालें. तेथून दोन कोसांवर घाट होता, तेथें गोविंदपंत बुंदेले होते. तिकडून * त्यांनीं यमुना उतरून परस्परें गोविंदपंत बुंदेले यांस तिकडेच ताण बसविला. ते तिकडेच राणभरी[31] जाले. † यांजकडे यावयास फुरसत जाली नाहीं. पांच सातशें खाशियांचीं डोचकीं कापून नेलीं. तैसेंच दिल्ली नजीक राजघाटावर मालोजी शिंदे तेही घाटावरून उधडून, शहाधऱ्या नजीक घाट उतरून, तिकडूनही फौजा आल्या. मालोजी शिंदे याची फौज झाडून पाठीशीं सांपडली. त्याजमुळें ज्याचें आयुष्य पुरतें ते मात्र वांचले. खांसा मालोजी शिंदे बाणाचे खरत[32] निघाले होते, तों चित्तांत योजना केली कीं, "दत्ताजी शिंदे आम्हां देखतां बहुतांची टीका करितात. आतां आम्हीं त्यास तोंड काय म्हणून दाखवावें? म्हणोन घोडे घातले. त्यांतच गैबतें[33] जाले. त्यांचा मुर्दा देखील कोणी दृष्टीनें देखिला नाहीं. इकडे दत्ताजी शिंदे यांजकडे तुंबळ युद्ध होतच होतें. निशाणापाशीं पांचशें ही फौज नाहींशी जाली. अर्धीच मराठी फौज, हिंमत भारी नाहीं[34]. त्यांत अडचण होती. त्या योगेंकडून अडचणींत फौज गैब[33] जाली. चाळीस हजार फौज; थोडकी नव्हती. परंतु अडचणींत कांहीं दिसेनासें जालें. इकडे निशाणाकडे जनकोजी शिंदे शोबतच होते. दत्ताजी शिंदे निशाणाचे बाजूंस[35] उजवे होते. दिल्लीचे बाजून पंचवीस खांसा व आपण उभे होते. गिलचास त्यांची धास्त होतीच. इतकी फौज हिंमत सोडून होती, परंतु तेही लोक बेलाशक अंगावर येईनात. अशी परस्परें झोटधरणी होतच होती. तों हत्तीवर घटका वाजत होती. आठ घटिका पूर्ण जालिया त्या अडचणींत पांचशें मनुष्यें ठार जालीं. तैशींच घोडींही पडलीं. तैसेच जखमी ही जाले. केवळ शेणसडा होऊन गेला. तैशा

---

३०. गारभांडी = गारगोटीचा चाप आहे ज्यांस अशीं भांडी.

३१. राणभरी = रानभरी = रानांत पळून गेलेले.

* दुराणीनीं † दत्ताजीकडे.

३२. खरत = विद्ध, व्याकुळ ( होत्साते. ) 'खारत' असें सर्व बखरींत दिसतें; खारत = चुरस.

३३. गैबत = गैब = गुप्त, नाहींसें.

३४. "हिंमत पक्की नाहीं. तुं० प्र०

३५. 'निशाणाचे बदलेस उभे होते.' पाठांतर.

समयीं जवळ नान्हाजी खराडा म्हणून सरदार होता. त्यानें अर्ज केला कीं, "पाटील! दुराणीची फौज झाडून उतरली. गोविंदपंत बुंदेले तो तिकडेच बुडविले. तैसेंच मालोजी शिंदे यांस तेच गत जाली. निशाण उघडें पडलें. अबरू जावयास प्रसंग आला. निशाण काढतां उत्तम आहे." असें म्हणतांच, दत्ताजी शिंदे यांनीं उत्तर केलेंकीं, "आपण मेला जग बुडाला. अबरू जाते आणि वांचतो कोण? अझून काय निघावयाची बाकी राहिली आहे कीं काय? सबेजंग[३६] होऊन गेली. आतां निशाण काढाल तर फौज पळूं लागेल. मग म्यां ही पळावें! मग देशीं तोंड म्यां दत्ताजीनें काय म्हणोन दाखवावें? असें बोलिल्यावर नान्हाजी खराडे मागती बोलिले कीं, "पूर्वीपासून देव, दैत्य, दानव काय करीत गेले? त्यास आम्हीं मृत्यलोकींचे मानव पडलों. वेळेस मान द्यावा. यासमयीं काळावर नजर देऊन निघावें." म्हणोन बोलिले. त्यावर दत्ताजी शिंदे यांनीं साफ सांगितलें कीं, "हा खंदारचा पातशहा अबदुल अली चालून आला आहे. या रानांत ईश्वरें मृत्यु आणिला तरी उत्तम आहे. योगी, सन्यासी, तपस्वी नाना प्रकारचें देहदंडण करितात कीं मोक्षसाधन व्हावें. त्यांत आम्हां क्षत्रियांचे स्वधर्म हेच कीं, रणांत सन्मुख मृत्यु आल्यास सर्वही साधनें[३७] सांधिलीं. तें ही कर्म ईश्वरें दाटून वोढून आणिलें. अशांत कोणी अभागी आहे तो विन्मुख होईल! रण सोडून निघालियास दोहींसही मुकावें. इकडे नर्कसाधन इकडे अपेश मरणाहून वोखटें. यांत मरतांच उत्तम." म्हणून *गाडून उभे राहिले.

तों इकडून जनकोजी शिंदे निशाणापाशीं झोंबत होते. त्यांचे उजवे दंडास एकाएकींच गोळी लागून दंड फोडून हाड बाहेर आलें. जनकोजी शिंदे यांस तवंई[३८] येऊन घोड्याखालीं आले. तों जवळ खिजमतगार उभा होता. तो धांवत दत्ताजी शिंदे यांजकडे आला. आणि घाबरेपणें वर्तमान सांगितलें कीं, "बाबासाहेब गोळी लागून पडले." असें वर्तमान ऐकतांच दत्ताजी शिंदे यांणीं जवळ लोक उभे होते त्यांस जावसाल केलाकीं, "बाबा आम्हांस सोडून गेले. आतां आम्हांस देशीं तोंड दाखवावयास येणार नाहीं. रणांत मृत्यु आला तर उत्तम आहे, नाहीं तर विष भक्षून प्राण द्यावा." असें बोलून दत्ताजी शिंदे यांचे पुढें दहा हजार कुतुबशहा व दुराणीचे लोक उभे होते. त्यांजवर अठरा असामीनिशीं घोडे घातले. घोडियाचें तोंड शिरें[३९]लें तों

---

३६. सबेजंग (सफेजंगी) = दारुण युद्ध. कनल, फडशा.

३७. रणांत विन्मुख न होतां मृत्यु आ-लल्या" नुं० प्र०.

* गाडून = ठाम.

३८ तव (ई)=घेरी, मूर्च्छा.

३९. "घायाचे तोंडास जात पावेतो"

त्यामध्यें अकरा खांसे ठार पडले. जाया खांशांनीं घाव केला. तेथून माघारे गोळीच्या माऱ्यांत निघाले. तो यशवंतराव जगदळे थोराळेकर यांस गोळी लागून ठार पडले. त्यांचा भाऊ पिराजी जगदळे ही समागमेंच होता. त्यानें भावाचे मुरदियासाठीं बहुत प्रयत्न केला. काढावा म्हणोन बोलिले. म्हणोन पाटील यांनीं लालमणी घोडियाचें तोंड माघारें किंचित् फिरविलें. मुर्दा ओढा ओढा म्हणोन बोलतात तों एकाएकींच आकाशाची दोरी तुटते, तैशी गोळी येऊन उजवे बगलेस बरगडींत लागली. आणि घोडियाखालीं आले. तों नजीक राजाराम चोपदार व राघोबा[४०] शेणवई पागनीस होता. त्यांनीं इत्यर्थ केला कीं, " बहुत दिवस यांचें अन्न भक्षिलें. आणि पाहिजे तितके विलास यांच्या जिवावर केले. आतां यांस टाकून जावें याहून मरण बरें." म्हणोन घोडियावरून उतरले. तों [दत्ताजी] घायाळ होते. प्राण कांहीं गेला नव्हता. घायाळ काढावा तरि त्याजकडील फौजेची निकड बसली. घायाळ काढावयास फुरसत पडेनासी जाली. तों नजीबखान रोहिला याचा गुरू कुतुबशहा[४१] याच्या अंबारीया नजीक आल्या. राघोबा पागे यांनीं राजाराम चोपदार यास सांगितलें कीं, " तुम्हीं कुतुबशाहा याजपावेतों जाऊन पोंचावें. दत्ताजी शिंदे रणांत घायाळ ह्मणून सांगावें. नाहीं तर अबदुल अल्ली हरामी याची गांठ पडली तर आमचे व पाटील यांचें शीर कापून नेतील. त्याहून यांजकडे *पाडाव सांपडले ते उत्तम " ह्मणून राजाराम चोपदार यास सांगून पाठविलें. तों कुतुबशहाची अंबारी केवळ नजीक आली. त्यास राजाराम चोपदार यानें जाऊन मुजरा केला. रात्रंदिवस येणें जाणें सहजच होतें. ओळख पूर्वींच होती. "राजाराम, तू कहां?" म्हणोन अविंधी भाषेनें पुसलें. त्यानेंही खरें वर्तमान सांगितलें कीं, " साहेब, पटेल घायाळ पडा है, या बचावे." असे म्हणतांच कुतुबशहास मोठा आनंद जाला. इक्षु-दंडांतूनच शर्करा सांपडते. किंवा तु प गी च[४२]नें व तीं त [?] सांपडतें, तैसा अनयासें करून महालाभ जाला. बोलिला कीं, " पटेल कहां है? दिखलाव." म्हणोन तैसेच अंबारी राजाराम जेथें दत्ताजी शिंदे घायाळ पडले होते तेथें घेऊन आला. कुतुबशहा यानें अंबारींतून खालीं उतरून जवळ आला. तों दत्ताजी शिंदे उताणे पडले होते. तेथें कुतुबशहा यानें जाबसाल केला कीं,

४०. राघोबा इ०—राघोराम पागे हा कर्ता पुरुष पेशव्यांच्या पदरीं होता. पुढें याणेंच महादजीस वस्त्रें देवविलीं. वि० ज्ञा० वि० पु० ११ अं० ३ पृ० ७८ व ८० पहा.

४१. मागें पृ० २९ टी० ६७ पहा.

* पाडाव=हस्तगत.

४२. 'दुधापासूनच नवनीत' असे तर नव्हे ?

"पटेल, हमारे साथ तुम् और लढेंगे ?" म्हणोन पुसलें. दत्ताजी शिंदे सावध होते, त्यांस पुरतें उमजलें कीं, "हे कांहीं आपणांस वांचवीत नाहींत, मग व्यंग[43] गोष्टी सांगणें हें विहित नव्हे." म्हणोन दम बांधोन जाबसाल केला कीं, "निर्शा अकताला, बचेंगे तो औरबी लढेंगे." असें ऐकतांच कुतुबशाहा यानें कमरेचा सुरा ओढून, लाथेनें ढकलून, पालथा घालून दत्ताजी शिंदे यांचा शिरच्छेद केला. रायेबा पागे व राजाराम चोपदार यानें बहुत ग्लानता केली कीं, "साहेब, इस्को बचाव, क्रोड रुपये पाहिजे तरि देऊं." म्हणोन बोलिले. परंतु त्याणें ऐकलें नाहीं. आपलें महत्कार्य केलें. तों आठ घटका दिवस आला होता. कुतुबशहा यानें शीर भालियास खोवून शहादानें वाजवीत जाते जाले. फत्ते जाली म्हणोन नजीबखान याजकडे गेले. शीर त्यानें काढून रुमालांत घेतलें.

इकडे दत्ताजी शिंदे घायाळ खालीं आले त्यांजेखालील लालमणी घोडा तानाजी खराडा यांनीं घेऊन निशाणाकडे घेऊन आले. तों निशाणापाशीं बहुत लोक झोंबत होते. ते समयीं निशाणापाशीं दोन चार सरदार होते त्यांस तानाजी खराडा यानें जाबसाल केला कीं, "यार हो, आतां निशाण काढावें. नाहींतर निशाण निघत नाहीं." लोकांनीं जाबसाल केला कीं, "निशाण येथें आहे ह्मणोन दम पडला आहे. निशाण निघालियावरि कोणी कोणाच्या दृष्टीस पडत नाहीं." असें ऐकून तानाजी खराडा याणें साफ सांगितलें कीं, "तुम्ही कोणाचे भिस्तीवर लढतां! दत्ताजी शिंदे तो रणीं पडले. जनकोजी शिंदे ही पडले ह्मणून ऐकतों. मग त्यांची गत काय असेल ती असो. प्रस्तुत दत्ताजी शिंदे यांजखालील घोडा लालमणी हा आह्मीं आणिला." ह्मणोन प्रत्यक्ष दाखविला. लोकांनीं अवसानें सोडिलीं. दम खात खात निशाण अडचणींतून झील उतरून मैदानांत आलें. जनकोजी शिंदे घायाळ घोड्यावर घातले. तों झाडून फौज झुरे मरे बाहेर निघोन मैदानांत आली. तों रोहिला व दुराणी पाठीवर आला. पांच सात हत्ती व सडे बुणगे तळावर उभे होते. संदीपबेग याचीं मुलें बुणगिया समागमें होतीं. परंतु त्यांचे दिवाण लक्ष्मी नारायण [व] पांच हजार फौज तळावर उभी होती. चौंकडून दुराणीची व रोहिलियाची मिठी बसली. मग भले लोकांनीं एकदांच घोड्यास चाबूक केले. तीस हजार फौज अद-

४३. व्यंग = हलकेपणाची, नीचपणाची.

४४ इन्शा हाखूनाळा = ईश्वराचे इच्छेनें. मागें पृ० २४ टी० ८८ पहा.

४५. "घोडी पंचकल्याणी पुठ्ठ्यावर डागिली होती. तिचें नांव कलामिर्णा" असा एक दोन प्रतींत पाठ आहे.

कोस पर्यंत ताफाचा ताफा एकदाच आरडाओरडा झाला. कोणी कोणास पुसेनासें जालें. बाप, लेक, भाऊ उभे राहीनात. दे धरणी ठाव असा प्रकार जाला. तें समयीं येसुजी भुईटे व जानराव वांबाळे यांनीं कडनिकड करून, जनकोजी शिंदे यांस घोडियावर बैसवून, दोहीं बाजूस धरून फौजेंत तडक पळूं लागले. घायाळ यांनीं "पाणी! पाणी! पाणी!" ही झटलिया पाणी द्यावयास दम निघेना. एवढा तालिवारे[46] याची दैवयोगें या रीतीची गत झाली. असो गिलचे पाठीवर डोचक्यीं कापीत चालिले. सोडवला (?) भला माणूस याची कोणी कुमक करीनात.

इतकियांत इकडे तळावर बुणगे व लक्ष्मी नारायण व हत्ती उभे होते. त्यांजवर येऊन मिटी बसली. ते समयीं हत्तीवरले माहुत अब्रूचे होते. त्यांनीं क्षणभर फौजेंत रण-कुंदल करून मारामार केली. तों महात गोळी लागून खालीं येतांच हत्ती मोकळे जाले. ते त्यांजकडे सहजच हस्तगत जाले. त्यांत एक बडे महात यांनें जव्हेरगज ह्मणोन बरा नामी हत्ती जलद व मर्द होता. तो दोन कोस पर्यंत काढिला होता. तळावर सडे बुणगे व हत्ती व अंबाऱ्या व खजीना निघूं पावला नाहीं. तळावरच लुटले गेले. बहुत करून मनुष्यें व खिजमतगार व पालखीचे भुई यांचे शिरच्छेद केले. क्वचित् कोणी दैवयोगें करून थोडकीं वांचलीं असतील. लक्ष्मीनारायण लाहुरचा सुभा तळावरच होता. त्यांनीं गनीमाची कीर्ति ऐकतच होते कीं, गनीम यांनीं पळावें मागुती उठून घोडे घालिंवे.[47] ह्मणोन ऐकत होते. त्यांजवरून लक्ष्मीनारायण आपले लोकांस वरचेवर सांगत कीं, "यार हो! भागो मत्, मराठियाचे गनिमी काम आहे. अ ब सा ये त मे उ ल टे [?] ह्मणोन तँट घालोन[48] क्षणभर मारामार केली. तों [49]त्यांची जड काय. मराठियांनीं पुरताच गनिमी कांवा केला! दंगा होऊन ते तळावरच कत्तल बहुतकरून जाले. मग लक्ष्मीनारायण पांचशें खांशियांनिशीं उरला. तो गनिमाचा धुराळा दृष्टीस पडेना! मग लक्ष्मीनारायण पांचशें खांशानिशीं दोन कोस पर्यंत जव्हेर हत्ती निघाला होता [तेथें गेला] तों दुराणीची मिठी बसली. मराठे हत्ती सोडून चालिले. बडेखां महात यानें बहुत करून बोलिला कीं, "यार हो! तुम्हीं दम खात निघावें. या वेळ पर्यंत येथवर आणिला आतां निभावून नेणें

---

४६ तालिवार = सुदैवी, श्रीमंत.

४७ पाठीमागील 'गनीमी कावा' पृ० ६२ टी० * पहा.

४८ तट घालोन = दम धरून, उभे राहून.

४९. गिलच्यांची.

५०. पळाले ते पळालेच!

म्हणून बहुत प्रकारें सांगितले. परंतु मराठे मनुष्य पळूं लागलियावर कोणा-ची ईर§ कोणास नाहींसी होते. रांडेनें ‡सावळें उचकटलें तर झाडास बांधिलें असतां झाड घेऊन बारा कोस पळतील. तेथें हत्तीची गत काय? खांसा जनकोजी शिंदे एवढा सरदार घायाळ पाणी मागत असतां वाटेनें दम धरून कोणी पाणी पाजीनात! तेथें हत्ती कोण जिन्नस! मग बडेखां महात यानें जावसाल केला कीं "यार हो! तुम्ही दम खात नाहीं. परंतु क्षणभर दम खाऊन माझा तरी तमाशा पहा!" म्हणोन माघारा फौजेंतून दुराणीची फौज होती त्यांत हत्ती चालवून क्षणभर मारामारी केली. मग त्यांनीं भाले लाऊन हत्ती व माहुत पाडाव करून चालविला.

इकडे शिंदे यांची गत हो जाली. तों दिल्लीचे किल्ल्यांत गाजुदीखान वजीर होता. त्यानें किल्ला टाकून कालिका-भवानीकडून तडक पळून पांच सात कोसांवर जनकोजी शिंदे यांची फौज गांठिली. तोहि यांचे समागमें पळूं लागला. असो; तीस हजार फौज गनिमाचे पाठीस लागली. लहान थोर सात आठ हजार मनुष्यांचीं शिरें कापून नेलीं.

इकडे दत्ताजी शिंदे यांचे तळावर दुराणी व रोहिला व सुजा व अहमदखान लंगडा पठाण व कुतुबशहा असे येऊन उभे राहिले. तों नजीबखान रोहिला याणें रुमालांत दत्ताजी शिंदे यांचें शीर घालून अबदुल अली दुराणी याजकडे आला. अंबारीस अंबारी तटली. अंबारींतूनच नजीबखान यानें कुरनीस करून, हातावर रुमाल घेऊन, वर शीर ठेऊन पुढें आला. आणि शीर पुढें ठेविलें. आणि अर्ज केला कीं, "पातशहा अमलपना, साहेब संदेकेत्[५१] नजर असे," म्हणोन शीर पुढें ठेविलें. तेसमयीं पातशाहाचा आनंद अति उत्कृष्ट, शाहाजणें वाजवून "शहाका बोलबालों[५२]!!" म्हणोन एक आरोळी केली. दुराणी नजीबखान याजवर परम खुशाल होऊन बहुमान हत्ती व घोडे दिले. जवळ आणून पाठ थोपटली. या प्रकारें गौरव केला.

तदनंतर राजाराम चोपदार जिवानिशीं जगून गेला होता त्यानें नजीबखान यास अर्ज केला कीं, "दत्ताजी शिंदे यांचें शीर कापून आणिलें. जें जालें तें त्यांचे प्रालब्धानेंच जाहलें. तुम्ही आपला जो वाघ*मान करावा तो

§ ईर = ईर्षा, आस्था.

‡ सावळें = हलक्या प्रतीचें लुगडें.

५१. पातशाह अलमपन्हा,साहेब सदाकत् नजर असो=पातशहा दुनियेचे संभाळकर्ते आहेत; धर्मसाहेब! कृपेची (चांगली) दृष्टी [ मजवर ] असावी.

५२. 'शहाका बोलबाला!' = राजाची दौलत चढती असो!

* 'वाघमन' पु० प्र० 'वोघ (वोदर) मान' तुं० प्र० 'ओघ' सा० प्र० 'धर्म' धां० प्र०—मुख्य मान किंवा ओघानें जी गोष्ट करणें ती ?

करून घेतला. आतां हिंदुधर्म आहे. शीर ठेविलियांत नफा नाहीं. उमरावगीर गोसावी यांजपाशीं बहुत मराठे आहेत. धड शीर एक करून त्याचें सार्थक करतील." या प्रकारें बोलिला. तों नजीबखान मान्य करीना. मग राजाराम चोपदार उमरावगीर गोसावी याजकडे जाऊन त्यास अर्ज केला कीं, "तुमचा हिंदुधर्म आहे. दक्खनचा सुभा दत्ताजी शिंदे यांचे शीर अविंधानीं नेलें. तें उमरावगीर गोसावी येथें असतां त्याचा सद्विनियोग* होऊं नये हें चांगलें नाहीं. तरि एवढें भूषण ईश्वर तुह्मांस देत आहे. यश ईश्वरें बळें होऊन घर पुसत आणिलें आहे. तरि पदरीं घेणें" ह्मणतांच उमरावगीर गोसावी याचे प्रत्ययास आलें. "सायास केलियानें असें घडून येणार नाहीं." म्हणोन उमरावगीर गोसावी सुजाउद्दौला याजकडे येऊन अर्ज केला कीं "साहेब, आमचा स्वधर्म आहे. त्यास आम्ही साहेबांच्या पदरीं असतां दत्ताजी शिंदे [ यांचें ] देहसार्थक नाहीं, असें होईल तर आह्मी पदरीं राहिल्याचें सार्थक नाहीं." असें ऐकतांच सुजाउद्दौला यानें नजीबखान याजपाशीं जाऊन दत्ताजी शिंदे यांचें शीर मागितलें. त्यानीं उत्तर केलें कीं, "आम्हीं शीर अबदुल अलीस नजर केलें आहे, आह्मांस मागतां येत नाहीं. तुम्हीं परस्परें पातशहास अर्ज करून शीर मागोन घ्यावें" हें ऐकून सुजाउद्दौला यासही संकटच जालें. नजीबखान यास बोलिला कीं, "माझा बाप मनसूर अल्ली पूर्वीं गनिमाचे पेचांत आला. तेसमयीं मनसूर अल्लीनें आपली दाढी राणोजी शिंदे यांचे हातीं दिली कीं, इची शरम राखावी. असें बोलिल्यावर राणोजी शिंदे यांनीं अब्रू रक्षून गंगापार करून दिलें. त्या तागाईत आह्मी राज्य खाऊन सुखरूप आहों. त्या राणोजी शिंदे यांचे पुत्र दत्ताजी शिंदे. वरकड अवघी बेइमानी आम्हांकडून घडली. परंतु एवढी तरि उत्तीर्णता व्हावें." ह्मणोन अबदुल अल्लीपाशीं स्वतां रदबदली करून शीर मागितलें. तेसमयीं पातशाहा यांनीं तीन[53] लक्ष रुपये मागितले. तेसमयीं उमरावगीर गोसावी यानें दोन लक्षांची निशा करून शीर आपलेपाशीं घेतलें. डेरियापाशीं येऊन दत्ताजी शिंदे यांचें धडही आणिलें. आपणाकडील मराठे होते त्यांस आणून साहित्य उत्तम प्रकारें करून, चंदन-काष्टें बेल-काष्टें व तुळसी-काष्टें [ आणून ] यथाविधी यमुनातीरीं दहन केलें. तीन हजार रुपये दान धर्म, खैरातही वाटली. असो.,

इकडे दिल्लीचा किल्लाही सहजच खाली होता. त्यांणीं किल्ला घेऊन

---

* सद्विनियोग ह्या अर्थी.

५३. हें कधीं घडलें? मागें पृ० ५१ ओ० २१ पहा.

५४. 'निदान दोन लक्ष रु०' तु० प०

आलीकडे येऊन मुक्काम केला. तों इकडे जनकोजी शिंदे घायाळ व भग्न असे फौजेसुद्धां पळत असतां अठरा कोसपर्यंत गिलचे यांणीं पाठलाग केला. आणि मग दुराणी फिरोन माघारे गेले. जनकोजी शिंदे यांस घोडियावर बसावयास अवसान पुरेनासें जालें. मग खेडियांतील खाटलें काढून खाशियांनीं[५५] उड्या टाकून घायाळ चालविला. तैशियांत दुराणीनें गडबड केली. खाटलें भुईस उतरावयास फुरसत पडली नाहीं. मग उभियानेंच खालें टाकिलें. जनकोजी शिंदे जखमी भारी, शरीरास परम दुःख जालें. मागती घालून तीन चार कोसपर्यंत निघाले. सायंकाळ जाला. दुराणीहि झाडून माघारी गेले. नजीबखान यानें मोठें यश संपादिलें. इकडे शिंदे यांचे बुणगे व कबिले चोवीस कोसांवर उतरले होते. प्रहर रात्रीं बुणगियांत दाखल जाले. तों बुणगे आधींच तयार होते. वाटेनें लोकांस जनकोजी शिंदे पुसत कीं, "काकासाहेब यांची गत काय ?" लोकांनीं दत्ताजी शिंदे पुढें गेले म्हणोन चाळवीत चाळवीत बुणगियांत आले. कचेरीस डेरिया नजीक वाडा पुढें खाटलें उतरलें. तों रामाजीपंत दिवाण व रूपराम कटारी धांवत आले. त्यांजसमागमें पांच सात मशालीही होत्या. जनकोजी शिंदे येईत तों पावेतों बायकांस कांहीं दत्ताजी शिंदे यांची अवस्था ठाऊक नव्हती. वाडांत वर्तमान कळतांच भागीरथीबाई व जनकोजी शिंदे यांची स्त्री काशीबाई अशीं उभयतां मरांठ[५६] धर्म विसरून धांवत वाडा बाहेर आलीं तों जनकोजी शिंदे घायाळ खाटलियावर पाहिले. तोंड उघडून पाहिलें तों जनकोजी शिंदे यांनीं डोळियांस पाणी आणून चुलतीस विचारिलें कीं, "बाई, काका कोठें आहेत?" तेसमयीं भागीरथीबाईस पुरतें उमजलें कीं, पाटील निश्चयें रणांत पडले. बाईस मोठा उभडा[५७] आला. मागती विवेक केला कीं, "जात्यांतील रडती आणि सुपांतील हांसती." त्यांची गत तो या रीतीची जाली. आणि हा तो घायाळ, याचेंही जगावयाचें कठीण. दुराणीचा मागें पेच भारी. आतां शोक करितें तर याची गत काय ?" ह्मणून उभडा आला तो विषासारिखा घोटून[५८] जनकोजी शिंदे यांस जाबसाल केला कीं, "बाबा, तूं रांडेसारिखा रडतोस! जयाजी शिंदे याचे पोटीं चौघी लेकी जाहल्या[५९], तैशीच तूं एक आणखी

---

५५. खाशियांनीं=बरोबरील मोठ मोठ सरदारांनीं.

५६ हा बायकांनीं बाहेर दृष्टीस न पडण्याची चाल मराठ्यांनीं मुसलमानांपासून उचलली. महाराष्ट्र ब्राम्हणांनीं पुढें तिचें अनुकरण केलें नाहीं, ही थोडी आश्चर्याची गोष्ट आहे.

५७. उभडा=अनावर गहिंवर.

५८. गिळून, आंतल्या आंत दाबून.

५९. यावरून जयापास जनकोजी सुद्धां पांच अपत्यें होतीं असें होतें.

जाली असतीस तरि आणिक एक जांवाई येता. पाटील काय घेऊन गेले ! दुनिया, दौलत, माहाल, मुलुक, खजिना, हत्ती, घोडे सर्व तुम्हांपाशीं ठेऊन गेले. तुम्हीं हिंमत धरून त्याचें सार्थक करावें. आतां रडून होणें काय ! " म्हणोन हिंमत देऊन बोलतांच जनकोजी शिंदे उगेच राहिले. स्वस्थ राहिले. 'रामाजी पंत दिवाण व रूपराम कटारी यांस बाईनीं आज्ञा केली कीं, रात्रीचे रात्र लष्करचा मुक्काम करणें. प्रातःकाळीं कूच करून जावें." असें ऐकून नगारजीस सांगून शाहाजणें केली. परंतु लष्कराचा धर सुटला. खावंदाची देखील आस्था धरीनात. मग लष्कर तडक रेवडीचे रोखें चालिले. धरणें[60] फुटल्यासारखें जालें. मग यांनीं ही येथून कूच करावें ह्मणून इत्यर्थ केला. पोतनीस व जामदार यांनीं येऊन अर्ज केला कीं, " खजिना व कापड जरमिना[61] उंटावर चालत होतें. वरकड साधें कापड छकडियांवर चालत होतें. आतां छकड्याचे जागीं छकडे राहिले. आतां ओझियाची आज्ञा काय ? " असें ह्मणतांच भागीरथीबाई यांनीं उत्तर केलें कीं, " आम्हीं कधीं कारभार केला नाहीं. तुह्मीं रामाजीपंत यांस विचारावें." तों जवळ जनकोजी शिंदे यांची स्त्री काशीबाई होती. तिची उमर तो अठरावीसां वर्षांची होती. परंतु मोठे हिमतीची बायको. तिनें जाबसाल केला कीं, " एवढाले जीव गेले, आतां दौलतीची आस्था कोणास आहे ? तुह्मी खजिना, जरमिना कापड, असेल तें उंटावर घ्यावें. आणि डेरे व साधें कापड यासि आग लाऊन द्यावी." ह्मणोन साफ सांगितलें. मग तैसेच जामदार व पोतनीस यांनीं सांगितलें त्याप्रमाणें वर्तणुक केली. जितकें अगत्याचें ओझें होतें तितकें मात्र घेतलें. वरकड बाडें व कचेरीचे डेरे व सामान व खासे महालांतील डेरे व जामदारखाने व नगारखान्याचे डेरे व साधीं कापडें यांस आग लाऊन दिली. मोठा प्रळय जाला. जनकोजी शिंदे यांस बाईचे पालखींत घातलें. दोहीं बायांच्या पालखीचे भुई एके पालखीस लाविले. बायकांस घोडीं बसावयास पाहण्यास गेले. तों धुंदींत ज्याचे हातास जे घोडे आले [तें] त्या बारगिरानें नेलें. मग भलतीशीं वैळेगीं[62] दोन घोडीं होतीं, त्यांजवर बायका स्वार केल्या. तों भागीरथीबाई गरोदर, नऊ महिने पूर्ण भरले होते. घोडियावर बसावयाचें संकटच. परंतु संकटास उपाय नाहीं. एवढे तालिवार, परंतु रडावयास फावलें नाहीं ! घायाळ जनकोजी शिंदे यांच्या जखमा

६०. धरण नदीचें.
६१. जरमिना = भरजरीचें वगैरे मौल्यवान्.
६२. कंठाळी, टाकाऊ या अर्थी. 'खळगीं' असें तुं० प्रतीत आहे.

बांधावयास फावलें नाहीं ! असो या रीतीनें कूच केलें. बहुतकरून तोफखाना तळावरच राहिला. अडीच प्रहर रात्र पावेतों तेथून दहा बारा कच्चे कोस गेले. तों जखमी याजसमागमें एक दील पांचशें खांसा नाहीं. जिकडील तिकडे रानोमाळ [ होऊन ] कोणास कोणी पुसेनासे जाले. तों रूपराम कटारी याणें पालखी उतरून मनसुबा करिता जाला, कीं, "आतां दुराणी कांहीं या फौजेस निभाऊं देत नाहीं. तरि उभयतां बायका व जनकोजी शिंदे व रामजीपंत यांस कोणास न कळतां नेऊन भरतपूर अथवा रामगड अथवा कुंभेरी येथें ठेऊन दुराणीची दौड आली तरी आम्ही हातीं देणार नाहीं. वरकड फौजेचे दैवीं असेल तें होईल." असें म्हणतांच जनकोजी शिंदे यांनीं उत्तर केलें कीं, "बाईस विचारावें." तों बाईनें ऐकून सांगितलें कीं, "मनसोबा मजला कांहीं सुचत नाहीं. तुम्ही चित्तास येईल तसें करावें." म्हणतांच काशीबाईनीं भीड मर्यादा सोडून बोलिली कीं, "तुम्ही हा मनसोबा काय करितां ? जाट आमचा काय भाऊ व्यंकटराव[६३] नव्हे. किंवा मावळा भापकर नव्हे. त्यांनींच जर बंदीस घातलें तर पेशवे यांस आमचें [?] अगत्य कांय ? दुसरें, दक्षणचे आमचे जिवासाठीं या रानांत आले त्यांस मोकलून आम्ही आपले जीव जगवून तरी काय करावें ? सोक्ष मोक्ष जे चौघांत होतील ते होऊत, परंतु मनसबा उत्तम नाहीं." म्हणोन म्हणतांच भागीरथीबाई यांनीं आज्ञा केली कीं, "पालखी चालूं देणें," असें ह्मणोन तडका लष्कर चालों लागलें. तें दिवस उगवावयास रेवडी नजीक आले. दिवस उगवला तों गांवकरी खेड्यापाड्याचे लोक उंटें, तट्टें, घोडीं बोढूं लागले आणि गिलचा आला ह्मणून मागती गडबड जाली. ते समयीं मोठा प्रळय जाला. पड तो [?] यांनीं बायका मुलें टाकून दिलीं. तेथें वरकड काय पहावें ? अंगावरील वस्त्रें कोणी ठेवीनात. असें पळूं लागले. तों पालखी जवळ दोघी बायका होत्या. पालखींत जखमी जनकोजी शिंदे होते. भोई घाबरे होऊन पालखी टाकावयाचे विचारांत आले. ते समयीं जनकोजी शिंदे यांस नेटें पालखी चालली तर सोसेना. ते वक्तीं भागीरथीबाई यांनीं भोई यांची प्रार्थना केली कीं, "बत्तीस भुई तुह्मी आहां ! तुह्मांवर घाव पडे तोंवर पालखी न टाकावी. तरि असामीस शेर [शेर] सोन्याचें कडें देईन." याप्रकारें हिं-

---

६३. व्यंकटराव निंबाळकर. मागें पृ० २६।२७ पहा.

६४. असें या बायास अशा संकटावस्थेंत वाटलें असेल यांत फारसा दोष नाहीं. परंतु अगत्य होतें कीं, नव्हतें हें मागील पुढील हकीगतीवरून सिद्ध होईलच. मागें पृ० २३ व ३१ पहा.

मत दिली. तों पळावयाची फारच गडबड जाली. जिवाचे धास्तीनें बावन्न बिरदांचे धणी, भले सरदार, घोडे सोडून पाहडांत शिरले ! "जीव द्यावा त्या पेक्षां जितरब गेलें तरी उत्तम" म्हणोन घोडीं सोडिलीं. रांडा पोरें घोडी धरूं लागलीं. ते समयीं भागीरथीबाई यांनीं जनकोजी शिंदे यांस सांगितलें कीं, "बाबा, मजला आतां घोडियावर बसून पळावयाची निभावणी पडत नाहीं. तुम्ही झाडून पुढें चालावें. माझे समागमें * जिव्हाळियाचा मनुष्य असेल तो द्यावा. गिलचा दृष्टीस पडेतों पावेतों मजला रक्षावें, निदान निभावणी दिसेनाशी जाली म्हणजे माझे दोन तुकडे करावे.†" असें बोललियावर या प्रमाणेंच आवजी आनंदराव म्हणून बरा मर्दाना आणि जिव्हाळियाचा होता, त्यास जनकोजी शिंदे यांनीं सांगितलें कीं, "बाईसमागमें दमखात खात यावे. निदान दुराणी दृष्टीस पडलियावर बाईचे दोन तुकडे करावे. आशा न धरावी. यांस जिवें मारून मग तुमचे दैवीं असेल तसें पहावें."- याप्रमाणें सांगोन त्यास भागीरथीबाई यांज समागमें दिले. तैसेच काशिबाई यांजसमागमेंही कुसाजी शिंदे यांस नेमून दिलें. परंतु भागीरथीबाई पोटाशीं नऊ महिने पूर्ण भरले. ह्मणोन त्यांस पळावयाचें संकट. काशिबाई सडी होती. तिनें पालखी सोडिली नाहीं. या प्रकारें तीन कोस भोई पालखी घेऊन पळाले. जखमी आंत परम कष्टी. प्राण गेला तरी पुरवला. परंतु [वेदना] सोसवेना. ह्मणोन भोई यांस शिव्यागाळ करीत. परंतु कोणी ऐकेनात. मग एक गांव बरा मातबर होता. तेथील हजार दीड हजार मुलें बायका पुरुष लष्करास ओढाओढ करूं लागले. तों पालखीजवळही दिवस उगवलियावर पांच सातशें खांसा जमला होता ते वक्तीं काशिबाई यांनीं सवाल केला कीं, "तुम्ही एवढे मनुष्य, दुराणी तो दृष्टीस पडेनात. रांडा पोरें घोडीं ओढितात. तुमच्या पोटांत हरणाचीं काळिजें कशीं शिरलीं ? असें ऐकून जनकोजी शिंदे यांणीं भोई यांस रागास आले कीं, "पालखी थांपवावी. घोडें बसावयास द्यावें." असें म्हणतांच लोकांस ईर्ष° येऊन दोडगियावर घोडे

६५. हां बावन्न बिरुदें कोणतीं ? मागें पृ० ५९ ओ० २० पहा.

६६. जितरब = उगवलेलें शेत.

६७. ह्या पळाच्या हृदयद्रावक हकीगतींत ह्या गोष्टी सारखी दुसरी वाईट वाटण्याजोगी गोष्ट नाहीं. ज्या शूरांचें नांव ऐकून हिंदुस्थानांतील लोक कांपत होते, त्याचीं घोडीं रांडा पोरांनीं न्यावीं आणि त्यां रांडा पोरांस व 'दांडगियांस' योग्य शिक्षा करण्याचें हां सामर्थ्य त्यांच्या अंगीं राहूं नये !

* जिव्हाळियाचा = ममतेचा.

† हें ह्या बाईचें भाषण लक्षांत ठेवण्या जोगें आहे.

६८. 'आनंदराव.' पाठांतर.

६९. 'काळजी' पाठांतर. ह्या बाईचें वर्तन ध्यानांत ठेविण्याजोगें आहे.

७०. ईर = धैर्य, हिंमत.

घातले. पांच सातशें मनुष्य कापून काढिले. मग हुल्लड शांत झाली. सायंकाळ जाला. लष्कर जिकडील तिकडे पळून गेलें. एक जागां जमून राहिलें नाहीं. जातीनिशीं जनकोजी शिंदे खासा दहा हजार एकीकडे आणि नारो शंकर एकीकडे, सांबाजी शिंदे एकीकडे, कोणी कोणास पुसेनात. तमाम लष्करांत जनकोजी शिंदे असतां आरोळी झाली कीं, " जनकोजी शिंदे जाटांनीं कुंभेरीत नेले. आम्हांस रानांत मोकलिलें." ह्मणोन लोक दिलगीर जाले. असो. तेवढी रात्र घोडियावर जीन व उंटावर ओझीं तशीच जिकडील तिकडे लष्कर उभे राहिलें. दुसरे दिवशीं दिल्लीहून कच्चे ऐंशी कोस कोटपुतळी तेथें जनकोजी शिंदे राहिले. तमाम डोंगरांत सांडणी पाठऊन लष्कर जमा केलें.

तों तेच दिवशीं मल्हारराव होळकर यांचीं[७२] निकडीचीं पत्रें गेलीं होतीं म्हणोन मल्हारराव यांनीं जयनगरचा शह टाकून मजल दरमजल मोठ्या मजली करून मिळावयास येत होते. तों इकडे यांची अवस्था ऐशी झाली. हें मल्हारराव यांस विदित नवतें. तेही मुक्कामास कोटपुतळी पासून दोन कोसांवर आले. त्रुणगे यांचा मुक्काम जाला. मागून मल्हारराव मजलीस शहाजणें वाजवित आले. तों शिंदे यांचे लष्कराचे पळाचे राऊत जाऊन तेथें पोंचले. मल्हारराव यांनीं जवळ बोलावून वर्तमान विचारिलें. स्वारांनीं वर्तमान सांगितलें कीं, " दत्ताजी शिंदे यांचा शिरच्छेद जाला. जनकोजी शिंदे जखमी व बायका व लुटलेलें लष्कर असे येथून तीन कोसांवर कोटपुतळीस मुक्काम करून राहिले आहेत." हें वर्तमान मल्हारराव यांनीं ऐकतां क्षणींच अंबारीतच घालून घेतलें व गंगाधर तात्या सहाजणें वाजवीत होते तें मना केलें. असे डेरियांत जाऊन शोक करिते जाले. ते समयीं त्यांची स्त्री गोदूबाई होती. तिनें निषेध केला कीं, " सुभेदार, तुमचें वृद्धपण जालें. शिंदे यांचीं मुलें म्हणजे काय? त्यांचें तोंडाचें जार वाळलें नाहीं! त्यांनीं एवढा पराक्रम करून मारतां मारतां मेले. एरवीं हा मृत्यु लोकच आहे. जाला प्राणी वांचत नाहीं. परंतु इहलोकीं कीर्ति करून परलोक साधन करणें, हेंच दुर्लभ. हें मूल जनकोजी शिंदे, याणें एवढा पराक्रम केला! तुमचे दिवस समीप आले. तरि हिंमत धरून मारतां मारतां मरावें. हा

---

७१. हुल्लड=गडबड, धामधूम.

७२. यांचीं=शिंद्यांचीं. मागें पृ० ५८ ओ० १० पहा.

७३. घालून घेणें= अंग टाकणें, भूमीवर पडणें.

७३. " गौतमाबाई " तु० प्र० ' गोदावरी 'चें नांव ' गौतमी ' असे ही आहे.

प्रलोंपे स्त्री जातीनें करावा. असें पुरुषास बोलिलें नाहीं. प्रस्तुत जवळ जखमी व मुलें बाळें आले आहेत. तर ऐसेच जाऊन भेटून त्यांचें समाधान करावें." ह्मणोन बोलतांच वृद्धास विषाद येऊन गोदूबाईस बोलिले कीं; "तुझे चित्तांत आह्मीं मरावें असें आहे." यावर गोदूबाईनीं उत्तर केलें कीं, "सदैव * असतां वैधव्याची आस्था धरील अशी कोण चांडाळीण असेल.? अहेवपणें हळद-कुंकु-मंडित मरावें. परंतु जैसें पूर्व आचरण असेल तैसें घडेल. आपले पदरीं लौकीक भारी. तुह्मी आपले घोंगडी विणावयाचें स्वकर्म करीत असतां तरि सहजच वाचावयाची आस्था धरावी. वाण सतीचें घेतलें जसें सांभाळावें, तैसेंचि धर्मशास्त्र आहे." बाईचें वचन ऐकून, तैसेच रागास येऊन, घोडियावर स्वार जाले. हत्ती व फौज सिद्ध होऊन जनकोजी शिंदे यांजकडे चालिले. "जैशी देवाची उजरी तैशी वुद्धि उपजे शरीरीं." तमाम फौजेची छैंबी पळाली. तोंडें काळीं खापरासारिखीं दिसों लागलीं. एकामेकांस बोलूं लागले कीं, "शिंदे यांची फौज एवढी ल्हती तिची ही गत! आमची खानदेशी फौज बहुत करून तिची गत काय?"

असो या प्रकारें शिंद्याच्या लष्करास मल्हारराव आले. तों भागीरथीबाई व काशिबाई यांस राहुटी देखील नाहीं. झाडांस वस्त्रें गुंडाळून बैसली होती. तेथें गोदूबाई आली. ते समयीं उभयतां बायांचे व भाणसिणी यांचा कोल्हाळ झाला. तीन दिवस दम खादला होता तितका उभडा आला. "भगवंत आह्मांवर केवढा गहजब केला! आह्मी देवाचे घरीं काय चोरी केली होती? एवढें निर्वाण आम्हांस [कां] दाखविलें? आमचा वियोग केला! आतां पाटील कोठें पाहूं?" म्हणोन ऊर माथा बडवून तोंडीं माती घालूं लागली. ते समयीं गोदूबाई यांणीं बहुतशांतवन केलें. मायाजाळ, स्मशानवैराग्य दुसरियास सांगावें. परंतु ज्याचा उभडा तोच जाणत असेल. हा अनुभव मनुष्यदेहीं सर्वत्रांस आहेच. तैसेच मल्हारराव जनकोजी शिंदे यांस पाहून जैशी माय प्रलोंप करिते तैशी गत जाली. उफराटे जनकोजी शिंदे यांणीं

---

७५. प्रलाप =रिकामी बडबड किंवा विलाप ह्या अर्थी.

७६. "म्हणून बोलिली येविशीं दोहरा आहे :—
उ जे ळ स व भ ले ज्य ले भ ये न के स ।
रे मे नी (न)? री म,न री पु ड रे मा द र क
रे न रे स?" तुं० प्र०

* "सुवासिणी' तुं० प्र०

७७. अहेवपणें; [=अविधवा-पणें] सुवासिनी असतां.

७८. 'घेतलें जैसे सोहाळे भोगावे तैसेच धर्म-शिलेस पाय द्यावा' तुं० प्र० 'क्षत्रिय धर्म धरिले तैसें चालावें' सातारा प्रत.

७९. छबी=तेज, पाणी.

८०. माणसिणी, मासणी, जाणसिणी[?]

८१. प्रळाप=विलाप

मल्हारराव यांचें समाधान केलें. "सुभेदार, हा मृत्युलोकच आहे. त्यांत केहांही जाणें खरें. वडील कीर्तिच करून गेले. आपणही किती दिवस जगणें आहे ? त्यांत अवकाशही नाहीं. 'सुपांतील हंसती आणि जात्यांतील रडती' हाही दृष्टांत जाणावा. प्रस्तुत आमचे हातांत ग्रास जात्यांतील आहे." म्हणोन शांत केलें. मल्हारराव यांनीं डेरा व वाडाच्या कनाथा व बिचोर्थी[१] व खासगीचे डेरे पूर्ववत् प्रमाणें आणून दिले. दोन्हीं सैन्यें एक जागां जालीं. त्यावेळेस लोकांस असें जालें कीं, कुडींतील प्राण व्याकूळ जाला असतां परतता तैसें घडलें. मल्हारराव आले ह्मणोन ते दिवशीं सैन्य स्वस्थ राहिलें. तों मल्हारराव यांचे लष्करांत तीन वेळां गडबड जाली.

दुसरे दिवशीं जाटाची बातमी आली कीं, "दुराणीची फौज तुम्हांवर सडी होऊन येणार तुम्ही स्वस्थ कसे राहिलां ?" ह्मणोन पत्रें आलियावर मल्हारराव, जनकोजी शिंदे व गंगाधरपंत व रामाजीपंत दिवाण असे एकत्र होऊन जनकोजी शिंदे यांस विचार सांगते जाहले कीं, "बाबा ! तुम्ही जखमी आहां. दुराणीची दौड भारी. सहजी चालणें कच्चे चाळीस कोस. त्यांत तुमची निभावणी पडणार नाहीं. यास्तव बुणगे व बायका व तुह्मी आम्ही चमेली पार जाऊन सडे फौजेंत रामाजीपंत व आमचे गंगाधरपंत राहतील." याप्रमाणें मल्हारराव यांचें वचन ऐकून जनकोजी शिंदे यांणीं उत्तर केलें कीं, "सुभेदार, तुह्मी वडील आहां. मुलें माणसें व बुणगे घेऊन जावें. माझा नेमच आहे कीं, जेथें पाटील मृत्यु पावले त्या स्थळीं आपला देह टाकावा. असा माझा नेम [आहे] आपल्यास राहणें नाहीं." असें ऐकून मल्हारराव यांणीं बहुत प्रकारें वडीलपणें धिःकार करून सांगितलें. परंतु जनकोजी शिंदे यांचे बुद्धीस उतार पडेना. मग रागें मल्हारराव डेरियास येऊन गोदूबाई यांस वर्तमान सांगितलें कीं, "जनकोजी शिंदे आह्मांस सर्वत्रांस घेऊन बसतात. ऐकत नाहींत." तेव्हां गोदूबाई थोर हिंमतीची बायको, तिनें मागती मल्हारराव यांस विचार करून सांगितलें कीं, "सुभेदार, तुमची साठी बुद्धि नाठी, तैसा विचार जाला आहे. अपकीर्ति मिळवून किती पन्नाशा जगणें आहे ? बहुत रोज गुजरले, थोडके राहिले आहेत. जनकोजी शिंदे मूल हातसाता त्याची एवढी हिंमत ! आणि तुह्मीं हा विचार काय म्हणोन ध्यानांत आणिला ?" असें ऐकून मल्हारराव यास विषाद येऊन दातानें ओंठ चावून बोलता जाला कीं, "त्यां तुझें चित्त पाहिलें." ह्मणोन तैसेच जनकोजी शिंदे यांचे डेरियास येऊन खचीत जाबसाल केला कीं, "तुम्हीं आम्हीं सर्वत्र फौजेंत राहून बायका, मुलें,

१. बिचोबा=उहान तंबू (यास काठी | नसते.)

बुणगे झाडून माळव्यांत लावून द्यावीं. तुम्हीं आम्हीं सडे राहून दुराणी भंवताले गनीमी काव्यानें राहून गिलचा हारीस आणावा." म्हणोन बोलून तेच समयीं बुणगियाचें कूच करविलें. शिंदे इमानाचे शाबूद, अशा आकांतांत ही सावध; फौजेस आठवडा रोजमुरा दिला. बुणगियाचा बंदोबस्त करून वाटेस लाविलें. केरोलीचे[८३] राजाचा व मल्हारराव यांचा स्नेह, म्हणून केरोलीचे घाटें बुणगे वाटेस लाविले. केरोली कडून दत्ताजी शिंदे यांचे दहावे दिवशीं चमेलीस[८४] आले. तेथें क्रिया कर्म करून कूच करून, कुवारी नदीवर मुक्काम केला. तेथें तेरा दिवस करून राहिले. तों भागीरथीबाई प्रसूत जाहली. पुत्र झाला[८५]. ते समयीं तोफा [व] बरकड यंत्रें सुटलीं. दत्ताजी शिंदे यांचें दुःख एकीकडे ठेऊन बहुतच खुशाली केली. सुर्योदय झाल्यावर मल्हारराव यांची स्त्री गौतुमाबाई व तिची सून, खंडेराव होळकर यांची स्त्री, अहिल्याबाई डेरियास उभयतां आल्या. त्यांणीं ही खुशाली करून गजांवर शर्करा वांटल्या. मोठे संकटीं पांच दिवस मुक्काम करून कूच केलें. ते माळवियांत येऊन पोंचले. शिंदे याचे बुणगे व बायका उज्जनीस राहिल्या. मल्हारराव यांची भारधडी[८६] इंदुरास राहिलीं.

[इकडे] मल्हारराव व जनकोजी शिंदे यांनीं कूच करून मारवाड प्रांतास गेले. तों दुराणीनें पाठलाग केला. गिलचे तिकडे येतां क्षणींच पाणिपत कर्णोल इकडे गेले. मोंगल तिकडे जातांच गनीम दिल्लीस पोंचले. अबदुल अली तेथें येतांच शिंदे, होळकर आगरियास आले. अविंध आगरियास येतांच हे जयनगर प्रांतांत गेले. तिकडे मोंगलांची दौड पोंचतांच हे उदेपूरचे सुमारें गेले. गनीम केवळ सडे नदार[८७] याप्रकारें गनीमी कावा करून गिलचा हारीस आणावा ह्मणोन उपाय केले. परंतु दुराणीचा हिंमत यांजहून भारि. गनीमच पिटून दमास आणिले. राज्य सुबत्ता[८८]. ओले हरभरे व गहूं व गाजरें पुष्कळ. याकरितां अन्नाची परवा नव्हती. अवांतर मुलख असता तर अन्नाविणें मरतीं. आणि दमही न पुरता. याप्रकारें फाल्गुन शुद्ध १४ दिल्लीस येऊन पोंचले. पौर्णिमेचे दिवशीं थोर मजल करून शिकंदर ह्मणोन शहर मोठें अंतरवेद प्रांतीं होतें—तेथें यमुना उतरून शिकंदरियास पोचले. शिकंदरियास खबरही नव्हती. एकाएकींच गनीम यांणीं जाऊन

---

८३. केरौलीचें राज्य जयपूरच्या व शिंद्यांच्या मुलखां दरम्यान चमेलीचे पश्चिम तीरीं आहे.

८४. 'सचोळीस आले' तुं० प्र०

८५. ह्या पुत्राचे नांवाचा उल्लेख पुढील इतिहासांत कोठें केलेला आढळत नाहीं ह्या वरून तो अल्पायुषी झाला असें वाटतें.

८६ भारधडी=जड सामान.

८७. नदारत [?] अगदीं ह्या अर्थी?

८८. 'राण (ज्य) सुभिक्षेचें' तुं० प्र०

घाला घातला. शहर लुटून सत्यनास केला. ते दिवशीं लष्करांत भांडीं, वस्त्रें, मैदा, तांदूळ व साखर व तूप कोणी तेसमयीं खाईनात असें जालें. लष्कर केवळ सडे, अधीक एक तांब्या घ्यावयास अनुकूल पडेना. तेथें थोर हांडे, वासनें कोण घेतो[८९]? असो. ते दिवशीं शिमगी पौर्णिमा होती. व सर्वत्रांनीं ते दिवशीं अन्न पाणी केलें. हुताशनी पूजन केलें. [तों] एकाएकींच सुरजमल्ल जाट याच्या सांडणी स्वार धांवत शिंदे यांजकडे आला कीं, "दुराणीची फौज

८९. एथपासून तों पुढ पृ० ८४ टीं० * घातली आहे तेथपर्यंत सातारा प्रतीचा पाठ निराळा आहे तो येणेंप्रमाणें :–

"असो ते दिवशीं येथें मुक्काम करून, दुसरे दिवशीं तेथून कूच करून दिल्लीवर आले. तों दुराणीची दौड याजवर येण्याची बातमी येताच दिल्लीवर अवसान न खाता तेथून मागती ग्वालेर, कुंभेर, दीग, भरतपूर या रोखें चालिले. दुराणीची दौड यांचे पिछाडीस येत चालली. पळतां पळतां खराब जाले. घोडे मनुष्य थकले. दर मुक्कामास शेंपन्नास घोडीं व उटें थकून रहात कोणी मनुष्य थकलें असतां दुराणीनें नेऊन शिरच्छेद करावा. असा अनर्थ झाला. गनिमांचा हर्ष उडून गेला. बहुत फिकिरींत पडले. हमेषा हिंदस्थानांत गनिमांनीं दिग्विजय करून संतोषांत काळहरण करून होते. प्रस्तुतकाळीं काळ फिरला. यांची गत होऊन फार जेरीस आले. फौजेत कोणावर होष राहिला नाहीं. शह सोडून दक्षिणेस येतां नये. शिंदे अभिमानास पोंचले. तेव्हां होळकर यांसही शहास गुंतून पडणें प्राप्त जालें. एरवीं होळकर मतलबी, ते इतके खराब न होते. अशा संकटानें रोज कूच करून वीस पंचवीस कोसांचा चाटा पाडावा. पुन: दुराणीनें येऊन गाठावें. असें होत चालिलें. देशीं श्रीमंतांस वर्तमान वरचेवर लिहून पाठवितच होते परंतु इकडून कुमक गेली नाहीं. कारण श्रीमंतांचा व बेदरखान निजामअली यांचा बिघाड होऊन श्रीमंत फौजेसुद्धां त्याजवर चढाई करून गेले होते. यामुळें हिंदुस्थानांत फौज पाठवावयाची तर्तुद झाली नाहीं व श्रीमंतांचे विचारांत शिंदे होळकर उभयतां त्या प्रांतीं आहेत ते मसलतीस धक्का बसं देणार नाहींत. या खातरीवर [श्रीमंत] स्वस्थ होते. इकडे शिंदे व होळकर पराकाष्ठा करीतच होते. तत्रापि दुराणी गिलच्यांचा शह भारी. उपाय चालेना. गनिमांची फौज जेरीस आली. सन्मुख सामना होऊन लढाई करण्याचा हिंमत गनिमांची राहिली नाहीं. गनिमांचे फौजेंत महागाई फार झाली. हिंदुस्थान प्रांतींचे राजेरजवाडे कोणी यांची कुमक करीनात. कुंभेरीकर जाट मात्र गनिमांचें संधान राखून होता. परंतु त्यासही उघड कुमक करण्याची हिंमत नव्हती; गिलच्याची जरब होती. असे कांहीं दिवस लोटले. इतक्यांत गनिमांनीं आपणांत विचारणा केली कीं, "असे किती दिवस पळावें ? एक वेळ सामना करून मारावें किंवा मरावें.' ऐशी योजना करून फौजेंतील निवडक फौज वेगळी करून एके तोंडावर शिंदे व एकीकडे होळकर उभे राहिले. इतक्यांत दुराणीची दौड येऊन पोंचली. त्यांचा यांचा मुकाबला होऊन लढाई सुरू झाली. ते दिवशीं गनिमांनीं मोठी शिकस्त करून गिलच्यांचें तोंड मागें हटविलें. परंतु गिलच्यांची फौज भारी व अविचारी लोक, बेलाशक मारारार करून गनिमांचे फौजेंत मिसळले. शिंदे यांनीं जागा सोडली नाहीं. होळकर यांची फौज खानदेशी पाठ देऊन पळों लागली. गिलच्यांनीं मिसळोन जो सांपडेल त्याचा शिरच्छेद केला. असे करितां पंधरा कोस पाठलाग केला. मल्हारराव यांजकडील महिपतराव होता त्याचें शीर कापून नेलें" इत्यादि.

दिल्ली नजीक यमुना उतरून अंतरवेद प्रांतें तुह्मावर आले. तुह्मीं देखत चौर्डी झुरंती करणें " ह्मणोन आली. जाटांनीं शिंदे यांचा उपेकार ध्यानांत आणून सर्व प्रकारें बरचेवर साहित्य करीतच होते. जनकोजी शिंदे यांनीं चिटी घेऊन मल्हारराव यांजकडे आले. त्यांस सर्व वर्तमान सांगितलें. "या दिवस पर्यंत आह्मी तुमचे आवाईवरच पळत होतो. दुराणी केवळ अस्मानाची गांड फाडून आला नाहीं. आह्मी उगेच व्यर्थ पळतो. अद्यापि दुराणीचें तोंड आह्मीं पाहिलें नाहीं. आमचें तोंड त्यांणीं पाहिलें नाहीं. कोठवर पळावें ?" या प्रकारची शिंदे यांचे फौजेची हेटाळणी होळकराचे लोक करीत होते. हे कानोरकानीं शिंदे यांनीं हें वर्तमान ऐकिलें होतें. त्यांत होळकर यांनीं वळ बांधून गोष्टी सांगितल्यावर जनकोजी शिंदे यांनीं उत्तर केलें कीं "सुभेदार, तुम्ही एक वेळ युद्ध करणें. आह्मांस आज्ञा देणें. आह्मी तुमचे फौजेंत राहिल्यास उत्तम नाहीं." मल्हारराव यांनीं "तुम्ही आम्हीं राहून युद्ध करावें" ह्मणून बहुतसा दुराग्रह केला. जनकोजी शिंदे यांणीं साफ उत्तर केलें कीं "सुभेदार, आमचे लोकांनीं धास्त खादली आहे. दुराणी आलियावर झाडास बांधले असतां झाडच घेऊन जातील. वरकड गोष्टी काय सांगावयाच्या आहेत ? आस्था या रीती आहे. ही फौज तुमचे फौजेंत राहिलियास तुमचे फौजेस अपाय होईल. एक पळालियावर दुसरियाची हिंमत कमी येते. यास्तव आपण या स्थळीं राहून एक वेळ दुराणीचा मोकाबिला घ्यावा." असें बोलून शिंदे यांणीं नगारा केला आणि कूच केलें. तों मल्हारराव यांजकडील सर्वत्रांस हुटहूट होती कीं, "एक वेळ झुंज करावें. दुसरियाचीच आवाई ऐकून कोठवर पळावें !" मग मल्हारराव यांणीं गंगोबा तात्यांस बोलाऊन आज्ञा केली कीं, "फौजेंत तुम्ही राहून युद्ध करणें. जखमी मूलें गेलें. आह्मी राहूं नये. बहुत युक्तीनें युद्ध करावें." म्हणोन चार अध्वर्य होते त्यांस सांगितलें. आणि आपण निघोन जनकोजी शिंदे यांस गांठलें. तेवढी रात व दुसरे दिवशीं तिसरा प्रहरपर्यंत आगरिया नजीक येऊन पोचले. तों यमुनेस उतार सांपडेना. घोडे घालून ठाव पहात तों ठाव लागेना. तेसमयीं मल्हारराव बहुत घाबरा जाला. जाटाकडील वकील रूपराम कटारी यांस बोलावून विचारणा केली कीं, "बाबा जखमी आहेत. यांस पार करून देणें" ह्मणोन अर्जिनें होऊन गोष्ट सांगितली. कठिण समय

१० झुरती=पलायन.

११. उपकार=जयापा शिंद्यांचा. मागें कुंभेरीच्या वेढ्याची हकीकत पहा.

१२. मुकाबला=गांठ

१३. बा० जनकोजी.

१४. अध्वर्य = मुख्य.

१५. अर्जीन = नम्र लीन.

वैरियास न यावा. मल्हारराव या प्रकारें बोलतांच रूपराम कटारी याणें म-र्यादा खंडून जाबसाल केला कीं " डोखरे रोताहै क्या तुम्हारा जान खालीं अम्हारा जान उपर है[१६]" असें म्हणोन निष्ठुर बोलतांच कठिण शब्द प्रसंगोपात साहणें पडलें. डोखरे म्हणोन हिंदुस्थानी भाषेनें म्हातारा म्हणोन आहे. असें रूपराम कटारी यानें बोलून दोन नावा आणून दोन राहुटिया नजिक खुंटविल्या. निदान दोन खांसे यांस पार करून आगरियाचे किल्ल्यास पोंचते करीन म्हणोन गाडल्या. ते समयीं तमाम फौजेस गैरइतबार जाला. निदानीं हे आम्हांस मोकलून यमुना पार जातील ह्मणून रात्रींच शोध करून तेथें दोन कोसांवर पेंढारी यांनीं छाती बराबर पाणियाचा उतार ठिकाणीं लाविला. लष्करांत खबर कळतांच कोणी खावंदाची देखील वाट पाहिली नाहीं. रात्रींच फौज नदी उतरावयास गेली. मग मल्हारराव व जनकोजी शिंदे हो उदईक जलघाटें [जन-१] नदी उतरून दिवस उगवावयास आगरियाचे शहरांत जाऊन राहिले.

मागें गंगाधरपंतीं शेटियजी खराडे व संताजी बावळे पांच हजार फौजेनिशीं पुढें बातमीस पाठविले. आपण जीनसामान बांधून सिद्ध होऊन बसले. तों उजडावयास झालें. तोंडास तोंड दिसों लागलें ते समयीं गिलचे यांची फौज येऊन पोंचली. बातमीचे लोक सावधच होते. तयार होऊन घोडियांवर बसतात तों ते गिलचे सरमिसळ होऊन फौजेंत पोंचेल. ते समयीं गंगाधरपंतीं कडनिकड करून पुढें सरले. आले होते त्यानवर घोडे घालून एक वेळ घाव केला. सारून माघारे घातले. रोहिले व दुराणी झाडून येऊन पोंचले. क्षणभर बरीच मारामार झाली. घायास हजार पांचशें मनुष्य ठार पडतांच मल्हारराव यांची फौज तडक आगरियाचे रोखें पळूं लागली. गनिमाहुन गिलचियांचा कावा अधिकोत्तर. झुंजास इकडे आरंभ होतांच हजार फौजेनें पळावयाची वाट धरावी. गनीम पळूं लागतांच मागून डोचकीं कापीत पाठीस लागावें. [तेव्हां] पुढें वाट धरून उभे होते ते सहजच मध्यें शिरून मरामार करूं लागले. होळकराच्या फौजेंत मोठासा प्रळय झाला. दे माय धरणी ठाय तैशीगत आली. कितीएक जिवाची आस्था धरून दांतीं तृण धरून उभे राहतात. दुराणी केवळ कठोर, निर्दय, " गोघास खाती, बीजा करो, अल्लाका डेरा दिखलाव " म्हणोन शिरच्छेद करावा. असें करीत पंधरा कोस पर्यंत पाठलाग केला. मल्हारराव याजकडील महिपतराव म्हणोन दिवाण होता. तो घायाळ होतांच त्याचें शीर कापून * नेलें. तैसेंच सटवोजी

१६. 'डोखरे डरता है क्यों? तुमचा जीव खालीं आमचा जीव वरता' टु० प्र०

* मागें पृ० ८२ टीप ८१ पहा.

खरींडा म्हणोन मातबर सरदार होता. त्यास जखमा भारी लागतांच घोडियाखालीं आला. ते समयीं त्याचा शिवाजी खराडा केवळ सत्पुत्र होय. त्यानें पित्या करितां जीवित्वास उदार होऊन, घोडियावरून उतरून, मांडी देऊन बसला. तशामध्यें दैवयोगें करून एक पठाण बहुत नेकजाद थोर मनुष्य होता त्याची गांठ पडली. तो जवळ येऊन उभा राहिला. तों सटवाजी खराडे यांस जीव होता. पठाण यास उत्तर केलें कीं, "तूं थोर, भला मनुष्य दिसतोस. मी सठवाजी खराडा आहें. हा माझा पुत्र आहे. घरीं संपत्ती थोडी बहुत आहे. परंतु वंशीं संतान पुत्र एवढाच आहे. माझे तो अयुष्याची मर्यादा झाली. परंतु एवढा कृतोपकार करावा कीं, माझा पुत्र वांचवावा निदान पार पाडून गनिमाचे फौजेंत पोंचवाल तर तुह्मास लाख पन्नास हजार रूपये पावते होतील. हें ऐकून पठाणास ही करूणा आली. त्याची अची [?] अबदुल अली पावेतों भीड भारीच होती. त्याणी आपले दहा पठाण जवळ ठेविले होते. कीं ह म ली [?] हरामीची गांठ पडली तर यास मारूं न द्यावें. ऐसें सांगून पुढें गेले. वीस कोसपर्यंत पाठलाग केला. पांच सात हजरा मनुष्यांचीं शिरें कापून नेलीं. तेसमयीं खानदेशी लोक घोडियांस म्हणों लागले कीं, मा य नि भा उ सा हो नें[१८]" असें ह्मणतांच दुसरे म्हणूं लागले. "तिकडे गंगोबा तात्या[कडे ?] धाडले. अजुनी काय पाहतां ?" असे खानदेशी लोक बोलूं लागले शिंदे यांचे फौजेस हांसत होते त्यांची मोडसी उतरली. समदुःखी जाले. असो. या प्रकारें मल्हारराव यांचे फौजेची पोळजत्रा * जाली. लष्काराचा पळ दाहांनीं पाचांनीं आगरियास पोंचले. जे पुढें येत त्यांस असें वाटे कीं, आपणच आजच जगून आलों, अवघे कत्तल जाले. इकडे सटवाजी खराडा घायाळ होता त्याचा प्राण निघून गेला. पठाण यांणीं शिवाजी खराडे यांस आपले लष्करांत घेऊन गेलें. दुराणींनीं थोर यश संपादून [त्याणीं] शिकंदरियावर मुक्काम केला. इकडे मल्हारराव यांनीं आगरियाहून कूच करून जयनगराचे रोखें निघाले. गंगाधर तात्या यांचे वृषण घागरी येवढे जाले. घोडियावर बसतां नये असें जालें. कोठवर पळतील ? गिलचियांनीं कूच करून आगरिया नजिक यमुना उतरून मागती गनिमाचे पाठलागास † गेले.

इकडे पुढील वर्तमान दत्ताजी शिंदे पडलियावर जनकोजी शिंदे यांचें पत्र नानासाहेब व भाऊसाहेब यांस पाठविलें होतें. त्यांत सविस्तर जाहालें

१७. सटवाजी ह्म० वरील शेटियाजी.

१८. 'माये निभाव सोने न जालब धोड़' न० प्रत.

* पोळजत्रा = वसु सोडलेल्या बैला-मारितात त्याप्रमाणे. कत्तल किंवा दुर्दशा (?)

† मां० ड० यांणी शिंदे होळकरांच्या संबंधानें या वेळेस अनुलक्षून दिलेली हकीगत निराळी आहे

वर्तमान साकल्य लिहिलें होतें. तों भाऊसाहेब यांणीं तांदुळज्याचे[99] मुक्कामीं नवाब निजामअली यांशीं लढाई केली होती. तेथें तुंबळ युद्ध करून यश संपादिलें होतें. कीं असे गनिमांनीं मोंगलाशीं युद्ध करून मोंगल शिकस्त[100] केला नव्हता. केवळ मोंगल जेरीस आणून त्याजपासून मुलूख व किल्ले देवगीर व अशेरी आणखी अवांतर किल्ल्यांच्या सनदा करून घेतल्या. तेस-मयीं भाऊसाहेब यांस गर्व बहुत जाला होता. यशाच्या फंदांत निमग्न झाले होते. तों गर्वाचें घर खालीं. ईश्वरास साहेना. अशा आनंदांत असतां अकस्मात शिंदे यांचीं पत्रें येऊन पोंचलीं. तेवेळेस पत्रें वांचून पाहिलीं आणि भाऊसाहेब यांचा आनंद होता तो नाशातें पावून दुःखीं निमग्न पडते जाले. दुधाचे रांजणांत कांज्याचे शितेंडि, किंवा धनलोभियाचें धन जातें, अथवा राजा दशरथास कैकयेचे शब्द-बाण, किंवा जानकी-हरणीं, राजा रामचंद्र किंवा रुक्मीणी-स्वैंवराचे समयीं शिशुपाळ राजास जैशी गत अपमान जाला, तैशी गत भाऊसाहेब यांची जाली. विजय जालियाचे अति उत्कर्षें समाधान मानून होते, तों एकाएकींच दत्ताजी शिंदे यांजकडील पराजयाचें वर्तमान ऐकून, पत्र वाचून पाहून, आपले जागां मुहूर्त मात्र दंग होऊन बैसले. जैसे टांकियांनीं पाषाण लेववि़जे, कीं निर्जिव काष्टांगाचे पुतळे, तैसे देहभाव तटस्थता जाली. तेसमयीं जवळ बळवंतराव गणपत व गोविंदराव शिवराम व गोपाळराव गोविंदे व आणखी जिव्हाळियाचे दहा पांच मुत्सद्दी बसले होते. त्यांत बळवंतराव यांनीं जाबसाल केला कीं, "भाऊसाहेब, गोमीसे पाय बहुत, एक पाय मोडला तर उणें पडत नाहीं." तों आधींच त्यांचे आंगीं मोंगल-पराभवांचें वारें होतें. त्या फुंदांतचें बळवंतराव यांनीं अग्नीवर घृत टाकावें तैसा चढाचा जाबसाल केला कीं, "दुराणी ह्मणजे कोण जिन्नस? साहेबीं खांसा स्वारी हिंदुस्थानांत करावी. शिंदे होळकर यांणीं त्या राज्यांतील बहुत दिवस सौख्य अनुभविलें आहे. एकामेकांत कलह करून स्वामि-कार्याची नुकसानी केली. आतां ऐशीच फौज घेऊन हिंदुस्थान काबीज करावें. दुराणी बहुत करून त्या राज्यांत येतो. त्याची एक वेळ खोड मोडून द्यावी,

९९. तांदुळज्याच्या म्ह० उदगीरच्या.
१००. शिकस्त = पराभूत.
१. "वाउ [ढ] दांत निमग्न. तुं० प्र०
२ 'रुक्मियाचा अपमान जाला तैशी' तु० पु० प्र०
३. "टांकियांनीं पाषाण जेवविले" तु० प्र०
४. मेहेंदळे, खाजगीवाले (?) व पटवर्धन. यांतून बळवंतराव मेहेंदळे यांणीं कर्नाटकांत कडापा वगैरे ठिकाणीं मोठा पराक्रम केला होता. हे बळवंतराव प्रसिद्ध आपाबळवंत यांचे तीर्थरूप. गोपाळ गोविंद यांणीं ही कर्नाटकांत मोठमोठीं कामें बजाविलीं होतीं.
५. गोम = घोण. "इंगळीस" तु० प्र०
६. "ताम्रपराभवाचें" तु० प्र०
७. फुंद— (फुगलेला) फंद, वारें.

कीं पुन: हा अटक उतरून येऊं न पावे." असें बोलतांच तेक्षणीं भाऊसाहेब यांणीं ईमश्रु पिळून अति उत्कर्षें बोलते जाले कीं; "आम्ही हमेशा देशीं मोंगलाशीं लढाया करितों, परंतु नर्मदापार जाऊन कोठें दिग्विजय केला नाहीं. एक वेळ हिंदुस्थानांत जाऊन अबदुल अल्लीचें पारपत्य करावें, म्हणजे शिंदे होळकर यांचा गर्व-परिहार होईल. आणि आमचें पुरुषार्थाचें सार्थक [ होईल. ] नाहीं तर अपकीर्ति लौकिकांत होईल कीं, ज्याचा सेवक गांजला त्याचे भलेपणाची निर्फळता. यास्तव लक्ष मनसुबे एकीकडे ठेऊन हिंदुस्थानांत मसलतीस जावें."

ऐसा चित्तांत निश्चय करून राजश्री नानासाहेब यांजकडे * गेले. तों, तेही शिंदे यांचें वर्तमान ऐकून प्रलापांतचें होते. तों भाऊसाहेबांनीं जाऊन विनंती केली कीं, "हिंदुस्थानांत वर्तमान तो या रीतीनें जाहलें. अवघें हिंदुस्थान एकत्र जाहलें आहे. पाण्या आधीं वळण बांधितां उत्तम. नाहीं तर शेणामेणाचें लोखंडाचें जालियावर पुढें भारी पडेल. यास्तव राजश्री दादासाहेब यांची रवानगी साठ हजार फौजेनिशीं करावी. ते पुढें जातील. जड भारी सारखें आणखी साहित्य करावयास येईल." असें ऐकून नानासाहेबांनीं, उत्तर केलें कीं, "तिघां खाशियांनीं ठिकाणीं राहूनच झाडून देशाच्या फौजा पाठवून द्याव्या; परंतु खासा स्वारी गेलिया आब तुटेल." असें बोलिल्यावर भाऊसाहेब [ यांनीं ] मर्यादा सोडून उत्तर केलें कीं, "नानासाहेब, एवढें कर्म एक कीर्तिसाठीं करावें. दुराणीचा शह भारी; फौजेनें कार्य होणार नाहीं. या कार्यास खांसा स्वारी गेली पाहिजे. मग दैवीं असेल तसें घडेल आशा जशी [ न ? ] मृत्यु स्वदेशीं परदेशीं सुटत नाहीं." अथवा मेलें तर कोणी वाळवून ठेवणार नाहीं." असें वर्म-भेदक उत्तर येतांच नानासाहेब आपले जागीं कुंठित जाले. चित्तांत पुरता भाव समजला कीं, "भाऊसाहेब दुराग्रहास पडले." तेव्हां कोणाचें ऐकत नाहींत म्हणून क्षणभर भाऊंस शांत करून सांगितलें कीं, "दादासाहेब यांची रवानगी करितों," ह्मणून सांगून भाऊंस लावून दिलें. जवळ स्त्री गोपिकाबाई होती. तीस बोलिले कीं, "भाऊसाहेब यांचा दुराग्रह कीं दुराणीचे पारिपत्यास दादांस रवाना करावें. त्यास अबदुल अल्ली व नजीबखान रोहिला व सुजाउद्दौला व अमदखान लंगडा पठाण व माधवसिंग जयनगरकर व बिजेसिंग मारवाडी व दुंदेखान रोहिला समग्र हिंदुस्थान एकत्र जालें आहे. एवढी शिंद्यांची लढती फौज सिंधी कोणगत

ः श्मश्रु = मिशा.

* नाना, भाऊ वगैरे सर्व यावेळीं मांजरा नदीच्या तीरीं होते.

१. प्रलाप=विलाप. मागें पृ० ७१ पहा.

आली. आपले हातें मुलास वोपून द्यावें असें जालें आहे." असें ऐकून गोपिकाबाईनीं उत्तर केलें कीं, "दादासाहेब यांस रवाना करावे. जे दैवीं असेल तें होईल." असें ऐकतांच नानासाहेब यांस विषाद आला. आणि ह्मणाले कीं, "स्त्रीबुद्धिःप्रलयंगता" बोटानें मुलें होतीं तर पुरुष कशास करिते.' स्त्री जातीस मनसबा पुसावा याहून अश्लाघ्यता दुसरी नाहीं." म्हणोन बोलून निवांत राहिले.

उपरांतिक भाऊसाहेब व नानासाहेब एकत्र होऊन, दादासाहेबांस पाठवावें असा भाऊंचा दुराग्रह पाहून दादासाहेब यास बोलिले कीं, "हिंदुस्थानांत शिंदे यांची फौज बुडाली त्यास तुम्ही फौज घेऊन हिंदुस्थानांत जावें. ताम्रं पराभवातें पाववावे. असें ऐकून दादासाहेब यांनीं उत्तर केलें कीं, "हिंदुस्थानांत जावयाची मजला आज्ञा कराल तरि ऐशीं हजार फौजेस भर नालबंदी देऊन समागमें क्रोड रुपये खजीना द्यावा म्हणजे आह्मी हिंदुस्थानांत जातों. मग दुराणी व आह्मी पाहून घेऊं. हें तुह्मांस अनुकूल पडत नसल्यास आह्मांस जाणें साफ पुरवत नाहीं." ह्मणोन बोलून उठोन गेले. अशी एक दोन दिवस मनसब्याची गडबड झाली. तों रघुनाथराव याचा पुरता दुराग्रह दिसोन आला.

मग राजश्री भाऊसाहेब व बळवंतराव गणेश एकांतीं बैसून मनसबा केला कीं, "दादासाहेब समागमें खजिना मागतात. दुसरें; नानासाहेबांचे चित्तांत निखालसतेनें दादासाहेब यांस पाठवावें असें नाहीं. जुलमांत नानासाहेब आहेत. त्यांत रडत राऊत घोडियावर बसविलिया पुढें पराजय कशास इच्छावा?" नानासाहेब व गोपिकाबाईचें बोलणें एकांतीं जालें तेंही भाऊंस कानोपकानीं श्रुत झालेंच होतें. भाऊसाहेब याचें वचन ऐकून बळवंतराव गणपत यांनीं हित-शत्रुपणें निरोत्तर केलें कीं, "बाहेर पैसा मिळवून घरास खजीना आणावा, तो घरचा खजीना नेलियावर बाहेरचा खजीना काय मिळवावा? आयत्या पिठावर रेघा कोणीही ओढील. एवंच दादासाहेब खातरजमेशीं जात नाहींत." असें ऐकून भाऊसाहेब बोलिले कीं, "आतां अवघा मनसबा एकीकडे ठेऊन आम्हींच जावयाचें करावें. नानासाहेब यांचे दादासाहेब सखे भाऊ. आह्मी चुलत भाऊ. त्यांचे आमचे ममतेस महत् अंतर." पुढील भवितव्य विपर्यास यास्तव अशी बुद्धि निर्माण झाली. धैर्य-समुद्र उहुळला. भाऊसाहेबीं आपणच जावें असा पुरतेपणें निश्चय केला.

मग भाऊसाहेब नानासाहेब यांजकडे जाऊन बोलते जाले कीं, "दादासाहेब

---

१० ताम्र = यवन, मुसल्मान.

यांस जावयास अनुकल पडत नाहीं, खजीना पाहिजे. आतां आह्मांस जावयाची आज्ञा करावी. मी हिंदुस्थानांत जातों." म्हणोन निक्षून जाबसाल केला. नानासाहेब यांनीं भाऊंचें वचन ऐकून आपले जागीं निवांत राहिले. मुहुर्त मात्र उगेच राहून भाऊंस बोलिले कीं "भाऊसाहेब, तुम्हीं, हें चित्तांत काय आणिलें? आपले जागां राम-लक्ष्मणाची जोडी म्हणवितों. भाऊ! तुम्हीं आजपर्यंत जितके पाणी पाजिलें तितकेंच प्यालों. तुमचे कधीं शब्द-उलंघन केलें नाहीं. आह्मांस मोकलून जाऊं ह्मणतां, तेव्हां आम्हांस दशरथाची गत आली. तुमचा वियोगानळ कांहीं आम्हांस साहणार नाहीं[११]." असें बोलून डोळियांस पाणी आणिलें. तो ज्या ज्या काळीं जें होणें तें चुकत नाहीं. बहुत नानासाहेबांनीं मायाजाळांत गोविलें. परंतु भाऊंचे चित्त हालेनासें झालें[१२]. पुरता जावयाचा दृढ निश्चय जाहला. नानासाहेब गोपिकाबाई यांजकडे जाऊन बोलिले कीं, "भाऊंनीं जावयाचें चित्तांत निश्चयरूप आणिलें. बहुत ग्लानी[१३] केली. परंतु निष्ठुरच बोलतात. तस्मात् तुम्हांस आम्ही सहजी उत्तर केलें तें त्याचे कानावर गेलें कीं काय हें नकळे. आमचा, सांगावयाचा यत्न राहिला[१४]. तुम्ही त्यांस बोलावून कळेल त्या रीतीनें शांतवन करावें." म्हणून गोपिकाबाईंस सुचना केली. त्यावर बाईनीं भाऊंस बोलावून आणिलें. बोलती जाली कीं, "साहेब, आह्मी तुमचे जिवावर सुखरूप आहों. आणि तुम्हीं मनांत हिंदुस्थान जावयाचें काय ह्मणोन आणिलें? आपण शाबूद तो दुनिया शाबूद: तुह्मांस जाणें तरि आमचें देहसार्थक करून जावें" असें ऐकतांच भाऊसाहेब यांस सतीची गत जाली. सतीनें जावयाचा निश्चय केलियावर मग पुढें मुलें बाळें संपत्ती आणिली तरी वमनप्राय होतें, तैसें जालें. उत्तर केलें कीं, "बाई तुम्ही व नानासाहेब व दादासाहेब शाबुद असलिया आम्हां सारिखे शतशः कारभारी होतील. आजिपर्यंत आम्हीं हिंदुस्थानांत न गेलों. बरें वाईट जें करणें तें [येथें] केलें. आतां एक वेळ आम्ही हिंदुस्थानांत जाऊन येतों. तुम्हीं लक्ष गोष्टी सांगितल्या तरी आम्हांस जावयाचें. रहावयास अनुकूल पडत नाहीं." असें ऐकतांच बाईस असें जालें कीं काळजीं घाव पडतो. तैसें जालें. आणि आक्रोश करून आंगावरील शालजोडी होती ती पुढें टाकिली आणि उभी राहिली कीं, "भाऊ, आम्हांस ओलांडून न जावें." असें म्हणतांच भाऊनीं विषादास येऊन निरोत्तर केलें कीं,

---

११. "तुमचे वियोगानें काळ कांहीं आम्हांस साहणार नाहीं." पाठांतर.

१२. "परंतु भाऊंचे चित्तात उदासीनता भरली ते चो खा ले नासे झाले." तुं० प्र०

१३. ग्लानी = ग्लांती = विनवणी.

१४. 'राहिला नाहीं.' पु० प्र०

"तुह्मी जातीच्या स्त्रिया, तुह्मांस हा मनसबा कशास पाहिजे ? तुह्मी आपले घरांतील कामधाम करून असावें." ह्मणून अव्हेर करून रागेरागें उठोन गेले. तेव्हां गोपिकाबाई यांस पुढें कळोन आलें कीं, भाऊ दिल्लीस निश्चयें जातात. मग गोपिकाबाईनीं नानासाहेबांस सांगितलें कीं, "भाऊ राहत नाहींत. जावयाचा निश्चय केला. आतां मिथ्या वाचा शिणविलियांत सार्थक नाहीं. आतां एक मात्र मनसबा आहे कीं, समागमें पार्वतीबाईस घेऊन जाणार तेव्हां मागें त्याचें काय आहे ? दिल्लीस गेले आणि तिकडेच राहिले तर मग यत्न नाहीं. यास्तव समागमें पायगुंता विश्वासराव यास द्यावें." असा दोघांचा संकेत जाला. एवंच भाऊसाहेब जावयाचा पुर्ता एकांतीं घरांतच मनसबा ठरला. तो पावेतों बाहेर कोणास कळूं दिला नाहीं.

[पुढें] फाल्गुन मास आला होता. ह्मणोन तमाम मराठे, ब्राम्हण व अविंधी सरदार ल्हान थोर रंग खेळावयास आणिले. तमाम डेरे छबिने देऊन जागोजाग आरास केली. आणि खेळावयास आरंभ केला. नृत्यांगना व रंग [या] दोहींस गांठ पडली. रंग राग एकत्र जाला. सायंकाळ मर्यादा जो रंग होणें तो जाला. उपरांतिक हिंदुस्थानांतील वर्तमान श्रुत केलें. आणि भाऊंनीं आपला जाण्याचा निश्चय सांगितला.

भाऊसाहेबीं मुहूर्त निकडीचे पाहिले तों जवळ मुहूर्त निघेनासा जाला. मग शिवालिखिताचे मुहूर्तें रात्रीं बाहेर निघाले. समागमें सरदार दमाजी गायकवाड व यशवंतराव पंवार व समशेर बहादर व इभ्रमखान गारदी व हरी दामोदर, सोनजी भापकर व राणोजी शिंदे [यांचे] राखेचे पुत्र तुकोजी शिंदे व महादजी शिंदे, आणखी ल्हान थोर सरदार हजेरीची पन्नास हजार फौज नेमली. भाऊसाहेबीं सरदार लोकांचे चित्तांत किल्मिष होतें तो त्याचा संशय दूर करून दमाजी गायकवाड डावे हातें श्रीमंतास मुजरा करीत[19] होते. जाते समयीं त्यांचे गळां पडोन त्यास वचन दिलें कीं, "हिंदुस्थानांतून फिरोन आलियावर तुमची गुजराथ संपूर्ण तुमचे स्वाधीन करितों." ह्मणून त्यांचें

१५. मिथ्या = उगीच, व्यर्थ.

१६. 'मध्यरात्रौ' तु० प्र०

१७. 'विठोजी शिंदे' पु० प्र० हें चुकीचें दिसतें. महादजीचें नांव मागें एकदां मारवाडच्या हकीगतींत टॉड याच्या ग्रंथांत आलें आहे. नंतर, शिंदखेडच्या लढाईंत व दिल्ली जवळ झालेल्या युद्धांत त्याणें मोठा पराक्रम केला असें ग्रां० ड० ह्मणतो. मागें पु० ३७।६८।६९ पहा.

१८. किल्मिष = किंतु, वाकडें, वैरभाव.

१९ 'डावे हातें' इ०—शाहू मरण पावल्यावर पेशव्यास हुसकावून लावण्याची ताराबाईनें खटपट चालविली होती. तींत दमाजी गायकवाड याणें तिला मदत केली. पुढें नानासाहेबांनीं त्याशीं सलुखाचें बोलणें लावून आपले लष्करांत मदरबंदींत ठेविलें. या करितां गायकवाड पेशव्यास डावे हातानें रामराम करूं लागला.

समाधान करून त्यांस उजवे हातें रामराम करावयास लाविलें. तैसाच यशवंतराव पवार याचाही गौरव केला. आणि कित्येक लहान थोर सरदार यांचे वृत्ति-उच्छेद केले होते. कोणाचे सरंजाम जहागीर खालीं केल्या होत्या, त्यांसही वचन दिलें कीं, "तेथून आलियावर तुमचे तुम्हांस करून देऊं," ह्मणून समाधान केलें. इभ्रमखान गारदी यास समागमें घेतलें. तेवळेस इभ्रमखान गारदी यानें भाऊसाहेबांस जाबसाल केला कीं, "तुह्मी गनीमी लोक, दहावेळ पळाल व दहावेळ उभे राहाल. आह्मी गारदी लोक केवळ पायउतारे, आम्हांस पळावयास पाय नाहींत. आणि गांठ तो रोहिलियाची पडणार, त्याची आज्ञा काय?" तेसमयीं भाऊसाहेब यांनीं इमान दिलें कीं, "निदान प्रसंग पडला तरी तुम्हांस सोडून निघणार नाहीं. तुम्ही गाडून उभे रहाल तेथें मीहि उभा राहीन. यास अंतर करणार नाहीं." म्हणोन त्यास बेल-भंडार दिला. त्याजपासून साजक रोटी आपण घेतली. आणि कूच केलें. तेसमयीं गोपिकाबाईनीं बळें करून विश्वासराव यास हातीं दिलें. निघोन चालिले. तेसमयीं नानासाहेब व गोपिकाबाईस असें जालें कीं, बाळ आजच आपलें आपणास अंतरलें. सर्वत्रांचें मायाजाळ सारखेंच. पुढें होणार विचित्र होतें. यास्तव तमाम लष्करांत निरवानिरव करून, एकामेकांचें गळां पडोन निघाले. या प्रकारें भाऊसाहेब चांगली फौज, चांगले हत्ती, सरस घोडीं, उंच वस्त्रें, कांहीं खजिना घेऊन कूच करून गेले. इकडे नानासाहेब यांनीं कूच करून पुणियास जाते जाले.

भाऊसाहेब मजल दर मजल बऱ्हाणपुरास आले. असीरी किल्ल्यास पांच हजार फौज भोंवतालीं टाकून आपण पुढें विंध्याद्रि पर्वत ओलांडून नर्मदापार जाले. विंध्याद्रीसच सातपुडा प्राकृत अभिधान आहे. संपूर्ण देश खानदेश, बागलाण, नेमाड ओलांडून माळव्याच्या घाटास गेले. घाट बोडसियाचे नजीक चढून[२०] माळवे प्रांतीं गेले. सुरंज भेलशिया नजीक मुक्काम केला. तेथून जनकोजी शिंदे व मल्हारराव यांस पत्र लिहिलें कीं, "आह्मी मजल दर मजल यावें किंवा दम खात यावें." ह्मणोन पत्रें जासूद याजबरोबर पाठविलीं. मल्हारराव यांणीं पत्र पाहून त्यांस थोर विषाद आला कीं, "हे थोर खावंद असतां यांणीं ठिकाणीं राहूनच फौजेचा पुरावा करावयाचा होता. त्यास भाऊसाहेब कर्ते मनुष्य ते निघोन आले. तेव्हां साऱ्या गोष्टी यांतच आटपल्या. पुढें नानासाहेब यांस कांहीं उपराळें[२१] करावयाची हिंमत होणार नाहीं. असो. आले त्यास उपाय नाहीं." ह्मणोन

---

२०. 'घाट बोडसियाचे नजीक मुक्काम केला तेथून' तुं० प्र०

२१ उपराळा = पाठ पुरावा, मदत.

पत्राचें उत्तर लिहिलें कीं, "आधींच न यावें. ज्यांनीं मनसबा दिला ते थोर आहेत. रोहिला व सुजाउद्दौला व अहमदखान बंगड़ा व दुराणी कांहीं सामान्य नाहींत. यास्तव मोरहा इरेसें[22] पाडावा असा अर्थ नाहीं. याजकरितां साहेबीं माळवे प्रांतीं राहून छावणी करावी. पुढें फौज मात्र सडी रवाना करावी. आम्ही साहेबाचे दमावरीच कार्य उरकोन घेतों." ह्मणोन पत्रें आलीं. तीं भाऊसाहेब यांनीं वांचून पाहिलीं. आपले लहान थोर मुत्सुद्दी बोलाऊन त्यांस विचार पुसला. ते समयीं बळवंतराव गणपत यांणीं जाबसाल केला कीं, "भाऊसाहेब, शिंदे होळकर यांणीं या राज्यांत बहुत दिवस क्रमून राजे जाहले[23]. त्यांस आह्मी आलियाचें सुख काय आहे ? आम्हांस दबवणी मात्र देतात. भाऊसाहेब आपली सलाबतें कांहीं सामान्य नाहीं. आपला पुण्य प्रताप या प्रकारचा आहे कीं, गिलचा स्वामींनीं कानीं मात्र ऐकिले, परंतु दृष्टीस पडणार नाहींत. खातरजमा असों द्यावी. निश्चयेंच कूच करून दिल्लीस पोंचावें."

इकडे दुराणी पाठी लागून हैराण जाले. गनीम[26] यांनीं कावे देत देत अंतरवेद प्रांतीं गेले. तो दुराणी अंतरवेदप्रांतीं गेला. मागती गनीम यमुना उतरून आलीकडे आले. दुराणी नदीपारच राहिला. तों ज्येष्ठ मासही समीप पूर्ण होत आला. यमुनेस पाणी आलें. मग सहजच दुराणी काळजळेश्वराजवळ[27] राहिले. इकडे मल्हारराव व जनकोजी शिंदे केरोलीचे सुमारें चमेलीपार राहिले. इकडे भाऊसाहेब खंडण्या करीत करीत नरवर वलांडून ग्वाल्हेरीचे सुमारें आले. तेथून ढोलपूर चमेलीचा घाट धाकट्या तीन मजला राहिला. निदान कुवारी नदीवर मुक्काम केला. तों तेथून मागती शिंदे होळकर यांस पत्रें लिहिलीं. कीं "ढोलपूरचे घाटें उतरावें. किंवा अचेरीकडून[28] यावें. याचा निश्चय करून पाठवणें" ह्मणोन पत्रें मल्हारराव यांस हलकारे यांणीं दिलीं. त्यांणीं पत्रें वांचून पाहिलीं. पत्रांतील गर्भभाव ध्यानांत आणिला. तों भाऊसाहेब क्षेपनिक्षेप[29] आले. हें ऐकून मल्हारराव याचे तळपायाची आग मस्तकास जाऊन भाऊसाहेब यास पत्र लिहिलें कीं,

२२. मागें पृ० ४ टी० १ पहा.

२३. 'शिंदे होळकर यांणीं या रानांत बहुत दिवस केळें खादलीत. केळीं कोंकणा शब्द आहे. आपणच या रानांतील राजे जाह्याले' तुं० प्र०

२४. सलाबत = धाक, दरारा.

२५. "असें द्यावा." तुं० प्र०

२६. 'गनीम यांणी धुरोळ्या दृष्टीस पडों देईनासे झाले. कावे देत देत आणखीं गनीम अंतर्वेदप्रांतीं गेले.' तुं० प्र०

२७. 'काळजैश्वराबर' तुं० प्र०

२८ 'अटेरा' तुं० प्र०

२९ क्षेपनिक्षेप = खचित, कांहीं होईना

"तुह्मांस माळवे प्रांतीं छावणीस राहावें ह्मणून लिहिलें असतां येथपावेतों यावयास कारण काय? तस्मात् सर्व भोंवताले नुतन-वय मिळाले ते तुमचे हिताचे, आणि आह्मी वृद्ध आमची साठीची बुद्धि नाटी केली[३०]. आह्मी आजिपर्यंत जितकें कर्म केलें तितकें साहेबाचें अनहित केलें. असो. आतां सर्व मिळून स्वहित करावें." याप्रमाणें मल्हारराव यांणीं पत्रें भाऊसाहेब यांस लिहून पाठविलीं कीं "जें जालें तें उत्तमच जालें. अतःपर तरी चमेलीपार ग्वाल्हेरीचे नजीक छावणी करावी" ह्मणोन पत्रें पाठविलीं. पत्रें भाऊसाहेब यांणीं पाहून आपले जागां चार कारभारी यांस बोलावून आणून त्यांस विचार पुसला. मागती बळवंतराव यांणीं मसलत दिली कीं, "मजल दरमजल दिल्लीस जाऊन पोंचावें." असें ऐकून विठ्ठलराव शिवदेवें[३१] यांणीं जाबसाल केला कीं, "समागमें मुलें माणसें आहेत. तुमचे निर्भय राज्य ह्मणून तमाम कुटुंबें व जनार्दनपंत फडणीस[३२] यांची स्त्री काशीस जावयाचे उद्देशें आली आहे. तैसेच पायगुडे यांचें कुटुंब व आणखी कितीएक लहानथोर सरदार यांचीं कुटुंबें समागमें, आणि शत्रूची प्रबलता भारी, यास्तव मल्हारराव यांणीं लिहिलें तें मान्य करून या स्थळीं छावणी करून रहावें." असें ऐकून सर्वत्र मिळोन, त्यांणीं हास्य करून, विनोदें जाबसाल उडवून दिला कीं, "शिंदे होळकर व अंताजी माणकेश्वर व विठ्ठल शिवदेव व गोविंदपंत बुंदेले व नारो शंकर असे सर्वत्र या राज्[३३]यांत सुख पावले, त्यांस आह्मी आलियाचें सुख नाहीं." ह्मणून हेटाळणी करून कूच केलें. ढौलपूरचे घाटें चमेलीपार झाले.

ढौलपुरानजीक मुचकुंद[३४]-तीर्थ ह्मणून आहे. जे समयीं देव-साह्यार्थ कालयवन[३५] दैत्य यांशीं बहुत काल रात्रंदिवस [मुचकुंदानें] युद्ध करून दैत्य पराभविले. त्यांत कालयवन दैत्य मात्र चुकावून राहिला होता. त्यासि बहुत रात्री झोंप नव्हती. दिवसा उसंत नाहीं. याप्रकारें मुचकुंद युद्ध करून श्रमला होता. यास्तव ब्रह्मा, विष्णु, महेश्वर हे मुचकुंदाकारणें वर देते जाले कीं, "आमचे कारणीं फार शिणलास यास्तव पाहिजे तो इच्छित पदार्थ मागावा." असें म्हणतांच मुचकुंद

---

२९ "नतन नवे मिळाले" सातारा प्र०

३० "साठीबुद्धी नाटी झाली" तुं० प्र०

३१. 'विठ्ठलराव शिवदेव' हे शब्द तुं० व सा० प्रतींत नाहींत.

३२. 'नानाफडणीस यांची मातोश्री' तुं० प्र०

३३ जेथें जेथें 'राज्य' असा अर्थ असावा तेथें तेथें 'राण' असा तुं० प्रतीचा पाठ आहे.

३४. मुचकुंद = सूर्यवंशी राजा. याणें देवास साहाय्य केलें.

३५. कालयवन = या ठिकाणीं 'कालेय' असावेंसें वाटतें. ही कालयवनाची कथा हरिविजय, अ० २२, किंवा बृहद्‌शम, अ० ९, यांत पहावी.

देवापाशीं वर मागता जाला कीं, "मी युद्ध करून फार श्रम पावलों आहें. यास्तव बहुत काल इच्छा पुरेतों पावेतों मजला झोंप द्यावी." ऐसें ऐकून ब्रह्मदेवें मस्तकीं हस्त ठेविला कीं, "संदेयीरहित[36] तुजला निद्रा दिली. तूं निजला असतां तुला कोणी उठवील त्याजवर तुझी दृष्टी पडतांच त्याणें जळोन भस्म व्हावें," म्हणोन वर देऊन त्यास ढवलपुरा पासून वरतें कोसावर लहानसा पहाड आहे, तेथें गुहा आहे, त्यांत निद्रा करविली होती. असे बहुत दिवस जाले होते. तों कोणें काळें करून विष्णूचे व कालयवन याचें अतिशय करून युद्ध जालें. ते समयीं ब्रम्हराक्षस याचें बळ भारी म्हणोन विष्णूस फार संकट प्राप्त जालें कीं, "काळयवन आपणास अटोपत नाहीं, त्यास यत्न काय करावा?" म्हणोन ध्यानांत आणिलें. मग विष्णु नाटकी मुर्ती, कौशल्य केलें. कालयवनाचे भयें, ज्या गुहेंत मुचकुंदानें निद्रा केली होती तेथें पळत येऊन आपला पीतांबर होता तो मुचकुंदावर पांघरूण घालून आपण गुप्त जाले. तों मागें धांवत कालयवन गुहेस आला. तो निद्रागत पीतांबर पांघरून विष्णु-शोधार्थ लागला. कालयवन दैत्य दुर्वृत्त, त्याणें रागें करून लाथेनें हाणून त्यास जागा केला, आणि बोलिला कीं, "चोरा पळून येऊन लपून पडला आहेस, तुजला वाचूं कैसा देतों!" ह्मणून लत्ताप्रहारें त्यास ताडन करून जागें केलें. तों मुचकुंद याणें डोळे उघडून त्याजकडे पाहिलें. तेव्हां ब्रम्हवरदें करून कालयवन जळून भस्म जाला. मुचकुंद आपले जागां सचिंत[37] होऊन विष्णूस धांवा केला कीं, "मजला हत्या घडली, त्यास यत्न काय?" ते समयीं विष्णु प्रगट होऊन त्याचें समाधान केलें कीं, "तूं आमचें महत्कार्य केलें. आतां तुजला ब्रह्म-हत्येचा दोष घडला यास्तव चिंतातुर, तर यास यत्न एक सांगतों. तेथून अर्ध कोस दक्षिणेस तीर्थ होतें. त्या तीर्थीं स्नान केल्या ब्रम्ह-हत्येचें पातक जातें." या प्रकारें सांगून त्यास तेथें स्नान करवून ब्रम्ह-हत्ये पासून मुक्त केला. त्यापासून त्या-तीर्थास मुचकुंद-तीर्थ म्हणों लागले. त्या तीर्थाचीं स्नानें दानें करून, भाऊंनीं कुच करून, आगरियाचे रोखें गंभीरा नदीवर मुक्काम केला.

मग त्या मुक्कामीं मल्हारराव होळकर व जनकोजी शिंदे व नारो शंकर असे भेटावयास आले. भेटी जाल्या. जनकोजी शिंदे यांचें बहुत प्रकारें समाधान करून, त्यांस हत्ती व घोडे व वस्त्रें दिलीं. ते समयीं मल्हाराव यांणीं भाऊंची मर्यादा कांहीं धरिली नाहीं. भरले सभेंत गर्जों लागला कीं, "भाऊसाहेब,

---

३६. 'शंकारहित' तुं० प्र०

३७. तुं० प्र० 'अजुर्दा' = खिजलेला, दुःखी.

तुम्हांस नदी-पार रहावें ह्मणोन लिहिलें असतां, यावयास कारण काय? चार भोंवताले मिळाले ते केवळ बेवकूब आहेत. एवढा मोहोरा आणून इरेस घातला. आतां यास काढावयास यत्न नाहीं," म्हणोन बहुत गाली-प्रदानें केली. परंतु कोणी शब्द काढीनात. असो. या प्रकारें बोलिले परंतु गोष्ट गुदरली.[३८] उपाय राहिला. मग तेथून आगरियावर येऊन मुक्काम केला. दुराणी भारी असें ऐकून, बरोबर मुलें माणसें आणिलीं आहेत त्यांस कांहीं आश्रय करावा म्हणून आगरियाचा किल्ला होता. म्हणून त्या किल्लेदाराशीं स्नेह करून, त्यास दहा हजार रुपये दारू गोळियास दिले. आणि इमान प्रमाण घेतले कीं, "निदान समय प्रगट जाला तरि बायका मुलें आहेत त्यास स्थळ किल्लियांत द्यावें." याप्रमाणें बंदोबस्त करून गोघाटावर मुक्काम केला. तों गिलच्या पलीकडे गंगेचे तीरीं येऊन नदी-पार काळजेश्वरावर [त्याणें] मुक्काम केला होता. त्याणें कूच करून [तो] यमुना पार यांच्या बरोबरीनें राहिला. परंतु यमुनेस पाणी भारी यास्तव त्याचा यत्न यांजवर चालेना. या प्रकारचें यांचें कूच जालें, म्हणजे त्यांणींही पलीकडे कूच करून बरोबरीस रहावें. भाऊसाहेब तेथून निघाले. यमुनेचे [व] वृंदावनाचे मध्यें मुक्काम करून राहिले. तीर्थविधी यथाविधी करून, छायातिसराईवरून हा डे ल प ल्ल व [?] करून दिल्लीस पोंचले. तों दिल्लीचे किल्लियांत रोहिले व गारदी नजीबखान याजकडील चार हजार सामान[३९] किल्लियांत होते. ते समयीं शहरचें वस्त्राहरण करून किल्लियास मोर्चे लाविलें. आणि जनकोजी शिंदे व मल्हारराव होळकर [४०]यांणीं इमान प्रमाण देऊन सुरजमल्ल जाट यास पांच सात हजार फौजेनिशीं भेटीस घेऊन आले. भाऊसाहेब त्यांस आडवे जाऊन, सन्मानें करून घेऊन आले. तों दिल्लीचा किल्ला अपेशी, पांच सात रोजांत हल्ला करून, मोर्चा लावून,[४१] हस्तगत केला. त्यांत सामान होतें व लोक होते त्यांस जीवदान देऊन सोडलें. आणि किल्यांतील अलमशाहा पातशाहा होता तो गाजुदीखान यानें मारून [तो] शिंदे याजकडे गेला होता, त्या तागाईत कोणी पातशाहा तक्तीं बैसविला नव्हता. मग भाऊसाहेब यांणीं अल्लीगौर चेंकते[४२] याचा पुत्र चौदा वर्षांचा शाहाजादा शहाअल्लम म्हणोन होता, त्यास तक्तीं बैसवून, त्याचे नावें शिक्के

३८. 'गुदस्त' तु० प्र०
३९. 'सामायनें' पाठ तु० प्र०
४०. 'यांचें इमान' इ० पु० प्र०
४१. 'हलकाकरून, मोकळा होऊन' पु० प्र०
४२. 'चेमकत' पु० प्र० 'शाहाजादा शहाअलम' हे शब्द तु० प्रतींत नाहींत. अल्लीगौर यासच शहाअल्लम (दुसरा) ह्मणतात. त्याचा पुत्र जवान बक्त यांस भाऊंनीं तक्तावर बसविलें. अल्लीगौर पूर्वेकडील प्रांतांत पळून गेला होता.

व मोहरा व रुपये केले. सुरजमल्ल जाट याजपाशीं गाजुदीखान होता. तो त्यास वजारत द्यावी म्हणोन असा बहुत करून आग्रह सुरजमल्ल जाट याचा व शिंदे होळकर[43] यांचा होता, परंतु बळवंराव कोणाचें चालूं देईनात. नारो शंकर यास राजे बहादर ऐशी किताब देऊन, वजिरात सांगून किल्यांतील व शहरांतील कुल[44] पारपत्यें त्याचे स्वाधीन केलें. त्याजपाशीं पांच हजार फौज ठेविली. ते समयीं शिंदे, होळकर यांचे चित्तांत संशय आला कीं, "भाऊ साहेबीं आमचें मानिलें नाहीं. तेव्हां सुरजमल्ल जाट यांणीं काय चित्तांत आणिलें असेल? या प्रकारें या हिंदुस्थानांत आमची अप्रतिष्ठा जाली. यांत परिणाम काय?" म्हणोन मल्हारराव यांणीं जनकोजी शिंदे यांस विचारिलें. जनकोजी शिंदे यांणीं जाबसाल केला कीं, "आपलें चालेनासें दिसोन आलें. तेव्हां हरएक[45] मसलत आपण सांगों नये. आपले जागां प्रतिष्ठेनें रहावें." म्हणोन बोलिले. तैसेंच सुरजमल्ल जाट यांणीं आपला वकील रूपराम कटारी यास [बलावून] बोलिले कीं, "गाजुदीखान याचे वजारतीविषयीं भाऊसाहेब यास आह्मीं रुबेरूं[46] विनंती केली. तैसेंच शिंदे होळकर यांणीं अर्ज केला. परंतु त्याणें मानिलें नाहीं. तेव्हां या स्थळीं राहिलियाचें स्वरूप नाहीं. अपाय होईल. यास्तव येथून हरयत्नें निघतां उत्तम," म्हणोन मनसबा केला. परंतु शिंदे होळकर यांचे नजीक रहाणें. जावयास उपाय नाहीं. म्हणोन चिंतातुरच होता. तो 'विनाशकाळीं विपरीत बुद्धि' तैसा विचार घडला.

गोविंदपंत बुंदेले यास तसदीकरून पन्नास लक्ष रुपये मागितले. त्यांणीं समय जाणून, आणावयास जातों म्हणून, बाराजीपंत बाघ व आपण बुंदेलखंडात गेले. यांहीं खर्चाची तंगचाई जाणोन पातशहा याचे तक्तावरतें कचेरीस छत रुप्याचें होतें. तळ हाता इतका [ पत्रा ] मोठा होता. त्याजवर सोनेरी वर्खी मुलाम्याचें काम होतें. त्याजवर नजर भाऊसाहेबांची गेली. चित्तांत विचार केलाकीं, "हें छत आहे. हें काढून फौजेस रोजमुरा द्यावा." ह्मणोन मसलत ठीक केली आणि उगेच फुलें द्यावीं ह्मणोन[47] शिंदे, होळकर व सुरजमल्ल जाट यांस विचारणा केली. ते समयीं सुरजमल्ल जाट याणें अर्ज केला कीं, "भाऊसाहेब पातशाही तक्तीची जागा

४३ 'होळकर' तृ० प्रतींत नाहीं.
४४. कुल = सर्व
पारपत्य. = अमल, अधिकार.
४५. हरएक = कोणतीही.
४६. 'रुबरू' तृ० प्र० = समक्ष.
४७. 'फुलें वावीं ह्मणोन' = बाह्योपचारार्थ.

मर्यादेची आहे. पूर्वी नादरशाही जाली होती तेवेळेस तक्तावर सोन्याचे कैळस होते ते नेले, परंतु या छतास हात लाविला नाहीं. त्याजवर खंदारचा पातशाहा अबदुल अली दोन वेळां चालोन आला. त्याणें तोफा देखील कोंढून नेल्या. परंतु याची मर्यादा राखली. प्रस्तुत मी पातशाही उमराव तुम्हांपाशीं आहें. आम्हां देखत या गोष्टी होऊं नयेत. आम्हांस गोष्टीनें यश येणार नाहीं. आणि स्वामि-द्रोहही पदरीं पडेल. यास्तव अर्ज करितों कीं, आजिचे प्रसंगीं एवढी जोड मजला द्यावी. तुम्हांस तंगचाई जाली तर मजला आज्ञा करावी. मी पांच लक्ष रुपये साहेबांस देतों." असें ऐकतांच यांस अधिकच अभाव जाला कीं, "हेच पांच लक्ष रुपये देतात तेव्हां कांहीं अधिक असेल" ह्मणून त्याचा अव्हेर करून, कचेरीच संपूर्ण छत कोंढिलें झाडून रुपें वजन केलें. तों तीन लक्षांचें भरलें. ते समयीं भूमिकंप ही जाला. जनवदंता उल्कापातही जाले म्हणतात. ते समयीं बहुतांस वाईट वाटलें. सुरजमल्ल जाट यांणीं हुजूर जाऊन अर्ज केला कीं, "भाऊसाहेब आम्ही जवळ असतां तुम्हीं तक्त विध्वंस केला. येणेंकरून आम्हांस दूषण. ज्या गोष्टीचा साहेबांस आम्ही अर्ज करावा ते समयीं आपण अव्हेर करितोते. आमचे चित्तांत हिंदुधर्म आहे. राज स्वस्थ रहावें. तुमचें आमचें इमान जालें. यमुनेचें पाणी हातांत घातलें त्याचें सार्थक हेंच कीं काय ?"

ते समयीं भाऊसाहेबीं ती गोष्ट टाकून शिंदे, होळकर समग्र बोलावून मनसबा केला कीं, "यमुनेस पाणी भारी. दुराणी यमुने पार राहिले. सध्यां कुंजपुरियांत कुतुबशहा व अहमदखान कसलखान असे पंधरा हजार फौजेनिशीं बळावून राहिले आहत. प्रस्तुत त्याचें पारिपत्य करावें. त्याची तजवीज काय?" असें ह्मणतांच मागती सुरजमल्ल जाट याणें प्रत्योत्तर केलें कीं, "आमचे ऐकाल तरि छताचे रुपये काढिले आहेत. मागती छत यथास्थित करावें. येणें करून आपला जय होईल. दुसरें, गाजुदीखान याची वजारत त्याची त्यास द्यावी. येविशीं शिंदे होळकर यांचें व आमचें इमान-प्रमाण गुंतलें. पुढें आणखी

४८. 'कवच' पु० प्र०

४९. 'गाळून' पु० प्र०

५०. अभाव=संशय.

५१. 'कचेरीचा छत काढिला' असा तृ० प्रतीचा पुल्लिंगीं प्रयोग सर्वत्र आहे.

५२. 'आपण अव्हेर करितात' असा द्वितीयपुरुषाचा तृतीयपुरुषीं प्रयोग प्रयोग करण्याचा हिंदुस्थानांतील मराठे लोकांचा प्रघात.

छोटा मोठा अर्ज ऐकत जावा. म्हणजे मी सर्वस्वें तुमचे पदरीं आहे. लागेल तो दाणा व साहित्य पुरवीन. दिल्ली सोडून जाऊं नये. येथूनच सर्व मजकूर मसलती[५३] कराव्या. कदाचित् तुम्हांस[५४] कुंजपुरियाचें पारिपत्य करणें तरि लक्ष प्रकारें करावें. परंतु तेथें गुंतून राहूं नये " याप्रमाणें मसलत दिल्लीपुढील होणार वलोत्तर. भाऊसाहेब यांणीं जावसाल केला कीं, " आम्ही कांहीं दक्षण सोडून तुमचे बळावर आलों नाहीं. आमचे चित्तास येईल तसें करूं. तुम्ही राहवेल तर[५५] रहावें, नाहींतर आपले ठिकाणास जावें. गिलच्यांचें पारिपत्य केल्यावर तुम्ही आम्ही समजून[५६] घेऊं." ऐसा निष्ठुर जावसाल होतांच शिंदे, होळकर यांस वाईट वाटलें. आपलाले जागीं स्तब्ध राहिले. उपरांतिक सुरजमल्ल जाट आपले जागां अंजुरदा[५७] होऊन आपले डेरियास गेला. चित्तांत विवंचना करितां जाला कीं, " आम्ही आलों हेंच मूर्खपण केलें. आतां जाण्याची तजवीज कोणत्या रीतीनें होईल[५८] ? " म्हणोन महासंकटीं पडला.

इकडे भाऊसाहेब यांणीं कुंजपुरियावर जावयाचा कृतनिश्चय केला. मल्हारराव व जनकोजी शिंदे डेरियास आले. एकत्र एकांतीं मनसबा केला कीं, "जाटास आम्हीं इमान देऊन आणिलें. भाऊंची [मर्जी] तो केवळ कठीण. बळवंतराव व भाऊसाहेब यांणीं मनसबा पूर्ण केला कीं, सुरजमल्ल जाट यास धरून, कैद करून, त्याचा गोठ लुटून टाकावा. हा मजकूर खचीत जाला आहे. आतां हर यत्न करून सुराजमल्ल जाट यास काढून द्यावा. मग त्या निमित्त आह्मांसच काय करितील तें करोत. " असें बोलून रूपराम कटारी, वकील जाटाकडील, यास बोलावून सांगितलें कीं, " तूं आज रात्रीं हर यत्न करून निघोन जावें. भाऊसाहेब यांचा गोट दूर आहे. त्यांस कळों न देतां निघोन जावें. इतकियावर तुमचें आमचें इमान उगवलें. अत:पर आम्हांवर शद्ब नाहीं." म्हणोन कानावर हात ठेविले. याप्रमाणें बोलोन रूपराम कटारी आपले गोटास गेला. सविस्तर अर्थ सुरजमल्ल जाट यास सांगितला. सुरजमल्ल जाट यानें उत्तर केलें कीं, " दोहींकडून अवघडच आहे. आजिचे प्रसंगीं दैवयोगें करून निभावून गेलों तर सर्वस्वें भाऊसाहेबाचे द्रोही जालों. गिलच्यांचें पारिपत्य दैवयोगें करून जालें तर आम्हांस पुरताच क्षय

५३. ' मनसबा मसलती ' तुं० प्र०
५४. ' आह्मांस ' पु० प्र०
५५. 'राहवेल तोंवर तुं० प्र०
५६ ' पाहून घेऊं ' पु० प्र०
५७. अजुरदा = खिन्न.
५८. ' निभावणी कोण अर्थी होईल ' तुं० प्र०

आला. आधींच भाऊ पुरते आग्रही, मग आह्मांस आश्रयही कोणाचा नाहीं. या गोष्टीचें भय धरून रहावें तर सध्यांच बंदीस पडावें. या दोहीं संकटांचा अर्थ काय करावा?" रूपराम कटारी याणें निरोत्तर केलें कीं, "'एक आणी चूकी तो बारा बरसकी हयात' ऐसा आहाणा प्रसिद्ध आहे. प्रस्तुत बचाऊन जावें. पुढें इकडे भाऊ आणि [तिकडे] अबदुल अल्ली दुराणी. दोनीही सबळ अनुष्ठानी, दोहींचीं सुकृतें सध्यां ताजव्यांत घातलीं आहेत. न्यून[59] पूर्ण थोडकिया दिवसांत दिसोन येईल. तों पावेतों आम्हीं आपले जागां दम बांधोन स्वस्थ राहावें. पुढें जें रामजीचे चित्तांत येईल तें सुखरूप होईल. उद्यांची फिकीर आज कशास पाहिजे? सध्यां निभावणी होईल अशी निघावयाची मसलत सिद्ध करावी. जें होईल तें सुखें होऊ, परंतु आज रात्रौ निघावें." म्हणोन निश्चय केला. मग प्रहर रात्र गुदरलियावर गुप्तरूपें हत्तीच्या घांटा काढून, डेरे दांडे पाडून, झाडून निघाले. जवळ शिंदे होळकर होते, परंतु त्यांणीं काणा डोळा केला. चार कोश भुई गेलियावर मग शिंदे होळकर यांजकडील दिवाण गंगोबा तात्या कचेरीस जाऊन वर्तमान सांगितलें कीं, "सुरजमल्ल जाट गुप्तरूपें कोणास न कळतां पळून गेला. आम्हांकडील फौज पाठिलागास गेली. आपणही फौजेची रवानगी करावी." असें ऐकतांच भाऊसाहेब यांणीं फौज सिद्ध केली. ताकीद करावयासि, फौज तयार होऊन निघावयासि, आणखीही साहा चार घटका लागल्या. इकडे शिंदे होळकर यांचीही फौज निघोन गेली. तों सुरजमल्ल जाट सडा झाडून रामगडांत पोंचला. मागें थोडे बहुत बाजार बुणगे सांपडले ते लुटून आणिले. असो. या प्रकारें जाट तो निभावून गेला. इकडे भाऊसाहेबही पुरतेपणीं उमजले कीं, "शिंदे होळकर यांचे अनुमताखेरीज जाट गेला नाहीं. अस्तु. आतां गोष्ट चित्तांतच राखावी" म्हणोन आपले जागां राग शांत करून राहिले. कचेरीस मात्र बोलिले कीं, "ईश्वर-सत्तेकरून दुराणीचें पारिपत्य जाहालियावर जाटाचे अधिकोत्तर काय आहे?[60]

५९. न्यून पूर्ण=कमी कोण जास्त कोण, सामर्थ्य अधिक उणें कोणाचें हें.

६०. येथपासून तुंगार प्रतीचा पाठ निराळा आहे तो असा:—"खमाखाय जाट होता कीं नाहींसा करीन, तरीच जातीचा ब्राह्मण, ह्मणोन प्रतिज्ञा केली. या प्रकारें निशान हातींचें गमावलें. उपरांतिक भाऊसाहेबीं नारो शंकर किल्ल्यांत ठेवले. त्याजपाशीं किल्ल्यांत दोन हजार फौज प्यादे व हजार गारदी व शहरचे गिर्दनवाजीस पांच हजार फौज ठेवून मजल दरमजल कूच करून कुंजपुरियास जाऊन पोंचले. तों दुराणीची फौज पलीकडे यमुना तीरींच होती. कुंजपुरियास पोहोंचलियावर दुराणी [यांणां] नदी उतरावयासि बहुत तल्लास केला. परंतु भाऊसाहेब यांस तेव्हां यश घ्यावयाचें होतें वास्तव त्यांस यमुनेनें वाट दिली नाहीं.

[ पुढें ] खासा भाऊहेब व बळवंतराव गणपत व जनकोजी शिंदे व मल्हारराव होळकर व दमाजी गाइकवाड व यशवंतराव पंवार व विठ्ठल शिवदेव व समशेरबहादर व इभ्रामखान गाडदी व आणखी सरदार सर्वत्र मिळोन मनसबा केला कीं, "कुतुबशहा व सैमदखान कत्तलखान. कुंजपुरियांत आहेत. यांजवर जाऊन त्यांचें पारिपत्य करावें. व कुंजपुरें याचा किल्ला खणोन टाकावा." ऐशी मसलत करून, मुहूर्त पाहून कूच दरकूच मजल दरमजल कुंजपुरिया नजीक लागले." त्यांचीही बातमी होती. सावध होते. तयार होऊन शहर सोडून फौजे सुद्धां बाहेर आले. त्यांची यांची गांठ पडली. त्यांजकडील यांजकडील तोफांचा व बाणांचा ऐसा मारा जाला [ कीं ] गर्दी होऊं लागली. मनुष्यास मनुष्य दिसनासे जाले. मोठी खणाखणी झाली. एक प्रहर पावेतों झाली. ते समयीं घोडियाचें तोंड आंत शिरेनासें जालें. ते समयीं भाऊसाहेब यांणीं बळवंतराव गणपत यांसि अज्ञा केली कीं, "तीन टोळ्या करून हल्ला करावा." त्याजवरून तीन टोळ्या केल्या. एका बाजूस समशेर बहादर व दमाजी गायकवाड व नारो शंकर व एकीकडे यशवंतराव पवार व इभ्रामखान गारदी निज्याम अल्लीपाशील, यांणीं एकीकडून चालून घेतलें[६१]. मोठी दोन घटिका पर्यंत मारामार जाली. कुतुबशहा कडील चांगले मनुष्य तितके शिकैस्त[६२] जाले. मग गनिमांनीं चोहोंकडून 'हर! हर!' म्हणोन" घोडे घातले. एकच धौशा केला. ते समयीं मोठी धुंदी जाली. बाहेरलें सामान माणूस गांवांत जाऊं पावलें नाहीं. तों चोहोंकडून तोडें लागून लांडगे-तोड झाली. मग चोहोंकडून हल्ला जाऊं लागली. ते दिवशीं मराठियांणीं कांहीं चित्तांत

---

(मागील पृष्ठावरून चालू.)
मग राहिले, दुराणी यांनीं मनसबा करून कमाऊच्या पहाडा नजीक यमुना उतरावी म्हणोन दोन दिवसांत ऐशीं कोस कच्चे पहाडाच्या सुमारास गेले. तों तिकडेही उतार सांपडेना म्हणून ते निवांत दोन रोज तिकडेच राहिले. कुंजपुरिया भोंवताल्या फौजा उभ्या राहिल्या. तों कुतबशहा व समदखान कत्तलखान आंत होता त्यांणीं कांहीं गांवांत सामान टाकून बाहेर निघावें तें न करितां झाडून सामान बाहेर काढून युद्धास तोंड लाविलें. बाहेरील गनिमांच्या तोफांचा व हस्तनाला व सुतारनाला व जजाला व बरखंदाज बाणांचा मार अतिशयें करून झाला तों ते थोडके आणि गनिमांच्या फौजा भारी. शिंदे होळकर यांजकडील त्यांणीं कत्तल फार वेळां केली होती यास्तव केवळ हे दांतनिकसीस आले. इभ्राम खान गाडदी निजाम अल्ली पाशील रहवाई त्याणें एकीकडून चालोन घेतलें-मोठाशी दोन घटकापर्यंत मारामारी झाली." खमाखाय = खचित, कांहीं होईना.

६१ येथपर्यंत तुगार प्रतीचा पाठ निराळा आहे. वर ६० ची टीप पहा.

६२ शिकस्त = पराभूत, मृत.

करुणा आणिली नाहीं. जितके हाता खालीं सांपडले तितके जिवें मारावयास आळस केला नाहीं. ते समयीं पांच सात हजार मनुष्य त्यांजकडील ठार मारिले. तैसेच घायाळ जाले. मुडदे घायाळांचे ढीग एकत्र जाहले. शहर पन्हा खालीं होता तो हल्यासरसे चढोन [घेतला] गावांत जाऊन गांवांतील चिर्धी चोळी केली. कुंजपुरियाची वस्ती अफाट होती. लूटही मुबलक सांपडली. नजीबखान रोहिला याचा व्याही व जांवई [असे] कुंजपुरियांत होते. ते हस्तगत जाले. धरून आणिले. इकडे कुतुबशाहा गायकवाड यांच्या फौजेंत जिता सांपडला. तैसाच सैमदखान कत्तलखान हो सांपडला. भाऊ साहेब व जनकोजी शिंदे व मल्हारराव होळकर एक जागां उभे होते. लुटीची गर्दी जाहाली. कोणी घोडे, कोणी उंटें, कोणी हत्ती व कोणी बैल असे ज्याचे दैवीं जैसें होतें तैसें सांपडले. दत्ताजी पडले ते समयीं जव्हाहिर गज हत्ती कुतुबशहा याजकडे सांपडला* होता तो कुंजपुरियांतच होता. तो अनायासें करून जनकोजी शिंदे यांजकडे सांपडला. ते दिवशींचा शिंदे याचा आनंद कोठवर वर्णावा ? असो.

इकडे दमाजी गायकवाड यांणीं कुतुबशहास हत्तीवर बैसवून भाऊसाहेब यांजकडे लावून दिला. पुढें दिवाणानें येऊन भाऊसाहेबांस सांगितलें कीं, " कुतुबशहा आह्मांकडे सांपडला. तो आपणाकडे घ्यावा" ह्मणोन सांगितलें. तों तोही नजीक येऊन पोंचला. त्याकडे पाहतांच भाऊसाहेब यांस उत्कर्ष रागाचा आवेश येऊन सर्वांगास रोमांच आले. बोलते जाले कीं, " या मात्रागमनियास एवढे प्रतिष्ठेनें कशास आणिलें ?" अशीं गाळी प्रदानें देऊन " हत्तीवरून लोटून द्यावा " म्हणोन बोलिले. तें कुतुबशहा याणें कानें ऐकून आपणच हत्तीवरून उडी टाकिली. धरून जवळ आणिला ते समयीं भाऊनीं त्यास विचारलें कीं, " आतां काय खबर आहे ती बोलणें." असें ह्मणतांच कुतुबशहा यानें चित्तांत विचारणा केली कीं, " आतां आपण यांच्या कवेंत सांपडलों. आतां अजीन † होऊन बोललों तर मला कोणी वांचवीत नाहीं. मग व्यंगोत्तर कां बोलावें ?" ह्मणोन प्रश्नोत्तर केलें कीं, " तुमचे चित्तांत काय मजकूर आहे ? तुह्मांस सल्ला करणें तर मजला वांचवावें. तुमचे इच्छेप्रमाणें दुराणी व रोहिला यांचा [व तुमचा] सल्ला करून देईन. हें न होय तर मजपासूनच पन्नास लक्ष रुपये घेऊन मुक्त करावें. तुम्हांस युद्ध करावयाची हिंमत असली तरि खंडणी घेऊन मजला सोडावें. आज पासून पंधरा दिवसांत पंचवीस हजार फौजेनिशीं तुम्हांशीं लढाई करावयास सिद्ध आहे." हें ऐकून मागती भाऊनीं विचारिलें कीं, " दत्ताजी शिंदे यांचा शिरच्छेद तुम्हींच के-

---

* मागें पृ० ७१।७२ पहा. | † अजीन = नम्र, गयावया.

ला कीं काय? " असें ऐकून कुतुबशहा याणें चित्तांत विचार केला कीं, "यांणीं हें वर्म काढिलें, तेव्हां आपणास प्राणानिशीं सोडीत नाहींत. आतां अधीन होऊन बोलणें हें मूर्खपण आहे." जाणून बोलतां जाला कीं, "आम्हीं आपला स्वधर्म केला. आमचे पुराणांत निश्चय आहे कीं, शत्रूचा शिरच्छेद करून, शीर भाल्यास टोंचून मग शहाजणें वाजवावीं. या प्रमाणें वर्तणूक केली." असें ऐकून भाऊसाहेब यांचे तळव्याची आग मस्तकास गेली. अंग रोमांच जालें, क्रोधाचा सीमासमुद्र डहुळला. आज्ञा केली कीं ढालेपाशीं[६३] नेऊन याचा शिरच्छेद करावा." हें ऐकून मल्हारराव व जनकोजी शिंदे यांणीं अर्ज केला कीं, "यास वांचवून याचे हातून महत्कार्य संपादून घ्यावें. यास मारलिया दत्ताजी शिंदे कांहीं उठत नाहींत." ह्मणून विवेक करून सांगितलें. परंतु भाऊसाहेब यांस विषाद-अग्न शमेनासा जाला. 'शिरच्छेद करावा' ह्मणून आज्ञा [ करून ] एकदांच तीन परवानग्या दिल्या. मग ढालेपाशीं नेला. तों कुतुबशहा याणें पाणी प्यावयास मागितलें, "आधीं पाणी पाजून मग शिरच्छेद करावा" [असें बोलला.] तेव्हां पाणी पाजावें हें विहित होतें. परंतु दत्ताजी शिंदे यांचें वर्तमान ऐकून सर्वांस विषाद सारिखाच, कोणास करुणा येईना. निष्ठुरपणें बोलिले कीं, "या मात्रागमनीस लघुशंका प्राशन करवणें." ऐसें बोलून तात्कालच शिरच्छेद केला. त्यास गोरगंपण[६४] प्राप्त जाला नाहीं. ढालांपुढें काक-जंबूक यांणीं खादला. तैसेंच सैमदखान कतलबान सांपडला तोही याप्रकारेंच मारिला. दोन्ही सरदार पंधरा हजार फौजेनिशीं[६५] मारिले.

उपरांत कुंजपुरियाचें वस्त्र हरण केलें. लूटही बेमुबलक ज्याचे दैवीं जैशी होती तैशी सांपडली. किल्यांत नजीबखान याचा व्याही व जांवई होता. तोही सांपडला. त्याचीं मुलें माणसें सांपडलीं. त्यांस द्रव्याचे आशेनें बोटास पलितें लाविलें कीं, "नजीबखान याची ठेव काय असेल ती दाखवणें." ह्मणोन फारच हाल केले. तेव्हां पंधरा लक्ष रुपयांची मालियत[६६] दाखविली. त्यांचे हाल या रीतीनें करून कैदेंत ठेविलें. भाऊसाहेब यांणीं मुक्काम तेथें करून स्वस्थ राहिले. कामाठी बेलदार असे लावून कुंजपुरियाचा किल्ला व शहरपना ढांसळून टाकिला. तेसमयीं भाऊसाहेब व बळवंतराव गणपत यांणीं यशप्राप्तीचा संतोष मानून परस्परें बोलते जालेकीं, "शिंदे होळकर यांणीं आम्हांस दुराणीची सलाबत[६७] घातली. ते दुराणी काय जाले?"

---

६३. ढालेपाशीं = निशाणापाशीं

६४ गो (र) कपन गोर-गपण = गोर कफन (?) पांढरा शेला मढमाती ह्या अर्थी.

६५ 'फौजेचे' तुं० प्र०

६६. 'माया' तुं० प्र०

६७. सलाबत=धाक, दरारा.

बळवंतराव यांणीं प्रत्युत्तर केलें कीं, " सुरंजेचे मुक्कामीं मी साहेबांस बोललों होतों कीं, शिंदे होळकर आम्हांस धुडावितात. परंतु गिलचे आम्ही कानें मात्र ऐकूं. परंतु दृष्टीस पडणार नाहींत. साहेबाचा पुण्यप्रताप थोर आहे." असें बोलून संतोष मानिला. तों शिंदे होळकर डेरियास आले. अर्ज केला कीं, "साहेबीं महत्कार्य करून यश संपादिलें. आतां कूच करून दिल्लीस जाऊन पोंचावें. यांत उत्तम आहे." असें ऐकून बळवंतराव यांणीं जाबसाल केला कीं, "सुभेदार, तुमचे आंगांत दुराणीचे शाहारे कां शिरले ? अद्यापि तुमचें भय कां जाईना?" असें ऐकून मल्हारराव यास विषाद आला. तो स्पष्टवक्ता, त्यास कोणाची परवा नाहीं. आणि आंगीं कृत्रिम हा नव्हते. "तुम्ही ब्राम्हण जात निर्बळ, कांहीं आकाश फोडून आलां नाहीं. पंचाननाची गांठ पडली नाहीं तों वर हें बोलणें बोलतां" ह्मणोन बोलून रागें रागें डेरियास गेले. भाऊंनीं त्यांचे बोलण्याचा त्रास मानून, दुराणीशीं फितूर म्हणोन विकल्प चित्तांत आणिला. असो पुढील होणार बलोत्तर, [त्यास] कोणाचाही यत्न नाहीं. ते समयीं दिल्लीस प्रविष्ट होते तर अवघड न पडतें. ते * कुंजपुरियास खणत्या लाविल्या आणि स्वस्थ राहिले.

इकडे नजीबखान व दुराणी यांणीं कुंजपुरियाचें वर्तमान, कुतुबशहा व सैमदखान कत्तलखान यांच्या शिरच्छेदाची वार्ता, ऐकून दांत ओंठ चावून थणगटें तोडूं लागले. "आतां जीव ठेवणें हें उचित नाहीं." ह्मणोनें सर्वत्रांनीं मसलत करून, तेथून कूच करून, कच्चे साठ कोस भूमि एक वेळ एक रात्र चालोन पाणिपत कर्णाल येथें यमुनेस गचक्या, उतार होता. तेथें पुढें हत्तीवर हस्तनाले व उंटावर सुतारनाले व बाणांच्या कैच्या अशा पुढें घालून, सडी फौज झाडून आलीकडे उतरली. मागोन तोफखाना व बुणगे झाडून उतरले. हें वर्तमान भाऊसाहेबांस कळलें नाहीं. ऐसा प्रकार अकस्मात् विघ्न उतरलें. इतकियांत पाणिपत कर्णोल्यांत भाऊसाहेबांचीं ठाणीं होतीं, तीं पळोन लष्करांत दाखल जालें. तेव्हां वर्तमान भाऊंस कळलें. तेसमयीं भाऊंनीं तमाम उमराव, मल्हारराव होळकर व जनकोजी शिंदे व दमाजी गायकवाड व यशवंतराव पवार व विठ्ठलराव शिवदेव व अंताजी माणकेश्वर व समशेर बहादर व इब्रामखान गारदी व

---

६८. "पुण्यप्रताप या प्रकारचा आहे" तु० प्र०

६९. 'कृत्रिम ही नवतें'–बखर लिहिणारा आतां असें म्हणतो. पण मागें मल्हाररावा विषयीं एतद्विरुद्ध त्याणें लिहिलेलें आढळतें.

७०. 'तोंच वल्गनाकारितां' तु० प्र०.

७१. अवघड=पुढील संकट, दुर्दशा.

* ते = परंतु, तें न करितां.

सोनजी भापकर [व] या वितरिक्त आणखी लहान थोर सरदार बोलावून विचार केला कीं, "दुराणी एकाएकींच यमुना उतरून अलीकडे आला. तस्मात् त्याचा जोरा भारी, तेव्हां उमेदीनें आला. आतां यास यत्न काय करावा?" हें मल्हारराव यांणीं ऐकून उत्तर केलें कीं, "हा विचार बळवंतराव यांस विचारावा. आम्हांस कांहीं मसलत सुचत नाहीं. आमची साठी बुद्धि नाठी जाली." म्हणोन बोलून कानावर हात ठेविले. तेसमयीं आणखीही कित्येक शाहणे तार्किक होते. त्यांणीं मसलत दिली कीं, "दिल्लीस जाऊन पोंचावें. म्हणजे बचाव होईल. परंतु निभावणी होऊन जाण्याची मसलत इभ्रामखान गारदी यास विचारावी." त्याजवरून इब्राम-खान यास विचारिलें. त्याणें मसलत दिली कीं. "तुम्ही देशचा मोंगलें बंदेगान[७२] अली याजप्रमाणें गोल बांधून चालिलां तरि तुमची निभावणी करून देईन. गनिमी कावा केला तरि मग आमचा यत्न राहिला." असें ऐकून तोच मनसबा प्राधान्य करून, कुंजपुरा सोडून, दिल्लीचे रोखें घालिले.

पुढें बातमीस बाजी हरी व भगवंतराव कदम व शिंदे यांजकडील येसोजी भोइटे असे पांच सात हजार लोक पाठविले. ते बातमीस निघाले. तेथून दुराणीची फौज पांच कोस होती. तेथें उभे राहिले. तों [७३]त्यांणीं हें दुःखें[७४] पाहिलें नव्हतें. अस्ताव्यस्त लोक गाशे टाकून झरझऱ्यां[७५] लावून बसले. कोणी घोडीं सजगुरियांत सोडून चारीत बसले व कोणी निजले. असें पाहून येसोजी भोइटे यांणीं जाबसाल केला कीं, "तुम्ही बातमीस आलां. तेथून गिलचे पांच कोसांवर आहेत. त्यास हें कांहीं देशाचे मोंगल नव्हत, जे तुम्ही स्वस्थ राहिलां. हे दुराणीची दौंड[७६] भारी. बेफाम राहूं नये." हें ऐकून सर्वांनीं त्याचीं हेटाळणी केली. हातावर हात मारून विनोद करिते जाले कीं, "शिंदे, होळकर यांचे फौजेनें दहशत खादली आहे. जे गोष्ट सांगतात ते हिंमत सोडून बोलतात." म्हणोन बोलतांच येसोजी भोइटे स्तब्ध राहिले. यांणीं आपला एक भला माणूस झाडावर टेहळ्या बसवून, आपण घोड्यावर स्वार होऊन, मजबुदीनें उभे

---

७२. बंदेगान इ०—हैदराबादकर हे देशींचे मोंगल.

७३. त्यांणीं = शिंद्याच्या लोकां शिवाय इतरांनीं.

७४. हें दुःख=गिलचा पुढें असतां अव्यवस्थित राहणें किती घातकारक होतें ही गोष्ट.

७५. झरझऱ्या=हुक्का किंवा त्याच्या लांब नळ्या.

७६. "दौड" नं० ५०

राहिले. तों एकाएकीं झाडावरील टेहळ्या सांगो लागला कीं, "तेथून दोन कोसांवर फौजेची गर्दी आली. धुराळे दृष्टीस पडूं लागले." असें म्हणतांच शिंदे यांजकडील लोक हुशार होऊन, गडबडून घोडियांवर स्वार जाले. आणखी एक वेळ यांसं[77] इशारत केली कीं, "घोडियावर जलदी स्वार व्हावें." मागती त्यांची मस्करी करून दम बांधून [हे] तसेच बैसले तों धुराळा दृष्टीस पडूं लागला. जवळ आले असें [पाहून] येसोजी भोइटे यांणीं जागा सोडून लष्कराचे रोखें पळूं लागले. तों एकाएकींच फौज दृष्टीस पडूं लागली. मग गडबड करून [इतर लोक] घोडीं संभाळावयास गेले. तों ज्याचें घोडें जवळ आणि [जो] सावध होता तो स्वार जाला. वरकडांस घोडीं प्राप्त होऊं दिलीं नाहींत. तों यांत येऊन [गिलचे] मिसळ जाले. त्यांची प्रतिज्ञाच कीं, सांपडले मनुष्य त्याचा शिरच्छेद करावा. असो. तेसमयीं बाजी हरी यांजकडील स्वार घोडियावर बसोन लष्कराकडे भरधांव पळों लागले. तों आंत गिलचे सरमिसळ जाले. लष्करच्या ढाला दिसत तोंपर्यंत सरमिसळ आले. ढाला पाहिलियावर दुराणी फिरोन गेले. तेसमयीं बातमीचे बाराशें स्वारांचीं लोकांचीं डोचकीं कापून नेलीं.

हें वर्तमान फौजेंत[78] कळतांच भाऊंची हिंमत दिल्लीस जावयाची होती ते राहिली. पाणिपत नजीक असल्यास तेथें रहावें ह्मणोन शोध केला. तों पाणिपत जवळ आहे असें समजलें. मग भोंवताले लष्कर उतरलें. भंवताला खंदक ह्मणून सभोंवताले आराबा[79] पसरून राहिले. फौजेचे तोंडावर इभ्रामखान गारदी राहिला. तेथून अबदुल अली व सुजाउद्दौला व नजीबखान रोहिला व अहमदखान लंगडा पठाण, अशी एक लक्ष वीस हजार फौज व तीनशें तोफा यमुनातीरीं तीन अडीच[80] कोशांवर उतरले. त्यांसही धास्त होतीच. एकाएकींच कांहीं गळां पडले नाहींत. परंतु गनिमाचे फौजेनें धास्त खाऊन कूर्मवत् आकर्षण करून राहिले. दुराणी भोंवताले कावे देत फिरों लागले. दाणा पाणी याची रसत[81] पोंचेनाशी जाली. सुरजमल्ल जाट हातीचें निधान गमाविलें. त्याची पहिलीच प्रतिज्ञा होती कीं, सरसाल तुह्मीं दुराणीशीं युद्ध केलें तरी पैसा शेर पीठ व

७७. यांस=इतरांस.

७८. "कळताच फौजेची छबी मावळली" तु० प्र०

७९. 'आराबा'=तोफखाना.

८०. 'ती चौ कोसावर' तु० प्र०

८१. रसत = दाणा वैरण इत्यादिकांचा पुरवठा.

हरभरेही तैसेच पूरवीन. तो असता तरि धान्यास अंतर न पडतें. असो. होणार बलोत्तर, ज्या काळीं जें होणें तें होतच आहे. या प्रकारें महिना पंधरा दिवस गोळागोळी होतच होती. तों दिवसें दिवस धान्याची महर्गता होत चालली. वैरणही नाहीं. घोडियांची शक्ति चालिली. तेसमयीं भाऊसाहेब यांस परम संकट भासलें कीं, " आतां निभावणी होणें कठीण आणि देशची कुमकही व्हावयाची नाहीं. आणि मी नानासाहेबांशीं प्रतिज्ञापूर्वक निघून आलों असतां, कुमक करा म्हणोन म्हणावें हें उचित नाहीं. असें जाणोन स्तब्ध राहिले.

हें वर्तमान विश्वासराव यांणीं ऐकिलें. त्याजवरून त्यांणीं जनकोजी शिंदे यांसि एकांतीं बोलावून विचार पुसिला कीं, " भाऊसाहेब तो. अभिमानानें पेंचांत आले. मनसबा तो भारी पडला*. निभावणी व्हावयाचा प्रकार राहिला. भाऊसाहेब तों अभिमानी पुरुष. [तर आतां] नानासाहेब यांस निदानचें पत्र लिहावें." म्हणोन मनसबा करून विश्वासराव यांणीं बापास पत्र लिहिलें कीं, " गिलचे यांचा पेंच भारी पडला. निभावणी व्हावयाचा प्रकार राहिला नाहीं. भाऊसाहेब तों अभिमानी पुरुष, यांतच गर्द होतील परंतु व्यंगोत्तर लिहिणार नाहींत. यास्तव संकटांत आणखी पन्नास हजार फौज व क्रोड रुपये खजिना असें पाठवितां तरि तुमचीं आमचीं दर्शनें होतील. नाहीं तर पत्रीं लिहिलें हा भेट समजावी. नानासाहेब, आम्हांसारखे तुम्हांस पुत्र आहेत व आणखींही होतील. परंतु भाऊंसारखा बंधु मिळणार नाहीं." म्हणून भाऊसाहेब यांस कळूं न देतां पत्र लिहिलें. हें वर्तमान कर्णोपकर्णीं भाऊसाहेब यांणीं ऐकून, जनकोजी शिंदे व विश्वासराव यांस एकांतीं बोलावून, क्रोधें संतप्त होऊन बोलिले कीं, " तुह्मांस जीव निभावणें असेल तर उत्तम आहे. अजुनी लावून द्यावयास फुरसत आहे. हर यत्न करून तुम्हांस दिल्लीस पावते करितों. तेथून पांच हजार फौज घेऊन देशास जाणें. आमची आस्था धराल तरि आमचीं शंभर वर्षे पूर्ण भरलीं. " या प्रकारें निष्ठुर वचन ऐकून विश्वासराव यांस असें जालें कीं, अंगावर कडा कोसळतो, कीं मस्तकीं विद्युल्लता पडते. ऐसा प्रकार होऊन अधोवदनें तटस्थ राहिले. मर्यादेची सीमा उल्लंघेनाशी झाली. तेसमयीं जनकोजी शिंदे यांणीं उत्तर केलें कीं, " भाऊसाहेब, तुह्मीं हा चित्तांत अंदेशा काय आणिला ? अशा

---

* अवघड प्रसंग येऊन ठेपला.

८२. " संकटार्थ आणि [क] पन्नास हजार फौज " तुं० म०

समयास वडिलांस न लिहावें तर मग शत्रूस लिहावें कीं काय ?" हें ऐकून मागती भाऊंनीं उत्तर केलें कीं, "जें दैवीं असेल तें होईल. अतःपर तुह्मीं पत्र लिहिण्याचे वाटेस न जावें." म्हणोन साफ सांगितलें. त्यांनीं हो मान्य केलें. पायांवर हात ठेविला कीं, "या उपरि आम्ही पत्र लिहिणार नाहीं."

या प्रकारें दिवसें दिवस गनीम जेरीस येत चालिले. आणि शत्रु भर घेत चालिले. जामदारखानियांतील पैसा[83] कुल खालीं जाला. गोविंदपंत बुंदेले खजिना आणावयास बुंदेलखंडांत पाठविले होते. त्यांणीं कांहीं दिवसगत लाविली. म्हणोन त्यांजवर कोपायमान होऊन ढालाइत* व दहा हजार रुपये मसाला[84] करून पाठविले. मग गोविंदपंत बुंदेले यांणीं वीस लक्ष रुपये घेऊन [ते] दिल्लीस आले. तो खजिना आणोन दिल्लीस टाकिला. परंतु लष्करांत पोंचेना. रुपयांचा तोटा आणि धारण पांच शेर, सात शेर जाहली. यत्न नाहीं. मग भाऊंनीं विचार केला कीं, "अंतरवेदप्रांतीं फौजा पाठवून भागीरथीचे पुलावरून दुराणीस रस्त येती ती मना करावी." ह्मणोन मनसबा करून गोविंदपंत बुंदेले व पाराजीपंत वाघ यांस हातरोखी[85] वरचेवर पाठवून अति आग्रहें अंतरवेदींत घालविले. गोविंदपंत यांचे अयुष्याची सीमा सरत आली. म्हणोन त्यांस तैसाच बुद्ध निर्माण जाली. तारखी पारखीनें[86] रहावें तें न करितां मुक्काम करीत खंडण्या घेत चालिले. ते जैता गुजरें[87] याणें तिकडील सूत्र ठीक करून गोविंदपंत यास खंडणीचे नादीं लावून गोंविलें. तों नजीबखान रोहिला याचा सासरा व दुंदेखान रोहिला व उमरावगीर सुजाउद्दौला याजकडील व अहमदखान लंगडा याचा भाऊ ऐसे पंधरा हजार फौज निवड करून गोविंदपंत बुंदेले याजवर † पाठविले. अविंधानीं मोंगलाई मसलत करून, होळकराचीं निशाणें लावून गेले. तों गोविंदपंत यांणीं दुरून पाहिलें. फौजेची गडबड जाली. जीनबंदी लोकांनीं केली. तों जात्या‡ आपण उठेनात. ते लोकांस म्हणों लागले कीं, "नारो शंकर यांची फौज आली, निशाणें त्यांचींच आहेत." असें म्हण-

८३ 'रुपयेफारिक झाले' तु० प्र० फारिक=खलास,

* ढालाइत = ढाल बांधलेले शिपाई, परिचारक.

८४. मसाला=बहुलास पाठविलेल्या लोकांस त्या कामाबद्दल जो पैका घेण्याचा हक्क आहे तो पैका.

८५. हातरोखा=आज्ञापत्र. हातचें पत्र.

८६. तारखी पारखी=हुशारी, सावधपण.

८७. जैतागुजर—पृ० ५२ पहा. या गिराशानें मराठ्यांस भागिरथीस उतार दाखवून दिला होता. परंतु आतां तो मुसलमानांकडे सामील होऊन गोविंदरावाचा त्याणें नाश केला.

† 'अताईखान यास पाठविलें' मां. ड०

‡ जात्या = स्वतः, खुद्द

तात तों तेजवळ दम बांधून येऊन एकाएकींच यांजवर अविंधानीं घोडे घातले. तेसमयीं गोविंदपंत यांणीं गडबड करून पळों लागले. तों ते मरमिसळ यांतच जाले. गोविंदपंत यांस घोड्यावर बसावयाचा सराव योडकाच होता. कोस अदकोस पळाले तों गोविंदपंत बुंदेले घोडियावरून खालीं आले. तेवेळेस कोणी मातबर* मनुष्य होते त्यांणीं दम बांधोन, घोडियावरून उड्या टाकून घोडियावर घातले. पुढें आणखी कोस पर्यंत संभाळीत गेले, तों त्यांची दाटी भारी जाली. तमाम शिरें कापीत सुटले. तेवेळेस मागती गोविंदपंत घोडियावरून खालीं आले. तेव्हां पाय जायां जाला. उठावयाची ही हिंमत हरली. लोकांस उडी टाकून काढावयासि अवसान पुरेनासें जालें. जवळ पुत्र होता तो टाकून गेला. तेथें दुसरियावरि शद्व काय ठेवावा ? ते समयीं त्यांस गोविंदपंत पाडव सांपडले. त्याशांच्या गाठी पडल्या. त्यास गोविंदपंत अजीन होऊन बहुतकरून काकुळतीस आले कीं, "मजला प्राण-दान देणें, क्रोड रुपये देतों." ह्मणोन बोलिले. तेव्हां ते केवळ दैत्य, त्यांस करुणा कैंची? तात्काळ शिरच्छेद करून, धड तेथें टाकून शीर घेतलें. ते समयीं दीड हजार मराठियांचीं शिरें कापिलीं. 'मुरगी मारी बचडे दाणादाण' तैसे जिकडील तिकडे पळाले. मग त्यांणीं गोविंदपंत बुंदेले यांचें शीर घेऊन, आपले फौजेंत गेले. नजीबखान रोहिला याणें परम संतोष मानून, रुमालांत शीर घेऊन अबदुल अलीस नजर केलें. याप्रमाणे मित्रत्व गोविंदपंत यांचे कामांसें आलें.

इकडे भाऊसाहेबांकडील वर्तमान तरि लष्करांत महागाई झाली. भोंवताले गिलचे फिरों लागले. दाणापाणियांची रस्त फौजेंत पोंचेनाशी झाली. आणि जामदारखान्यांतील खजिना कुल खालीं जाला. अन्नदुष्काळ आणि दामदुष्काळ, दोन्हींस ऐक्य जालें. मनुष्यास अन्नाचें [१०]खोबरें जालें. दिवसामध्यें मनुष्यास अर्धे पाव भाकर मिळेनाशी जाली. तेथें हत्ती घोडे यांचा विचार काय पहावा ? लष्कर केवळ जेरीस आलें. घोडे मनुष्यांची हिंमत हरली. तमाम फौजेंत निरवानिरव होऊं लागली. कोणास जगून

---

* मातबर= शूर, धीराचे सरदार.

८८. "काढावयाचीं अवसानें पुरेनाशीं झालीं" पृ० ४०

८९. 'मित्रत्व कामास आलें' ही व्याजोक्ति नजीबखानाचा गोविंदरायानें पूर्वी बचाव केला होता ही गोष्ट ध्यानांत आणिली म्हणजे नीट समजेल. मागें पृ० ४४ ओळ २३ पासून पहा.

९०. खोबरें जालें = खोबऱ्याप्रमाणें अन्न दुर्मिळ झालें ? असें ह्मणण्याचा प्रघात प्रथमतः देशावर पडला असावा.

९१. 'अर्धपोटीं मिळेनाशी झाली' पृ० ४०

जाऊं असा भरवंसा नाहींसा जाला. ते समयीं भाऊसाहेब यांणीं प्राणांत-समय जाणोन आपले जागां विस्मय करिते जाले कीं, "आह्मी गनीम, [आह्मीं] मोंगलाचें अन्न पाणी बंद करावें. तें न करितां आमचाच आटा बंद जाला. तेव्हां सर्व उपाय राहिला. देशींहून कोणी कुमक करावी, तेही आस्था राहिली. समागमें मुलें मनुष्यें आणिलीं एवढें वाईट केलें. असो. 'आप मेला जग बुडाला' ज्याचे दैवीं [जें] असेल तें घडेल" ह्मणोन मनांत चढ उतार करूं लागले. परंतु बाहेर व्यंगोक्ति शब्द बोलेनात. लष्करांत सोनियाचीं कडीं व रूप्याची जितकी चीजवस्त होती तितकी मोडून, एक शाळा घालून, भाऊशाई व मल्हारशाई व जनकशाई तमाम मोहरा व रुपये केले. तरी पैसा पुरेनासा जाला. मोठ्या संकटें लमाणाची खेप आली तरि पांच शेर सात शेर धारण जो आधीं जाईल त्यास मात्र मिळत होती. नाहीं तर पैसा पदरीं असोन दाणा मिळेनासा जाला. तेसमयीं जाट बरोबर असता तर अन्नपाणियाची कमती न पडती. दिल्लीस खजीना सरकारचा व शिंदे होळकर यांचा चाळीस लक्ष रुपये रोख व शिवाय कापड होतें. परंतु लष्करांत पोंचेना.

तेसमयीं गोविंदपंत बुंदेले यांचा पुत्र व पाराजीपंत वाघ असे भग्न फौज घेऊन दिल्लीस होते. त्यांस भाऊंनीं रागास येऊन पत्रें लिहिलीं कीं, "खजिना घेऊन येणें." त्याजवरून पाराजीपंत यांणीं दीड हजार घोडा खासे खासे मनुष्य निवड करून, घोड्यावर पांचशें रुपये ओझें घालून सूर्यअस्ताचे समयीं निघाले. ते कडनिकड करून कच्चे चाळीस कोस भुई [चालून] चार घटिका रात्र आहे तों लष्करापासोन दोन कोसांवर दाखल झाले. तों तेच दिवशीं दुराणीची फौज जोंगा[12] सोडून दिल्लीचे र-स्त्यावर येऊन राहिले होते. हें वर्तमान पाराजीपंत यांस ठाऊक नव्हतें. आणि येणें-जाणियास अनाभ्यासी होते. त्यास लष्करा नजीक येतांच असें भासलें कीं, लष्करा नजीक पोंचलों. ह्मणोन आपण दूर उभे राहून गोठ कोणाचा म्हणोन पुसावयास पाठविलें. तो गोठ सुजाउद्दौला याचा होता. कोणाचा गोठ म्हणोन विचारतांच त्यांणीं कृत्रिमपणें सांगितलें कीं, "गोठ इभ्रामखान गारदी याचा आहे." असें ऐकतांच लोक [यांचे] केवळ थंडी-नें हात पाय आखडले होते. हिमाचल नजीक यास्तव शीत[13] भारी. पाणी गोठतें[14]. तेथें वरकड गोष्ट काय सांगावी? त्यांतही सावध पुरुष होते त्यांणीं

१२. 'यमुना सोडून' तु० प्र०
१३. 'हिंव' तु० प्र०
१४. "पाणी गार येत होतें" तु० प्र०

दम राखोन [ते] दूर उभे राहिले. गुडगुडीचे तलबी होते त्यांनीं शेंपन्नास लोकांनीं घोड्यांवरून उतरून हातांत गुडगुड्या घेऊन त्यांचे गोठांत शिरले. तों एकदांच "लेव! लेव!" म्हणोन पुकार झाली. जे घोडिवर सावध होते, ते निघोन गेले. आणि तलबे गुडगुडीचे होते ते त्यांजकडे तमाम हस्तगत झाले. त्यांत त्यांणीं एकास सोडिलें नाहीं. तमाम शिरें कापीत मारामार केली. त्यांचीं घोडीं व त्याजवरील खजिना झाडून गेला. वरकड पाराजीपंत वाघ व हजार नऊशें स्वार[९५] आड वाटेनें लष्करांत जाऊन पोंचले.

त्याजवर तेच दिवशीं कचेरीस शिंदे, होळकर व दमाजी गायकवाड व आणखी थोर थोर सरदार होते. तों बळवंतराव गणपतराव यांणीं शिंदे होळकर यांजवर आरोप ठेवून कुरापत काढिली. बोलते जाले कीं, "शिंदे होळकर एवढे लंढते[९६] सरदार असतां त्यांची केवळ हिंमत हरली. वेजीं उतरलीं.[९७] यांची गत अशी होऊन गेली. आम्ही हिंदुस्थानांत आलों या अर्थं ध्यानांत आणीनात*. असें दिसून आलें." या प्रकारें दुरोक्ति शब्द बोलिले. तें मल्हारराव यांणीं हास्य विनोदावर नेलें. तों जनकोजी शिंदे यांस [ती] गोष्ट सहिली नाहीं. भाऊसाहेब जवळ असतां ऐसा जाबसाल केला कीं, "बळवंतराव, तुम्हीं काय पाहिलें? आमची हिंमत हरली [ह्मणतां पण] तुम्हीं दिग्विजय कोणता केला? असो. तुह्मांस आमचा तमाशा पाहणें तर उदयीक आम्हीं युद्ध करितों." म्हणोन जिदेची[९८] जाबसाल करून, तेसमयीं मुजरा करून उठोन चालिले. भाऊसाहेब यांणीं होकारूनें[९९] पाहिलें. तों यास विषाद प्राप्त होऊन, रागें संतप्त [होऊन] डेरियास आले. तमाम फौजेंतील सरदार बोलावून सांगितलें कीं, "यार हो, आतां जिदेचा मजकूर आहे. मारतां मारतां मरावें हें उत्तम, परंतु वारंवार भग्न फौज घेऊन जाणें हें मूर्खपण." म्हणोन फौज सावध करून, प्रातःकाळीं चार घटिका रात्र आहे तों नगारा करून, जेवून खाऊन, दिवस उगवतांच खंदक सोडून बाहेर आले. मल्हार-

---

९५. "पाराजीपंत वाघ व दोन तीनशें स्वार" धा० प्र० "वाघ व लोक दोन कोस आड वाटेनें" तुं०प्र० वरील पुणें प्रतीच्या पाठान १०००।९०० आहे तेथें २।३ शें असावेंसें वाटतें.

९६. "एवढे एवढे सरदार" पु० प्र०

९७. "वेजीं उतरलियाची गत दिसोन आली." = जुने झाल्याची, पाणी उतरल्याची स्थिती दिसते. धो० प्रतीचा पाठ आहे तो असा "ओझें घेऊन वीस कोस माणूस चालून उगीच बसतें ती गत होऊन बसली."

* ह्या अर्थं इ०=आम्ही आलों ह्मणून मनावर घेत नाहींत.

९८. जिदेचा= जिद्देचा = हटतटाचा, ईर्ष्येचा.

९९ "भाऊ साहेब यांणीं स्नेहानें बोलावू पाठविलें. तों मजरा झाला आतां बसावयाचें नाहीं म्हणोन गेले. विचार पाहतां शिंदे यांस विषाद" इ० धो० प्र०

राव यांस सांगून पाठविलें कीं, “तुम्हीं फौज सिद्ध करून बाहेर निघावें. मल्हारराव यांस भाऊसाहेबीं ताकीद केली होती कीं, “जनकोजी शिंदे हे मूल आहेत. त्यांणीं उतावळी केली तरि त्यांस काकुलपणें* सांगून पहावें. आणि तुम्हीं न जावें.” असें सांगितलें होतें. त्याजवरून त्यांस आड-विहीर जाली. “आपण जावें तर भाऊसाहेब रागास येतील. न जावें तर पांढरे केसांस बोल लागेल.” असें जाणोन खासा आपण राहून, संताजी वाघ व गोविंदपंत बुंदेले यांचा पुत्र व भानराव बारगळ असे पांच सात हजार फौज तयार करून एका बाजूस उभे राहिले. हें वर्तमान भाऊसाहेब यांणीं ऐकून बळवंतराव गणपतराव यांस आज्ञा केली कीं, “हुजरातीची फौज सिद्ध करून जनकोजी शिंदे यांची कुमक करावी. त्यांचे वडील आमचे सेवेवर कामास आले. तो वंश एवढाच राहिला आहे. तोही तुह्मी वचनानें पोळून इरेस घातला. हें उत्तम नाहीं. सत्वर कुमक [१]करणें” ह्मणोन आज्ञा करून बळवंतराव गणपतराव तयार करून वाटेस लाविले.

इकडे वर्तमान मोंगलास कळतांच नजीबखान रोहिला व अहमदखान लंगडा पठाण व कांहीं सुजाउद्दौला याजकडील फौज व कांहीं दुराणीकडील, असे निवडक फौज सिद्ध करून समागमें दहा पंधरा तोफा घेऊन आपली फौज सोडून एकांगीस[१] यावें याजप्रमाणें बाहेर आले. उभयतां दळें सन्मुख दृष्टीस पडों लागलीं. आधीं दुरूनच तोफा व बाणांचा मार होऊं लागला. तिसरा प्रहरपर्यंत याजप्रमाणें झालें. तों होळकराकडील संताजी वाघ वगैरे यांणीं गनीमी काव्यानें त्यांजवर उठले. हुतुतूची घाई घडीभर झाली. तो त्यांचे पाठीवर रोहिले व दुराणी वेलाशक उठले. तेसमयीं संताजी वाघ यांणीं आपले बाजूस निघावें [ पण ] त्यास दम पुरला नाहीं. शिंदे यांच्या फौजेचे आश्रयास आले. तों दुराणी व रोहिला शिंदे यांचे फौजेवर आदळले. तों जनकोजी शिंदे आधींच इरेस पडले होते. तेसमयीं त्यांणीं आपला नेम फौजेंतून आधीं उठोन हाणावें, उष्टे झुंजास शिवूं नये, ऐसा मजकूर होता, तो सर्वांचे अनुमतें सोडून फौजेचे पाठीवर खासा आपण व तमाम लबेचे[२] खिजमतगार व जासूद व चोपदार व भालदार व कारकून यांणीं हातांत

---

* काकुलपणें = वडीलपणें.

१००. हें भाऊचें बोलणें तुगार प्रतीत मात्र नाहीं. नदर चुकीनें तें लिहिवयाचे राहिलें असावें.

भाऊंच्या या बोलण्यावरून पेशव्यांस सरदार लोकांचें ‘आगत्य’ होतें कीं नव्हतें, हें स्पष्ट दिसतें. मागें पृ० ७६ टीप ६४ पहा.

१. ‘एकांतीस’ तुं० प्र० ‘एका अंगास’ धो० प्र० एकांगीस येणें = एकीकडे स्वतंत्रपणें उभें राहणें ?

२. लबेचे = निरोप पोंचविणारे.

काढ्या घेऊन फौजै[3] घालवून लाविली. उभय दळें एकमेकांस आदळलीं. वरकड रसालियाचा मार राहिला. तरवारीची खणाखणी जाहली. पूर्वीं जैसे मारामारी रामायणीं राक्षस आणि वानर, किंवा भारतीं कौरव पांडव यांचें सैन्य, या प्रकारें समारंभ जाहला. गनिमाचे फौजेंतील भले लोकांनीं तोंड माघारें केलें तरि काठी मारीत. शिपाई लोकांस एकीकडे आड एकीकडे विहीर, ऐसा प्रकार जाला. लोकांस 'लेजेदे दान जेलेदे प्राण' तैसें घडलें. दोन्हींही दळें हटेनात. उभयतां फौजेमध्यें अंतर, हात थोडा दूर, त्यांत त्यांस हिंमतें[4] त्यांणीं उठोन हाणावें. मोंगलांकडील विशेष चमत्कार वर्णावा तर त्यांचा सहजच स्वभाव, ते असुरचे[5]; परंतु मराठियांणीं ते दिवशीं शर्थ केली[6]. तों सायंकाळ होत आला. तेसमयीं बळवंतराव गणपतराव यांणीं कुमक केली असती तरि तेच दिवशीं नांम्राचा पराभव जाला असता. बळवंतराव यांचे चित्तांतील मनसबा कीं "शिंदे होळकराचे फौजेनें धास्त खादली आहे. दुराणी पुढें यांस दम निघणार नाहीं." ही खातरजमा चित्तांत आणून आपळे जागियावर तमाशा पहात उभे राहिले. ही फौज नामोहरम[7] जालियावर आपण पुढें घोडे घालून मारामार करावी. याअर्थे दम खाऊन राहिले. तों ते दिवशीं शिंदे केवळ इरेस पडले. रण सोडून माघारे हटेनात. तों सायंकाळ व्हावयास आला. मग शिंदे यांजकडील फौजेनें उतार व्हावा तैसा मार देत देत [ गिलचा ] माघारा सारून त्याचे गोटांत घातला. त्यांचे गोठाचा खंदक होता तेथपर्यंत घालवून तोफा देखील सोडविल्या. दोन चार ओढून आणिल्या. थोर तोफा ओढेनात त्यांचे कानियांत खिळे मारिले[8]. तों केवळ अंधार पडला. मग जनकोजी शिंदे फौजेसह माघारे फिरले. पांच सातशें मनुष्य घोडे ठार पडले. तैसेच जायां जाले. ते दिवशीं रोहिले व दुराणी हजार संख्या मनुष्य ठार जाले.

याप्रमाणें यश संपादून जनकोजी शिंदे शहाजणें वाजवीत गोठास चालिले. तों भाऊसाहेब आडवे आले. तों बळवंतरावही येऊन पोंचले. जनकोजी शिंदे यांज-

---

३ 'होळकचांरी फौज' धों० प्र०

४. 'अंतर हिंमत' पु० प्र०

५. 'ते प्रत्यक्ष असुरच' पाठांतर.

६ 'मराठियांची शर्थ झाली' पाठांतर.

७. नामोहरम = पराभूत.

८. 'सायंकाळ झाला. मशाळा लागल्या. तेव्हां शिंदे यांणीं एकवेळ हर हर म्हणोन एकदांच उठावणी करून * * तसा मार देत देत त्यांचे गोटात नेऊन घातले. तमाम लष्कर याचा कल्होळ होऊन तमाम बुणगे पळों लागले. तोफा शिंदे यांणीं सोडविल्या. तोफा भारी, माणसांनीं वाहेनात. तोफाचे बैल घेऊन गेले होते. * * अपरात्र झाली माणसास माणूस ओळखेनासें झालें, ते समयीं चार तोफा आणिल्या." धों० प्रतीचा पाठ.

कडे बळवंतराव आले. तेसमयीं जनकोजी शिंदे यांस क्रोधाचा आवेश येऊन गाली-प्रदानें केलीं कीं, "तुमचे चित्तांत आमची फजीती व्हावी असें होतें. परंतु ईश्वरसत्ता प्रमाण. आम्ही सेवेशीं चोर नव्हत. सेवेशीं चोर असतों तरि ईश्वर आम्हांस यश न देता. कौतुकें तुमचे दृष्टीस पडतें." ह्मणोन बोलतांच भाऊसाहेबीं त्यांस चार गोष्टी सांगून शांतवन केलें. डेरिया पावेतों आले. समाधान करून भाऊसाहेब आपले डेरियास गेले. जनकोजी शिंदे यांजकडील भले मनुष्य ठार पडले होते. गोरेंकंपणेंची साहित्य करून त्यांचीं सार्थकें केलीं. तों बळवंतराव गणपत यांस वाईट वाटलें. "गोष्ट आपणाकडे आली. आमचा घात आम्हींच केला. करावयास गेलों एक आणि जाहलें एक." असें अवघड मानून स्तब्ध राहिले. इकडे दुराणी अबदुल अल्ली व रोहिले व सुजाउद्दौला यांणीं हें युद्ध जालियावर शिकस्त खादली होती. आपले जागां मोंगल दगावले होते. त्यांतच [मराठ्यांनीं] कूच केलें असतें तर त्यांस गळां पडावयाचें सामर्थ्य नव्हतें. पुढील होणार भवितव्य. मागती दम खाऊन ठिकाणींच राहिले.

एक दोन दिवस राहिले तों इकडे गोविंदपंत बुंदेले यांचें शीर कापून नेलें होतें [ते] शीर व वकील पत्रें भाऊसाहेब यांजकडे पाठविलीं कीं, "तुमचे गोविंदपंत पुढें तुह्मांस स्वर्गीं जागां पहायास गेले आहेत आणि तुम्हांस न्यावयासि शीर पाठविलें आहे. होय न होय हें पहावें." म्हणोन तें शीर व पत्रें भाऊसाहेब यांजकडे वकील घेऊन आले. रुमालांतून शीर पुढें ठेवून पत्र हातीं दिलें. भाऊसाहेबांहीं पत्रें वांचून पाहून त्यांतील गर्भभाव ध्यानांत आणिला. गोविंदपंत बुंदेले यांचें शीर ओळखिलें. तेसमयीं कचेरीस लहान थोर सरदार होते त्यांच्या मुखश्रिया उतरल्या. तमाम लष्करांत खबर कळतांच फौज थोडी बहुत हिंमत धरून होती त्यांचीं अवसानें गेलीं. इकडे भाऊसाहेब यांणीं पत्राचें उत्तर दिलें कीं, "तो जागा सर्वत्रांचा आहे. त्याशिवाय दुसरी गति कोणती आहे? प्रस्तुत तुम्ही थोर, खंदाराचे पातशाहा, तुम्ही तेथें जाल तेव्हां तुमचे स्वरूपाप्रमाणें मान जाला पाहिजे. म्हणोन तुमचे मेजवानीस पुढें गोविंदपंत बुंदेले साहित्यास गेले आहेत." म्हणोन उत्तर दिलें. शीर होतें तें ठेवून घेतलें. त्यास अन्न-प्रसाद दिला.

त्यास पंधरा दिवस रोज जाले. लहान थोर ह्मणों लागले कीं, "शिंदे यांची

१. 'केवळ' पु० प्र०

१०. म० मार्ग पृ० १०२ टीप ६४ पहा.

कुमक बळवंतराव यांणीं केली असती [तर] गोष्ठ फत्ते होती. कुमक न करून मसलत बुडविली." हें ऐकून बळवंतराव यांस आवेश आला. पृथक् युद्ध करावें ऐसा चित्तांत मनसबा करून, भाऊसाहेबांकडे जाऊन अर्ज केला कीं, "शिंदे यांणीं युद्ध केल्यावर दुराणींनीं शिकस्त खादली होती. त्यास गोविंदपंत यांचें शीर कापून आणल्यावर मागती गिलचे शेरें[११] जाले. भोंवताले फिरों लागले. रस्ता* मना झाल्या. त्यास आतां मजला आज्ञा करावी. मी हुजुरात घेऊन एक वेळ युद्ध करितों." ह्मणून बहुतच अतिशय केला. भाऊसाहेब यांणीं दुराग्रह जाणून तमाम हुजुरात व लहान थोर सरदार यांसि आज्ञा केली कीं, "बळवंतराव जरीपटका घेऊन युद्धास जातात. तुम्ही फौज सिद्ध करून युद्धास जाणें" म्हणून ताकीद जाली. तों वरकड सरदार बहुत करून कोणी निघाले नाहींत. शिंदे होळकर मात्र इरेनें फौज सिद्ध करून [१२]ऐके बाजूस उभे राहिले. बळवंतराव यांणीं हुजुरात सिद्ध करून † त्यांस चिटी पाठविली कीं, "आपण बाहेर निघालों." चित्तांत विचारणा केली कीं, "यश प्राप्त जालें तरिच भाऊंस तोंड दाखवावें, नाहीं तरि तिकडेच मरावें." अशी योजना करून, निदान समय जाणून बळवंतराव आपले कुटुंबांत गेले. समागमें स्त्री व आपाराव होता. स्त्रीशीं जाऊन बोलिले कीं, "ईश्वरें यश दिलें तरि उत्तम, नाहीं तरि पुनः तुमची आमची भेट स्वर्गी होईल." म्हणोन डोळियांस पाणी आणून निरवानिरव केली. तों बळवंतराव याची स्त्री महा-पतिव्रता होती. तिणें जाबसाल केला कीं, "उत्तम आहे. शत वर्षांत केव्हां तरी मरावें, त्यास या समारंभांत मुक्तता जाली तरि उत्तम जालें. त्याची क्षीत कशास करावी." म्हणोन समाधान करून बोलती जाली कीं, "तुम्ही लौकीक करून गेलां तरि मीही वांचणार नाहीं. तुमची सांगातीण होईन." म्हणोन बोलिली. मागती बळवंतराव यांणीं उत्तर केलें कीं, "आपाराव मूल नेणतें आहे. समागमें येणें उचित नाहीं. हें ऐकून स्त्रीनें उत्तर दिलें कीं, "त्याचे प्राळब्धीं असेल तैसें घडेल. त्याची आस्था कशास पाहिजे?" म्हणोन परस्परें बोलून बाहेर आलीं

[नंतर] नगारा करून, फौज सिद्ध करून, खंदक सोडून निघाले. तों दुराणी व रोहिले यांची फौज ते दिवशीं भारी चढून आली. बळवंतराव व गिलचे यांचे युद्धास तोंड लागलें. मोठा प्रलय जाला. इरेचें काम, बहुतच कडनिकड केली. परंतु रोहिले व दुराणी यांणीं केवळ आगीनें भाजून काढि-

---

११. शेर (वाघ), = जबरदस्त.

* रस्त — धान्यादिकांचा पुरावा.

१२. 'आपले बाजूस' पाठांतर.

† 'गिलच्यास' धो॰ प्र॰

लें. धुराची व रेतीची व धुरळियाची गर्दी जाली कोणास कांहीं दिसेनासें जालें. उभय दळांतील यंत्रांचा एकच भडिमार झाला. घोडीं मनुष्यें धुंद जालीं. तो प्रळय मराठियांस सोसेनासा जाला. गनिम गोटाचे सुमारें तडक पळों लागले. त्या धुरळियांत गर्दींत शिंदे, होळकर यांस कांहीं दिसेनासें जालें. फौज पळोन धमधमियापावेतों[13] आली तों शिंदे होळकर यांजवर मागून उमाळे[14] गोळ्या पडूं लागल्या. तों तशांत कांहीं वायु सुटला. त्यानें धुराळा मना जाला. पाहतात तों रोहिलियांचीं धमधमियाशीं निशाणें जाऊन पोंचलीं. धमधमियाशीं गेलियावर बळवंतराव यांणीं तोंड काय दाखवावें? म्हणोन माघारे फिरोन मारामार केली. दुराणी व रोहिलियाचे तोंड थोपून राहिले. तैसेच पळाले असते तरि दुराणी येऊन गोटांत शिरते. तशांत एकाएकींच बळवंतराव यांचे आयुष्याची दोरी स्वर्गींची तुटली. आयुष्याचा संग्रह सरला म्हणोन कुटुंबाचा ऋणानुबंध पुरला. आयुष्याची मर्यादा जाली. म्हणोन गोळी लागोन घोडिया खालीं आले. तों दुराणीची गांठ पडली. त्यांणीं बळवंतराव यांचें शीर कापायास उरावर पाय देऊन गळ्याची घाटी सोडविली. तों हें अनुचित पाहून खंडेराव नाईक निंबाळकर[15] यांणीं केवळ सती पडतात तैसेच त्या मुरद्यावर जाऊन वर्षले. शिपायगिरीची शर्त करून मुर्दा सोडविला. शीर कापूं दिलें नाहीं. निदान खानदान* मनुष्य याप्रमाणें कामास येतें. खंडेराव नाईक यांस जखमाही लागल्या, परंतु शीर कापूं दिलें नाहीं. असो त्यांणीं क्षत्र धर्माची यथास्थित पुरवून दिली. तों धुराळियाची गर्दी निघून गेलियावर एकाएकींच रोहिलियांचीं निशाणें धमधमियापाशीं आलीं, [होतीं] तीं शिंदे होळकर यांचे दृष्टीस पडलीं. मग शिंदे होळकर यांणीं मध्यें घोडीं घालून अगदींच खांडेवा[16] तोडिला. पांच हजार रोहिला पाठीशीं सांपडला, तितके ठार मारून टाकिले. त्यांत एक खबर सांगावयास जाऊं दिला नाहीं. वरकड फौज दुराणीची निघोन गेली. पांच हजार मनुष्य त्यांजकडील ठार जालें. मुर्द्यावर मुर्द्यांचे ढीग पडले. अशुद्धाचे प्रवाह चालिले याप्रमाणें मोठें युद्ध होऊन शांत जालें. रोहिले व दुराणी आपले गोटास गेले. श्रीमंतांकडील भले लोकांचे मुर्दे त्या मुडद्यांत सरमिसळ होते. ते ओळखूं न येत. प्रयत्नें हुडकून काढून त्यांचीं सार्थकें केलीं. बळवंतराव यांचा मुडदा भाऊसाहेब

१३. धमधमा = खंदकाच्या बाजूनें तोफा लावणसाठीं रचलेला मातीचा बांध, मोरचा.

१४. उमाळे = (अतिशय, वर्षाव) पुष्कळ ह्या अर्थी.

१५. 'निंबाळकर अमलुजकर' तृ० प्र०

* खानदान = कुलीन, कुलशीलयुक्त.

१६. खांडावा?

यांणीं आणवून पाहून डोळ्यांस पाणी आणिलें. "बळवंतराव आह्मांस टाकून गेले." ह्मणून बहुतच शोक केला. मुर्दा डेरियास आणिला.

हें वर्तमान बळवंतराव यांची स्त्री डेरियांत होती, तिणें ऐकून तैशीच बाहेर आली. मुडदा पाहून क्षणभर स्तब्ध होऊन बोलती जाली कीं, "राव आम्हांस टाकून गेले. अतएव अहेवपण* हरलें, आतां आपण राहणें उत्तम नाहीं." ह्मणोन रुदन न करितां मुरदियापाशीं बैसली. बळवंतराव याचें मुख अवलोकन करून, पूर्व सुख आठवून बोलों लागली कीं, "राव! तुम्ही आह्मांवर कां रुसलां? आमचे हातचा विडा कां घेतां† नाहीं? आम्हीं तुमचें काय केलें? आह्मांशीं बोलून गेलिया एक प्रहर लोटला नाहीं! ईश्वरें आह्मांस एवढें निर्वाण कां दाखविलें? राव यांणीं सर्व संपत्तीची व आमची आस्था सोडून गेले!" तों जवळ पुत्र आपाराव बळवंतराव हें मूल होतें. बारा वर्षे जालीं होतीं. त्यांणीं मातुश्रीचे ओटींत शिरून दाढीवोटी धरून बोलूं लागले कीं, "आह्मांस सोडून राव निघोन गेले. आणि तुम्ही समागमें सहगमन जाऊं ह्मणतां, तेव्हां आम्हीं अन्नपाणी कोणास मागावें? व कोणावर रुसावें?" असें ऐकून बाई बोलती जाली कीं, "बापा, तुम्हीं अन्नपाणी ईश्वराजवळ मागावें, आणि ईश्वरावरच रुसावें. आतां आह्मांस मिथ्या मायाजाळांत गोवूं नये" ह्मणोन त्यास ढकलून दिलें. तों भाऊसाहेब यांणीं येऊन बहुत प्रकारें बोध केला कीं, "पुत्र असतां जाणें उचित नाहीं. आपाराव आहे यास सवाई बळवंतराव करीन. तरीच जन्मा आलियाचें सार्थक." ह्मणोन समाधान करून बोलिले. बाईनीं उत्तर केलें कीं, "मूल तुमच्या वोटींत आहे. कळेल तैसा परामर्ष करीत जावा आह्मीं प्रपंचाचें रहस्य संपूर्ण अनुभवलें. आतां आस्था कांहीं राहिली नाहीं. या समयीं आमचे मायबाप तुम्हीं होऊन आमची बोळवण करावी." म्हणोन निश्चयाचें उत्तर दिलें. मग भाऊसाहेबांनीं सहगमनाचें साहित्य यथास्थित करून उभयतां स्त्री-पुरुषाचें दहन केलें. मुलाकडून त्यांचे तेरा दिवसांचें सार्थक करून यथाविधि दान धर्म केला.

याप्रमाणें बळवंतराव यांचा समाप्ति जाल्यावर फौजेनें धास्त बहुत खादली. बाहेर कोणी निघेनासें जालें. दुराणी त्यांस मारूं लागले. अन्न दृष्टीस पडेनासें जालें. मग तमाम लोक भाऊसाहेब यांचे डेरियास जाऊन अर्ज केला

---

* अहेवपण = अविधवापण = सुवासिनीत्व.
† 'घेतला नाहीं' पाठांतर.

१७. दाढी वोटी (होटी) धरून = लडिवाळपणें, काकुलतीस येऊन.

कीं, " भाऊसाहेब आह्मांस रणांत मारावें, परंतु अन्नाविणें मारूं नये." असें बोलिलियावर भाऊसाहेब यांणीं शिंदे होळकर व दमाजी गायकवाड व समशेर बहादर व विठ्ठल शिवदेव व अंताजी माणकेश्वर व यशवंतराव पवार व सोनजी भापकर व आणखीहि कित्येक सरदार थोर थोर होते त्यांस बोलावून आणिलें. आणि एकत्र होऊन मनसबा केला कीं, " आतां कुजून मरावें हें ठीक नाहीं. गिलचे यांचें पारिपत्य करावें. गिलचांचें बळ दिवसें दिवस बहुत होतच चालिलें, आणि आपलें लष्कर झडत चालिलें. घोडीं मेलीं. मातबर खांसा घोड्यामुळे पया-उतारा जाला*. यास्तव एक वेळ हा मुक्काम सोडून बाहेर मोकळे रानीं निघोन जावें. दिल्लीचा रस्ता सोडून दुसरेकडून जावें तरि झाडी मातबर आहे ; मार्ग नाहीं. तोफखाना निभावणार नाहीं. यास्तव दिल्लीच्या रस्त्यानें जावयासि मार्ग उत्तम आहे. परंतु वाटेवरि गिलचे यांचा मुक्काम राहिला आहे. ते जाऊं देणार नाहींत. यास्तव बंदोबस्तीनें निघोन जावें. यमुनेच्याच तीरीं येथून पांच कोसांवर जाऊन नदी पाठीशीं घ्यावी. पुढें गिलचांचे तोंडावर तोफखाना द्यावा. दिल्ली उजवे बाजूस राहून, दिल्लीहून सरंजाम आणवून सारें लष्कर आबाद करावें." तेव्हां मल्हारजी होळकर बोलिले कीं, " गिलचा मार्गावरि असतां फार करून जावयास निभाव कैसा होईल ? " तेव्हां निश्चय केला कीं, " कुल बुणगे सुद्धां झुंज देत, उडवीत, मारीत जावें. आणि पुढें मुक्काम झाल्यावर चोहोंकडून सरंजामही येऊन पोंचेल. लष्कर अबादान झाल्यावरि पुनः गिलचांचें पारिपत्य करूं " हा सिद्धांत केला. तेव्हां जनकोजी शिंदे यांसि मल्हारराव यांणीं सांगितलें कीं, " निभाव जाला तरि हा विचार उत्तमच आहे. नाहीं तरि, निभाव न जाल्यास पुढें गत कैशी होईल? निघण्याचा विचार ठीक दिसत नाहीं. परंतु भाऊसाहेबांचा व सर्वत्र मुत्सद्दी व सरदार यांचा लहान थोरांचा आग्रह कीं, कूच करून दिल्लीच्या रोखें जावें. यास्तव उपाय राहिला. परंतु उद्यांच निघून जावें असें नाहीं. रविवारीं कूच करून जावें." तेव्हां भाऊसाहेब बोलिले कीं, " आज मंगळवार आहे. रविवारास सहा दिवस अवकाश आहे. तोंपर्यंत लष्कराचे लोक कितीक अन्नाविणें मरतील कितीक अन्नामुळें गिलचांचे लष्करांत जातील. मग जाऊन सार्थक काय ? इतके दिवस लष्करांत लोकांस धीर पुरवत नाहीं. यास्तव उदयीकच कूच करून जावें. मरावें कीं मारावें. हाच सिद्धांत उत्तम." यास्तव

* म६० सांठ सात राऊत घोडे मेल्या | कुळे भयराहित झाले.

याप्रमाणें मनसबा ठरावून इब्राहिमखान गारदी यास बोलावूं पाठविलें. यासही हा विचार पुसला. तों इब्राहिमखान गारदी यानें जाबसाल केला कीं, " भाऊसाहेब, तुम्हीं जे समयीं इकडे यावयाची मसलत केली ते समयीं तुमचें आमचें इमान प्रमाण जाहलें तेंच करार आहे. आमचें गैर इमान असतें तरि आह्मी आजपर्यंत येथें तुह्मांपाशीं न ठरतों. तुह्मांस मिथ्या भासेल तरि प्रचीत दाखवितों. " ह्मणोन बोलोन दुराणी व नजीबखान रोहिला व सुजाउद्दौला यांचीं पत्रें पंचवीस दाखविलीं कीं, " तुह्मी आम्ही एक जात आहों. यासमयीं आह्मांकडे यावें. ह्मणजे तुह्मांस पंचवीस लक्षांचा मुलुख देऊं. पातशाही उमरावी देतों." म्हणोन पत्रें दाखविलीं. प्रविष्ट केलीं. भाऊंनीं वांचून पाहिलीं तेव्हां इब्राहिमखान गारदी याची निखालसता देखिली. उत्तर दिलें कीं, " तुमचें आमचें इमान आहे तेंच करार* आहे. परंतु आतां दिल्लीस जाऊन पोंचावयाची मसलत कोणती करावी ? निभावणी कैशी होईल ? याची मसलत काय ? " याप्रमाणें पुसतांच इब्राहिमखान गारदी याणें निरोत्तर केलें कीं, " तुम्ही गनीम लोक, तुह्मांस हिंमत पुरवणार नाहीं. तुम्ही आह्मांस घेऊन आलां ते कांहीं निभावणी करावयाची दिसत नाहीं. रणांत आह्मांस सोडून जाल. आम्हांस मात्र मृत्यूनें गांठलें, हेंच खरें. " असें ऐकून मागती भाऊसाहेबीं दुसरें इमान दिलें कीं, " तुम्हांस सोडून आह्मी कदापि जाणार नाहीं. तुम्ही जेथें उडी टाकून उभे रहाल तेथें आम्हीही कत्तल होऊन जाऊं. परंतु रण सोडून जाऊं हें घडणार नाहीं. " ह्मणोन इमान प्रमाण दिलें. तेव्हां इब्राहिमखान याणें निखालसता मसलत दिली कीं, " हर यत्नें दिल्लीस पोंचावें हें खरेंच आहे. आतां जावयास उपाय सांगणें, ह्या रीतीनें वर्ताल तर अवघेच पार पडून जाऊं. याची मसलत एक आहे कीं, देशीं मोंगल निज्यामअली नबाब तुम्हांशीं लढाई हमेशा करितो, याजप्रमाणें गोल बांधून मध्यें बुणगे घालावे. व भोंवताला आराबा वांटून द्यावा. चहूंकडे चार सरदार मातबर देऊन त्रिकडील तिकडे बाजबा वांटून द्याव्या. आणि कोस दोन कोस लढत भांडत दिल्लीस जाऊन पोंचावें. " याप्रमाणें मसलत सांगितली. ती सर्वत्रांचे चित्तास† आली.

याप्रमाणें निश्चय ठरल्यावर दुसरे दिवशीं तमाम फौजेस खर्चास दिलें.

---

* करार = शाबद.

१८ 'इब्राहिमखान याणें व आणखीं लहान थोर सरदार यांणीं " पृ० ४०

† ह्या मसलतीस काशीराजानें लिहिलेल्या फारशी बखरीचा किंवा इंग्रजी ग्रंथांचा आधार नाहीं.

पहिल्यानें ज्यांस बाजारांत अन्न मिळालें, त्यांनीं आणिलें. ज्यांस अन्न न मिळे त्यांनीं मिठाया आणिल्या. निदान कोणी गूळ, खोबरें खारीक, साकरही आणिली. वाणियाचे घरीं नाहींशीं केली. फौजेंत तमाम निरवानिरव जाली. प्रहर रात्र पहांटेची उजेडावयाची राहिली तों कुचाचा नगारा जाला. तो दिवस शके १६८२ सोळाशें ब्यांयशीं, पौष शुद्ध ८ बुधवासर होतों[19], विक्रमनाम संवत्सर होता. तमाम फौज सिद्ध होऊन * बाडी-नग व फौज व तोफखाना बाहेर निघाला. तों सूर्योदय झाला. ते दिवशीं प्रातःकाळीं स्वारी तयार केली. भालदार चोपदार व सरकारकून जागां [जागां] सरदारां [कडे] पाठविले कीं, " लौकर स्वार होऊन निशाणापाशीं यावें." याप्रमाणें सर्वत्रांस ताकीद करून खासा आपण व विश्वासराव अंबारींत स्वार जाले. सौभाग्यवती पार्वतीबाई व नाना फडणीस यांची मातुश्री व स्त्री एक अंबारींत पार्वतीबाईचे नजीक होती.[20] आणि तोफखाना [व] इब्राहिमखान गारदी [पुढें.] उजवे बाजूस शिंदे होळकर होते. डावे बाजूस दमाजी गायकवाड व यशवंतराव पवार व अंताजी माणकेश्वर व विठ्ठलराव शिवदेव व समशेर बहादर व आणखी लहान थोर पथके डावे बाजूस होते. † मध्यें आपण खासे व हुजरात होती. कितीएक पथके पिछाडीस बुणगे मध्यें घालून होते. याप्रमाणें नेमणूक करून, गोलचा गोल, सात आठ घटका दिवस आल्यावर निशाणें हत्तीवर देऊन, नौबत चौघडा सुरू करून, भाराचा भार चालिले. दीड कोसावर जाऊन उभे राहिले. आणि तोफखान्यापैकीं मातबर मातबर तोफा निवड करून पुढें गिलचियाचे तोंडावर घातल्या. बाकीच्या हलक्या तोफा सभोंवत्या देऊन, त्यांचे मागें गारदी यांचा रिसाला नेमून दिला. त्यांचे मागें सड्या फौजा, त्यांचे मागें बुणगें, त्यांचे मागें कांहीं सड्या फौजा, असे जिकडील तिकडे बंदोबस्त यथास्थित राखिला.' आणि तळ सोडून दीड कोसावर जमावसुद्धां आले. मागें तळावरील गाडे व छकडे आणि कितीएक सरंजाम न चाले, तो जाग्यावरिच टाकिला.

तिकडे मोंगल आपले तळावरि तयार होऊन जमावसुद्धां आंवळून उभा राहिला. तों भाऊसाहेब यांणीं मसलत केली कीं, " आपण नीट चालून जावें. आह्मांस गिलचानें वाट देऊन एकीकडे बगल[21] मारून जाहला तरि

---

१९. ता. ७ जानुआरी सन इ० १७६१. 'बुधवासर होता' हे शब्द तु०प्रतींत नाहींत.

* बाडी नग = तंबूच्या कनाथी वगैरे.

२०. ह्या शब्दा पुढें तु० प्रतींत असें लिहिलें आहे :—" रात्रीं मनसबा केला होता जो तो राहिला. पुढें विनाशकाल आरावा मागें टाकून फौजा झाडून पुढें निघाल्या उजवे बाजूस शिंदे होळकर होते."

† पुढें २७ टीप पहा.

२१. बगल मारून=एके बाजूस होऊन.

योंस[22] आपले लढाईचें प्रयोजन नाहीं. ' आणि मार्ग मोकळा करीत नाहीं तरि मधींच घोडे घालून मारामार करीत उधळून, मार देत, नीट निघोन जावें." अशी मसलत केली. रात्रीं मनसबा केला होता तो राहिलें[23]. आणि पुढें होणार 'विनाशकालीं विपरीतबुद्धी' निर्माण जाली. तेसमयीं सर्वत्रांस सांगून, आराबा अवघा मागें टाकून, निशाणें सोडून, फौजा पुढें चालिल्या. तेव्हां फौज जमूनही नव्हती. मुजऱ्यास धोरसा[24] धरावा तैसा फरा बांधोन फौज उभी राहिली. तेसमयीं इब्राहिमखान गारदी याणें हें पाहून चित्तांत विचारणा केली कीं, "रात्रौ भाऊसाहेब यांणीं मनसबा केला काय ! आणि कर्तव्य हें केलें काय ? असो. आतां मसलतीस धक्का पुरता बसला. उपाय अवघाच राहिला. भाऊसाहेबांच्या बोलण्याची शाश्वती पुरती समजली. असो. आम्ही भाऊसाहेब यांस इमान दिलें आहे. त्यापेक्षां आतां मागें पुढें पहावें तरि आपले पूर्वजांस बोल लागेल. भाऊसाहेब जें करतील, त्यास सादर न होतां गत तर नाहीं. दैवीं असेल तैसें घडेल. परंतु रणांत विन्मुख व्हावयाचें नाहीं. असो, आपले आयुष्याची सीमा होऊन शंभर वर्षें[25] आतांच पूर्ण भरलीं, हें खरें. आतां 'आपले वळें घालावी कास, कोणाची न धरावी आस' तैसें घडलें." इब्राहिमखान गारदी याणें आराबा सोडून तोही डावे बाजूस आला. बुणगे व तोफखाना झाडून मागें मोकळा राहिला.

इकडे झाडून मोंगल तयार होऊन तोही युद्धास उभा राहिला. तेसमयीं अबदुल अलीकडील वकील भाऊंकडे आले. "आजचे दिवस झुंजास तहकुबी करावी, सल्याचें बोलून ठीक करितों. उतावळी न करणें" ह्मणोन आले. भाऊसाहेबीं त्यांस धिक्कार करून माघारे लौविलें. परस्परें गोळागोळीस तोंड लागलें. त्यांजकडील तीनशें तोफा व गनिमांकडील दोनशें तोफा, एकदांच सरबत्ती जाली. शिवाय धाकटीं यंत्रें, हस्तनाला व सुतारनाला व बंदुका व रेकले त्यांस गणित नाहीं. मोठीशी गर्दी होऊन गेली. धुराचे गर्दीनें

---

२२. भो० प्र० "त्यांचें लढाईचें प्रयोजन एकंदर नाहीं." येथ पासून नुगार प्रताच्या पाठात अतर फार येतें. बहुधा मधील मधील मजकूर गाळलेला आहे. व कोठें कोठ मागें पुढें झालेला आहे.

२३. वर टीप २० पहा.

२४. धोरसा = कड, धार.

२५. या गोष्टीशीं इंग्रजी ग्रंथांचा अगर काशीराजाचे बखरीचा मेळ पडत नाहीं. उलटें या ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, भाऊनींच शेवटली चिठी सुजाउद्दवला यांजकडे पाठविली कीं, 'भांड पूर्ण भरलें. एक बिंदुही जास्त राहू शकत नाहीं. सल्याचें काय कारणें असेल तें आतां करा. अगर नाहीं म्हणून साफ सांगा.'

सूर्यबिंब आच्छादिलें. कोणाची खबर कोणास नाहींशी जाली. त्यांत शूर होते त्यांस वीरश्रिया आल्या. भ्याड होते त्यांस ऐसें जालें कीं, ' धरणी माय, दे ठाय ' तैसें जालें. धडाकियाखालीं घोडे मनुष्यें धुंद जालीं. रण-तुरें व रण-भेरीव आरावियाचीं वाद्यें [असा] एकदांच कल्होळ जाला. उभय दळें मिळतीं जालीं. तों हुजरातीची फौज, बहुत दिवसांचे खानदान[26] लोक होते, त्यांणीं कृत-संकल्प केला कीं, " बहुत दिवस यांचें अन्न भक्षिलें आहे. त्याची उतीर्णता आज आहे." म्हणोन त्यांजवरि हुजरातीनें कडनिकड करून घोडे घातले. झुंजास तोंड लावून घाव केले[27]. क्षणभर हुतुतूसारिखे[28] त्यांस मोडूनही घालविलें. एक वेळ यांसही मोडून ते घालवीत. अशा पांच सात हिराहिर्‍या[29] जाल्या. तों विठ्ठल शिवदेव व यशवंतराव पवार कांहींसे पुढें वाढून[30] गेले. त्यांजवर झुंज पडलें. तेव्हां हे क स्कैं रा नें[31] माघारे तोफ-खान्यांत येऊन उभे राहिले. दमाजी गायकवाड यांजवर गिलच्यांनीं येऊन नेट बसाविला. तेही माघारे येऊन. उभे राहिले. मुक्कामीं गोटाचा गोट

२६. खानदान कलीन, मोठ्याकुळात जन्मलेले.

२७. काशीराजानें लढाईच्या वेळीं दोन्हीं फौजांची व्यवस्था खालीं लिहिल्या प्रमाणें होती म्हणून लिहिलें आहे.

अहमदशहाचा तंबू.

| हरखुरदारखान. | अमीर बेगखान. | दुंदखान रोहिला. | हाफीज राहिमत-खान. | अहमद खान बंगश. | दुराणी वजीरशहा वलीखान. | सुजाउद्दौला. | नजीबखान रोहिला. | शहापसंदखान. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

दुराणी तोफखाना.

| [उत्तर] | मधील मैदान. | [दक्षिण] |
|---|---|---|

मराठी तोफखाना.

| इब्राहिमखान गारदी. | दमाजी गायकवाड. | विठ्ठल शिवदेव. | भाऊसाहेब व विश्वासराव. | यशवंतराव पंवार. | समशेर बहादर. | मल्हारराव होळकर. | जनकोजी शिंदे. |
|---|---|---|---|---|---|---|---|

मराठ्यांचा गोट.

२८. हुतुतू सारखें = सपाट्यासरसें.

२९. हिराहिर्‍या=वेगानें, त्वेषानें केलेल्या उठावण्या किंवा हल्ले.

३०. वाढून गेले = चालून गेले.

३१. लष्करानें ? कचखाऊन?

येऊन उभा राहिला होता. त्याप्रमाणें पथकें उभीं होतीं. त्यांजवर खांसा अबदुल अली त्या झुंजावरि डावे बाजूस होते[३२]. त्यानें झुंज भारी केलें. कुल **भाऊसाहेब** यांजकडील पथकें माघारी फिरविलीं. हल्लेक बहुत जाले. **इब्राहिमखान गारदी** याजवर खांसा **दुराणी** व **रोहिला** यांणीं चालून घेतलें. यांची[३३] एक रंजक उडाली. तिकडील लोक बहुत पडले. परंतु जाग्यावरून हलले नाहींत. तैसेच नेट धरून मारीत आले. आणि **इब्राहिमखान गारदी** याजवरि चालोन आले. **इब्रामखान गारदी** याजवरिच पडले. कुमक कोणींच केली * नाहीं. तथापि संभाळून येऊन हुजरातीचे लोक एक होऊन संधान साधिलें. तोफा सुटत होत्या. लढाई मना जाली नव्हती. मातबर एक प्रहरपर्यंत लढाई केली.

इकडे उजवे बाजूस **शिंदे होळकर** होते. यांजवरि **सुजाउद्दौला** वगैरे यांणीं येऊन झुंज दिलें. झुंज मातबर होऊं लागलें. मध्यें **भाऊसाहेब** व **रावसाहेब** अंबारींत होते. ते घोडियावर स्वार जाले. **भाऊसाहेब** **बोर** घोडीवर[३४] व **रावसाहेब** **पीलबाला** घोडा याजवरि स्वार जाले. चहूंकडून संभाळून होते. झुंजाचें तोंड भारी लागलें. मारामारी होतच आहे. मातबरच खासे पडों लागले. तेसमयीं **विश्वासराव** हुजरातीच्या लोकांत येऊन त्यांनीं घोडे घातले. आणि घाव केला. तों ईश्वरी क्षोभ जाला. एकाएकींच छातीमध्यें गोळी लागून **विश्वासराव** ठार[३५] जाले. **नानासाहेबांचें** निधान हरपलें. लोकांनीं कडनिकड करून मुर्दा अंबारींत घातला. आणि वरतीं शालजोडी घातली. हें वर्तमान **भाऊसाहेबांनीं** पाहून अवसान सोडिलें. बहुतसा विलाप करूं लागले. मग **भाऊसाहेबांनीं** निश्चय केला कीं, या उपरि

---

३२. "खासा अबदाली कांहीं फौजेनिशीं मागें राहून पुढाल लढत्या फौजेची व्यवस्था करीत होता. बारावर एक वाजतां मराठ्यांच्या ऐन जयाच्या वेळीं त्याणें जागजागीं मदत पाठविली व पळोन आलेल्या आपल्या शिपायांस पुन्हा लढण्यास हाकून लाविलें. ह्या व्यवस्थेमुळेंच दुराण्यास ह्या दिवशीं यश आलें." असें काशीराजाचें ह्मणणें आहे.

३३. म्ह० गार्दी लोकांची.

* दमाजी गायकवाड यांची मदत इब्रामखानास फार झाली. प्रा. ड.

३४. "हर घोडीवर व रावसाहेब पिल्या घोड्यावर" धो० प्र० पीलबाला = हत्तीच्या बांध्याचा. बोर = काळसर तांबड्या रंगाची.

३५. १२ वाजतांचे सुमारास भाऊनीं दुराणी वजीरास मागें हटविलें. त्याचे लोक पळून जाऊन त्याचा अगदीं मोड झाला होता. अशासमयांत अबदालीनें वजीरास मदत करण्याकरितां पाठविलेली १०००० स्वारांची मोडची मोड भरधांव भाऊ व विश्वासराव यांजवर पडली त्यावेळां जी हातघाईची लढाई झाली तींत विश्वासराव जखमी होऊन घोड्याखालीं आला. काशीराज म्हणतो गोळीची जखम नव्हती. मानेवर तरवारेची व डावे डोळ्याचे वरचे बाजूस तीराची अशा दोन जखमा होत्या.

गिलचा खाशानिशीं मारीन. ह्मणोन लोकांस ताकीद केली. आणि झुंज केलें. हाणा! हाणा! असें मुखें बोलोन बरोबर समशेर बहादर घेऊन पुढें जाले. आणि तीन वेळ हत्यार केलें. लोकांनीं हिंमत धरून, भाऊसाहेबां-बरोबर पुढें सरसावून, शिपायगिरी बहुत केली. रोहिला माघारीं फिरविला. अबदुल अली पळोन नदी तीरास गेली[३६]. शर्थ जाली.

पुढें विठ्ठलराव शिवदेव यांणीं बुणगे पेशवी गिलचे चाकर ठेविले होते. ते दोन हजार होते. त्यासमयीं त्यांस इशारतीस भगवा पटका दिला होता. तो डोईस बांधोन फिरत होते. तेसमयीं विश्वासराव पडले, ही खबर लष्क-रांत बुणगियांत आली. त्याजमुळें लष्कर गडबडलेंच होतें. गिलचे चाकर यांणीं भगवा पटका टाकून दिला, आणि बुणगियांत आवई घातली आणि लुटूं[३७] लागले. बुणग्यानें पळ काढिला. बुणगे पळतें हें पाहून विठ्ठल शिव-देव यांणींहि पळ काढिला. आधींच विश्वासराव यांचें वर्तमान ऐकून दह-शत खादली होती. कोणी दम धरून बुणग्यांत राहीनासें जालें. लुटीची आवई घातली आणि धुमाळी मांडिली.

इकडे भाऊसाहेबांकडे युद्ध होतच होतें. भाऊसाहेब यांची स्त्री पार्व-तीबाई तेथें होती. अंबारीस अंबारी तटली होती. युद्धाचे धुंदींत घाबरी होऊन अवघें लक्ष पुढेंच होतें. तों एकाएकींच मुर्दा पाहिला. आणि बा-ईनें महातास पुसलें कीं, "मुर्दा कोणाचा आहे?" त्याणें उत्तर केलें कीं, "विश्वासरावसाहेब ठार जाले!" खवासखान्यांत खिजमतगार होता, त्यास सांगोन तोंड उघडून पाहिलें. तों रावसाहेब मृत्यु पावले हें देखिलें. पार्व-तीबाईनीं पाहून ऊर कपाळ बडविलें. शंखध्वनि केली. आणि बोलती जाली कीं, "ईश्वरा! आम्हांस एवढें निर्वाण कां दाखविलें? रावसाहेबांसारिखें रत्न गेलें!" ह्मणोन बहुतच शोक करिती जाली[३८]. तों जवळ नाना फडणीस

---

३६. वर टीप ३२ पहा.

३७. गिलचे लोकांची एक टोळी मराठ्यांच्या तोफखान्याकडे होती त्या लोकांनीं आपल्या देशाचे लोकांबरोबर लढण्याचें नाकारून आम्हांस रजा द्यावी म्हणून भाऊस विनंती केली. व त्याप्रमाणें त्यांस पूर्वींच फौजेंतून लावून दिलें होतें, असें ग्रा० ड० म्हणतात.

३८. भाऊंस अपत्य नसल्यामुळें म्हणा किंवा दुसरे कांहीं कारणानें म्हणा, त्यांची ममता विश्वासरावावर व माधवरावावर कांहीं विलक्षण होती. दोन्ही मुलांस कारभारांत व मुलुखगिरींत आपणाबरोबर घेऊन, त्यांस उत्तम प्रकारचें शिक्षण देऊन राजाधिकार चालविण्यास त्यांणीं योग्य केलें होतें. पार्वतीबाईचीही ममता नानांचे मुलांवर फार होती. पुढें नारायणरावावर तर अतोनातच बसली. मुलांचें-ही वर्तन तदनुरूपच दृष्टीस पडतें. विश्वासरावाचें नानांस पत्र, व भाऊंनीं त्याबद्दल दोष दिला तेव्हांची त्याची वर्तणूक पहा.

यांची मातुश्री होती तिणें शांत केली. " बाई, रडें ईश्वरें ओढूनच आणिलं आहे. एवढ्यावरच मुक्त जालां असा अर्थ नाहीं. अजुनीहि सर्वत्र महा अनर्थापात आहे. यांत ईश्वर पार पाडील तर बरें, नाहीं तर रडें लागलेंच आहे. तों पावेतों दम खावा. " म्हणोन शांत केली.

इकडे हुजरातीनें व इब्राहिमखान गारदी याणें कडनिकड करून, एक वेळ त्यांस मोडून त्यांचे जाग्या पावेतों तुडवीत तुडवीत गेले. तेसमयीं अबदुल अली दुराणी केवळ नामर्द, यमुना तीरानें दोन कोस पळाले. हें नजीबखान याणें ऐकून व पाहून दातानें ओंठ चावून हवदियांतून पाय उतारा जाला. तैसाच दुंदेखान रोहिला व अहमदखान लंगडा असे पाय उतारा जाले. आणि शिंदे होळकर हे उजवे बाजूस आहेत, ऐशी बातमी आणून डावे बाजूस चालोन घेतलें.[३९] आधीं तोंड समशेर बहादर याजवर बसविलें. तेसमयीं समशेर बहादर याणें मारामारी बहुत केली. तों फौजेनें हातच सोडिले. आंगें पाहिजे तितकी केली. आंगावर जखमाही बहुत चढल्या. परंतु फौज फुटून गेली. तैसेच अनुक्रमें दमाजी गायकवाड यांजवरि तोंड बसविलें. त्याणींहि क्षणभर मारामारी केली. परंतु तेही बाजूस निघाले. तैसेच विठ्ठल शिवदेव व अंताजी माणकेश्वर व यशवंतराव पवार यांजवरि येऊन वर्षले. तेव्हां त्यांणींहि करावयाची तितकी बहुतच केली. परंतु फौज जमून नाहीं. यास्तव सर्वांचेच उपाय राहिले. पोवार यांचें मुंडमोचन करून इभ्रामखान गारदी याजवर तोंड लाविलें.

इकडे भाऊसाहेबांकडे लढाई होतच होती. होतां होतां मारामारी खणाखणी जाहली. तेसमयीं विश्वासरावसाहेब यांचें वर्तमान ऐकून जनकोजी शिंदे व तुकाजी शिंदे यांणीं मारामारी करीत [ते] भाऊसाहेबांपाशीं आले. तों इभ्रामखान गारदी याजवरि [ दुराणी ] येऊन पडले. त्याणें जिवाचा निधडा करून शिपायगिरी म्हणावी तैशी केली. कितेक गारदी खेतीस * आले. परंतु कुमक कोणाची जाली नाहीं. मग एके क्षणांत पांच हजार गारदी ठार जाले. होते कीं नव्हते असे केले. हुजरातीचे जवळच लोक पळों लागले. तोफखाना बंद जाला. जातीनिशी शिकस्त त्याणें पुरती केली. जाऊन गिलचाच्या लष्करांत मिसळला. आणि दहा पांच नामांकित सरदार मारून ठार केले. भोंवताला वेढा गिलचेयांचा पडला. अंगावरि जखमा भारी चढल्या. दुराणी पळोन गेले होते ते माघारे आले. गारदी यांचे मु-

३९. ह्या हकीगतींत व काशीराजाच्या वर्णनांत फारच फरक आहे.

* खेतीस येणें= प्रेतें होऊन पडणें, मरणें.

४०. वर टीप ३२ व ३६ पाहा.

यांचे टांग पडले. इभ्रामखान गारदी याचा पुत्र व भाचा होता तो ठार जाला. खांसा इभ्रामखान गारदीहि रणांत घायाळ जाला. असे असतां लढतच होता. यत्न चालेना तेव्हां हत्यार राहिलें. मग धरून नेला.

हें वर्तमान भाऊसाहेबांस कळलें. चोहींकडून प्रळय एकदांच जाला. मोठी धुंदी जाली. यशवंतराव पवारही ठार जाले. कोणास कोणी पुसेनासें जालें. जाग्यावरच इभ्रामखान गारदी होता कीं नव्हता असें जाइलें.[४१] इकडे मल्हारराव होळकर यांचे बाजूनें झुंज मातवर जालें. रेटत नाहींसें जालें, तेव्हां तेही बाजू सोडून निघाले. मग केवळ तोंड हुजरातीवर बसविलें. ते समयीं हुजरातीनें जितकी शर्थ करावी तितकी केली. जेथून मराठियांचें राज्य जालें होतें ते दिवसापासून झुंजें होत आलीं; परंतु याप्रमाणें मराठे कधीं झुंजले नव्हते. भाऊसाहेब यांणीं नांवनिशीवार असाम्या हटकून घालविल्या. आणि आपणही खांसा अगोदरच घोडियावर स्वार जाले होते. विश्वासराव ठार जाले, त्यापेक्षां आतां नाना साहेबांस तोंड काय दाखवावें! म्हणोन शोकांतच होते. तों अवघा मार भाऊसाहेबांवर येऊन पडला. तरवारीची खणाखणी जाली. डुकर खळीस येतो तैसा प्रकार भाऊंनीं केला. गर्दी ओल्यावर[४२] घोडीं मनुष्यांनीं खंदक भरला. माणसें दिशाभूल जालीं. कोणी-कडे पळावयाचे सुचेनासें जाले. तों तिसरा प्रहर झाला.

उपरांतिक चार घटकापर्यंत भाऊसाहेबांनीं हुजरातीनिशीं मारामार केली. परंतु डावे बाजूनें हातच सोडिले. आभाळ फाटलें, तेथें ठिगळ कोठवर लावावें? मग भाऊसाहेब घोडियावरून पाय उतारा जाले. भाऊसाहेब यांचे तोंडास हाणा! हाणा! हेंच करीत असतां खैरस[४३] आली. जाती-निशीं मोठा हिया करून बहुत झुंजले तें कोठवर लिहावें? सरकारचे मुत्सद्दी मातबर तमाम एकीकडे कुल् पळोन गेले. तेसमयीं सोनजी भापकर यांस भाऊसाहेब बोलिले कीं, "सोनजीबावा, यासमयीं निघावयाचें नव्हतें. तुमचा भरंवसा बहुत धरिला होता." तेव्हां [ सोनजी ] बोलिले कीं, लोक पळतात त्यांस माघारे फिरवितों. साहेबांस टाकून आम्हीं कोठें जावें? असें बोलून लोक फिरवावयास म्हणोन गेले, ते तिकडेच गेले. तेव्हां तुकोजी शिंदे ह्मणो लागले कीं, "महाराज, क्षत्रधर्माची शर्थ जाली. चोहींकडून आभाळ

४१. 'होता तो कांहीं नाहींसा झाला' पु० प्र०

४२. 'दे ण गे (पणगे) आलियावर घों-डीं' तृ० प्र०

४३. खरस = तृषेमुळें किंवा फार बो-लल्यामुळें तोंडाच्या कोंपऱ्यास पांढरी फेंसा सारखी थुंकी येते ती.

फाटले. या उपरि निघावें यांत उत्तम आहे." तेव्हां भाऊसाहेबांनीं उत्तर केलें कीं, "तुकोजीबावा, आतां कोणीकडे जावें! काय तोंड नानासाहेब यांस दाखवावें? रावसाहेबाची गत काय जाली ती पहावी. आणि इब्रामखान गारदी यास इमान दिलें तें काय?" असें ऐकून मागती तुकोजी शिंदे[४४] यांणीं उत्तर केलें कीं, "भाऊसाहेब, तुम्ही वांचलां तरि अवघ्यांचा सूड घ्याल. नाहीं तर तुमचे मागें अवघ्याच गोष्टी आटोपल्या." असें ऐकून मागती भाऊसाहेब बोलिले कीं, "पुणियांत नानासाहेबांस तोंड काय ह्मणोन दाखवावें? निघावें, अशी गोष्ट घडणार नाहीं. रणाचेठायीं ईश्वर-सत्तेकरून जें घडणार असेल तें घडेल. परंतु कदापि नामोहरम व्हावयाचें नाहीं." असें ह्मणतांच तुकोजी शिंदे यांणीं घोडियावरून उडी टाकिली. आणि जातीनिशीं हत्यार केलें. तेथें मोठी मातबर मरदोमी करून, मराठी धर्माची शर्थ करून खस्त केली. तेव्हां अकस्मात् गोळी लागोन ठार जाले. जरीपटकियाचे निशाणावर आधींच दाटी जाली होती. तेव्हां हत्तीवरून उतरून घोडियावर घेतलें. निशाण गुंडाळून झाडून पळों लागले. तेव्हां भाऊसाहेबांनीं शहाजणें वाजविण्यास आज्ञा दिली. फत्ते जाली, शहाजणें वाजतात, याजमुळें तरी लोक माघारे फिरतील, याअर्थे शहाजणें वाजतात असें करूं लागले. परंतु ज्यांनीं पळ काढिला त्यांपैकीं कोणी माघारे फिरले नाहींत. भाऊसाहेब यांचे तोंडास खरस आली. हाणा! मारा! ह्मणावयाचे राहिले. तोंडापुढें कोणी ओळखया आला तरि तोंडानें मात्र हुंकारा देऊन मानेचे संज्ञेनें दाखवूं लागले. अंगावरि ब्रह्मांड येऊन कोसळलें. परंतु हिंमत हरली नाहीं. भाऊसाहेब यांजप्रमाणें पराक्रमी दुसरा होणें हे असाध्य गोष्ट. जाग्यावरि हजार बाराशें मात्र उभे राहिले. चोहोंकडे एकदांच आभाळ पांढरें झालें. जिकडील तिकडे पळोन गेले. ऐसें झालियावर सोनजी भापकर याणें एक वेळ उत्तर केलें कीं,'भाऊसाहेब तुम्हीं निघावें.' त्यासही निदानचा जाबसाल केलियावर सोनजी भापकर यांणीं रिकीबींतील पाय काढून भाऊं मागें अडासनीं पाय [दिला] आणि उभे राहिले. भाऊसाहेब यांजपाशीं जनकोजी शिंदे व रावसाहेब याचे मुर्दाचे हत्तीपाशीं शें पन्नास लोक उभे होते. तेवढे मात्र बाकी राहिले. सभोंवता वेढा पुरा पडला. युद्ध बहुत केलें. पूर्वीं युद्धांत अतिरथी महारथी जुने त्याप्रमाणें भाऊसाहेबीं विरथीपणें[४५] शर्थ केली. पुढें कांहीं इलाज चालेनासा जाला. दुराणी व नजीबखान रोहिला असे चाळीस

४४. 'तुकोजी होळकर' असा थो० प्रतीचा पाठ आहे तो चुकीचा आहे.

४५. 'वीर यांणीं' तुं० प्र०

हजार फौजेंतून दहा बारा हजार फौजेनिशीं भाऊसाहेब यांजवर येऊन वर्षले. तेसमयीं मारामार अशी जाली कीं, 'न भूतो न भविष्यति.' एकदांच भोंवताले वेढून उभे राहिले. अंत रवंदळा[१६] रवदळ क्षणभर बहुतच केली. त्यांत भाऊसाहेब व जनकोजी शिंदे यांची गत कैशी जाली, हें नकळे. उभयतां खासे कोणी दृष्टीनें पाहिले नाहींत. *गयफ जाले, किंवा अस्मानांत गेले; कीं पृथ्वींत गेले, हें ईश्वरी कौतुक ब्रह्मादिकांस नैकळे[१७]. तेथें मानवी यांस काय कळेल?

इकडे मल्हारराव होळकर याजवरि गुदरलीं. तेसमयीं आभाळास ठिगळ कोठवर लावील? उपाय राहिला. तेव्हां मग पंचवीस स्वारांशीं बाजू देऊन निघोन गेले. रावसाहेबांच्या मुर्द्याचा हत्ती व भाऊसाहेबांची हस्ती घोडी अशीं सुजाउद्दौला याजकडे सांपडलीं.

याजवर इकडे पार्वतीबाईचे बंदोबस्तास विसाजी कृष्ण[१८] जोगदंड यांस पांचशें धनगर नेमून देऊन बरोबर ठेविले होते. त्यांस आज्ञा केली होती कीं, "आह्मी झुंजून पार निघालों असें कळलें तरि तुह्मीं यांस घेऊन दिल्लीचे रोखें आमचे मागें पिछाडीस घेऊन यावें. आणि रणांत पडलों असें वर्तमान ऐकल्यावर यांस तुह्मीं जिवें मारून निघून जावें. गिलच्यांचे हातीं भाऊसाहेब यांची स्त्री जिवंत सांपडली, असा लौकिक मात्र न होईलसें करावें." असें निश्चयरूप सांगून त्यास रखवालीस ठेविले होते. तों मोड झाला. लोक पळों लागले. ते समयीं विसाजी कृष्ण व लोक यांणीं धास्त खाऊन, बाईची आस्था सोडून आपले जीव वांचविले. कोणीकडे गेले त्यांचें ठिकाण नाहीं. भाऊसाहेबीं सांगितलें होतें, त्याप्रमाणें कांहींच घडलें नाहीं[१९]. तों एक घटिका दिवस राहिला. ते समयीं पार्वतीबाई अंबारींत होती, तिणें

१६. रवंदळा रवदळ = तुडवा तुडव, मारामार.

* गयफ = गैब = गुप्त.

१७. तुं० प्र० 'त्यांत भाऊसाहेब यांची गत काय जाहाली हें नकळे. तेशी [च] फौज येऊन जनकोजी शिंदे यांवर पडली. तेथें बहुतच मारामार जाहाली. तों शिंदे यांची फौज मोडोन निघोन गेली. खासा भाऊसाहेब कोठें आहेत ह्मणोन हुडकीत गेले, त्यांसिही फिरून देखिलें नाहीं. मग अनुक्रमें मल्हाराव होळकर यांजवर अवघीच फौज येऊन पडली ".

जनकोजी तर पाडाव सांपडला होता. या तरुण उदार व शूर राजपुत्राचा शेवट फारच वाईट झाला. कांहीं दुराणी सरदारांचें एकमेकाशी वाकडें असल्यामुळें व नजीबखानाच्या कात्रिमानें पैसा देऊन सुजाउद्दौला सुटका करीत असतां जनकोजीचे तुकडे करून त्यास पुरून टाकून, मागमूसही नाहींसा केला !! भाऊंचें शिरविरहित धड सांपडलें असें काशीराज म्हणतो.

१८. जोगदंडाचा वाडा सदाशिव " आहे. तेच हे जोगदंड असावे.

१९ हा जोगदंडाचा, भाऊंचे आतेच वगैरे मजकूर तुं० प्रतींत नाहीं.

हत्ती बसवून, पाय उतारा होऊन, बुणागियाचे रोखें पळूं लागली. केवळच भांबावली. घरचा पोरगा कोतवाल घोडी घेऊन उभा होता. तो "बाईसाहेब घोडियावर बसावें" असें ह्मणों लागला. परंतु तिजला घोडियावर बसावयाचें देहभान राहिलें नाहीं. जानू भिंताड्या खिजमतगार मात्र एकटा जवळ राहिला होता. त्याणें हिंमत धरून सोबत दिली. तशा आकांतांत बारवे-कर ह्मणून मातबर मनुष्य व घोडे ही सख्त पाटाळ होतें, त्याची गांठ पड-ली तेव्हां त्यास बोलिली कीं, "मी भाऊसाहेबांची स्त्री आहे. मजला घोडीवर घ्यावें." ह्मणतांच तोही मनुष्य चांगला भला, तो हिंमत धरून बोलिला कीं, "बाईसाहेब रिकिबींत पाय देऊन घोडीवर यावें." ह्मणतांच तिणें रिकि-बीस पाय देऊन [त्यानें] घोडीवर घेतली. आणि तिच्याच शालजोडीनें कंबरेस पाठीमागें बळकट आंवळून बांधिली. आणि भोंवताली नजर केली. तों गिलचे अवघे भोंवताले, मागें पुढें ढिगाचे ढीग देखिले. तेव्हां बाईस बोलि-लाकीं, "बाईसाहेब! निभावणीचें कठीण दिसतें. असो, तुमचे सुकृतें तरि पार पडलों तरि पडून जाऊं." ह्मणोन त्यानें डोळे झाकून फौजेंतून घोडी घातली. तों बाईचें पुण्य सबळ, ह्मणोन अशा अरिष्टांतून पार पडली. तों दिवस ही अस्तमान जाला. कोसपर्यंत गिलचे यांणीं पाठलाग केला. परंतु तशांतून निभावून गेली. नाना फडणीस यांची मातुश्री श्री भागीरथीचे यात्रेस गेली होती ती गिलचे यांजकडे सांपडली. तिची यात्रा सफळ जाली. नानाची स्त्री होती ती मात्र रणांतून बाहेर आलियावरि तिणें घोडी टाकून दिली. ती पाय उतारा होऊन अंगावरील दागिने काढून, फाटकें वस्त्र नेसून, अंगास माती लावून दिल्लीच्या रोखें गेली.

दुसरें वर्तमान झुंज झाल्यावरि झुंजांतून मातबर सरदार लहान थोर कितीएक लोक आले ते पश्चिमेकडे झुंजांत तळावरि खंदकांत येऊन दाखल जाले कीं, भाऊसाहेब माघारे पळोन पूर्ववत् प्रमाणें तळ बळकावून राहतील. या मागें नित्य झुंजास जात असत, तेव्हां संध्याकाळीं माघोर फिरून येईत, त्याप्रमाणें येतील. ह्मणोन माघारे बुणगेसुद्धां खंदकांत दाखल झाले. तों तेथील बुणगे व फौज पळत आहे तेव्हां तेथेंही धीर धरवत नाहींसा जाला. मग तेथून जिकडे वाट सांपडेल तिकडे पळत चालिले. ज्यांचे घोडियास जीव होता ते खंदक पार जाले. ते पाणिपत शहरांत गेले. तेथून जिकडे ज्यांस

५०. बखर लिहिणारा विनोदी होता असें दिसतें. अशा प्रसंगाच्या वेळा विनो-दशक्ति दर्शविणें जरा अप्रशस्त होय. मागें पृ० १०८ टीप ८९ पाहा.

५१ 'वस्तांचा ढोंग करून' तु० प्र०

जैसा मार्ग दृष्टीस पडला तैसे निघोन गेले. कितीएक गाड्या, छकडे, बायका [होत्या] खंदकांतून त्यांस निघावयाचें जालें नाहीं. [तीं] तेथेंच राहिलीं. गिलचे डोचकीं कापीत होते, तीं कापावयाचीं सोडून दिलीं. कोठवर कापितील ? कंटाळले. त्यांची हौस पूर्ण जाली. मोडली फौज दिल्लीच्या रोखें गेली. परकड कोणी कुरुक्षेत्राकडे आणि आडवी तिडवी गेली. ती कांहीं निभावली नाहीं: गिलचे यांजकडील लोक यांणीं पानिपत शहराची बंदोबस्ती करून खंदकांतील मालमत्ता लुटूं लागले. कितीएक बायका धरून नेल्या. कितीएकांनीं जीवेंच मारिल्या. तीच गत पुरुषांची केली.

प्रातःकाळच्या प्रहर दिवसानंतर झुंजास तोंड लागलें होतें तें तीन प्रहर हाणा ! हाणा ! मारा ! मारा ! हेंच जाहलें. पृथ्वीनें बहुत अशुद्ध प्राशन केलें. हिंदुमध्यें मागें याप्रमाणें युद्ध होऊन कत्तल जाहली नाहीं. या पुढें ही होणार नाहीं. तथापि भगवंताची करणी, कुल पृथ्वींतील लोक नेऊन त्या स्थानीं मारावे. हें कौतुक निर्माण झालें. मराठे लोक फौजांसुद्धां हाटोन कधीं ह्मणोन सरदार करीत होता ! त्याणें यागती अ णि खि ल्या होत्या [ ? ] आपल्या फौजां भोंवताला खंदक खणून कोणीही राहिले होते कीं काय ? उत्तम प्रकारें गांठ पडली तरि झुंज द्यावें नाहीं तरि पळोन जावें. हा मराठी धर्म पुरातन चालत आला आहे. तेणें करूनच पृथ्वीस पालाण घातलें होतें. तें सोडून अविंध धर्माचा अविलंब केला. तेणें करून समस्त पृथ्वीचे, दक्षिण प्रांतीचे बहुत लोक व बायका अमुप गैब जाल्या.* ईश्वर सत्ता प्रमाण. त्याणें बैंईगीस करावी. नानासाहेब व भाऊसाहेब ईश्वरी अंश, अवतार धरून कलियुगीं यांणीं चरित्र केलें.

यानंतर इकडे झुंज होतां होतां रात्र झाली. झुंज बंद जालें. हत्यारें राहिलीं. विश्वासराव यांच्या मुर्द्याचा हत्ती अंबारीसुद्धां सुजाउद्दौला याजकडे नेला होता. ते समयीं सुजाउद्दौला याजकडील उमरावगीर गोसावी ह्मणोन सरदारी करीत होता. त्याणें मोंगती आणखी तीन लक्ष रुपये देऊन विश्वासराव व तुकोजीशिंदे व संताजी वाघ व यशवंतराव पंवार असे चार मुर्दे सोडवून आपणाकडे ब्राह्मण व मराठे मिळवून त्यांस विधियुक्त अग्नि संस्कार करू-

५२. "खेती खनल" पाठांतर.

* लढण्याची मराठी रीत सोडून फिरंग्याच्या पद्धत स्वीकारल्यामुळें मराठे शाहीचा ऱ्हास झाला अशी मराठे लोकांची जी सर्वत्र समजूत तिचें हें वरील उद्गार व्यंजक होत.

५३. बैंगीस, बायगीस = [ ? ].

५४ मागें दत्ताजीचा मुरदा याणेंच सोडविला होता. मागें पृ० ७३ पाहा.

म मुर्दांचें दहन केलें. आणि अस्थी ही वाराणशीस रवाना केल्या. वरकड मोडकी फौज नाना पुरंदरे व बाजी हरी व अंताजी माणकेश्वर व मल्हारराव होळकर असे रात्रौ दिल्लीचे सुमारें चालले. परंतु तमाम लोकांची हिंमत हरली. गाईचे गौर[५५] जाले. रांडांनीं मारिलें तरी कोणी कोणास मिळेनासे जाले. रात्रौ दांडग्यांच्या हुलडींत अंताजी माणकेश्वर व बाजी हरी ठार जाले. त्यांचे मुर्दे देखील कोणी काढिले नाहींत. वेडावस्यासारिखीं माणसें जालीं. एवढाले श्रीमंत त्यांच्या गति याप्रकारच्या जाहल्या. ' कर्मणो गहना गतिः ' असें जाहलें.

मग कुतुबशाहा व समदखान कत्तलखान यांचे पुत्रांनीं पातशहास अर्ज केला कीं, " आम्हांस कत्तल करण्याची आज्ञा द्यावी. " असें म्हणतांच अबदुल अल्ली बोलिला कीं, " मारलियांस मारावें, यांत भूषण काय ? " असें ऐकून त्यांणीं मागती उत्तर केलें कीं, " आमचे बाप फौजेसुद्धां कुंजपुरियांत कत्तल केले. त्यांचा सूड उगवावा लागतो. " असें ऐकून अबदुल अल्ली बोलिला कीं, " येथून वीसां कोसांवरि चार घटिका कत्तल करणें, जास्ती न करणें. " असें ऐकल्यावर कुतुबशहाचे पुत्रानें सोनपतानजिक चार हजार मनुष्यांची कत्तल केली. तैसेच समदखान कत्तलखान याचे पुत्रानें बहादरगडानजिक येऊन पांच हजार मनुष्यांची कत्तल केली. पानपत शहरांतील दुसरे दिवशीं दरवाजे बंद करून पंधरा हजार धरिले. व खंदकांतीलही बंद[५६] धरिला. तेव्हां ताकीद जाली कीं, माणसांस न मारावें. माल मत्ता घेऊन सोडून द्यावें. त्याजवरून दुसरे दिवशीं कोणी मारिले नाहींत. बंद धरिला, तो वीस हजारपर्यंत आणिले. दोन दिसव लष्करांत होते. त्यास सुजाउद्दौला यानें गिलच्यास तीन लक्ष रुपये खंडणी देऊन धर्मार्थ बंद सोडवून दिले. रणांतही सुजाउद्दौला याणें शोध करून मातबर मातबर, ओळख ज्याची निघाली, त्यास नेऊन उत्तम गती केली. गिलच्यांचें लष्कर लुटीनें कुबेर झालें. घोड्यास कोणी पुसेनासें जालें. तेथें वरकड लूट कोण घेतो ? ज्यास गाढव प्राप्त नव्हतें त्यास हत्ती प्राप्त जाला!

त्याजवरि इकडील पळाचें वर्तमान. कितीएक घोड्यांचें सामर्थ्यें करून

---

५५. गाईचे गौर झाले = गौर=गोंवारी किंवा गौरखर = रानगाढव.

५६. बंद धरिला =बांधून ठेविलें, अटकेंत ठेविले.

५७ परंतु या प्रमाणें वागणूक झाली नाहीं दुसरे दिवशीं या पाडाव झालेल्या मराठे लोकांच्या दावणीच्या दावणी उभ्या करून त्यांस मूठभर फुटाणें व चुळकाभर पाणी देऊन त्यांची दुराणी लोकांनीं मोठ्या मोजेनें कत्तल केली ! ! यापेक्षा जास्त क्रौर्य दाखवून विशेष कलंक कोणतेंही लोकांच्यानें लावून घेववेल काय ?

दिल्लीस पांच सात हजार ज्यांस रस्ता सांपडला ते निघाले. त्यांस वाटेस दांडगियांनीं मारामार जागोजाग करून कितीएक लोकांचीं घोडीं घेऊन सोडिले. कितीएक जिवें मारिले. त्यामध्यें ज्यांच्या घोडियांस बराच जीव होता ते पांच हजार वांचून गुरुवारीं संध्याकाळीं चाळीस कोस दिल्लीस दाखल जाले. कितीएकांस दुसरा मार्ग सांपडला तेथें भकोन आडरानांत पडले. ते फिरत फिरत जिकडे भगवंतें वाट दिली तिकडे गेले. ज्यांचें आयुष्य बळकट होतें ते मात्र जगले. यानंतर पार्वतीबाई यांजपाशीं जानू भिंताड्या खिजमतगार होता. त्याणें व बारबेकर यानें पाठिशीं बांधून आणिलियावर घोडें थकलें. मग पिराजी रौंऊत होता त्यानें पाहतांच आपल्या घोडियावर बसवून सहा कोसपर्यंत आणिली. पुढें त्याचा घोडाही थकला. मग त्यानेंही उतरून ठेविली. पुन: जानू भिंताडा खिजमतगार याणें कोस आद कोस चालवीत आणिली. बळकट घोडियाचा मातबर कोणी भेटलियास त्याच्या घोडियावर बसवी. असें करीत करीत दिल्लीकडे तीन मजलांवर मल्हारराव होळकर व नाना पुरंदरे व कितीएक सरदार व पागेचे बारगीर, शिलेदार असे शेंपन्नास भेटले. त्यामध्यें येऊन मिळाली. बळवंतराव याचा पुत्र आपाराव तेंही निभावून आला. पार्वतीबाईचे चित्तांत कीं भतार दिल्लीस आला असेल. ह्मणोन बहुतच आशा होती. तों दिल्लीकडील मजकूर तरी बुधवारीं अष्टमीस तीन प्रहरपर्यंत लढाई होऊन मोड जाला. ते गुरुवारीं प्रातःकाळीं कितीएक पळोन आले. तेथें नारो शंकर व मीरखांन लेकवळा व बाळाजी पलांडे असे सहा सातशें किल्लियांत होते. व बाकीं हुजुरातीचीं पथकें लक्ष्मणराव गावडे व हिराजी शिल्के व तलखाजी बाधे व बापूजी रायाचें पथक व पर्वतराव कदम व गोविंदपंत बुंदेले यांचे पुत्र पांचशें स्वारांनिशीं असे तीन हजार होते. दिल्लीच्या किल्ल्यांत नारो शंकर होते. त्यांजपाशीं तेसमयीं चाळीस लक्ष रुपये खजीना होता. पार्वतीबाई दिल्ली नजीक आली तों भाऊसाहेब नाहीं ह्मणोन ऐकतांच आशेची निराशा जाली. पळोन तीन हजार जमले होते. ते बाहेर वाळवंटींत होते. तें त्यांस सर्वांस पळाचें वर्तमान कळलें. परंतु तहकीक कळेना. कदाचित् भाऊसाहेब दिल्लींत आले. अगोदर पळाले असे जाहलें. त्यास तोंड दाखवावेंयासि जागा नाहीं. यास्तव धीर धरून राहिले. देशांतील लष्कराचे उदमी कितेक

५८. 'पिराजी राऊत पुणतांबेकर' पाठांतर.

५९. 'तिरखा नबाब बाळाजीपंत असे सहा सात' घो० प्र०

६०. तहकीक=खरी हकीकत, पक्का मजकूर.

दिल्लींत जाऊन राहिले होते. त्यास लुटूं लागले. व मारूंही लागले. वाळवंटीस पथकें होतीं त्याणीं गुरुवारीं तिसरा प्रहरपर्यंत धीर धरून होते. मग इयां इयां करीत निघाले. नारो शंकर वगैरे किल्यांत होते ते गुरुवारीं संध्याकाळपर्यंत धीर धरून होते. कांहीं खजीना सरकारचा होता. तो अगोदरच कडेस लावून, बाहेरलीं पथकें व आपण एकत्र होऊन निघून गेले असते तरि निभावून जाते. तें न जालें. संध्याकाळीं गंगोबा तात्या होळकरांचे दिवाण पळतच दिल्लींत आले. नारो शंकर यांजकडे भोजन केलें. सविस्तर वर्तमान सांगितलें. "याजउपरि ज्यास जैसा भगवंत मार्ग देईल तैसें निघोन जावें. सुधा मार्ग दिसत नाहीं. तुम्ही डोळे झांकून काय बसलां?" असें नारो शंकर यांसि सांगितलें. आणि ते स्वार होऊन तैसेंच निघून गेले. तेव्हां अवसानें यांचीं गेलीं. खजिना काढावयास अनुकूळ पडेना. दिल्लींतील वाणी बकाल बायका देखील लष्कराच्या लोकांस मारूं लागले. गर्दी करून लुटूं लागले. शहरांत धूम बहुत झाली. तेव्हां जिवानिशीं मारामार करीत नारो शंकर वगैरे कुल झाडून निघाले. खजिना जाग्यावरच राहिला. अगोदर वाळवंटीं पथकें होतीं तीं निघोन फर्दाबादेस पोंचलीं आणि जीन उतरलें. नाना पुरंदरे व बाळकोबा नाना आणखीं शेपन्नास असे तेही आले. ते हे एकत्र होऊन तीन मजला आले. तों होळकराची व बायकांची गांठ पडली. तेथून मजल दरमजल लष्कर अकरावे दिवशीं भिंडीस दाखल जालें. इकडील वर्तमान. कितेकांस दिल्लीचा मार्ग सांपडला ते यांचे मागो माग दिल्लीस भिंडीवर आले. वाटेनें कितीक जिवें मारिलें. कितीएकांस लुटून सोडून दिलें. दिल्लीचा मार्ग न सांपडला आणि आड मार्गें भयानें [जे] गेले ते फिरत फिरत जातां जातां तीस च्याळीस हजार जमले. त्यांस पंचवीस पन्नास दांडगे मिळून घोडीं हिरोन घेईत. असा अनर्थ होऊन मातबर माणूस पाय उतारा जालें. बहुतांस अन्न कोठें न मिळे. मग अवघे जमून मथुरेस येऊन एक दिवस दम खाल्ला. तों हजारों हजार थोर थोर मनुष्य नागवे उघडे केवळ भणंग, कंगाल, अन्नरहित, वस्त्रानें रहित, कळाहीण चीलची भाजी खात आले. जातां जाटाच्या मुलखांत आले. तों जाट यांचें भय बहुत होतें. परंतु त्याणें हें वर्तमान ऐकून हिंदुधर्मास भिऊन, तमाम सांडणी स्वार पाठवून आपले मुलखांत ताकीद केली. "कोणास न छळितां ज्यास जैसें अनुकूल पडेल [तसें] त्यानें अन्न वस्त्रें द्यावीं" याप्रमाणें ताकीद जाली. वाटेस एक गांव मातबर होता. तेथें एका सावकारें भिक्षेस खंडीभर उडीद वाटले. तेथें एकएकांस दहा दहा दाणे वाटणीस आले.

मग दोन मण पिठाच्या भाकरी करून पैशा एवढा तुकडा वांटला. तेथें माणसांस एकएक वांटणीस आला. अशी भिक्षा घातली. अंगावरी वस्त्र नाहीं. ब्राह्मणांस तो अकरा दिवस अन्न मिळालें नाहीं. यांत पौष मास, थंडीचे दिवस, प्रावरणास एकंदर अंगावरीच कांहीं नाहीं. मातबर होते ते दीना प्रमाणें होऊन पंधराने दिवशीं भरतपुरास येऊन दाखल जाले. तेथें जाटाची बायको होती. तिणें धर्म बहुत केला. जागोजाग स्वार पाठवून पळाचे लोक आणविले. आणि भरतपुरास पावल्या तीस चाळीस हजार काढून सर्वत्रांत आठ रोजांचें अन्न [व] ब्राह्मण होते त्यांस निवडून नेऊन दूध पेढे वगैरे मिठाया दिल्या. असें एक दिवस फराळास घालून दर ब्राह्मणास पांच पांच रुपये नक्त व एक पागोटें व एक रजई व एक धोतर व आठ रोजांचा शिधा बहुत प्रकारचा इतकें देऊन शहरांत आराम व्हावयास राहून घेतलें. आणि शहरांत ताकीद केली, "ज्यास जसें अनुकूळ पडेल त्याणें [तसें पळाचे लोकांस] अन्न द्यावें. जेथें राहतील तेथें वस्तीस जागा द्यावी. कोणीं छळूं नये." अशी बहुतांस ताकीद करून, मातबर कोणी भेटेल त्यास घोडा बसावयास दिला. कोणास पालखी दिली. या प्रमाणें सर्वत्रांचा समाचार करून दहा लक्ष रुपये पर्यंत खर्च केले[६१]. तेणें करून बहुतेक लोक जगले. तेथून फिरोन पुढें येतां आम्हीकडे वाटेस दांडगे यांणीं प्रावरणें हिरोन घेतलीं. उघडे बोडके, पडत पडत भडेस [भिंडीस?] दाखल जाले. पार्वती बाई व होळकर व नानापुरंदरे असे होते तेथें सर्वत्र जमा जाले. तेथें पंधरा मुक्काम जाले. तेव्हां सुरजमल्ल जाट याणें रूपराम कटारी यान समागमें लक्ष रुपये व वस्त्रें मथुरेवर पाठवून दिलीं. तेथून मल्हारराव होळकर व नाना पुरंदरे व पार्वतीबाई एक महिना ग्वालेरीस जाऊन राहिले. पळाचे लोक आले. त्या सर्वत्रांस वस्त्रें व पांच रुपये खर्चास बाईनीं दिले. व नानापुरंदरे यांणीं तेथून बैरागी भाऊसाहेबांच्या शोधास पाठविले. परंतु भाऊसाहेबांचे कोठें ठिकाण लागलें नाहीं. घायाळ समशेर बहादर कुंभेरीस आला. तेथें सुरजमल्ल जाट याणें त्याची बहुत उठाठेव[६२] करून घोडीं व पालखी देऊन वाटेस लाविला. तो समशेरबहादर याणें "नानांस तोंड काय दाखवावें!" ह्मणोन भाऊ! भाऊ! असा शोक करून निधान पावला.

६१. जाटांनीं जी मदत या परम संकटाच्या वेळेस केली तिजबद्दल त्यांची वाखाणणी केली तेवढी थोडीच! सुरजमल्लाची इतकी अवधीरणा व अपमान भाऊनीं केला असतां निदान प्रसंगीं हें त्याचें वर्तन पाहून तर त्याची विशेष प्रशंसा करणें योग्य होय.

६२ उठाठेव=आदरसत्कार, संभ्रम.

यानंतर दोन चार रोजांनीं दुराणी ही मागें इकडे दिल्लीस पोंचला. तेव्हां इभ्राहिमखान गारदी रणांत घायाळ त्यांजकडे सांपडला होता. त्यास आपणाकडेस चाकरीस रहावें ह्मणोन रदबदली घातली. परंतु त्यास चाकरीस रहावयाचें अनुकूळ पडलें नाहीं. "भाऊसाहेब यांचे व आमचे वचनाचें इमान प्रमाण जालें आहे. यास्तव अशी गोष्ट आपणाकडून कदापि घडणार नाहीं." ह्मणोन साफच जाबसाल केला.

यावर इकडील मजकूर तरि पुण्याहून नानासाहेब पैठणावरि आले होते. तेथें आपलें लग्न [६३] केलें. आणि दादासाहेब यांजसमागमें कांहीं फौज देऊन निजामअलीच्या तोंडावरि रवाना केलें. आपण दहा बारा हजार फौजेनिशीं कूच करून वराडांत बाळापुरच्या प्रांताच्या रोखें येऊन उतरले. तेथें जानोजी भोंसले, सेनासाहेब सुभा, हे नानासाहेब यांस येऊन भेटले. त्यांचें बहुत प्रकारें समाधान करून हिंदुस्थानांत जावयासि समागमें घेतले. पांच सात हजारांनिशीं तेही सामील होऊन समागमें चालले. नानासाहेब यांजसमागमें बाबूजी नाईक बारामतीकर व गोपाळराव गोविंद व सदाशिव रामचंद्र व विठ्ठल विश्राम व यमाजी शिवदेव व खांसा स्वारी मळेगांव परगणे आडगांव प्रांत वऱ्हाड येथें दाखल जाले. तीन मुक्काम तेथें जालियावर मग पौषमासीं, शुक्लपक्षीं, हरि अण्णांचा [६४] निघण्याचा करार करून विंध्याद्री पर्वत येथील गोंडाचा राजा आणून त्यास वस्त्रें, अलंकार, कडीं, शिरपेच, बक्षीस देऊन समाधान करून चालिले. सातपुड्या पार होऊन नर्मदावरि मुक्काम केला. तेथून जानोजी भोंसले व हुजराती पथके खेचीवाडीकर बेइमान जाला होता, त्याच्या पारिपत्यास खेचवाडी मुलखांत पाठविले. नानासाहेब आपले फौजेसुद्धां मुक्कामावर होते. तेथें वर्तमान ऐकिलें कीं, पळाचे लोक उघडे बोडके आले. त्यांणीं श्रीमंतापाशीं सर्व सविस्तर वृत्तांत निवेदन केला. ते समयीं श्रीमंतानीं ऐकोन खेद बहुत केला. नानासाहेब यांचा निश्चय पूर्ण होता कीं, दिल्लीस आपण जाऊन गिलचाचें पारिपत्य करावें. अशी विचारणा करून बंदोबस्त केला होता. त्यांस सौभाग्यवती गोपिकाबाई यांणीं बहुत बोध करून माघारें फिरविलें. कूच करोन मजल दरमजल उतरून बऱ्हाणपुरास दाखल जाले. इकडील ग्वाल्हेरीहून पार्वतीबाई व नाना पुरंधरे वगैरे श्रीमंतास येऊन भेटले.

---

६३ नारोबा नाईक वाखरे पैठणकर ह्या देशस्थ गृहस्थाच्या कन्येशीं हें लग्न झालें. ह्या बाईचें नांव राधाबाई होतें.

६४. हे हरिअण्णा किंवा हरिआपा कोण ?

आणि साकल्य वर्तमान हिंदुस्थानांतील सांगितलें. मग पुढें बऱ्हाणपुराहून श्रीमंत नानासाहेब यांणीं भाऊ ! भाऊ ! ऐसा शोक करीत करीत जेवतां निजतां निजध्यास बहुतच करीत. कूच करून मजल दरमजल पुण्यास दाखल जाले. दादासाहेब निजाम अली याचा बंदोबस्त करून पुण्यास दाखल जाले. उभयतांच्या भेटी जाल्या.

नंतर दिवसेंदिवस भाऊसाहेबांच्या शोकें करून नानासाहेबांचें शरीर कृश झालें बुद्धिभ्रंश जाला. लोकांस शिव्यागाळी करूं लागले. कारभार विपरीत होऊं लागला. पुत्रशोक व बंधुशोक [परम कठीण !] श्रीरामचंद्रजी वनवासास गेलियावर मागें राजा दशरथास रघुनाथ-वियोगाचें दुःख होऊन राम ! राम ! ह्मणतां शोक करून प्राणत्याग केला. त्याप्रमाणें नानासाहेब भाऊसाहेबांच्या शोकें निधानास गेले. शके १६८३, वृषानाम संवत्सरे ज्येष्ठ वद्य स[६५]प्तमी, मंगळवारीं देवाज्ञा जाली. वैकुंठ-लोकास गेले.

नानासाहेब व भाऊसाहेब अवतारी पुरुष. उभयतांप्रमाणें मनुष्य लोकीं या मागें कोठेंही जाले नाहींत आणि पुढें ही होणें कठीण. उभयतांचा ऋणानुबंध कीं, एक मरतांच एकानें मरावें ! पूर्वी बाजीराव साहेब मुक्त जाहलियावरि सहा महिन्यांनीं चिमाजी आपा गेले. तैसेच भाऊसाहेब गैब झाल्यावर वर्तमान नानासाहेब यांणीं ऐकतांच साहा महिन्यांतच मृत्यु पावले. भाऊसाहेब मृत्यु पावले हें कोणीं ऐकिलें नाहीं व पाहिलें [६६]नाहीं. भगवंत इच्छे करून त्या कहरांतून पार पडून वांचून हरकएक कोठें असले तरि निर्माण [६७]होतील. बहुत भाऊ आहेत, परंतु श्रीमंत लोकांत यांजप्रमाणें भाऊपणा कोठें नाहीं. राम भरताची साम्यता !

नानासाहेब यांचें देहसार्थक यथाविधी करून राजश्री माधवराव बल्लाळ यांसि सातान्यास नेऊन मातुश्री ताराबाईसाहेब व राजाराम महाराज यांसि भेटवून त्यांजकडून मुखप्रधान असे शिक्के करवून वस्त्रें दिलीं. आणि निरोप देऊन वाटेस लाविलें.

याप्रमाणें वर्तमान जालें. नजीबखान प्यादा होता तो फर्जी जाला व त्यानें प्यादे[६८]भर्ति केली. याप्रमाणें ही हकीगत जाली त्याप्रमाणें विस्तार करून लिहिलें आहे. याची माहितगारी ते वेळचे कोणी अनुभवी

६५. अन्यत्र वद्य प्रतिपदा असें आढळतें. नानांचा काळ पर्वतीवर झाला.

६६. येथें पुणें प्रतीचा २०४ था बंद संपला. पुढील मजकूर शेवटपर्यंत धोपेश्वर प्रतींतून घेतला आहे.

६७. ह्या संशयरूप लेखावरून ही बखर ह्या लढाई नंतर लौकरच लिहिली असावी असें चांगलें अनुमान करतां येतें.

६८. मार्गे पृ० ४ टी० १ पहा.

असतील त्यांस मात्र ठाऊक. असा इतरांस दाखला पोंचणार नाहीं. आपण हिंदुस्थानचे आद्यंत वर्तमान लिहून द्यावें ह्मणोन आज्ञा केली होती. त्यास हें वर्तमान माहितगारांनीच लिहिलें पाहिजे. त्याजवरून विचारणा करून सेवेशीं लिहून विस्तारें ध्यानास आणावें आणि मनन करून मिथ्या असल्यास सोडून द्यावें आणि सत्य असेल तें जमेस धरावें. हें लिहून कळवावें असा विचार नाहीं. सेवेशीं कळावें. बहुत काय लिहिणें कृपालोभाची वृद्धि करावी हे विज्ञापना. हे खबर समाप्त. श्रीदत्तार्पणमस्तु. मिती जेष्ठ वद्य ७ शके १७८१ सिद्धार्थीनाम संवत्सरे ते दिवशीं सायंकाळीं लिहिली. लिहिणार विष्णु बापूजी निफाडकर राहणार धोपेश्वर, तालुके राजापूर. चुकली तरी क्षमा करावी हे विज्ञापना.

[तुंगार प्रत मागाहून मिळाली. तिचा आरंभ व शेवट खालीं दिले आहेत ]

## आरंभ.

"राजश्रियाविराजित रा० रा० गणेशपंत स्वामीचे सेवेशीं,

पोष्य चिंतामण गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागाईत पौष १२ मुक्काम दिल्ली इंद्रप्रहस्त जाणोन यथास्थित वर्तमान असे. विशेष आपण कृपा करून पत्र पाठविलें, लिहिला मजकूर विदीत जाला. पत्रीं आज्ञा जाली कीं, हिंदुस्थानांतील आदि अंती वर्तमान दक्षण देशीं हिंदुपद शाहु छत्रपती यांचा प्रधान मुख्य आदिकरून सवा लक्ष फौजेनिशीं भाऊशाई गर्दी होऊन फ्यादेमत कैशी झाली हें सविस्तर वर्तमान लिहावयास आज्ञा केली ऐशियास—"

## शेवट.

"हे बखर राजश्री राघो मल्हार कुळकर्णी तर्फ तुंगार, तळ प्रांत कर्नाळा तालुके वसई कर याची बखर असे. दरजामी पुणें येथें समाप्त केली. हस्ताक्षर मल्हार गोविंद पानसरे कसबे इंदापूर सन १२०१ सु॥ हिसने तिसेन मया [तैन] व अल्लफ शाके १७१२ विरोधिकृत् नामसंवत्सरे मिती मार्गशीर्ष वद्य ७ छ २० रविलाखर.

(समाप्त.)

६१. ह्या वर्षी म्हणजे सवाई माधवराव्यांच्या कारकीर्दीत या राघो मल्हारानें ही त पुण्यास करविली. यावरून ही ही खबर लढाई झाल्यावर लौकरच लिहिली असावी असें जें अनुमान त्यास बाध येत नाहीं.